म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ६२
१८२८

# [illegible]रत्नसंग्रह.

REFBK-0002828
REFBK-0002828

मराठी ग्रंथ

भारत इतिहास संशोधक मंडळ.



REFBK-0002828

श्रीसमर्थ रामदासस्वामी.

( भीमस्वामीचा मठ, तंजावर. )

॥ श्री ॥

# समर्थ-रत्न-संग्रह

अथवा

## समर्थ-वाङ्मयाचें नवनीत.

प्रस्तावना, समर्थांचें संक्षिप्त चरित्र व
कठिण शब्दांचे अर्थ यांसह

लेखक

सदाशिव खंडो आळतेकर, बी. ए.एल्एल्. बी.

कऱ्हाड

केल्यानें होत आहे रे। आधीं केलेंचि पाहिजे ॥
यत्न तो देव जाणावा। अंतरीं धरितां बरें ॥

समर्थ स्फुट प्रकरणें ३०-४.

महंतें महंत करावे। युक्तिबुद्धीनें भरावे ॥
जाणते करूनि विखरावे। नाना देशीं ॥

दासबोध. ११-१०-२१

आवृत्ति पहिली २००० प्रती

दासनवमी ९ शके १८४७

किंमत १। रुपया.

प्रकाशक-श्रीयुत रा. सदाशिव खंडो आळतेकर
बी. ए. एल् एल्. बी. कऱ्हाड.
मुद्रक—रा. गणेश काशिनाथ गोखले. सेक्रेटरी,
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५ शनिवार पेठ, पुणें शहर.
व
रा. वामन वासुदेव अतीतकर, बी. ए.
श्रीसमर्थ प्रसाद प्रेस तळेगांव दाभाडे,

प्रकाशकांनीं सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

ॐ

# प्रस्तावना.

उत्तिष्ठत ! जाग्रत !! प्राप्य वरान्निबोधत !!! कठोपनिषत् ३।१४ उठा! जागे व्हा!! आणि श्रेष्ठ महात्म्याकडे जाऊन ज्ञानप्राप्ति करून घ्या!!! ( व त्याप्रमाणें आचरण ठेवा. )

(१) गतवर्षी विजयादशमीच्या सुमुहूर्तावर मुलभदासबोध अथवा समर्थांच्याच भाषेंत दासबोधाचें सार हा ग्रंथ महाराष्ट्रांतील वाचकांना सादर केला होता. " समर्थ–रत्न–संग्रह " अथवा " समर्थ वाङ्मयाचें नवनीत " हा ग्रंथ ही या वर्षी विजयादशमीस प्रसिद्ध व्हावा या हेतूनें सर्व हस्तलिखित ग्रंथ श्रावण शुद्ध पंचमीसच मुद्रकांच्या हातीं दिला होता. परंतु कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें विजयादशमीस ग्रंथ प्रसिद्ध न होतां दास नवमी पर्यंत वाट पाहावी लागली. समर्थ–रत्न–संग्रह समर्थांच्या प्रयाण तिथीस प्रसिद्ध होण्यांत ही एक प्रकारचें औचित्य आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल.

(२) कर्तव्य मूढ झालेला महाराष्ट्र दासबोधवाचनानें कर्तव्यपर व्हावा, साक्षर महाराष्ट्राचें–विशेषतः प्रौढ विद्यार्थी–व स्त्रिया यांचें लक्ष्य दासबोधांतील अत्युत्तम शिकवणीकडे लागून महाराष्ट्रातील जनते-

मध्यें चैतन्य उत्पन्न होऊन ती कर्तव्यनिष्ठ व्हावी या हेतूनें सुलभ दासबोध प्रसिद्ध केला होता. समर्थ—रत्नसंग्रह अथवा समर्थ–वाङ्मयाचें नवनीत प्रसिद्ध करण्यमध्यें ही तोच हेतु आहे. खुद्द समर्थांचा दासबोध लिहिण्यांत जो हेतू होता तोच इतर सर्व वाङ्मय लिहिण्यांत होता.

दासबोधेतर समर्थ वाङ्मय दासबोधाचा स्पष्टीकरणार्थ आहे हें सर्व समर्थ वाङ्मय वाचणाऱ्यांच्या तेव्हांच लक्षांत येईल. समर्थांना निद्रिस्त व कर्तव्यमूढ झालेला महाराष्ट्र जागा करावयाचा होता. बारा वर्षे तीर्थयात्रा करीतं असतांना लोकांची हीन स्थिति पाहून समर्थांचें अंतःकरण किती विव्हळ झालें होतें हें त्यांच्या ग्रंथांतील कांहीं भागावरून स्पष्ट दिसून येते. लोकांना केवळ अध्यात्म ज्ञान शिकवून देशाची स्थिती सुधारणार नाहीं म्हणून समर्थांनीं अध्यात्म ज्ञानाबरोबरच नीति-न्याय युक्त यथार्थ व्यवहारज्ञानाची व राजकरणाची ही शिकवण आपल्या वाङ्मयांत घालून दिली आहे. अध्यात्मज्ञान व व्यवहार ऊर्फ राजकारण यांची सांगड जशी दासबोधांत घालून दिली आहे, तशी दासबोधेतर वाङ्मयांतही दिली आहे.

( ३ ) समर्थ वाङ्मय व महाराष्ट्रांतील इतर साधुसंतांचें वाङ्मय यामध्यें एक विशिष्ट प्रकारचा भेद आहे. श्रीज्ञानदेव, नामदेव, एकनाथ तुकाराम प्रभृति साधुश्रेष्ठांनीं आपल्या अधिकार युक्त वाणीनें व आचरणानें महाराष्ट्रीयांना सदुपदेश करून धर्मनीति-सदाचरणाचा मार्ग दाखविला होता. समर्थांनींही आपल्या ग्रंथांत आपल्या अधिकारयुक्त व तेजस्वी वाणीनें धर्मनीति सदाचरणाचा मार्गच आचरण्यास शिकविलें आहे. नित्यनैमित्तिकामध्यें सुद्धां समर्थ म्हणतातः—रामीं रामदास कवी । न्याय-नीतीनें शिकवी ॥ समर्थपूर्व व समर्थकालीन साधु-श्रेष्ठांचा भर निवृत्ति मार्गावर विशेष दिसून येतो. समर्थांची शिकवण निवृत्तिपूर्वक प्रवृत्ति मार्गाची आहे. " प्रवृत्ति सासरे । निवृत्ति माहेर ॥ तेथें निरंतर । मन माझें ॥ स्फुट ओव्या. वामन पंडित व मोरोपंत या गृहस्थाश्रमी कविश्रेष्ठांचा ही कल निवृत्तिमार्गा-कडे विशेष दिसून येतो. वामन पंडित समर्थकालीन असून त्यांच्या काव्यांत राजकारणाचा गंधही दिसून येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर तत्कालीन शोचनीय समाज स्थितीचें हृदयद्रावक वर्णन पंडितांच्या का-व्यांत कोठेंही आढळून येत नाहीं. मोरोपंत मराठी

साम्राज्याच्या माध्यान्हकालीं हयात होते. रामायण महाभारतांतील तेजस्वी युद्ध प्रसंगाची अनेक हृदयंगम वर्णनें पंताच्या काव्यपटु लेखणींतुन उत्कृष्ट उतरलीं आहेत. परंतु ज्या रामायण महाभारतांतील युद्ध कथाश्रवणानें शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची स्फूर्ति झाली त्या रामायण महाभारतांतील वीर रसाचें वर्णन करतांना पंतांनीं स्वतःच्या कालांतील कुरुक्षेत्रांतील युद्धाचा व साम्राज्याकरितां लढणाऱ्या मराठे वीरांच्या वीररसाचा उल्लेख केलेला आढळून येत नाहीं. रामायण भारतादि संस्कृत ग्रंथावर मराठींत काव्यें लिहिण्याचा पंतांचा उद्देश केवळ निवृत्तिपर होता. भारताच्या प्रारंभीं पंत म्हणतातः—हरि ज्यांचा कैवारी त्या पांडुसुतांसी वंदितों भावें। वाटे चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें ॥ पंतांची काव्यकुशल लेखणी भारतांवर उत्कृष्ट काव्य करावयास सरसावली ती महाराष्ट्रांमध्यें वीररस उत्पन्न करण्याकरितां नव्हे तर आपला उद्धार व्हावा या हेतुनें. रामायण भारतादि काव्यें मातृभाषेंत लिहिण्याचा पंतांचा हेतु उदात्त होता परंतु रामायण लिहिण्याचा समर्थांचा हेतु उदात्ततर होता. सुंदरकांड आणि युद्ध कांड या दोन कांडांवरच समर्थांनीं काव्य केलें आहे;

यावरूनही समर्थांच्या काव्याचें वैशिष्ट्य दिसून येते. करुणाष्टकांतील स्फूट श्लोकांच्या अखेरीस राघवाचा महोत्सव करण्यास जनतेस उपदेश करतांनासुद्धां समर्थांच्या वाणींतून वीररस कसा वाहतो तें पहा:—

जया यत्न फावेल तेणें करावा। महोत्सव या राघवाचा भरावा॥ महायत्न देखोनियां काळ धाके। प्रतापें बळें वाजवावे तडाखे॥.

(४) "ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग" असें श्रीमद्भवद्गीतेचें रहस्य लो. टिळकांनीं थोडक्यांत काढलें आहे. दासबोधाचें रहस्य थोडक्यांत सांगणें झाल्यास "धर्ममूलक विवेक—वैराग्य प्रधान प्रयत्न-वाद" असें सांगतां येईल असें मी सुलभ दास-बोधाच्या प्रस्तावनेंत म्हटलें होतें. सुप्रसिद्ध समर्थ वाङ्मय—भक्त श्रीयुत शंकर श्रीकृष्ण देव यांना माझें म्हणणें पटलें याबद्दल मला आनंद वाटतो. दासबोध-रहस्यास "महाराष्ट्र—धर्म" असें दुसरेंही यथार्थ नांव श्रीयुत शंकररावजी यांनी सुचविलें आहे. समर्थांचें सर्व वाङ्मय सूक्ष्म रीतीनें वाचल्यास दासबोधा प्रमाणेंच समर्थ्यांच्या दास बोधेतर वाङ्मयाचें रहस्य धर्म मूलक विवेकवैराग्यप्रधान प्रयत्नवादच आहे असें चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत येईल. राम मंत्राच्या

श्लोकांच्या स्फुट काव्या शिवाय समर्थांचा कोणताही ग्रंथ घेतला तरी वरील विधानाची सत्यता दिसून येते. प्रातःकाळीं शांत वेळीं म्हणण्याच्या भूपाळ्या मध्यें सुद्धां समर्थ म्हणतातः---राम विवेकाचे घरीं। भक्तीवरी सांपडे ॥ १ ॥ विवेक—वैराग्य सोडीना। कर्म मर्यादा सांडीना। रामी रामदास कवी। न्यायनीतीनें शिकवी ॥ २ ॥ ओव्या शतकांत समर्थ म्हणतात. क्रियावंत साधु विवेकीं विरक्ती। तोचि तो लौकिकीं मान्य आहे ॥ ( शतक ३ ) वैराग्यावांचूनी सर्व खंडे ज्ञान। त्यागाचें लक्षण तेथें नाहीं ॥ ( शतक ४ ) मीपणाचें मूळ शोधितां सूटलें। विवेकें सूटलें मायाजाळ ( श. ७ ) प्रयत्न आहे थोर पहावा विचार येणें पैलपार पाविजे तो ॥ १ ॥ होत नाहीं प्रयत्नें ऐसें काय आहे। विचारुनी पाहे आलया रे ॥ २ ॥ सर्व कांहीं प्रयत्न केलियानें होतें। आळशी पडतो सावकाश ॥ ३ ॥ प्रयत्न झाला आधीं म्हणोनिया थोर। प्रारब्ध विकार ऐलिकडे ॥ ३ ॥ (शतक. १३) ओव्या शतक तेरा हे फार हृदयंगम आहे. यांत समर्थांनीं प्रारब्धवाद आणि प्रयत्नवाद यांचें उत्कृष्ट विवेचन करून प्रयत्नवादास प्रधानत्व दिलें आहे. स्फुट ओव्यांत समर्थ म्हणतातः—भाग्यवंत नर यत्नास

तत्पर । अखंड विचार चाळणेचा ॥ २३ ॥ असों द्यावा सदा सन्निध विवेक । तेणें देव एक चोजवेल ॥ २४ ॥ धन्य तोचि एक संसारीं पाहतां । विवेकें अनंता ठायीं पाडी ॥ ३२ ॥ विचारणा सार । विचारें उद्धार । साधु योगेश्वर विचारेंचि ॥ ५३ ॥ विचारेंचि मनीं होतसे सार्थक । धन्य हा विवेक । दास म्हणे ॥ ५४ ॥ स्फुट प्रकरणांत समर्थ म्हणतातः—

यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेवीण दरिद्रता ॥ १ ॥ आळशी घातघेणा तो । कष्टला म्हणजे बरा ॥ ३ ॥ भाग्यासी काय ऊणे रे । यत्नावांचूनि राहिलें ॥ यत्न तो करावा कैसा । हेंचि आधीं कळेचिना ॥ ४ ॥ भाग्य हें चुकतां जातें । आळसें काम नासतें ॥ ५ ॥ कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळचि पाविजे ॥ ६ ॥ आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्मांड भोगवी ॥ ७ ॥ केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ॥ यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरतां बरें ॥ ८ । अचूक यत्न तो देवो । चूकणें दैत्य जाणिजे ॥ ८ ॥ शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ॥

(५) वरील उताऱ्यावरून समर्थांचा विवेक वैराग्य—व प्रयत्न यांवर किती कटाक्ष आहे, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. "यत्न तो देव जाणावा"

असें म्हणण्यांत प्रयत्नवादाच्या श्रेष्ठत्वाची सीमा झाली. स्वच्छतेची योग्यता जनतेला पटविण्याकरितां एका आंग्ल ग्रंथकारानें cleanliness is next to Godliness. म्हणजे स्वच्छता ही देवत्वाच्या खालोखाल आहे, असें स्वच्छतेचें वर्णन केलें आहे. परंतु कर्तव्यमूढ झालेल्या महाराष्ट्रास कर्तव्यपर करण्या करितां समर्थांनीं यत्नास देवच बनविलें आहे !! प्रयत्नवादाचें इतकें महत्व इतरत्र क्वचितच सांपडेल. परंतु मनुष्य नुसता प्रयत्न करण्यास प्रवृत्त होऊन उपयोगी नाहीं. प्रयत्न योग्य दिशेनें झाला तरच इष्ट फलप्राप्ति होईल. म्हणून समर्थ इषारा देतातः—अचूक यत्न तो देवो। चुकणें दैत्य जाणिजे ॥ कोणत्या दिशेनें यत्न केल्यास कार्यसिद्धि होईल हें कळणें सोपें नाहीं म्हणून समर्थ जाणत्याची संगत धरण्यास सांगतातः—जाणता बोलेल तैसें बोलावें। जाणता सांगेल तैसें चालावें ॥ जाणत्याचें ध्यान धावें। नाना प्रकारीं ॥ १ ॥ जाणत्याचें पेच जाणावें। जाणत्याचें पीळ उकलावें। जाणता राखेल तैसें राखावे। लोक राजी ॥२॥ जाणत्याचें धूर्तपण। जाणत्याचें राजकारण ॥ जाणत्याचें निरूपण। ऐकत जावें ॥ ३ ॥ दासबोध (द. १८ स. २) जनीं

जाणता पाय त्याचे धरावे ॥ म० श्लोक ॥ १४१ ॥ वरील उताऱ्यांवरून वाचकांच्या लक्षांत तेव्हांच येईल कीं नुसता आळस टाकून प्रयत्न सुरू केला म्हणजे कार्यभाग झाला असें नाहीं; तर प्रयत्न सुरू करतांना जाणत्याचें शिष्यत्व पत्करून विवेकानें अचूक यत्न करण्यास शिकलें पाहिजे. मनाच्या श्लोकासारख्या लहान ग्रंथांत सुद्धां विवेक वैराग्यावर समर्थांचा किती कटाक्ष आहे तो पहाः—विवेकें सदा सस्वरूपीं भरावें ॥ १० ॥ विवेकें कुडी कल्पना पालटीजे ॥ १३ ॥ विवेकें त्यजावा अनाचार हेवा ॥ ६९ ॥ विरक्तिबळें निंद्य सर्वै त्यजावें॥८८॥वढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं ॥२०५॥ तेव्हां जाणत्यापाशीं अचूक यत्न शिकल्यावर सुद्धां विवेक वैराग्याचें किती महत्व आहे हें वरील उताऱ्यावरून दिसून येईल.

(६) परंतु अचूक यत्य व विवेक वैराग्य येवढ्यानेंच इष्ट फलप्राप्ती होईल असा वृथा अभिमान मनुष्यानें बाळगूं नये म्हणून समर्थ म्हणतातः—सामर्थ्य आहे चळवळीचें जो जो करील त्याचें । परंतु तेथें भगवंताचें । अधिष्टान पाहिजे ॥ ( द. १९. स. ९ ) आपल्या सर्व-चळवळी—सर्व प्रयत्न परमेश्वरावर विश्वास ठेवून केले पाहिजेत. प्रथमतः अपयश

आल्यास निराश न होतां साध्य प्राप्ती होईपर्यंत परमेश्वरावर विश्वास ठेवून कर्तव्य म्हणून प्रयत्न केला पाहिजे. गीतारहस्यकारांच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास केवळ कर्तव्य म्हणून व्यावहारिक अगर पारमार्थिक फलप्राप्तीच्या साधनास प्रयान सुरू केला पाहिजे. एकदां—दोनदांच नव्हे तर अनेकदां अपयश हें पुढें वाढून ठेवलेलें असतें असा इतिहासाचा अनुभव आहे. एकदां दोनदां ठेंच लागल्यावर सा. मान्य मनुष्य माघार घेऊन स्वस्थ बसतो' परंतु विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः। प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥ या भर्तृहरीच्या प्रसिद्ध सुभाषिताप्रमाणें अंगीकृत कार्यामध्यें कितीही विघ्नें आलीं तरी हताश न होतां इष्टफलप्राप्ती पर्यंत सतत उद्योग करून " उत्तम जना " ची पदवी महाराष्ट्र जनतेनें पटकावली पाहिजे. असें होण्यास विवेक—वैराग्य युक्त प्रयत्नास परमेश्वर कृपेची जोड पाहिजे म्हणजे विघ्नें तेव्हांच दूर होतात. समर्थ म्हणतात:—मनीं धरावें तें होतें। विघ्न अवघेंचि नासोन जातें। कृपा केलिया रघुनाथें। प्रचीत येते ॥ दासबोध ६-७-१९. रघुनाथ स्मरोनि कार्य करावें। तें तात्काळाचि सिध्दि पावे। कर्ता राम हें असावें। अभ्यंतरी ॥ ६-७-२१

( ७ ) दासबोध हा ग्रंथ ओवीबद्ध आहे. दासबोधेतर वाङ्मयामध्यें ओव्याशतें व स्फुट ओव्या हे दोन ग्रंथ प्रामुख्यानें ओवीबद्ध आहेत बाकी बहुतेक सर्व ग्रंथ श्लोकबद्ध आहेत, भुजंगप्रयात, अनुष्टुप् प्रणालिका हीं समर्थांचीं आवडतीं वृत्तें दिसतात. मनाचे श्लोक, राममंत्राचे श्लोक, रामायण हे सर्व ग्रंथ भुजंगप्रयात वृत्तांत आहेत. स्फुट प्रकरणें षड्रिपु पंचीकरणादि लघु प्रकरणें अनुष्टुप छंदांत आहेत. स्फुट श्लोक हें प्रकरण प्रणालिका वृत्तांत आहे. करुणाष्टकामध्यें मात्र वृत्त-बाहुल्य दिसून येतें. यांत महिम्न धाटीचे शंभर श्लोक शिखरिणी वृत्तांत आहेत. कांहीं श्लोक मलिनी, वसंततिलका व शार्दूल विक्रीडित वृत्तांत आहेत. यांत कांहीं धाट्या सवाया ही आहेत. समर्थांची कांहीं कविता अभंगांतही आहे. " पंचकें " हें प्रकरण बहुतेक अभंगांत आहे. समर्थांनीं भूपाळ्या आरत्या व पदेंही केलीं आहेत. क्वचित् प्रसंगीं समर्थांनीं हिंदुस्थानींतही पदें केलीं आहेत. समर्थ वाङ्मयांत क्वचित् प्रसंगीं हिंदुस्थानी शब्द ही आढळतात.

(९) समर्थांच्या श्लोकबद्ध वाङ्मयामध्यें वृत्तशास्त्राचे नियम सर्वत्र तंतोतंत पाळलेले दिसून येत नाहींत. समर्थांचा मुख्य हेतू कर्तव्यमूढ समाजामध्यें

चैतन्य उत्पन्न करून त्याला कर्तव्यपर करण्याचा होता. जसी ज्या वेळीं सद्विचाराची स्फूर्ति होई तशी त्यावेळीं त्या वेळीं त्यांच्या वाणीतून काव्यदेवता बाहेर पडे. समर्थांना छंदशास्त्राचें ज्ञान चांगलें होतें, असें त्यांच्या श्लोकबद्ध वाङ्मयावरून दिसतें. परंतु काव्य-स्फूर्ति उत्पन्न झाल्यावर श्लोकबद्ध काव्य करतांना त्यांनीं ऱ्हस्वाचें दीर्घ व दीर्घाचें ऱ्हस्व करून काव्य-स्फूर्ति थांबविण्यापलीकडे छंदशास्त्राच्या नियमाकडे लक्ष्य दिलेलें दिसून येत नाहीं. करुणाष्टकांतील "स्फूर्ति" प्रकरणांत समर्थ म्हणतात. उठे मारुती वेळ नाहीं उडाया। तयाचे परीं स्फूर्ति दे रामराया ॥ मारुतीच्या उड्डाणाप्रमाणें समर्थांचें काव्यस्फूर्तिरूप उड्डाण सुरू झाल्यावर विचार–स्फूर्ति थांबवून छंद शास्त्राच्या नियमाकडे समर्थांनीं वामन पंडित व मोरोपंताप्रमाणॅ लक्ष्य दिलेलें नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें ऱ्हस्वाचें दीर्घ अगर दीर्घाचें ऱ्हस्व करून वृत्तनियम साधत असतील तर तसें करण्याची संधि मात्र समर्थांनीं दवडली नाहीं. उदाहरणार्थः––सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं ॥ कृपा भाकिता दधिली भेटि जेणें॥ जना जल्प वीकल्प तोही त्यजावा ॥ १ ॥ मने काल्पिला वीषयो सोडवावा ॥ १ ॥ म्हणे दास संदेह

तो वीसरावा ॥ वरील उदाहरणें मनाच्या श्लोकांतील आहेत. आतां कांहीं उदाहरणें करुणाष्टकांतील देतोंः— रविकुल टिळका रे हीत माझें करावें ॥१॥ दिनाचें उणें दीसतां लाज कोणा ॥ १ ॥ तुझे गूण गातां मनासी रहावें ॥ १ ॥ वीसरू पडतो पोटीं बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥ म्हणे दास ऊदास झालों दयाळा ॥ १ ॥ रघुविर गुण गातां वाणि हे नित्य रंगो ॥ १ ॥ इ० ऱ्हस्व दीर्घ बदलून छंद् शास्त्राच्या नियमाकडे लक्ष दिल्याचीं समर्थांच्या वाङ्मयांत शेंकडों उदाहरणें आहेत. रामायणांत विर शब्दाबद्दल विर पुष्कळ ठिकाणीं घातला आहे. क्वचित प्रसंगीं एखादा शब्द गाळून अगर बदलून छंद शास्त्राला मान दिल्याचें आढळून येतें:—नव्हे धीर नैनीं ( नयनीं ) सदा नीर लोटे। यजि पति जगतीचा नाथ योध्यापुरीचा ( अयोध्या पुरीचा ) लंकानाथा बद्दल लंकनाथ, किरणा बद्दल कीर्णे, तरतील बद्दल तर्तील, न बोलावे बद्दल नोबलावे न आणितां बद्दल नाणिता असे शब्द घालून वृत्त नियम पाळले आहेत.

( १० ) ऱ्हस्व दीर्घ बदलून छंद शास्त्राचे नियम पाळण्याकडे समर्थांनीं लक्ष्य पुरविल्याची वर उदाहरणें दिलीं आहेत. असें असतां कल्याणस्वामीच्या

बाडाबरहुकूम श्रीयुत देवांनीं छापलेल्या करुणाष्टका-मध्यें पुढील प्रमाणें अनेक उदाहरणें आढळून येतातः—तनुमनु धनु माझें राघवा रूप तुझें ।... प्रचलित न करावी सर्वथा बुधि माझी । अचळ भजन लीला लागली आस तुझी ॥ १४८।४ ॥ याच्या वरीलच श्लोकामध्यें रविकुळ टिळका रे हीत माझें करावें ॥ १४७. ३ ॥ असें आहे.

तिसऱ्या श्लोकांत वृत्ताचे नियम पाळण्याकरितां हितचें हीत करणारे समर्थ चवथ्या श्लोकांत तुझें चे तूझें करण्यास विसरतील हें संभवत नाहीं. त्याच प्रमाणें शुद्ध संस्कृत शब्द बुद्धि लिहून वृत्ताचे नियम पाळण्यांत येत असतां बुधि लिहितील हें ही संभ-वत नाहीं. समर्थ वाङ्मयामध्यें बुधि, शुधि, उघरावें, चीत, दुश्चीत इत्यादि पाठ लेखकाच्या हयगयीमुळें अगर गडबडीमुळें पडले असावेत असें वाटतें. त्याचप्रमाणें आचपळ आगणित, आवचट इत्यादि अशुद्ध पाठ पडून छंदोभंग झाला आहे. उदाहर-णार्थः—आचपळ प्रणवातें उन्मनी मुक्ति दाते ॥ ( १५४.६ करुणाष्टकें ). अचपळ हा व्याकरणशुद्ध शब्द लिहून वृत्तशास्त्राचे नियम पाळले जात असतां मुद्दाम आचपळ हा अशुद्ध लिहून समर्थ वृत्त

शास्त्राच्या नियमांचा भंग करतील हें संभवत नाहीं. आगणित आवचट इत्यादि अनेक शब्द हे लेखकाच्या हयगयीनें अगर अज्ञानानें पडलेले असावेत असें वाटतें. तेव्हां दासबोधाप्रमाणें इतर समर्थ–वाङ्मय हीं निरनिराळ्या वेळीं व ठिकाणीं समर्थांनीं प्रथम निरनिराळ्या शिष्यांस लिहिण्यास सांगितलें व त्यांचा बौद्धिक दर्जा सारखा नसल्यानें क्वचित्प्रसंगी हयगयीनें व गडबडीनें पुष्कळ व्याकरण-अशुद्ध शब्द समर्थ वाङ्मयांत पडलेले आहेत. "छंद" बद्दल छेद चुकून पडले असावे अशी श्रीयुत देवाची टीप आहे, त्याचप्रमाणें वंशाबद्दल वौश, मत्सराबद्दल मत्छर, माशाबद्दल मौशा पृष्टभागाबद्दल पुष्टिभाग वेश्याबद्दल वैशा असे अनेक शब्द प्रथम लेखाच्या हयगयीमुळें अगर गडबडीमुळें चुकून पडले आहेत. मढें मठांतील करुणाष्टकाची दुसरी एक प्रत श्रीयुत देवांना मिळाली आहे. त्यांतील पाठभेद निराळे आहेत. दोन्ही प्रती समर्थांच्या प्रमुख शिष्यांच्या असतां पाठभेद कां असावे याचे श्रीयुत देवांप्रमाणें इतरांनाही आश्चर्य वाटणें साहजिकच आहे. समर्थ–रत्नसंग्रहांत कांहीं पाठ मढें मठांतील प्रतींतून घेतले आहेत. तेथें खालीं टीपेंत म. पा. म्हणजे मढें पाठ

असें लिहिलें आहे. कल्याणस्वामींच्या बाडांतील पाठा बद्दल टीपेंत क. पा. असें संक्षिप्त लिहिलें आहे. बऱ्याच ठिकाणीं मढें मठांतील पाठ शब्द सरस आहेतः—रामीं मिळाली अती धन्य झाली । वेश्या वैकुंठा न पढोन गेली ॥ १३४.२६ कष्टणाष्टकें. कल्याणप्रतींत वैशा हा अशुद्ध पाठ आहे. समर्थ—रत्न-संग्रहांत शुद्ध शब्द घालण्यांत आले आहेत. समर्थ—रत्न—संग्रहास निरनिराळ्या ग्रंथकारांनीं प्रसिद्ध केलेल्या साग्र समर्थ—ग्रंथांची मदत घ्यावी लागली आहे त्याबद्दल त्या सर्वांचा मी फार ऋणी आहे.

( ११ ) परंतु सर्व ग्रंथकारांमध्यें धुळ्याचे प्रसिद्ध समर्थ वाङ्मय प्रसारक श्रीयुत शंकर श्रीकृष्ण देव यांचा मी फार ऋणी आहे. समर्थ वाङमयाकडे माझें लक्ष्य श्रीयुत देवांनीं प्रथम प्रसिद्ध केलेल्या ग्रंथराज दासबोधांतील उत्कृष्ट प्रस्तावनेवरून केले. समर्थांचें व समर्थ शिष्याचें वाङमय प्रसिद्ध करून श्री देव यांनीं महाराष्ट्राला अत्यंत ऋणी करून ठेविले आहे. परंतु साक्षर महाराष्ट्राने श्रीयूत देवांच्या अनुपम श्रमाचे म्हणावे तसे चीज केलें नाहीं. सर्व साक्षर महाराष्ट्रि-याच्या घरांमध्यें समर्थ वाङमयाची श्रवण-मनन-निदि-ध्यास दिसून आला पाहिजे. परंतु खेदाची गोष्ट ही

कीं कित्येक पदवीधर गृहस्थांच्या घरामध्यें सुद्धां समर्थ वाङमय आढळून येत नाहीं. कित्येकांच्या घरांत समर्थ वाङमयाचीं कांहीं पुस्तकें आढळून येतात पण तीं कपाटांत धूळ खात पडलेलीं आहेत. मनोरंजक व उत्तान शृंगाररस प्रधान कादंबऱ्या व नाटकें, अपशब्द व ग्राम्यविनोद प्रधान साप्ताहिकें व प्रात्याहिके वाचण्यांत व पत्ते खेळण्यात तासांचे तास ज्यांचे जातात त्यांना तेजस्वी समर्थ वाङमय वाचण्यास व आपल्या मुलांना शिकविण्यास वेळ सांपडू नये हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय. कठोर बोलल्याबद्दल महाराष्ट्रांतील साक्षर जनता माझेवर रागावेल हें मी जाणून आहें. परंतु समर्थच म्हण-तातः—न्यायें निष्ठुर बोलणें । बहुतांस वाटे कंटाळ-वणें मळमळ करितां जेवणें । विहित नव्हे ॥ १२-७-११। साक्षर महाराष्ट्र जनता रागानें तरी जागी होऊन समर्थ-वाङ्मय वांचून कर्तव्यपर झाल्यास मी त्यांचा राग आनंदानें सहन करीन. क्रोधोपि निर्मलधियां स्पृहणीय एव.

( १२ ) समर्थ-रत्न-संग्रह ऊर्फ समर्थ-वाङ्मयाचें नवनीत लिहिण्याची कल्पना मला श्रीयुत शंकररावजी देवांच्या करुणाष्टकांतील प्रस्तावनेवरून सुचली. प्रस्ता-

वना पान १४ " श्रीसमर्थांच्या काहीं इच्छा " या सदराखालीं श्रीयुत देव म्हणतातः—"दासबोध, मनाचे श्लोक, श्रीसमर्थांची कविता-मालेंतील तिसरा भाग, हीं करुणाष्टकें, आत्मारामादि स्फूट प्रकरणें, असंख्य पदें पदांतरे इत्यादि श्रीसमर्थ वाङ्मयांतून समर्थांच्या इच्छा काय होत्या त्या निवडून काढून त्यांचा कोणी एखाद्यानें सुंदर हार गुंफला तर तो निःसंशय फार मनोहर होईल. असा हार कोणी तरी गुंफुन श्रीसमर्थांच्या कंठीं घालावा! त्यांचा सुगंध सांप्रदायिकांना प्रसन्न करील, तो नुसता पाहून ही त्यांच्या नेत्रांना आल्हाद वाटेल!" श्रीयुत शंकररावांच्या इच्छेप्रमाणें मी समर्थ–रत्न–संग्रह रूपीं हार तयार केला आहे. परंतु श्री शंकररावांच्या इच्छेप्रमाणें तो मनोहर झाला आहे, कीं नाहीं याची मला शंका आहे. वकिली सोडल्या पासून श्रीसमर्थवाङ्मय वाचण्यास पुष्कळ वेळ सांपडतो हें मी मोठें भाग्य समजतों. परंतु कांहीं सार्वजनिक कामाकरितां नित्य फिरावें लागल्यामुळें समर्थ रत्न–संग्रहाची अखेर लिखिते ( प्रुफें ) तपासण्याचे काम वेळेवर व व्हावें तसें झालें नाहीं याबद्दल माझा नाइलाज आहे. तरी छापल्यावर ग्रंथ पुन्हा वाचून शुद्धिपत्र जोडलें आहे.

त्या प्रमाणें दुरुस्ति करून ग्रंथ वाचावा अशी वाचकांना माझी नम्र विनंति आहे.

(१३) सुलभ दासबोधाला आश्रय देऊन महाराष्ट्र जनतेनें ज्याप्रमाणें माझ्या श्रमाचें चीज केलें म्हणजे बऱ्याच साक्षर महाराष्ट्रियांचें दासबोध वाचनाकडे लक्ष्य गेलें त्याप्रमाणें समर्थ–रत्न–संग्रहास ही महाराष्ट्रजनता आश्रय देईल व समर्थ–वाङ्मयाचें वाचन मनन–निदिध्यास करून महाराष्ट्राचा उद्धार करण्यास प्रवृत्त होईल तर मी माझ्या श्रमाचें चीज झालें असें समजेन.

( १४ ) समर्थ–रत्न–संग्रहाचें एकंदर तेरा भाग केले आहेत. सदहू भागांत प्रकाशित समर्थ वाङ्मयांतील बहुतेक सर्व ग्रंथांचें सार देण्याचा प्रयत्न केला आहे. सुलभदासबोधांत दासबोधाचें सार गतवर्षीच प्रसिद्ध केल्यामुळें समर्थ–रत्नसंग्रहांत दासबोधेतर समर्थ वाङ्मयाचेंच सार देण्याचा माझा प्रथम मानस होता. परंतु समर्थ-रत्न-संग्रहांत समर्थांच्या ग्रंथ राजांतील कांहीं थोडी तरी रत्नें दिल्याशिवाय ग्रंथाचे समर्थ–रत्न–संग्रह हें नांव अन्वर्थक होणार नाहीं; म्हणून सुलभ दासबोधांतील काहीं समास अखेरच्या भागांत घातले आहेत. समग्र दासबोधाचें सार

छापावयाचे मनांत आणल्यास समग्र सुलभ दासबोधच समर्थ—रत्न—संग्रहास जोडावा लागला असतां; कित्येक समर्थ—भक्तांची तशी सूचनाही होती. परंतु आधींच समर्थ-रत्न-संग्रह अदमासापेक्षां मोठा झाल्या-मुळें तसें करणें अशक्य झालें.

( १ ) पहिल्या भागांत कांहीं भुपाळ्या व सांप्र-दायिकांतील कांहीं अभंग पदें, पाळणा ही देऊन शेवटीं " दिवटा " या नावानें प्रसिद्ध असलेली मार्मिक कवितां दिली आहे. ( २ ) दुसऱ्या भागांत मनाच्या श्लोकांपैकीं १०१ श्लोक दिले आहेत. सर्व २०५ श्लोक द्यावेत असे कित्येक समर्थभक्तांनीं सुचविलें होतें, परंतु नवनीतांत मुळचा सर्वभाग येणें इष्ट न वाटल्यानें १०१ श्लोकच घेतले आहेत. तिसऱ्या भागांत राममंत्राचे ३६ श्लोक घेतले आहेत. चवथ्या व पांचव्या भागात करुणाष्टकें या नांवाने प्रसिध्द असलेल्या समर्थ-वाङमयाचा भाग घेतला आहे. स्वतः समर्थांनीं करुणाष्टकें असें नांव दिलेले आढळून येत नाहीं. परंतु रामदास व रामदासी यांतील १० व्या भागापैकीं कांहीं अष्टकांना करुणाष्टके हें नांव ज्यांनीं प्रथम दिलें त्यांची मार्मिकता दिसून येते. करुणाष्टकें भाग १ यांत या प्रथम दिलेल्या

फक्त आठ अष्टकांनाच करुणाष्टकें अशी संज्ञा सांप्रदायिकांच्या नित्य नेमांतील पाठांत व समर्थांचे साग्र ग्रंथ म्हणून प्रसिध्द केलेल्या ग्रंथांत आढळून येते. या आठ अष्टकांपैकीं " बुद्धि दे रघुनायका " हें पांचवें अष्टक मात्र रामदास व रामदासीच्या १० व्या भागांत नाहीं. तिसऱ्या भागांतील स्फुट प्रकरणांत तें आहे. तें अष्टक करुणापर असल्यानें स्फुट प्रकरणांत आम्हीं न देतां करुणाष्टकांच्या पहिल्या भागांत दिले आहे. करुणाष्टकांच्या पहिल्या भागांत सांप्रदायिकांच्या आठ अष्टकाशिवाय आणखी आठ अष्टकें घालून एकंदर १६ अत्यंत करुणापर अष्टकांचा पहिला भाग केला आहे. दुसऱ्या भागांतील बहुतेक अष्टकें अध्यात्मपर, प्रास्ताविक, सुभाषितात्मक, उपदेशपर, वर्णनपर अशीं आहेत. सर्व अष्टकांना नांवें समर्थांनीं दिलेलीं नाहींत. तीं श्रीयुत देव यांनीं फार मार्मिकतेनें दिलीं आहेत. कांहीं स्थळीं आम्ही निराळी नामयोजना केली आहे. सहाव्या भागांत समर्थकृत रामायणाचे सार दिलें आहे. समर्थांनीं सुंदर व युद्धकांड—या दोन कांडांवरच रामायण—कविता केली आहे. व ती कविता इतकी तेजस्वी व ओजस्वी झाली आहे कीं

महाराष्ट्रांतील प्रौढ विद्यार्थ्यांनीं त्याचीं नेहमीं पारायणेंच करावीत. महाराष्ट्रांतील शाळांत समर्थांचें रामायण क्रमिक पुस्तकांत घातल्यास फार उत्तम होणार आहे. करुणाष्टकें व रामायण ही निराळी छापून थोड्या किंमतीत ग्राहकांना मिळतील अशी तजवीज करावी अशी कांहीं समर्थ-भक्तांची सूचना आहे.व तसें लवकरच करण्याचा आमचा विचार आहे. सातव्या भागांत समर्थांच्या चवदा ओंव्याशतांचे सार दिलें आहे. हीं शतकें सोपीं असून मार्मिक आहेत. बाराव्या शतकांत प्रयत्न व प्रारब्ध यांचें वर्णन फार बहारीचें आहे. समर्थांनीं प्रयत्नवादच श्रेष्ठ ठरविला आहे हें सांगावयास नकोच. आठवा भाग स्फुट ओंव्यांचा आहे. तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणें प्रासंगिक विषयावर यांत समर्थांचे प्रचीति-युक्त विचार ग्रंथित केलेलें आहेत. नवव्या भागांत समर्थांचीं स्फुट प्रकरणें दिलीं आहेत. या भागांतही प्रयत्न वादांचे समर्थन उत्तम प्रकारें केलें आहे व तुळजामाता व "आनंदवन भुवनी" ही सुप्रसिद्ध स्फूर्तिदायक प्रकरणें आहेत. दहावा भाग स्फुट श्लोकांचा आहे. यांत शेवटीं " नमू गणेश तो गुणी " यानें प्रारंभ केलेल्या स्फुटांत सर्व रामायण फार मार्मिकतेनें थोडक्यांत

दिलें आहे. अकराव्या भागांत पंचकें दिलीं आहेत. पंचकें हीं अभंगात्मक आहेत. यांत विविध विषयावर समर्थांचे विचार हृदयंगम रीतीनें दिले आहेत. पंचकें हें नांव कां दिलें हें समजत नाहीं. कोणी समर्थ-भक्तानें कळविल्यास मी त्यांचा फार आभारी होईन. अष्टकांत जसें आठच श्लोक असतात असा नियम नाहीं तसेंच पंचकांचेंही आहे. बाराव्या भागांत प्रासंगिक कविता दिल्या आहेत. समर्थांचे शिवाजी व संभाजी महाराजांस पत्र, राजधर्म, क्षात्रधर्म, सुप्रसिद्ध अंजनी गीत, कांहीं पदें व अभंग व षड्रिपु इत्यादि काव्यें यांत घेतलीं आहेत. तेराव्या भागांत दासबोधांतील कांहीं समास घेतले आहेत. ग्रंथ फार वाढूं लागला म्हणून दासबोधांतील कांहीं उत्तम रत्नें घेतां आली नाहींत याबद्दल दिलगिरी वाटते.

( १५ ) प्रत्येक भागाचे सार गद्यांत द्यावें असे कांहीं मित्रांनीं सुचविले होतें. परंतु तसें केल्यानें विनाकारण पुस्तक मोठें होईल व शिवाय खुद्द समर्थांची तेजस्वी वाणी वाचण्या--कडे वाचकांची प्रवृत्ति कमी होईल, म्हणून तसें केले नहीं. वाचकांनीं प्रत्येक भागाची पारायणें करून आपलें आपण गद्यांत सार काढावें अशी माझी त्यांना आग्रहाची विनंति

आहे. वाचकांनीं प्रत्येक भागाचे गद्यांत सार काढण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना समर्थ वाङ्मयाचे काळजीपूर्वक वाचन मनन–विवरण निदिध्यास करावा लागेल. साक्षर महाराष्ट्रानें समर्थ वाङ्मयाचें लक्ष्यपूर्वक वाचन--मनन--करावें व समर्थांची शिकवण आचरणांत आणून आपला स्वतःचा--महाराष्ट्राचा--व आर्यावर्ताचा उद्धार करावा अशी माझी साक्षर महाराष्ट्रियांना नम्र विनंति आहे.

विजया दशमी.<br>शके १८४६ } **सदाशिव खंडो आळतेकर.**

मराठी ग्रंथ संग्रहालय

# समर्थांचें अतिसंक्षिप्त चरित्र.

मोंगलाईत राक्षसभुवनापासून वीस कोसावर औरंगाबाद जिल्हा आंबड परगण्यांत गोदावरी नदीच्या कांठीं जांब नांवाचें गांव आहे. तेथें शके १५३० सालीं चैत्र शुद्ध नवमीचें दिवशीं दुपारीं रामजन्माचें काळीं समर्थांचा जन्म झाला. त्यांच्या वडलांचे नांव सूर्याजीपंत कुळकर्णी उपनांव ठोसर, ते जमदग्नि गोत्री ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. ते सूर्योपासक होते. समर्थांच्या आईचें नांव राणुबाई. समर्थांचें मूळ नांव नारायण होते. ते रामाची उपासना करूं लागले म्हणून पुढें त्यांना रामदास ह्मणूं लागले. समर्थांच्या वडिल बंधूचें नांव गंगाधर. त्यांनांच पुढें रामीरामदास व श्रेष्ठ ह्मणूं लागले. श्रेष्ठांचा जन्म शके १५२७ सालीं झाला. हल्लींचे चाफळचे स्वामी हे श्रेष्ठांचे वंशज आहेत. समर्थांचें लग्न त्यांच्या बाराव्या वर्षीं ह्मणजे शके १५४२ सालीं ठरलें होतें. लग्नाच्या वेळीं वधुवरामध्यें अंतरपाठ धरून ब्राह्मण सुमुहूर्तें सावधान ह्मणत असतां सावधान होऊन लग्नसमारंभांतून पळून पंचवटीस गेले व तेथें त्यांनीं बारा वर्षें पुरश्चरण केलें.

१९ श्लोकबद्ध रामगीता २० चतुर्थ मान २१ मारु-
तीची आरती २२ संकल्प २३ भूपाळ्या २४ अनामक
प्रकरण २५ अष्टाक्षरी पंचीकरण २६ गद्य पद्य
पंचीकरण.

॥ श्री ॥

# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| प्रस्तावना ... ... ... | | १–२४ |
| समर्थांचें संक्षिप्त चरित्र ... ... | | २५–३७ |
| भाग. | | |
| १ | नित्य नैमित्तिक—विविधसंग्रह–सोपान. | १–१४ |
| २ | मनाचे श्लोक. ... ... | १५–३७ |
| ३ | राममंत्राचे श्लोक. ... | ३८–४५ |
| ४ | कारणाष्टकें ( १ ) | ४६–७६ |
| ५ | करुणाष्टकें ( २ ) | ७७–१४८ |
| ६ | रामायण. | १४९–२७६ |
| ७ | ओव्या शतकें | २७७–३१६ |
| ८ | स्फुट ओव्या | ३१७–३६५ |
| ९ | स्फुट प्रकरणें. | ३६६–३९८ |
| १० | स्फुट श्लोक. | ३९९–४१८ |
| ११ | पंचकें. | ४१९–४४५ |
| १२ | प्रासंगिक | ४४६–४७५ |
| १३ | दासबोध | ४७६–५१२ |

# समर्थरत्नसंग्रह

—०—

## नित्यनैमित्तिक-विविधसंग्रहसोपान.

१ भूपाळ्याः—

१ राम आकाशीं पाताळीं। राम नांदे भूमंडळीं। राम योगियांचे मेळीं। सर्वकाळीं तिष्ठत ॥ १ ॥ राम नित्य निरंतरीं। राम सबाह्य अभ्यंतरीं। राम विवेकाचे घरीं। भक्तीवरी सांपडे[1] ॥२॥ राम भावें ठायीं पडे। राम भक्तीशीं आतुडे। राम ऐक्यरुपीं जोडे। मौन पडे श्रुतींशी[2] ॥३॥ राम योग्यांचें मंडन। राम भक्तांचें भूषण। राम आनंदाचा घन[3]। करी रक्षण दासाचें ॥४॥

२ उठीं उठीं बा रघुनाथा। विनवी कौसल्या माता। प्रभात[4] झालीसे समस्तां। दाखवीं आतां श्रीमुख ॥१॥ कनक[5]ताटीं आरातिया। घेवोनि क्षमा शांति दया। आली जनकाची तनया[6]। ओवाळाया तुजलागीं ॥२॥ जीव शिव दोघे जण। भरत आणि शत्रुघ्न। आला बंधु लक्ष्मण। मन उन्मन होउनिया ॥३॥ विवेक वसिष्ठ सद्गुरु। संत सज्जन मुनीश्वरू। करिती नामाचा गजरू।

---

१ भक्तीनें मिळतो. २ वेदांना. ३ मेघ. ४ प्रातःकाळ. ५ सोनें ६ कन्या.

हर्षनिर्भर होउनियां ॥४॥ सात्विक सुमंत प्रधान । नगरवासी अवघे जन । आला वायूचा नंदन । श्रीचरण पहावया ॥५॥ माझा जिवीचा जिव्हाळा । दीनबंधु दीनदयाळा । भक्तजनाचिया वत्सला । देई दयाळा दर्शन ॥६॥ तंव तो राजीवलोचनें । राम जगत्रय-जीवन । स्वानंदरूप होवोन । दासा दर्शन ²दीधलें ॥ ७ ॥

२ अभंग:—

१ राम गावा राम ध्यावा । राम जीवींचा विसावा ॥१॥ कल्याणाचें जें कल्याण । रघुरायाचें गुणगान ॥२॥ मंगळाचें जें मंगळ । राम कौसल्येचा बाळ ॥३॥ राम कैवल्याचा दानी । रामदासा अभिमानी ॥४॥

२ येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥धृ०॥ काय केली सिताबाई । येथें राही रखुमाबाई ॥१॥ काय केली अयोध्या पुरी । येथें वसविली पंढरी ॥२॥ काय केली शरयु गंगा । येथें आणिली चंद्रभागा ॥३॥ धनुष्यबाण काय केले । कर कटावरी ठेविले ॥४॥ काय केलें वानर³दळ । येथें मिळालें गोपाळ ॥५॥ रामीं रामदासीं भाव । तैसा होय पंढरिराय ॥६॥

---

१ कमलासारखे डोळे आहेत असा. २ दिलें. ३ सैन्य.

३ उपदेश देवुनि दीधला[1] मारुती। स्वयें रघुपती नीरवीता ॥१॥ निरविता तेणें झालों रामदास। संसारीं उदास म्हणउनी ॥२॥ म्हणोनी आमुचे कुळीं कुळदैवत। राम हनुमंत आत्मरुपीं ॥३॥ आत्मरुपीं झाला। रामीं रामदास। केला उपदेश दीनोद्धार ॥४॥

४ कां हो रामराये दुरी धरियेलें। कठिण कैसें झालें चित्त तूझें ॥१॥ देऊनि आलिंगन प्रीति पडिभरें[2]। मुख पीतांबरें पुसशील ॥२॥ घेऊनि कडिये धरुनि हनुवटी। केई[3] गुजगोष्टी सांगशील ॥ ३ ॥ रामदास म्हणे केव्हां संबोधशीं[4]। प्रेमपान्हा देशी जननिये ॥४॥

५ देव जवळी अंतरीं। भेटि नाहीं जन्मभरी ॥१॥ मूर्ती त्रैलोकीं संचली[5]। दृष्टी विश्वाची चुकली ॥२॥ भाग्यें आले संतजन। झालें देवाचें दर्शन ॥३॥ रामदासीं योग झाला। देहीं देव प्रगटला ॥४॥

६ पांचा लक्षणीं पूरता। धन्य धन्य तोच ज्ञाता ॥१॥ विवेक वैराग्य सोडिना। कर्ममर्यादा सांडिना ॥२॥ बोले शब्दज्ञान। अंतर्यामीं समाधान॥ ३ ॥ रामीं रामदास कवी। न्यायनीतीनें शिकवी ॥४॥

---

१ दिला. २ मोठ्या प्रीतीनें. ३ केव्हां. ४ बोलशील. ५ सांठली.

७ सगुणाकारितां निर्गुण पाविजे। भक्तिविण दूजे सार नाहीं ॥१॥ साराचेंही सार ज्ञानाचा निर्धार। पाविजे साचार भक्तियोगें ॥ २ ॥ वेदशास्त्रीं अर्थ शोधोनि पाहिला। त्यांहीं निर्धारिला भक्तिभाव ॥३॥ रामीं रामदासी भक्तीच मानली। मनें वस्ती केली रामपायीं ॥४॥

८ रामा तुझ्या स्वामीपणें। मानी ब्रह्मांड हें ठेंगणें। तुजवीण कोण जाणे। अंतर हें आमुचें ॥१॥ तुजवीण मज माया। नाहीं नाहीं रामराया। आम्हां अनाथा कासया। उपेक्षिसी ॥२॥ तुज समुदाय दासांचा। परी आम्हां स्वामी कैचा। तुजसाठीं जिवलगांचा। संग सोडिला ॥३॥ सगुण रघुनाथ मुद्दल। माझें हेंचि भांडवल। दास धरूनि पैलपार। टाकी या भवाचे ॥४॥

९ जन्मोनियां तूज भजो याच बुद्धी। प्राणत्याग संधी सांभाळीशी ॥१॥ उचित न चुके अचिंत्य श्रीरामा। स्वस्वरुपीं आम्हां ठाव देई ॥२॥ जन्मभरी तूज धरीलें हृदयीं। आतां या समयीं पावें बा ॥३॥ निष्काम ती तुज सेवायाची आशा। अंतीं रामदासा सांभाळावें ॥४॥

१० तोंवरी तोंवरी डगमगीना कदा। देहाची आप-

---

१ अंतःकरण.

दा झाली नाहीं ॥१॥ तोंवरी तोंवरी परमार्थ स्वयंभ। जंव पोटीं लोभ आला नाहीं ॥२॥ तोंवरी तोंवरी अत्यंत सद्भाव। विशेषें वैभव आलें नाहीं ॥३॥ तोंवरी तोंवरी सांगे निरभिमान। देहाशीं अभिमान झाला नाहीं ॥४॥ तोंवरी तोंवरी धीरत्वाची मातं। प्रपंचीं आघात झाला नाहीं ॥५॥ रामदास म्हणे अवघेची गाबाळी। ऐसा विरळा बळी धैर्यवंत ॥६॥

११ अपराधी अपराधी। आम्हां नाहीं दृढ बुद्धी ॥१॥ माझे अन्याय अगणीत। कोण करील गणीत ॥२॥ मज सर्वस्वें पाळावें। प्रतीतिनें सांभाळावें ॥३॥ माझी वाईट करणी। रामदास लोटांगणीं ॥४॥

४ पदें:—

१ त्रिविधताप-हारक हे गुरुपाय। भवसिंधूसी तारक हे गुरुपाय ॥१॥ स्वात्मसूखाचें बीज हे गुरुपाय। ज्ञानाचे निजगुण हे गुरुपाय ॥२॥ भक्तिपंथासी लाविती हे गु०। नयनीं श्रीराम दाविति हे० ॥३॥ सहजशांतीचें आगर हे गुरुपाय। पूर्ण कृपेचे सागर हे० ॥४॥ रामदासाचें जीवन हे गुरुपाय। सकळ जीवांसी पावन हे गुरुपाय ॥ ५ ॥

---

१ गोष्ट. २ विपत्ति. ३ निश्चयानें.

२ होतें वैकुंठीचे कोनीं । शिरलें अयोध्याभूवनीं । लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे माय॥१॥जातां कौशिक राउळीं । अवलोकितां भयंकाळी । ताटिका ते छळोनि मेली । तेंचि भूत गे माय ॥२॥ मार्गीं जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी । पाषाणाची झाली नारी । तेंचि भूत गे माय ॥३॥ जनकाचे अंगणीं गेलें । शिवाचें धेनु भंगिलें । वैदेहीअंगीं संचरलें । तेंचि भूत गे माय ॥४॥ जेणें सहस्रार्जुन वधिला । तो हा तात्काळची भ्याला । धनु देउनि देह रक्षिला । तेंचि भूत०॥५॥ पितयाचें भाकेशी । कैकंयी-वचनाशी । मानुनि गेलें अरण्यासी । तेंचि भूत०॥६॥ चौदा संवत्सरी तापसी । अखंड हिंडे वनवासी । सांगाते भुजंगं पोशी । तेंचि भूत०॥७॥ सुग्रीवाचें पालन । वालीचें निर्दालनं । तारी पाण्यावरी पाषाण । तेंचि भूत०॥८॥ रक्षी मरणीं बिभीषण । मारी रावण कुंभकर्ण । तोडी अमरांचें बंधन तेंचि भूत०॥९॥ वामांगीं स्त्रियेस धरिलें। धांवूनि शरयु तीरा आलें । तेथें भरतासी भेटलें । तेंचि भूत गे माय ॥१०॥ सर्वां भूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय ।

---

१ गृहीं. २ धनुष्य. ३ सीता. ४ लक्ष्मण. (शेषाचाअवतार) ५ मारणें.

रामदास नित्य गाय। तेंचि भूत गे माय ॥ ११ ॥

३ श्रीगुरूचे चरणकंजे[1] हृदयीं स्मरावें ॥धृ॥ निगमे[2] निखिले[3] साधारण सुलभाहुनी सुलभ बहु। इतर योग-याग विषमपंथीं कां शिरावें ॥ १ ॥ नरतनुदृढनावेसी। बुडवूनी अति मूढपणें। दुष्ट नष्ट कुकर[4]* सूकरतनु कां फिरावें ॥२॥ रामदास विनवी तुज अजुनि तरी समज उमज। विषयविष पेउनियां फुकट कां मरावें॥ श्रीगुरु० ॥ ३ ॥

४ निदानें पाहासी किती। दयाळा निदान पाहासी किती। रामराया निदान ०॥ धृ०॥ धांव धाव गा सीतापती। तुज वेगळी नाहीं गती। नानाशास्त्रें मौनावती नाम तारक वेद बोलती ॥१ ॥ जळीं पाषाण तारिले जड। मी काय तुज त्याहूनि जड। आतां पुरवी जीवींचें कोड। मनीं घेतला विषयीं मोह ॥ २ ॥ तुझ्या भेटीचें आर्त मोठें। मज न गमें कांहीं केल्या कोठें। तूजवांचोनि सर्वही खोटें। दीन बालक तुझें धाकुटें ॥३॥ वृत्ती जडली पायापाशीं। जेवी गुळाशी गुंतली माशी। देही असोनि गुप्त कां होशी। दास उदास देहभावाशी ॥ ४॥

---

१ पदकमल. २ वेद. ३ सर्व. ४ डुक्कर. ५ अंत. ६ इच्छा.

* कुक्कर ( कुत्रा ) याचा अपभ्रंश असावा.

५ अनाथ मी हीन दीन दरिद्री मज न नेणे कांहीं । तुजविण मज या जगीं पाहतां कोणीच नाहीं ॥ १ ॥ ज्ञान कळेना ध्यान कळेना मन वळेना देवा । विद्या नाहीं वैभव नाहीं ऐसा पूर्वींचा ठेवा ॥ २ ॥ युक्ति असेना बुद्धि असेना शांति वसेना अंगीं । रामदास म्हणे दयाळा ऐसा मी भवरोगी ॥ ३ ॥

६ जन्मलाचि नाहीं तो मरेल काई । जिणें मरणें दोन्ही नाहीं रे ॥धृ०॥ जनीं जीवन्मुक्त वर्ततात हरिभक्त । सद्गुरुबोधें ते अच्युत रे ॥ १ ॥ जिणों आणि मरणें येणें आणि जाणें । साधु तो अचळ पूर्णपणें रे ॥ २ ॥ सेवितां साधुचें चरण बाधीना दक्षिणायन । रामीं रामदासीं निजखुण रे ॥ ३ ॥

७ वेडिया स्वामीच होऊनि राहे । हे उपाधि तुज न साहे ॥ धृ० ॥ अरे तुझाचि तूं सकळ । तरी वायांचि कां तळमळ ॥१॥ स्वामी सेवकपण हे वाव । अभिमानासी कैचा ठाव ॥ २ ॥ अमंगळें जाणसि साचें । काय भूषण सांगसी त्याचें ॥ ३ ॥ मीपणाचें मूळ तुटावें । आनंदाचें सुख लुटावें ॥ ४ ॥ रामदासाचि नांव हें फोल । तेथें कायसे लागती बोल ॥ ५ ॥

८ देह दंडिसी मुंडे[1] मुंडिसी भंडें[2] दाविसी नग्न उवडा ॥ धृ० ॥ भस्मलेपनें तृण-आसनें ॥ माळभूषणें सांग हें मुढा ॥ १ ॥ अन्नत्याग रे हृदययोग रे। फुकट काय गे हिंडसी वनीं ॥ २ ॥ ऐक सांगतो रामदास तो। ज्ञानयोग तो सांगतां बरें ॥ ३ ॥

९ कैचें घर कैचें दार। मिथ्या सकळही व्यापार। अंतीं सोइरा रघुवीर। कां भुललासी ॥ १ ॥ कोणी नव्हेति रे कोणाची। सकळही सांगाती दैवाची। धरीं सोइरया रामाची। कां भुल० ॥ २ ॥ बहु अवघड आहे घाट। कैसी नकळे उरकेल वाट। होई रघुबीरजीचा भाट। कां भुल० ॥ ३ ॥ फिर माघारा परतोन पाहे। एक धर्मचि होऊनि राहे। धन जोडिलें न राहे। कां भुल० ॥ ४ ॥ ऐसी करावी बा जोडी। राहे एथें तेथें गोडी। सोडीं मिथ्या प्रपंच वोढी। कां भुल० ॥ ५ ॥ केव्हां जाईल न कळे श्वास। राहे तें घर पडेल वोस। ये कुडीया उपजेल त्रास। कां भुल० ॥ ६ ॥ सावध होई रे बा ऐसा। वोढी घरिंचा वासा। स्मर माझ्या रमाधीशा। कां भुल० ॥७॥

---

१ डोकें. २ कुभांड

संसार पाण्याचा बुडबुडा । याचा नको करूं ओढा । तूं समजेसी ना मूढा । कां भुल० ॥ ८ ॥ करी सीताराम मैत्र । होईल देह तुझा पवित्र । वरकड भिंतीवरील चित्र । कां भुल० ॥ ९ ॥ कां रे बैसलास निश्चळ । करतील अनर्थास मूळ । सांडुनी विश्रांतीचें स्थळ । कां भुल० ॥ १० ॥ मुख्य असूं द्यावी दया । नाहीं तरी सर्वही जाईल वाया । मिठी घालीं रामपायां । कां भुल० ॥ ११ ॥ करिशील डोळयाचा अंधार । पाहें जनासी निर्वैर । सांडीं धनसंपत्तीचें वारें । कां भुल० ॥ १२ ॥ अंगीं धनसंपत्तीचें वारें । खाया मिळतील भूतें पोरें । कामा नयेत रे निर्धारें । कां भुल० ॥ १३ ॥ रामदासाचें जीवन । तूं कां न करिसी साधन । तोडिल भवबंधन ॥ कां भुललासी ॥ १४ ॥

१० घटका गेली पळें गेलीं तास वाजे झणाणा । आयुष्याचा नाश होतो राम का रे म्हणाना ॥ १ ॥ एक प्रहर दोन प्रहर तीन प्रहर गेले । विषयाच्या संगामुळें चारी प्रहर गेले ॥ २ ॥ रात्र कांहीं झोंप कांहीं स्त्रीसंगें गेली । ऐशी आठा प्रहरांची वासलाद झाली ॥३॥ दास म्हणे तास वाजे सकळां स्मरण देतो । वेळोवेळां राम म्हणा म्हणोनि झणकारितो ॥ ४ ॥

११ तुझा भाट मी वर्णितों रामराया । सदा सर्वदा गाय ब्रीदें सवाया । महाराज दे अंगिचें वस्त्र आतां । बहू जीर्ण झाली देहबुद्धि कंथा ॥१॥

१२ धांव रे रामराया किती अंत पाहशी । धांव रे राम० ॥ धृ० ॥ प्राणान्त मांडिलासे नये करुणा कैशी । पाहीन धणिभरीं चरण झाडीन केशीं । नयन शिणले बा आतां केधवां येशी ॥ धांव रे ० ॥ १ ॥ मीपण अहंकारें अंगीं भरला ताठा । विषय–कर्दमांत लाज नाहीं लोळतां । चिळस उपजेना ऐसें झालें बा आतां । धांव रे० ॥ २ ॥ मारुतिस्कंधभागीं शीघ्र बैसोनि यावें । राघवें वैद्यराजें कृपा औषध द्यावें । दयेचे पद्महस्त माझे शिरीं ठेवावे ॥ धांव रे० ॥ ३ ॥ या भवीं रामदास थोर पावतो व्यथा । कौतुक पाहतोसी काय जानकीच्या कांता । दयाळा दीन–बंधो भक्तवत्सला ताता ॥ धांव रे राम० ॥ ४ ॥

भजनाचा उपसंहारः—

१३ आज्ञेप्रमाणें परमार्थ । केला जाण म्यां यथार्थ ॥१॥ आतां देहाचा कंटाळा । आला असे जी

---

१ कुभांड (२) पोटभर.

दयाळा ॥२॥ आतां एकचि मागणें । कृपा करूनिया देणें ॥३॥ ज्याची दर्शनाची आशा। पुरवावी त्याची इच्छा ॥४॥ ऐक सखया वचन। त्यांशीं देईन दर्शन ॥ ५ ॥ तेरा अक्षरि मंत्राचा । जप करील जो साचा ॥ ६ ॥ गणना होता तेरा कोटी। त्याशी भेटेल जगजेठी ॥ ७ ॥ भय न धरावें मनीं । बहु बोलिलों म्हणोनी ॥ ८ ॥ नलगे आसनीं बैसावें ।नलगे अन्न ही त्यागावें ॥ ९ ॥ येतां जातां धंद्रा करितां । जपसंख्या मात्र होतां ॥ १० ॥ तेरा कोटी गणना तेची । पापें निरसिती जन्मांतरिचीं ॥ ११ ॥ त्याशीं देईन दर्शन तत्काळचि मुक्त होणें ॥ १२ ॥ ऐसा वर होतां जाण। दास झाला सुखसंपन्न ॥ १३ ॥

१४ हनुमंत आमुची कुळवेली । राममंडपीं । वेला गेली । श्रीरामभजनें फळली । रामदास बोले ॥ १ ॥ आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें दैवत । तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धितें न पावे कीं ॥२॥ साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्य दैवत श्रीरघुनाथ ॥ गुरु श्रीराम समर्थ । उणें काय दासासी ॥३॥ दाता एक रघुनंदन। वरकड लंडी देईं कोण । हें त्यागोन आम्ही जन। कोणाप्रती मागावें ॥४॥ म्हणोनि आम्ही रामदास ।

रामचरणीं विश्वास । कोसळोनि पडे आकाश । आणि-काचा वाट न पाहूं ॥५॥ स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ । जानकी देवी रघुनाथ दैवत । मारुती उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥ ६ ॥

**पाळणा:—**

१ जो जो जो जो रे श्रीरामा । निजसुख गुणविश्रामा जो जो० ॥ धृ० ॥ ध्याती मुनि योगी तुजलागीं । कौसल्या वोसंगीं[*] ॥१॥ जो जो०॥ वेदशास्त्रांची मति जाण । स्वरूपीं झाली लीन ॥ २ ॥ जो जो० ॥ चारी मुक्तींचा विचार । चरणीं पाहती थोर ॥ ३ ॥ जो जो० ॥ भोळा शंकर निशिदिनीं । तुजला जपतो मनीं ॥ ४ ॥ जो जो० ॥ दास गातसे पाळणा । राम लक्ष्मणा ॥५॥ जो जो० ॥

**दिवटा:——**

१ हुशार भाई हुशार । अवघीं असावें खबर-दार । काळोखें पडतें फार । एकांशी एक दिसेना ॥१॥ चोराचे कळप फिरती । अवचित दगा करिती । निजो नका जागविती । मी दिवट्या साहेबाचा ॥ २ ॥ मी हराम नव्हे साहेबाचा । नफर[१] इतबारांचा[२] । मज

---

* उत्संगीं—मांडीवर. १ नोकर. २ विश्वासाचा.

राती जागायाचा ॥ हुद्दा दिला ॥ २ ॥ मी सारे रात जागतों ॥ अठरा[1] महालांची खबर घेतों । साही[2] नजरेंत राखतों । मनीं धरतों चहुंचे[3] गण ॥४॥ सकळिकांचें करितों बरें । परि मज मानिती अहंकारें । घोरों लागती झोपेच्या घोरें ! ते समूळ नागविती ॥ ५ ॥ जे मजला मानिती । माझ्या विचारें वर्तती । तरि हरिगीस्त झोला न पावती । ते नाडेनात जी ॥ ६ ॥ जे जे झोपेनें पीडले । ते ते अवघेचि नाडले । यमयातनेशी जुडले । पाहुणे रे यावया कारजें ॥ ७ ॥ जे मद्भरें पडले । जन्ममरणा राहाटी जोडले । सुटका नव्हती पाडिले । बांधोनिया जी ॥ ८ ॥ अरे जागा स्वरूपीं जागा । मुक्तीचा सोहळा भोगा । कर्म आपलें अंगा । लागोंच नेदावें ॥ ९ ॥ अरे भाई हुशार । झोपेनें नाडले थोर थोर । त्या जे जे खबरदार । ते कडेशी पडिलेजी ॥ १० ॥ महादेव निजेनें भ्रमला । विषें तळमळों लागला । मग म्यां खबरदार केला । तो वांचला दों अक्षरीं ॥ ११ ॥ स्वामी कार्तिक निजेनें भ्रमला । बळेंची परस्त्री भोगू लागला । मातृगमन पडावें त्याला । तो म्यां खबरदार केला ॥१२॥

---

१ अठरा पुराणें. २ सहा शास्त्रें. ३ चार वेद.

# २ मनाचे श्लोक

गणाधीश जो ईश सर्वां गुणाचा ।
मुळारंभ आरंभ जो निर्गुणाचा ॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥ १ ॥

मना सज्जना भक्तिपंथें चि जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥
जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें ।
जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ २ ॥

प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ।
पुढें वैखरीं राम आधीं वदावा ॥
सदाचार हा थोर सांडूं नये तो ।
जनीं तो चि तो मानवी धन्य होतो ॥ ३ ॥

मना वासना दुष्ट कामा नये रे ।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।
मना धर्मता नीति सोडूं नको हो ।
मना अंतरीं सार वीचार राहो ॥ ४ ॥

---

१ वाचेनें, वाणीनें.

मना पापसंकल्प सोडूनि द्यावा ।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा ॥
मना कल्पना ते नको वीषयाची ।
विकारें घडे हो जनीं सर्व ची ची ॥ ५ ॥

नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नानाविकारी ॥
नको रे मदा सर्वदा अंगिकारूं ।
नको रे मना मत्सरू दंभ भारू ॥ ६ ॥

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणें नीच सोशीत जावें ॥
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें ॥
मना सर्व लोकांस रे नीववावें ॥ ७ ॥

तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी ।
मना सज्जना हेचि क्रिया धरावी ।
मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ ८ ॥

जनीं सर्व सूखी असा कोण आहे ।
विचारें मना तूंचि शोधूनि पाहे ॥

---

१ भारी मोठा. २ सारखे. ३ परंतु. * देह ( कल्याणपाठ )

मना त्वां चि रे पूर्व-संचीत केलें ।
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥ ९ ॥

मना मानसीं दुःख आणूं नको रे ।
मना सर्वथा शोक चिंता नको रे ॥
विवेकें देहबुद्धि सोडूनि द्यावी ।
विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥ १० ॥

मना सांग पां रावणा काय झालें ।
अकस्मात तें राज्य सर्वै बुडालें ॥
म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं ।
बळें लागला काळ हा पाठिलागीं ॥ ११ ॥

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी ।
जितां बोलती सर्व ही जीव मी मी ॥
चिरंजीव हे सर्वही मानिताती ।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती ॥ १२ ॥

मनीं मानव व्यर्थ चिंता वाहातें ।
अकस्मात होणार होऊनि जातें ॥
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें ।
मतीमंद तें खेद मानी वियोगें ॥ १३ ॥

---

१ पादपूरणार्थ. २ दुष्ट. ३ जिवंत असतांना.

मना सर्वथा सत्य सांडूं नको रे ।
मना सर्वथा मिथ्य[1] मांडूं नको रे ॥
मना सत्य तें सत्य वाचें वदावें ।
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें ॥ १४॥

मना वासना चूकवी येरझारा ।
मना कामना सांडि रे द्रव्यदारा ॥
मना यातना थोर हे गर्भवासी ।
मना सज्जना भेटवी राघवासी ॥ १५ ॥

न बोले मना राघवावीण कांहीं ।
जनीं वाउगें बोलतां सूख नाहीं ॥
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो ।
देहांतीं तुला कोण सोडूं पहातो ॥१६ ॥

मना वीट मानूं नको बोलण्याचा ।
पुढें मागुता राम जोडेल कैचा ॥
सुखाची घडी लोटतां सूख आहे ।
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ॥ १७॥

भवाच्या भयें काय भीतोस लंडी[2] ।
धरी रे मना धीर धाकासी सांडी ॥

---

१ मिथ्या-खोटें. २ हे भिऱ्या.

रघुनायका सारिखा स्वामि शीरीं ।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥ १८ ॥

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ १९ ॥

असे हो जया अंतरीं भाव जैसा ।
वसे हो तया अंतरीं देव तैसा ॥
अनन्यास रक्षीतसे चापपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ २० ॥

सदा सर्वदा देव सन्निध आहे ।
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥
सुखानंद–आनंद–कैवल्य–दानी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ २१ ॥

सदा चक्रवाकांसि मार्तंड जैसा ।
उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ॥
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं ।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ २२ ॥

मना पाविजे सर्वही सूख जेथें ।
अती आदरें ठेविजे लक्ष तेथें ॥
विवेकें कुडी कल्पना पालटीजे ।
मना सज्जना राघवीं वास्ति कीजे ॥ २३

बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं ।
शिणावें परी नातुडे हीत कांहीं ॥
विचारें बरें अंतरा बोधवीजे ।
मना सज्जना राघवीं वास्ति कीजे ॥ २४ ॥

मना सज्जना एक जीवीं धरावें ।
जनीं आपुलें हीत तुवां करावें ॥
रघूनायकावीण बोलों नको हो ।
सदा मानसीं तो निजध्यास राहो ॥ ३५ ॥

मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी ।
कथा आदरें राघवाची करावी ॥
नसे राम तें धाम सोडून द्यावें ।
सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥ २६ ॥

मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे ।
जनीं जाणता भक्त होऊन राहे ।

---

१ सांपडत नाहीं. २ घर. ३ डोळ्यांमध्यें.

गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ २७ ॥

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ २८ ॥

सदा बोलण्यासारखें चालताहे ।
अनेकीं सदा एक देवासी पाहे ॥
सगूणीं भजे, लेश नाहीं भ्रमाचा ।
जगीं धन्य तो ० ॥ २९ ॥

नसे अंतरीं कामकारी विकारी ।
उदासीन जो तापसी ब्रम्हचारी ॥
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा ।
जगीं धन्य तो ० ॥ ३० ॥

मदें मत्सरें सांडिला स्वार्थबुद्धी ।
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ॥
सदा बोलणें नम्र–वाचा सुवाचा ।
जगीं धन्य तो ० ॥ ३१ ॥

---

१ क्रम. २ स्वार्थबुद्धीनें.

क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें ।
न लिंपे कदा दंभ वादें विवादें ॥
करी सूख-संवाद जो ऊगमाचा ।
जगीं धन्य तो० ॥ ३२ ॥

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं ।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा ।
जगीं धन्य तो० ॥ ३३ ॥

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं ।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ॥
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा ।
जगीं धन्य तो० ॥ ३४ ॥

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ।
स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ॥
तया अंतरीं क्रोध संताप कैचा ।
जगीं धन्य तो० ॥ ३५ ॥

नको वासना वीषयीं वृत्तिरूपें ।
पदार्थीं जडे कामना पूर्वपापें ॥

सदा राम निःष्काम चिंतीत जावा ।
मना कल्पना-लेश तोंही नसावा ॥ ३६ ॥

मना कल्पना कल्पितां कल्पकोटी ।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ॥
मनीं कामना, राम नाहीं जयाला ।
अती आदरें प्रीति नाहीं तयाला ॥३७॥

मना राम कल्पतरू कामधेनू ।
निधी सार चिंतामणी काय वानूं ॥
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता ।
तया साम्यता कायसी कोण आतां ॥३८॥

अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना ।
अती काम त्या राम चित्तीं असेना ॥
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।
अती वीषयीं सर्वदा दैन्यवाणा ॥३९॥

घनःशाम हा राम लावण्यरूपीं ।
महा धीर गंभीर पूर्णप्रतापी ॥
करी संकटीं सेवकांचा कुढावा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥४०॥

बळें आगळा[1] राम कोदंड-धारी ।
महा काळ विक्राळ तोही थरारी ॥
पुढें मानवा किंकरा कोण केवा[2] ।
प्रभाते मनीं ० ॥४१॥

सुखानंदकारी निवारी भयातें ।
जनीं भक्तिभावें भजावें तयातें ॥
विवेकें त्यजावा अनाचार हेवा ।
प्रभाते मनीं ० ॥४२॥

सदा रामनामें वदा पूर्णकामें ।
कदा बाधिजेनापदा[3] नित्यनेमें ॥
मदालस्य[4] हा सर्व सोडूनि द्यावा ।
प्रभाते मनीं ० ॥४३॥

जयाचेनि नामें महा दोष जाती ।
जयाचेनि नामें गती पाविजेती ॥
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा ।
प्रभाते मनीं ० ॥४४॥

न वेचे कदा ग्रंथिचे अर्थ कांहीं ।
मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ॥

---

१ श्रेष्ठ. २ पाड. ३ बाधिजेना आपदा किंवा न आपदा.
४ मद + आलस्य.

महाघोर संसार शत्रू जिणावा[1] ।
प्रभाते मनीं ० ॥ ४५ ॥

तनू[2] दंडणेचें महा दुःख आहे ।
महा दुःख तें नाम घेतां न राहे ॥
सदाशीव चिंतीतसे देवदेवा ।
प्रभाते मनीं ० ॥ ४६ ॥

बहूतां परी संकटें साधनांचीं ।
व्रतें दान उद्यापनें तें धनाचीं ॥
दिनाचा दयाळू मनीं आठवावा ।
प्रभाते मनीं ० ॥ ४७ ॥

समस्तांमध्यें सार साचार आहे ।
कळेना तरी सर्व शोधूनि पाहें ॥
जिवा संशयो वाउगा तो त्यजावा ।
प्रभाते मनीं ० ॥ ४८ ॥

नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं ।
नव्हे भोग ना त्याग ना सांग[3] पाहीं ॥
म्हणे दास विश्वास नामीं धरावा ।
प्रभाते मनीं ० ॥ ४९ ॥

---

१ जिंकावा. २ देह क.पा. ३ यथासांग.

अहो ज्या नरा राम विश्वास नाहीं ।
तया पामरां बाधिजे सर्व कांहीं ॥
महाराज तो स्वामि कैवल्यं–दाता ।
वृथा वाहणें देहसंसारचिंता ॥ ५० ॥

मना मत्सरें नाम सांडूं नको हो ।
अती आदरें हा निजध्यास राहो ॥
समस्तामधें नाम हें सार आहे ।
दुजी तूळणा तूळितां ही न साहे ॥ ५१ ॥

मुखीं राम त्या काम बाधूं शकेना ।
गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।
हरीभक्त तो शक्त कामास मारी ।
जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥ ५२ ॥

बहू चांगलें नाम या राघवाचें ।
अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ॥
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें ।
जिवां मानवां हेंचि कैवल्य साचें ॥ ५३ ॥

जनीं भोजनीं नाम वाचे वदावें ।
अती आदरें गद्य घोषें म्हणावें ॥

---

मोक्ष. २ बरोबरी. ३ तुलना करतांना. ४ संसाराचें.

हरी चिंतनें अन्न जेवीत जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥ ५४ ॥

जगीं पाहतां देव हा अन्न-दाता ।
तया लागली तत्वता सार[1] चिंता ॥
तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें ।
मना सांग पां[2] रे तुझें काय वेचें ॥ ५५ ॥

यथासांग रें कर्म तेंही घडेना ।
घडे धर्म तें पुण्य गांठीं पडेना ।
दया पाहतां सर्वभूतीं असेना ।
फुकाचें मुखीं नाम तें ही वसेना ॥ ५६ ॥

अती लीनता सर्व-भावें स्वभावें ।
जना सज्जनालागि संतोषवावें ॥
तनू[3]-कारणीं सर्व लावीत जावें ।
सगुणीं अती आदरेंसी भजावें ॥ ५७ ॥

हरिकीर्तनें प्रीति रामीं धरावी ।
तनू[3]-बुद्धि नीरूपणीं वीसरावी ॥
परद्रव्य आणीक कांता परावी[4] ।
यदर्थीं मना सांडि जीवीं करावी ॥ ५८ ॥

---

१. सर्व. २ बापा. ३ देह क.पा. ४ दुसऱ्याची.

क्रियेवीण नानापरी बोलिजेतें ।
परी चित्त दुश्चित्त तें लाजवीतें ॥
मना कल्पना धीट सैराट धांवे ।
तया मानवा देव कैसानि पावे ॥ ५९ ॥

विवेकें क्रिया आपुली पालटावी ।
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ।
जनीं बोलण्यासारिखें चाल बापा ।
मना कल्पना सोडि संसारतापा ॥ ६० ॥

बरी स्नान संध्या करी एक निष्ठा ।
विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ॥
दया सर्वभूतीं जया मानवाला ।
सदा प्रेमळू भक्ति भावें निवाला ॥ ६१ ॥

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें ।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ॥
क्रियेविण वाचाळतां ते निवारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ६२ ॥

जनीं वादवीवाद सोडूनि द्यावा ।
जनीं सूख-संवाद सूखें करावा ॥

---

१ अनिवार.

जगीं तो चि तो शोक संतापहारी ॥
तुटे वाद संवाद ०— ॥ ६३ ॥

तुटे वाद संवाद त्यातें म्हणावे ।
विवेकें अहंभाव यातें जिणावें ॥
अहंतागुणें वाद नानाविकारी ।
तुटे वाद० ॥ ६४ ॥

फुकाचे मुखीं बोलतां काय वेंचे ।
दिसंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे ॥
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारें तुझा तूंचि शोधून पाहें ॥ ६५ ॥

तुटे वाद संवाद तेथें करावा ।
विवेकें अहंभाव हा पालटावा ॥
जनीं बोलण्यासारिखें आचरावें ।
क्रिया पालटे भक्तिपंथेंचि जावें ॥ ६६ ॥

ध्रुवू लेंकरूं बापुडें दैन्यवाणें ।
कृपा भाकितां दीधली भेटि जेणें ॥
चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ६७

१अंतःकरणांत. २ याचितां. ३ दिली.

गजेंद्रू महासंकटीं वाट पाहे ।
तया कारणें श्रीहरी धांवताहे ॥
उडी घातली जाहला जीवदानी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ६८ ॥

आहिल्ये सतीलागीं आरण्यपंथें ।
कुढावा, पुढें देव बंदी तयातें ॥
बळें सोडितां, घाव घाली निशाणीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥६९॥

जनाकारणें देव लीळावतारी ।
बहूतांपरी आदरें वेषधारी ॥
तया नेणती ते जन पापरूपी ।
दुरात्मे महा नष्ट चांडाळ पापी ॥ ७० ॥

मना वासना वासुदेवीं वसों दे ।
मना कामना काम—संगी नसो दे ॥
मना कल्पना वाउगी ते न कीजे ।
मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ॥७१॥

गती कारणें संगती सज्जनाची ।
मती पालटे, सूमती दुर्जनाची ॥

---

१ संरक्षण.

रतीनायकेचा[1] पती नष्ट आहे ।
म्हणोनी मनातीत होऊनि राहे ॥७२॥

मना अल्प संकल्प तो ही नसावा ।
सदा सत्य संकल्प चित्तीं वसावा ॥
जनीं जल्प[2] वीकल्प तोही त्यजावा ।
रमाकांत एकांतकाळीं भजावा ॥७३॥

भजाया जनीं पाहतां राम एकू ।
करीं बाण एकू मुखीं शब्द एकू ॥
क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू ।
धरा जानकी–नायकाचा विवेकू ॥ ७४ ॥

विचारूनि बोले विवंचूनि चाले ।
तयाचेनि संतप्त ते ही निवाले ॥
बरें शोधिल्यावीण बोलों नये हो ।
जनीं बोलणे शुद्ध नेमस्त राहो ॥ ७५ ॥

नसे गर्व अंगीं सदा वीतरागी ।
क्षमा–शांति भोगी दया दक्ष योगी ॥
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्य वाणा ।
यहीं[3] लक्षणीं जाणिजें योगिराणा ॥ ७६ ॥

---

१ रतीचा नवरा-मदन. २ बडबड. ३ ह्या.

जिवां श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले॥
तनूबुद्धिचें कर्म खोटें कळेना।
जुनें ठेवणें मी पणें तें कळेना॥ ७७॥

म्हणे दास सायास त्याचे करावे।
जनीं जाणता पाय त्याचें धरावे॥
गुरूअंजनेवीण तें आवळेना।
जुनें ठेवणें मीपणें तें कळेना॥ ७८॥

निराकार आधार ब्रम्हादिकांचा।
जया सांगतां शीणली वेदवाचा॥
विवेकें तदाकार होऊनि राहें।
मना संत आनंत शोधूनि पाहे॥ ७९॥

नसे पीत ना श्वेत ना शाम कांहीं।
नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं॥
म्हणें दास विश्वासतां मुक्ति लाहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे॥ ८०॥

नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्वज्ञानें।
समाधान कांहीं नव्हे तानमानें॥

१ देह-क. पा. २ सांपडते. ३ गायनकलेनें.

नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें ।
समाधान तें सज्जाचिनि योगें ॥ ८१ ॥

दिसेना जनीं तेंचि शोधून पाहे ।
बरें पाहतां गूज तेथेंचि आहे ॥
करीं घेउं जातां कदा आढळेना ।
जनीं सर्व कोंदाटलें[2] तें कळेना ॥८२ ॥

म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे ।
अतर्क्यासी तर्की असा कोण आहे ॥
जनीं मीपणें पाहतां पाहवेना ।
तया लक्षितां वेगळें राहवेना ॥ ८३ ॥

जेथें[3] मक्षिका[4] भक्षिली जाणिवेचि ।
तया भोजनाची रुची प्राप्ति कैंचि ॥
अहंभाव ज्या मानसींचा विरेना ।
तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥ ८४ ॥

नको रे मना वाद हा खेदकारी ।
नको रे मना भेद नाना विकारी ॥
नको रे मना शीकवूं पूढिलांसी ।
अहंभाव जो राहिला तूजपाशीं ॥८५॥

---

गूढ. २ व्यापलें. ३ जेणें. क. पा. ४ माशी.

अहंतागुणें सर्व ही दुःख होतें ।
मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ॥
सुखी राहतां सर्व ही सूख आहे ।
अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहें ॥ ८६ ॥

मनें कल्पिला वीषयो सोडवावा ।
मनें देव निर्गूण तो ओळखावा ॥
मनें कल्पितां कल्पना ते सरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥ ८७ ॥

देहादिक प्रपंच हा चिंतियेला ।
परी अंतरीं लोभ निश्चीत झाला ॥
हरीचिंतनें मुक्ति–कांता वरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥ ८८ ॥

बरा निश्चयो शाश्वताचा करावा ।
म्हणे दास संदेह तो वीसरावा ॥
घडीनें घडी सार्थकाची करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥ ८९ ॥

करीं वृत्ति जो संत तो संत जाणा ।
दुराशा गुणें जो नव्हे दैन्य वाणा ॥

उपाधी तनूबुद्धितें वाढवीते ।
परी सज्जना केवि बाधूं शके ते ॥९०॥

स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या ।
स्फुरें ब्रह्म रे जाण माया सुविद्या ॥
मुळीं कल्पना दों रुपें तेंचि झालीं ।
विवेकें तरी सस्वरूपीं मिळाली ॥९१॥

तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले ।
तया देवरायासि कोणी न बोले ॥
जगीं थोरला देव तो चोरिलासे ।
गुरूवीण तो सर्वथा ही न दीसे ॥९२

गुरू पाहतां पाहतां लक्ष कोटी ।
बहसाल मंत्रावळी, शक्ति मोठी ॥
मनीं कामना चेटकें धातमाता ।
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥९३॥

नव्हे चेटकी चालक द्रव्यभोंदू ।
नव्हे निंदक मत्सरू भक्तिमंदू ॥
नव्हे उन्मतू वेसनी संग बाधू ।
जनीं ज्ञानियां तोचि साधू अगाधू ॥९४॥

---

१ देह.क. पा. २ व्यसनी. ३ अगाध, श्रेष्ठ.

नव्हे वाउगी[1] चाहुटी[2], काम पोटीं ।
क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ॥
मुखें बोलिल्या सारिखें चालताहे ।
मना सद्गुरू तोचि शोधून पाहे ॥९५॥
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी ।
कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ॥
प्रभु दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणें ।
तयाचेन योगें समाधान बाणें[3] ॥९६॥
नव्हे जाणता नेणता देवराणा ।
नये वर्णितां वेदशास्त्रां पुराणा ॥
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा ।
श्रुती नेणती नेणती अंत त्याचा ॥९७॥
वसे हृदयीं देव तो जाण ऐसा ।
नभाचे[4] परी व्यापकू जाण तैसा ॥
सदा संचला येत ना जात नाहीं ।
तयावीण कोठें रितां[5] ठाव[6] नाहीं ॥९८॥
मना सर्व ही संग सोडुनी द्यावा ।
अती आदरें सज्जनाचा धरावा ॥

---

१ व्यर्थ २ चावट. ३ होते. ४ आकाशाच. ५ रिकामा.
६ जागा.

जयाचेनि संगें महादुःख भंगे ।
जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥९९॥
मना संग हा सर्व संगास तोडी ।
मना संग हा मोक्ष तात्काळ जोडी ॥
मना संग हा साधकां शीघ्र सोडी[1] ।
मना संग हा द्वैत निःशेष मोडी ॥ १०० ॥
मनाचीं शतें ऐकतां दोष जाती ।
मतीमंद ते साधना योग्य होती ॥
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं ॥
म्हणें दास विश्वासतां मुक्ति भोगी ॥ १०१
॥जयजय रघुवीर समर्थ॥

---

१ भवसागरापासून सोडी.

## ३ राममंत्राचे श्लोक

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी ।
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं ॥
कसा कोणता नेणवे आज़पारे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १ ॥

नको कंठ शोषूं बहू वेदपाठीं ।
नको तूं पडूं साधनांचे कपाटीं[1] ॥
घडे कर्म खोटें बहू तो दगा रे ।
हरे राम ०॥ २ ॥

तुला ही तनू मानवी प्राप्त झाली ।
बहू जन्मपुण्यें फळालागीं आली ॥
तिला तूं कसा गोंविसी वीषयीं रे ।
हरे राम हा ०॥ ३॥

जरी ही तनू राक्षिसी पुष्ट कांहीं ।
तरी भोग तो रोग होईल देहीं ॥
विपत्तीपुढें तें नये बोलतां रे ।
हरे राम हा०॥ ४ ॥

---

१ कवाडां, संकटीं.

खुळे हस्तपादादि हे भग्न होती ।
दिठी मंद होउनियां कर्ण जाती ॥
तनू कंप सर्वांग होती कळा रे ।
हरे राम ० ॥ ५ ॥

कफें कंठ हा रोग होईल जेव्हां ।
अकस्मात् तो प्राण जाईल तेव्हां ॥
तुला कोण तेथें सखे सोयरे रे ।
हरे राम ० ॥ ६ ॥

तुझें बाळ तारुण्य गेलें निघोनी ।
कळेना कसे लोक जाती मरोनी ॥
करीसी मुलाची स्वहस्तें क्रिया रे ।
हरे राम ० ॥ ७ ॥

दुराशा नको रे परस्त्रीधनाची ।
नको तूं करी नीच सेवा जनाची ॥
पराधीन कैसा महा दीससी रे ।
हरे राम ० ॥ ८ ॥

मदें डोलसी, बोलसी साधुवृंदा ।
कसें हीत तूं नेणसी बुद्धिमंदा ॥

---

० ' १ लके. ' असा अर्थ करावा काय? २ दृष्टि.

रिकामाची तूं गुंतसी वाउगा रें ।
हरे राम ० ॥९॥

बहू व्याप संताप तो मुळमापा ।
गतायुष्य द्रव्यें नये कोटि बापा ॥
कळेना तुला कोगता तो नफा रे ।
हरे राम ० ॥१०॥

तुझे आप्त द्रव्यार्थ नुस्तेच होती ।
तनू हे चितेमाजि कीं वोळवीती ॥
असें जाणुनी हीत कांहीं करी रे ।
हरे राम ० ॥११॥

कुटुंबीं स्त्रिया पुत्र ते दासदासी ।
बहू पोषिसी सोसूनी दुःखराशी ॥
त्यजी भार कावाड ओझें किती रे ।
हरे राम ० ॥ १२ ॥

बहू इच्छिशी कीर्ति सन्मान कांहीं ।
सुखाचा तुला अंतरीं लेश नाहीं ॥
फुकाचें मुखीं नाम तें कां नये रे ।
हरे राम ० ॥ १३ ॥

रवीसूत[1] ते दूत विक्राळ येती।
तुझ्या लिंग-देहास ओढूनि नेती॥
तुला खंडिती मुंडिती दंडिती रे।
हरे राम ०॥१४॥

नको वीषयीं फारसा मस्त होऊं।
नको मानदंभांमधं चित्त गोवूं॥
नको भस्म लावूं जटाभार कां रे।
हरे राम ० ॥ १५॥

नको योग अष्टांग तो रोध प्राणा।
नको कृच्छ्रे[2] चांद्रायणी हट्ट जाणा॥
कळायुक्त चातुर्य ते वीकळीं[3] रे।
हरे राम ० ॥ १६॥

नसे सत्य कांहीं दिसें दों दिसांचें।
तुला लूटती चोरटे लोक साचे॥
स्त्रिया पुत्र कामा न येती तुला रे।
हरे राम ० ॥ १७॥

नको तूं कदापी करूं तीर्थयात्रा।
तनूदंडणीं क्षीणतां सर्व गात्रां[4]॥

---

१ यम. २ व्रत विशेष. ३ निरुपयोगी. ४ इंद्रियांना.

करी ग्रस्त आयुष्य तूं कोणसा रे ।
हरे राम ० ॥ १८ ॥

तुला यम पाशीं करी बद्ध जेव्हां ।
सखा कोणता सोडवी सांग तेव्हां ।
यमाला कदापी दया ते नय रे ।
हरे राम ० ॥ १९ ॥

तपस्वी मनस्वी भले पार गेले ।
दुजी सृष्टिकर्ते असे थोर मेले ॥
चिरंजीव कल्पायु गेले किती रे ।
हरे राम ० ॥ २० ॥

बहु काम धंद्यांमधें धांव घेसी ।
किती नांवरूपा जगीं मीरवीशी ॥
कशाला तुला उंट घोडे नगारे ।
हरे राम ० ॥ २१ ॥

म्हणें देश माझे भुमी नांव वाडे ।
शिबीकासनीं बैससी उंच लोडे ॥
कसा उंच तूं मंचकीं लोळसी रे ।
हरे राम ० ॥ २२ ॥

दशग्रीव लंकापुरीं मस्त झाला।
अकस्मात् गेला पुरीमाजि घाला॥
चिरंजीव दे राज्य बीभीषणा रे।
हरे राम० ॥ २३ ॥

अधोमूख विष्ठेमधें मायपोटीं।
पचे पिंड हा सोसुनी दुःखकोटी॥
स्मरेना कसे लाज नाहीं तुला रे।
हरे राम० ॥ २४ ॥

असें भोगुनी पंचचत्वारि मासीं।
पुढें दैवयोगें सख्या जन्मलासी॥
कसा वीसरे ध्यान सोऽहं पुढें रे।
हरे राम० ॥ २५ ॥

बहू पाळिलें पोशिलें मायबापीं।
निघे भिन्न निंद्रानियां पापरूपी॥
स्त्रियेचे मुळें शेवटीं दुर्गती रे।
हरे राम० ॥ २६ ॥

वहू ढीग मागें पुढें मोहरांचे।
मदोन्मत्त होऊनियां तेथ नाचे।

---

१ रावण.

असे गर्व त्यालागि नर्कासि थारे ।
हरे राम० ॥ २७ ॥

अलंकारस्थानीं तनू सज्जवीसी ।
मना दर्पणीं पाहुनी रंजवीसी ॥
कळेना जळे सर्पणीं रूप तें रे ।
हरे राम ० ॥२८॥

बहू द्रव्यगाठीं पुन्हां मेळवीशी ।
गुरू विप्र बंधु कसे चाळवीशी ॥
दुराशा कशाला, मशाला तुला रे ।
हरे राम ० ॥२९॥

रवी जे घडी हाणतो काळ तेव्हां ।
श्रुती शद्ब हे गर्जती तास तेव्हां ॥
म्हणे क्षीण आयुष्य गेलें तुझें रे ।
हरे राम ० ॥३०॥

कसी जन्मुनी माय त्वां वांझ केली ।
कसी लाज वंशा कुळा लावियेली ॥
भुमीभार धोंडा पशु हा खरा रे ।
हरे राम ० ॥ ३१ ॥

कसा कोणता काळ येईल केव्हां ।
दिनासारिखा काळ नेईल तेव्हां ॥
तुझें वित्त तारुण्य लोपेल सारे ।
हरे राम ० ॥ ३२ ॥

नको चाउटी वाउगी या जनासी ॥
हरीचिंतनीं ध्यास लावा मनासी ॥
अमोलीक हा काळ जातो वृथा रे ।
हरे राम ० ॥ ३३ ॥

महाघोर हा थोर संसार मोठा ।
कळे संतसंगें समूळींच खोटा ॥
कळे भुक्ति मुक्ती विरक्तीच गा रे ।
हरे राम ० ॥ ३४ ॥

त्यजा दुष्ट-संगा पहा रे भल्यासी ।
करा हीत येऊं नका गर्भवासी ॥
जसें अंतिचें दुःख होतें जिवा रे ।
हरे राम ० ॥ ३५ ॥

कळे साधनें याविणें सर्व निंदी ।
हरे राम हा मंत्र जो त्यासी वंदी ॥
हरे राम हे मालिका साधका रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३६ ॥

# ४ करुणाष्टकें.

१ नमनः—

नमूं आदिमाता नमूं योगमाता।
नमूं वेदमाता नमूं विश्वमाता॥
नमूं भक्तिमाता नमूं मुक्तिमाता।
नमूं सज्जनाची कृपा ज्ञानमाता॥ १॥

नमूं संतयोगी नमूं सिद्धयोगी।
नमूं भक्तज्ञानी विवेकी विरागी॥
नमूं आत्मनिष्ठां नमूं योगनिष्ठां।
नमूं सर्व श्रेष्ठां वरिष्ठां वरिष्ठां॥ २॥

मनीं चिंतितां राम, विश्राम वाटे।
जगज्जाळ जंजाळ हे सर्व तूटे॥
तुटे काळजी काळ जिंकावयाची।
फुटे वृत्ति अर्थांतरीं जावयाची॥ ३॥

२ प्रार्थनाः—

गणपती मति दे मज लाघवी।
जनकजापतिचा लघुसा कवी॥

विनवितों करुणालयकारणा ।
परम सुंदर दे मज धारणा ॥ १ ॥

बहुत सेवक त्याहुनि हीन मी ।
बहुत सेवक त्याहुनि दीन मी ॥
बहुत काय वदों गुण आपुले ।
पतित ते मजहुनी भले भले ॥ २ ॥

पतित दास जनीं तुमचे खरे ।
पतित पावन नाम कसें उरे ॥
वचन लागतसे पाहतां धुरे ।
नुधरितां ब्रिद हें तुमचें नुरे ॥ ३ ॥

३ करुणाष्टकें :—

'अनुदिनि अनुतापें तापलों रामराया.'

अनुदिनि अनुतापें तापलों रामराया ।
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया ॥
अचपळ मन माझें नावरें आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥१॥

---

१ पुढाऱ्याला. २ न उद्धारितां. ३ देवराया—क. पा. ४ अति चपल, नास्ति चपलं यस्मात्.

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ॥
रघुपति मति माझी आपुलीसी करावी ।
सकळ त्यजुनी भावें कास तूझी धरावी ॥२॥

विषयजनित सूखें सौख्य होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं ॥
रघुकुळटिळका[1] रें हीत माझें करावें ।
दुरित दुरि रहावें स्वस्वरूपीं भरावें ॥३॥

तनु मन धन माझें राघवा रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळभजनलीला लागली आस तुझी ॥४॥

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळस्वजनमाया तोडितां तोडवेना ॥
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणउनि करुणा हें बोलतों दीनवाचा ॥५॥
जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी ॥

१ रविकुळ—क. पा.

तळमळ निववी रे राम कारुण्यसिंधु ।
षडरिपुकुळ माझें तोडि याचा समंधू[1] ॥६॥
तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी ॥
झडकरि झड घालीं धांव पंचानना[2] रे ।
तुजविण मज नेते जंबुकी वासना रे ॥७॥
सबळ जनक माझा राम कारुण्यपेटी[3] ।
म्हणउनि मज पोटीं लागली आस मोठी ॥
दिवस गणित बोटीं प्राण ठेवूनि कंठीं ।
अवचट[4] मज भेटी होत घालीन मीठी ॥८॥
जननिजनकमाया लेंकरूं काय जाणे ।
पय न लगत मुखें हाणतां वत्स नेणें ॥
जलधरकणआशा लागली चातकासी ।
हिमकर[5] अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥९॥
तुजविण मज तैसें जाहलें रामराया ।
विलगविषमकाळीं तूटली सर्व माया ॥
सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं ।
वमक वमन जैसें त्यागिलें सर्व कांहीं ॥१०॥

---

१ संबंध. विरोधू–क. पा. २ सिंह. ३ लावण्यपेटी-क. पा. ४ एकाएकी. ५ चंद्र.

स्वजनजन-धनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती ।
विषय सकळ नेती मागुतां जन्म देती ॥११॥

सकळ जन भवाचे आखिल वैभवाचे ।
जिवलग मज कैंचे चालतें हेंचि साचें ॥
विलग विषम काळीं सांडिती सर्व माळीं ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥१२॥

सुख सुख म्हणतां हें दुःख ठाकूनि आलें ।
भजन सकळ गेलें चित्त दुश्चित्त झालें ॥
भ्रमित मन कळेना हीत तें आकळेना ।
परम कठिण देहीं देहबुद्धि वळेना ॥१३॥

उपरति मज रामीं जाहली पुर्ण कामीं ।
सकळभ्रमविरामीं[1] राम विश्रामधामीं ॥
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रघुकुळटिळका रे आपुलेंसें करावें ॥१४॥

जळचर जळवासी नेणती त्या जळासी ।
निशिदिन तुजपासीं चुकलों गुणराशी ॥

---

१ विषयसुखविरामीं—म. पा.

भुमिधरनिगमासी वर्णवेना जयासी ।
सकळभुवनवासी भेटि दे रामदासी ॥१५॥

## २ 'तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों'

असंख्यात रे भक्त होऊनि गेले ।
तिहीं साधनाचे बहू कष्ट केले ॥
नव्हे कार्यकर्ता भुमीभार झालों ।
तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों ॥१॥

बहू दास ते तापसी तीर्थवासी ।
गिरीकंदरीं भेटि नाहीं जयासीं ॥
स्थिती ऐकतां थोर विस्मीत झालों ।
तुझा दास ० ॥२॥

सदा प्रेमराशी तया भेटलासी ।
तुझ्या दर्शनें स्पर्शनें सौख्यराशी ॥
अहंता मनीं शब्दज्ञानें बुडालों ।
तुझा दास ० ॥३॥

तुझे प्रीतिचे दास निर्माण झाले ।
असंभाव्य ते कीर्ति बोलोनि गेले[१] ॥

१ जनासी. म. पा.

बहू धारणा थोर चकीत झालों ।
तुझा दास० ॥ ४ ॥

बहूसाल देवालयें हाटकाचीं[1] ।
रसाला कळा लाघवे नाटकाची ॥
पुजा देखतां जाड जीवीं गळालों ।
तुझा दास० ॥ ५ ॥

कितेकीं देह त्यागिले तूजलागीं ।
पुढें जाहले संगतीचे विभागी ॥
देह दुःख होतांच वेगीं पळालों ।
तुझा दास ० ॥ ६ ॥

सदा सर्वदा राम सांडूनि कामीं ।
समर्था तुझे दास आम्ही निकामी ॥
बहू स्वार्थ बुद्धीन रे कष्टवीलों ।
तुझा दास ० ॥ ७ ॥

किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती ।
किती धर्मसंस्थापना अन्नशांती ॥
परस्तावलों कावलों तप्त झालों ।
तुझा दास ० ॥ ८ ॥

---

१ सोन्याचीं.

## ३ " रामावर भार. "

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं ।
नसे प्रेम हें रामविश्राम नाहीं ॥
असा दीन अज्ञान मी दास तुझा ।
समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १ ॥

रघूनायका जन्मजन्मांतरींचा ।
अहंभाव छेदूनि टाकीं दिनाचा ॥
जनीं बोलती दास या राघवाचा ।
परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥ २ ॥

दिनाचें उणें दीसतां लाज कोणा ।
जनीं दास दीसे तुझा दैन्यवाणा ॥
शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी ।
तुझा[1] दास पाहे सदा शीघ्र कोपी ॥ ३ ॥

रघूनायका दीन हातीं धरावें ।
अहंभाव छेदूनिया उद्धरावें ॥
अगूणी तयालागि गूणी करावें ।
समर्थं भवसागरीं ऊतरावें ॥ ४ ॥

---

१ तुझी वास—म. पा.

किती भार घालूं रघूनायकाला ।
मजकारणें शीण होईल त्याला ॥
दिनानाथ हा संकटीं धांव घाली ।
तयाचेनि हें सर्व काया निवाली ॥ ५ ॥

मला कोवसा राम कैवल्यदाता ।
तयाचेन हे फिटली सर्व चिंता ॥
समर्थी तथा काय उत्तीर्ण व्हावें ।
सदा सर्वदा नाम वाचें वदावें ॥ ६ ॥

## ४ " रघूनायका मागणें हेंचि आतां. "

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी ।
अती आदरें सर्व सेवा करावी ॥
सदा प्रीति लागो तुझें गूण गातां ।
रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥

तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें ।
तुझे गूण गातां मनेसीं रमावें ॥
उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां ।
रघूनायका ० ॥ २ ॥

---

१ आधार. २ मनासीं रहावें. क. पा.

मनीं वासना भक्ति तूझी करावी ।
कृपाळूपणें राघवें पुरवावी ॥
वसावें मदीयांतरीं नाम घेतां ।
रघूनायका ० ॥ ३ ॥

सदा सर्वदा योग तूझा घडावा ।
तुझे कारणीं देह माझा पडावा ॥
उपेक्षूं नको गूणवंता अनंता ।
रघूनायका ० ॥ ४ ॥

नको द्रव्यदारा नको येरझारा ।
नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा ॥
सगूणीं मला लावि रे भक्तिपंथा ।
रघूनायका ० ॥ ५ ॥

भवें व्यापलों प्रितिछाया करावी ।
कृपासागरें सर्व चिंता हरावी ॥
मला संकटीं सोडवावें समर्था ।
रघूनायका ० ॥ ६ ॥

मनीं कामना कल्पना ते नसावी ।
कुबुद्धी कुडी वासना नीरसावी ॥

१ नुपेक्षी मज-क. पा.

नको संशयो तोडि संसारवेथा ॥
रघूनायका ० ॥ ७ ॥
समर्थापुढें काय मागों कळेना ।
दुराशा मनीं बैसली हें ढळेना ॥
पुढें संशयो नीरसी सर्व चिंता ।
रघूनायका ० ॥ ८ ॥
ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें ।
म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावें ॥
सुटे ब्रीद आम्हांसि सांडूनि जातां ।
रघूनायका ० ॥ ९ ॥

५ " बुद्धि दे रघुनायका. "

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं । विद्या नाहीं विवेकिता ।
नेणता भक्त मी तूझा । बुद्धी दे रघुनायका ॥ १ ॥
मन हें आवरेना कीं । वासना वावडे सदा ॥
कल्पना धांवते सैरा । बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥
अन्न नाहीं वस्त्र नाहीं । सौख्य नाहीं जनामधें ॥
आश्रयो पाहतां नाहीं । बुद्धि दे ० ॥ ३ ॥
बोलतां चालतां येना । कार्यभाग कळेचिना ॥
बहु मी पीडिलों लोकीं । बुद्धि दे ० ॥ ४ ॥

तुझा मी टोणपा झालों । कष्टलों बहुतापरी ।
सौख्य तें पाहतां नाहीं । बुद्धि दे० ॥ ५ ॥

नेटकें लिहितां येना । वाचिता चुकतों सदा ॥
अर्थ तो सांगतां येना । बुद्धि दे० ॥ ६ ॥

प्रसंग वेळ तर्केना । सुचेना दीर्घ सूचना ॥
मैत्रिकी राखतां येना । बुद्धि दे० ॥ ७ ॥

कळेना स्फूर्ति होईना । आपदा लागली बहू ॥
प्रत्यहीं पोट सोडीना । बुद्धि दे० ॥ ८ ॥

संसारीं श्लाघ्यता नाहीं । सर्वही लोक हांसती ॥
वीसरू पडतो पोटीं । बुद्धि दे० ॥ ९ ॥

चित्त दुश्चित्त होताहे । ताळ तंत्र कळेचिना ॥
आळसू लागला पोटीं । बुद्धि दे० ॥ १० ॥

संसार नेटका नाहीं । उद्वेगू वाटतो जिवीं ॥
परमार्थ कळेना ही । बुद्धि दे०॥ ११ ॥

देईना पुर्विना कोणी । उगेचि जन हांसती ॥
वीसरू पडतो पोटीं । बुद्धि दे० ॥ १२ ॥

पिशुनें वाटतीं सर्वै । कोणीही मजला नसे ॥
समर्था तूं दयासिंधू । बुद्धि दे० ॥ १३ ॥

उद्दास वाटतें जीवीं । आतां जावें कुणीकडे ॥
तूं भक्तवत्सला देवा । बुद्धि दे० ॥ १४ ॥

कायावाचामनोभावें । तुझा मी म्हणवीतसे ॥
हे लाज तूजला माझी । बुद्धि दे० ॥ १५ ॥

सोडविल्या देवकोटी । भूभार फेडिला बळें ॥
भक्तांसी आश्रयो मोठा । बुद्धि दे० ॥ १६ ॥

भक्त उदंड तुम्हाला । आम्हांला कोण पूसतें ॥
ब्रीद हें राखणें आधीं । बुद्धि दे० ॥ १७ ॥

उदंड ऐकिली कीर्ती । पतीतपावना प्रभो ॥
मी एक रंक दुर्बुद्धी । बुद्धि दे० ॥ १८ ॥

आशा हे लागली मोठी । दयाळू बा दया करीं
आणीक नलगे कांहीं । बुद्धि दे० ॥ १९ ॥

रामदास म्हणे माझा । संसार तुज लागला ॥
संशयो वाटतो पोटीं । बुद्धि दे० ॥ २० ॥

## ६ " उदासीन हा काळ कोठें न कंठे. "

समाधान साधूजनाचेंनि योगें ।
परी मागुतें दुःख होतें वियोगें ॥

घडीनें घडी शीण अत्यंत वाटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥

घरें सुंदर सौख्य नाना परींचें ।
परी कोण जाणेल तें अंतरींचें ॥
मनीं आठवितांचि तो कंठ दाटे ।
उदासीन हा० ॥ २ ॥

बळें लावितां चित्त कोठें जडेना ।
समाधान तें कांहीं केल्या घडेना ॥
नव्हे धीर नैनीं सदा नीर लोटे ।
उदासीन० ॥ ३ ॥

अवस्था मनीं लागली काय सांगों ।
गुणीं गुंतला हेत कोणास मागों ॥
बहूसाल भेटावया प्राण फूटे ।
उदासीन० ॥ ४ ॥

कृपाळूपणें भेट रे रामराया ।
वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया ॥
जनांमाजि लौकीक हा ही न सूटे ।
उदासीन० ॥ ५ ॥

अहा रे विधी त्वां असें काय केलें ।
पराधीनता पाप माझें उदेलें ॥
बहुतांमधें चूकतां तूक तूटे ।
उदासीन० ॥ ६ ॥

समर्था मनीं सांडि माझी नसावी ।
सदा सर्वदा भक्तचिंता असावी ॥
घडेना[1] तुझी प्राप्ति हें कर्म खोटें ।
उदासीन० ॥ ७ ॥

अखंडीत हे सांग सेवा घडावी ।
न होतां तुझी भेटि काया पडावी ॥
दिसंदीस आयुष्य हें व्यर्थ आटे ।
उदासीन० ॥ ८ ॥

भजों काय सर्वांपरी हीन देवा ।
करूं काय रे सर्व माझाचि ठेवा ॥
म्हणों काय मी कर्मरेखा न लोटे ।
उदासीन० ॥ ९ ॥

म्हणे दास मी वास[2] पाहें दयाळा ।
रघुनायका भक्तपाळा भुपाळा ॥

---

१ घडेना तुझा योग हा प्राप्त खोटें. क. पा. २ वाट.

पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें ।
उदासीन० ॥ १० ॥

## ७ "रघुनायका काय कैसें करावें."

उदासीन हा काळ जातो गमेना ।
सदा सर्वदा थोर चिंता शमेना ॥
उठे मानसीं सर्व सांडूनि जावें ।
रघूनायका काय कैसें करावें ॥ १ ॥

जनीं बोलतां चालतां वीट वाटे ।
नसे अंतरीं स्वस्थ कोठें न कंठे ॥
घडीनें घडी चित्त कोठी धरावें ।
रघूनायका० ॥ २ ॥

अवस्था मनीं होय नाना परीची ।
किती काय सांगों गती अंतरींची ॥
विवेकेंचि या मानसा आवरावें ।
रघूनायका० ॥ ३ ॥

विचारें तऱ्हीं अंतरीं कोंड होतो ।
शरीरासि तो हेत सांडूनि जातो ॥

उपाधीस देखोनि वाटे सरावें ।
रघूनायका० ॥ ४ ॥
म्हणे दास उदास झालों दयाळा ।
जनीं व्यर्थ संसार हा वायचाळा ॥
तुझा मी तुला पूसतों सर्वभावें ।
रघूनायका० ॥ ५ ॥

## ८ " तुजवीण रामा मज कंठवेना. "

तुझिया वियोगें जीवित्व आलें ।
शरीर–पांगें[१] बहु दुःख झालें ॥
अज्ञान दारिद्र्य माझें सरेना ।
तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १ ॥
परतंत्र जीणें कंठूं किती रे ।
उच्चाट[२] माझे मनिं वाटतो रे ॥
लल्लाट-रेखा तैरि[३] पालटेना ।
तुजवीण० ॥ २ ॥
जडली उपाधी अभिमान साधी ।
विवेक नाहीं बहुसाल बाधी ॥

---

१ पराधीनतेमुळें. २ संसाराचा कंटाळा.

३ जापिं: क. पा.

स्वामीवियोगें पळही गमेना ।
तुज० ॥ ३ ॥

विश्रांति देहीं अणुमात्र नाहीं ।
कुळाभिमानें पडिलों प्रवाहीं ।
स्वहित माझें होतां दिसेना ।

तुज० ॥ ४ ॥

विषयीं जनानें मज लाजवीलें ।
प्रपंचसंगें आयुष्य गेलें ॥
समयीं बहु क्रोध शांती घडेना ।

तुजवीण० ॥ ५ ॥

सदृढ झाली देहबुद्धि माझी ।
वैराग्य कांहीं होणार नाहीं ॥
अपूर्ण कामीं मन हें विटेना ।
तुजवीण० ॥ ६ ॥

निरूपणीं हे सद्वृत्ति होते ।
स्थळत्याग होतां सर्वेचि जाते ॥
काये करूं रे क्रिया घडेना ।

तुजवीण० ॥ ७ ॥

संसारसंगें बहु पीडलों रे ।
कारुण्यसिंधू मज सोडवी रे ॥
कृपाकटाक्षें सांभाळि दीना ।
तुज० ॥ ८ ॥

जय जी दयाळा त्रैलोक्यपाळा ।
भवसिंधु हा रे मज तारि हेळीं[1] ॥
धारिष्ट माझें हृदयीं वसेना ।
तुजवीण० ॥ ९ ॥

आम्हा अनाथा तूं एक दाता ।
संसारचिंता[2] चुकवी समर्था ॥
दासा मनीं आठव वीसरेना ।
तुजवीण० ॥ १० ॥

## ९ 'समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें.'

हिनाहून मी हीन जैसे भिकारी ।
दिनाहून मी दीन नाना विकारी ॥
पतीतांसि रे आणि हातीं धरावें ।
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥ १ ॥

---

१ लीलेनें. २ वेथा. क. पा.

जनीं भक्ति नाहीं मनीं भाव नाहीं ।
मला युक्ति ना बुद्धि कांहींच नाहीं ॥
कृपाळूपणें राज्य रंकासि द्यावें ।
समर्था० ॥ २ ॥

बहू साल अन्याय कोट्यान कोटी ।
रघूनायकें घातलें सर्व पोटीं ॥
किती काय गूणासि म्यां आठवावें ।
समर्था० ॥ ३ ॥

समर्थें दिलें सौख्य नानापरीचें ।
सदा सर्वदा जाणसी अंतरींचें ॥
ळळें पाळिलें तूं कृपाळू स्वभावें ।
समर्था० ॥ ४ ॥

दिनानाथ हें ब्रीद त्वां साच केलें ।
म्हणे दास भक्तांसि रे उद्धरीलें ॥
सुखें सांडणें या तनूचें करावें ।
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें॥ ५ ॥

---

१ देहाचें. क. प.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## १० "उदासीन हे वृत्ति कोठें न लागे."

रघूनायकावीण हा शीण आहे ।
सदा सर्वदा रंग वोरंगताहे ॥
निशीदीन या राघवाच्या वियोगें ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ १ ॥

गुणीं गुंतलें चित्त हें आवरेना ।
तयाविण आणीक कांहीं सरेना ॥
समाधान हें होय त्याचेनि संगें ।
उदासीन हे ० ॥२॥

मनीं प्रीति हे लागली राघवाची ।
सदानंद हे राममूर्ती सुखाची ॥
पदार्थी बळें लावितां चित्त भंगे ।
उदासीन हे ० ॥३॥

मनीं आठवितां समाधान वाटे ।
तया देखतां संशयो सर्व तूटे ॥
न लिंपे कदा चित्त दुश्चित्त भंगे ।
उदासीन हे ० ॥४॥

मनीं तंत आनंत या राघवाचा ।
तुटे किंत तो नावडे या भवाचा ॥

सदा सर्वदा अंतरीं राम जागे ।
उदासीन हे ० ॥५॥

मनीं नावडे द्रव्यदारा पसारा ।
मनीं नावडे माइकांचा उबारा ॥
मनीं नावडे भोग हा राजयोगें ।
उदासीन०॥ ६ ॥

जनीं पाहतां भेदबुद्धि अनेका ।
मदें मत्सरें निंदितीं एकमेका ॥
घडे त्याग या कारणें लागवेगें ॥
उदासीन हे० ॥ ७ ॥

बहूसाल हें बोलणें आवडेना ।
जनीं वासना शब्दज्ञानें पडेना ॥
क्रियेवीण तें बोलतां चित्त भंगे ।
उदासीन० ॥ ८ ॥

मनीं सवथा सत्य तें सांडवेना ।
मनीं सर्वथा मिथ्य ते मांडवेना ॥
समाधान तें योगसंगें निसंगें ।
उदासीन० ॥ ९ ॥

जनासारिखें बोलणें ही घडेना ।
म्हणोनी जनीं सर्वथा ही पडेना ॥
अहंता गुणें बुद्धि वेवाद लागे ।
उदासीन० ॥ १० ॥

उपाधीगुणें सत्य तें मिथ्य होतें ।
उपाधीगुणें मिथ्य तें सत्य होतें ॥
उपाधीगुणें एक रंगें विरंगें ।
उदासीन० ॥ ११ ॥

उपाधीगुणें लागतो पक्ष घेणें ।
उपाधीगुणें सत्य सोडून देणें ॥
उपाधीगुणें वीषयीं जीव रंगे ।
उदासीन ॥ १२ ॥

उपाधीगुणें सर्व सोशीत जावें ।
उपाधीगुणें मानवाधीन व्हावें ॥
उपाधीगुणें व्यर्थ हा स्वार्थ लागे ।
उदासीन ० ॥ १३ ॥

मनीं सांडितां संगव्याधी उपाधी ।
पुढें सांपडे राम कारुण्यनिधी ॥
विवेकें मनींचा अहभाव भंगे ।

उदासीन ० ॥ १४ ॥

पराधीलता रामदासीं घडेना ।
तनें चालतां रामभक्ती उडेना ।
उभा राम सांभाळितो पृष्ठिभागें ।
उदासीन ० ॥ १५ ॥

## ११ " सर्वोत्तमा कैं मज भेट देसीं. "

दुःखानळें मी संतप्त देहीं[1] ।
तुजवीण रामा विश्रांति नाहीं ॥
आधार तुझा मज मी विदेशी ।
सर्वोत्तमा कैं[2] मज भेटि देसी ॥ १ ॥

प्रारब्ध खोटं अभिमान आला ।
स्वामी समर्था वियोग झाला ॥
तेणें बहु क्षीति[3] वाटे मनासी ।
सर्वोत्तमा ० ॥ २ ॥

तुझिया वियोगें बहू वेदना रे ।
विवेक नाहीं आम्हां दिना रे ॥

---

१ देह. २ केव्हां. ३ दुःख.

पडिला समंधूं[1] या दुर्जनासी ।
सर्वोत्तमा ० ॥ ३ ॥

संसारचिंता मज वाटते रे ।
रामा प्रपंचीं मन जातसे रे ॥
संसर्ग आहे इतरा जनांसी ।
सर्वोत्तमा कै० ॥ ४ ॥

## १२ " शेखीं जिवें सांडुनि सर्व जावें. "

अनेक दिव्यांबर रत्नमाळा ।
सिंहासनीं फाकति रम्य कीळा ॥
शरीर तेंही लागे त्यजावें ।
शेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥ १ ॥

सर्वत्र हें वैभव ईश्वराचें ।
अणुमात्र तेंही नाहीं जिवाचें ॥
जन्मासि येतां उघडेंचि यावें ।
शेखीं० ॥ २ ॥

मधेंच हें सर्व निर्माण झालें ।
ऋणानुबंधें सकळै[2] मिळाले ॥

१ संबंध. २ सुंदर.

अज्ञानयोगें ममता भ्रमावें ।
शेखीं० ॥ ३ ॥

जितां जिवातें बहुसाल चित्तीं ।
करणें घडे हो धन हांव कीर्ति ॥
कटीसूत्र तेंही तोडूनि घ्यावें ।
शेखीं० ॥ ४ ॥

माता पिता ईतर थोरथोरें ।
देहांतकाळीं मिळती अपारें ॥
कौतूक तेंही सकळै पहावें ।
शेखीं० ॥ ५ ॥

शरीर पांगें बहु क्षीण झाला ।
सखीं म्हणोनी बहुसाल केला ॥
तेहीं समस्तें सूखें रहावें ।
शेखीं० ॥ ६ ॥

तारुण्यकाळीं मद आवरेना ।
वृद्धाप्यकाळीं कांहीं स्मरेना ॥
स्वहीत तेंही लोभें चुकावें ।
शेखीं० ॥ ७ ॥

सांडूनिया वोळखि ईश्वराची ।
बहुसाल चिंता केली जयाची ॥
निष्ठूर तेंही सकळै फिरावें ।
शेखीं० ॥ ८ ॥
संसारचिंता ऐसी कराया ।
दुःखानळें व्याकुळ सर्व काया ॥
दुजयासि जातां दुखें रडावें ।
शेखीं० ॥ ९ ॥
ऐकोन हें दास उदास चित्तीं ।
सीतापतीवांचुनि कोण अंतीं ॥
वायां प्रपंचीं वृथा शिणावें ।
शेखीं० ॥ १० ॥

## १३ " त्रैलोक्यनाथ रघुनाथ. "

रघुपतितनुरंगें रंगली नीळ शोभा ।
रघुपतिरुपयोगें सर्व लावण्य शोभा ॥
रघुपतिगुणगंधें धीर्य गंभीर्य लोकीं ।
रघुपति मम चित्तीं बैसला एकनेकीं[1] ॥ १ ॥

---

[1] अनेकीं एक.

त्रैलोक्यनाथ रघुनाथ अनाथबंधू ।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ करुणैकसिंधू ॥
त्रैलोक्यनाथ रघुनाथ कोदंडधारी ।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ लिळावतारी ॥ २ ॥

रघुपतिपदयुग्मीं लीन भावें असावें ।
रविकुळटिळकाचें नाम वाचें वसावें ॥
श्रवण--मनन भावें आदरेंसी करावें ।
परम सुखसमाधीं संतसंगें तरावें ॥ ३ ॥

तुजविण शिण झाला धांव रे रामराया ।
कठिण दिवस जातो तापली सर्व काया ॥
सकळ विकळ गात्रें अवस्था लागली रे ।
तुजविण जगदीशा बुद्धि हे भंगली रे ॥ ४ ॥

## १४ श्रीदेव देव.

श्री देव देव करुणाकर देव देवा ।
श्री देव देव कमलाकर देव देवा ॥
श्री देव देव विधिपूर्वज देव देवा ।
श्री देव देववर केशव देव देवा ॥ १ ॥

श्री देव देव गिरिजापति देव देवा ।
श्री देव देव मदनांतक देव देवा ॥
श्री देव देव सुरभूषण देव देवा ।
श्री देव देव शिवशंकर देव देवा ॥ २ ॥

श्री देव देव जनपावन देव देवा ।
श्री देव देव गरुडध्वज देव देवा ॥
श्री देव देव गजमोचन देव देवा ।
श्री देव देववर केशव देव देवा ॥ ३ ॥

श्री देव देव भवतारक देव देवा ।
श्री देव देव भवहारक देव देवा ॥
श्री देव देव सुरवंदन देव देवा ।
श्री देव देव निगमांतर देव देवा ॥ ४ ॥

## १५ रघुविर भजनाची मानसीं प्रीति लागो.

रघुविर भजनाची मानसीं प्रीति लागो ।
रघुविर स्मरणाची अंतरीं वृत्ति जागो ॥
रघुविर चरणाची वासना वासे मागो ।
रघुविरगुणगातां वाणि हे नित्य रंगो ॥ १ ॥

---

१ इच्छा.

चतुरपण जनीं हें पाहतां आढळेना ।
निकट रघुविराचें रूप कैसें कळेना ॥
चपळ मन वळेना गर्व ताठा गळेना ।
तुजविण जगदीशा कर्मरेखा ढळेना ॥ २ ॥
तरुणपण तनूचें[1] लोपतां वेळ नाहीं ।
तनुमनधन अंतीं वोसरे सर्व कांहीं ॥
सकळ जन बुडाले व्यर्थ मायाप्रवाहीं ।
झडकरि सुमना रे हीत शोधोनि पाही ॥ ३ ॥
पळपळ पळताहे बाळ तारुण्य देहीं ।
तळमळ विषयांची नेणते हीत कांहीं ॥
ळळळळ गरळा तो काळ लाळीत आहे ।
जळजळ सितळा हे भक्ति सेऊनि राहे ॥ ४ ॥
दिनकरकुळवल्ली लोटली अंगभारें ।
रघुविर–अवतारें दाटली थोरथोरें ॥
सुखरुप सुखवासी राहिले योगरासी ।
सफळ शितळ छाया फावली रामदासी ॥ ५ ॥

---

१ देहाचें क. पा.

## १६ रघुविर भजनें हो कामना पूर्ण होती

विषम गति मनाची ते मला आवरेना ।
शरिर विकळ कामें तें कदा सावरेना ॥
सुख दुख मज माझें वाढिलें तेंचि जेऊं ।
रघुपति तुजला रे कासया बोल ठेऊं ॥ १ ॥
नवस हरि कथेचे रामभक्ती करावे ।
कठिण विषम काळीं नेम जीवीं धरावे ॥
विविध सकळ कांहीं दोष नासोनि जाती ।
रघुविरभजनें हो कामना पूर्ण होती ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे

# करुणाष्टकें.

## भाग ५ वा. (२)

### (१) " प्रभुदर्शन "

नव्हे राजयोगी महद्भाग त्यागी ।
उदासीन जो वीतरागी विरागी ॥
जनस्थान गोदातटीं वास केला ।
प्रभू देखिला दास संतुष्ट झाला ॥ १ ॥

लिळाविग्रही देव ब्रह्मादिकांचा ।
सदा बोलणें चालणें सत्यवाचा ॥
जया चिंतितां चंद्रमौळी[1] निघाला ।
प्रभू देखिला० ॥ २ ॥

दिनानाथ विख्यात हें नाम साजे ।
प्रजापाळकू रामराजा विराजे ॥
बहू सुकृताचा बरा काळ आला ।
प्रभू देखिला० ॥ ३ ॥

जेथें[2] सोडिल्या देवकोटी अचाटा[3] ।
सुखें चालती स्वर्गिंच्या स्वर्गवाटा ॥
प्रतापेंचि त्रयलोक्य आनंदवीला ।
प्रभू देखिला० ॥ ४ ॥

---

१ शंकर. २ जेणें. क. पा. ३ पुष्कळ.

ऋषी तापसी योगरासी विलासी ।
मनीं चिंतीती राम लावण्यरासी ॥
असंभाव्य त्या कीर्तिच्या कीर्ति-ढाला ।
प्रभू देखिला० ॥ ५ ॥

## (२) "प्रपंचाचें वेड"

बाबा काका माउसा मित्र मामा ।
दादा नाना मेहुणा पुत्र शामा ॥
ताता जीजी गोत जामात साड्डू ।
नातू भाचे पूतणे हा पवाडू ॥ १ ॥
आया बाया माउशा पूतणीया ।
काक्या माम्या सासुवा मेहुणीया ॥
आज्या आता भाचिया आणि सूता ।
सूना कांता गोत्रजी त्या बहूता ॥ २ ॥
ऐसीयांची सोइरीये प्रपंचीं ।
नांवें घेतीं सर्व नानापरीचीं ॥
लोभें लोभें गुंतलें चित्त येथें ।
कोणी नाहीं राघवावीण तेथें ॥ ३ ॥
छत्र्या घोडे वैभवें फार झालीं ।
त्यांचे भेटीं सोइरीं सर्व आलीं ॥

---

१ विस्तार.

साली घाली कैच कैची मिळाशी ।
वाखा होतां सर्व शेखीं पळालें. ॥ ४ ॥
एका पोटाकारणें सर्व कांहीं ।
ये संसारीं पाहतां सूत्र नाहीं ॥
देवा देवा काय होईल कैसें ।
ऐसें तेसें लागलें हेंच पीसें ॥ ५ ॥

## ( ३ ) "समर्थांची इच्छा "

देवें दयाळा करुणा करावी ।
भक्ताभिमानें भरणी भरावी ॥
हे रामनौमी तरणी[1] तरावी ।
दासां समस्तां वरणी[2] वरावी ॥ १ ॥

रघुनाथ दासा कल्याण व्हावें ।
अति सौख्य व्हावें आनंदवावें ॥
उद्वेग नासो वर शत्रु नासो ।
नाना विलासें मग तो विलासो ॥ २ ॥

कोडें नको रे कलहो नको रे ।
कापट्य कर्मीं सहसा नको रे ॥

---

१ नौका. २ पूजेची पाळी.

निर्वाण-चिंता निरसी अनंता ।
शरणागता दे बहु घातमाता ॥ ६ ॥

अजयो न हो रे जयवंत हो रे ।
आपदा नको रे बहू भाग्य हो रे ॥
श्रीमंतकारी जनहीतकारी ।
परऊपकारी हरि दास तारी ॥ ४ ॥

## ( ४ ) "समर्थांची निष्ठा"

तुझा वर्णितों भाट मी देवराया ।
सदा सर्वदा गाय ब्रीदें सवाया ॥
महाराज दे अंगिचें वस्त्र आतां ।
बहू जीर्ण झाली देहबुद्धिकंथा ॥ १ ॥

तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा ।
सदा स्वस्थ चिंतीतसे गा महींद्रा ॥
राजाधीश देशा उरपूर्ण द्यावें ।
भवदैन्य हें देशघडी करावें ॥ २ ॥

तुझा भृत्य मी भार्गवा दर्पजीता ।
जीवित्व असें अर्पिलें तूज आतां ॥
भवा जिंकितां जीव देईन पाहे ।
तुज सन्मुख पाठिसी स्थीर राहे ॥ ३ ॥

रघुनायका नीकट दास तूझा।
तुला वीकिलासे स्वयें देह माझा॥
सदा सर्वभावें करीं दास्य तूझें।
देई आपुलें वेशवेतन[1] माझें॥ ४॥
तुझे मारुतीसारिखे दास देवा।
मला मानवा किंकरा कोण केवा॥
दिनानाथ विख्यात हें ब्रीद गाजे।
तेणें मानसीं थोर आनंद माजे॥ ५॥

(५) "श्रीरामाचें ब्रीद"

चकोरासि चंद्रोदयीं सूख जैसें।
रघुनायका देखतां सूख तैसें॥
सगूणासि लाचावलें स्थीर राहे।
रघूनंदनेंवीण कांहीं न राहे॥ १॥
चळेना समरंगणीं ठाण मागें।
चळेना मुखें बोलतां वाक्य यूगें॥
चळेना कृपासिंधु कल्पांतकाळीं।
रघूराज हा आदरें दास पाळी॥ २॥
चमत्कारलें चित्त हें रामगूणीं।
उठे कीर्ति वाखाणितां प्रीति दूणी॥

---

१ दासाचें वेतन.

रघुनायकासारिखा देव नाहीं ।
क्रिया पाहतां चोखडी सर्व कांहीं ॥ ३ ॥

चपेटा[1] विझे काळमाथां जयाचा ।
धरी रे मना पंथ या राघवाचा ॥
विवेकी जनें राजपंथेंचि जावें ।
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ॥ ४ ॥

## ( ६ ) " संसार "

नसे आंथराया नसे पांघराया ।
नसे धाम ना दृढ छाया निजाया ॥
नसे अन्न खाया नसे रम्य जाया ।
वृथा क्षीण संसार कर्ता रडाया ॥ १ ॥

नसे द्रव्य कांहीं घरीं धान्य नाहीं ।
बहू वेष्टिला कामक्रोधादि देहीं ॥
पराधीनता वेळ नाहीं मराया ।
वृथा० ॥ २ ॥

मनासारिखा मित्र तोही मिळेना ।
परत्रीक तें ज्ञान पोटीं वसेना ॥

---

१ विराम पावतो.

सदा कोप आरोप संतप्त काया।
वृथा० ॥ ३ ॥

मनासारिखा सोइरा ही मिळेना।
मनीं पाहतां चित्तशुद्धि असेना॥
उणें बोलती सर्व कांहीं छळाया।
वृथा० ॥ ४ ॥

म्हणे दास हे आस कैसी पहा हो।
सुखाची बहू होतसे श्लाघ्यता हो॥
पुढें जाहली सर्व काया पडाया।
वृथा० ॥ ५ ॥

(७) "देहावस्था"

तनू[1] चालतां सर्वही सूख आहे।
तनू खंगतां कोण सन्निध राहे॥
मिळालीं सखीं चोरटीं वैभवाचीं।
भले जाणते दायकें हीं भवाचीं॥ १ ॥

जयाकारणें सर्व चिंता करावी।
सदा संगती दुर्जनाची धरावी॥

१ देह क. पा.

जया कारणें भोगणें दुःख देहीं ।
तया वैभवा गेलिया चाड नाहीं ॥ २ ॥
न पाहे कदा देव तारुण्यकाळीं ।
तनू खंगतां सर्व झाली उमाळी[२] ॥
बैराडी[३] दिसे बापुडें दैन्यवाणें ।
तयालागि सांभाळिजे काय कोणें ॥ ३ ॥
उठे गर्व हा सर्व तारुण्यकाळीं ।
मदें मातलें चित्त हें काममेळीं ॥
विकारें मनीं देव तो आठवेना ।
पुढें अंतकाळीं स्मरेना स्मरेना ॥ ४ ॥

## (८) " संचित "

जनीं संचितें पिंड निमार्ण झाला ।
मनीं तेंचि भोगावया जिव आला ॥
शुभाशुभ होणार कांहीं कळेना ।
पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥ १ ॥
जिवा ऊगमीं देहनिर्माणकाळीं ।
विधी ओळी लेहोनि गेला कपाळीं ॥
शुभाशुभ होणार कांहीं कळेना ।
पुढें प्राप्त० ॥ २ ॥

२ मळमळ. ३ आशाळभूत.

समुद्रास लंघून पैलाड गेले।
परी भोगणें तें पुढें सिद्ध ठेले॥
शुभाशुभ० ॥ ३ ॥

जनीं वैभवें थोर सायास केले।
परी जीव हे मृत्युमार्गींच गेले॥
शुभाशुभ० ॥ ४ ॥

म्हणे दास विश्वास नामीं धरावा।
मनीं शोक अत्यंत तो ही नसावा॥
शुभाशुभ० ॥ ५ ॥

## (९) "महात्मा"

नव्हे चाकरीवीण तो क्षीण केला।
तरी भाकरी कोण देतो तयाला॥
धनी कोण तो ओळखेना कळेना।
तया व्यर्थ रे सर्व कांहीं कळेना॥ १ ॥

प्रितीनें देहबुद्धि सोडूनि धांवे।
धनी कोण जाणोनि तेथेंचि पावे॥
प्रभूच्या मनासारिखें चालताहे।
भला तोचि साधू जनीं मुक्त पाहे॥ २ ॥

मनांतील जाणे असा कोण आहे।
कसें कोण तें सर्व शोधोनि पाहे॥

किती एक तें पाहतां ही कळेना ।
किती एक तें चित्त चित्ता मिळेना ॥ ३ ॥
बहू बाप हो बोलतां पाप लागे ।
जनामाजि विस्मीत होऊनि सांगे ॥
बहु देव त्याला बहू बाप जाणा ।
म्हणोनि मना वोळखे देवराणा ॥ ४ ॥
असा नष्ट तो भ्रष्ट होऊनि गेला ।
क्रिया धर्म ना कर्म ना मुक्त केला ॥
दिसे सर्व आत्मा म्हणे तो दुरात्मा ।
निराकार आत्मा बुझे तो महात्मा ॥ ५ ॥

## (१०) "अनादिकाळ".

सदा सर्वदा होतसे दीन रात्री ।
किती एक मन्वंतरें होत जाती ॥
बहु काळ गेला नये मागुता तो ।
पुढें बोलतां चालतां सर्व जातो ॥ १ ॥
पहातो जनाला किती एक जाती ।
तनू टाकिताहे पुढें ते पहाती ॥
गताच्या कथा काढितो अल्प कांहीं ।
पुढें लोक ते काढितो आमुच्याही ॥ २ ॥

---

(१) समज

जिता तों किती घालमेली करावी ।
बहूतापरी कल्पना ते धरावी ॥
कितीएक तें आपुलें तें परावें ।
जनीं सर्व सांडूनि शेवीं मरावें ॥ ३ ॥

अहा रे मना हें तुला कां कळेना ।
वृथा शीणसी लोभ तूझा ढळेना ॥
जिणें सर्व जाई जणें दों दिसांचें ।
विचारीं जनीं आपुलें कार्य कैचें ॥ ४ ॥

म्हणे दास ऊदास होईं मना रे ।
बहु साल चिंता नको कामना रे ॥
स्वभावेंचि होणार तें होईना कीं ।
अकस्मात जाणार तें जाइना कीं ॥ ५ ॥

## (११) "गेलेली घडी"

सतीला पती दूसरा शोधवेना ।
दुजा जन्नकू बोलणें हें घडेना ॥
जनीं सद्गुरुसारिखा कोण आहे ।
मनीं मानवा तूंचि शोधूनि पाहे ॥ १ ॥

पहा तूटला तंतु तो मंद वाजे ।
मनीं शोधितां चोरटें चित्त लाजे ॥.

पुन्हां सांदितां वेगळा सर्व सांदा ।
मुखें बोलणें व्यर्थ वादा विवादा ॥ २ ॥

स्नेह तूटला तो कदाही जडेना ।
पुढें भेटि कल्पांतकाळीं घडेना ॥
मनीं तूटला तंत कैसा जडावा ।
पुन्हां मागुता योग कैसा घडावा ॥ ३ ॥

सुखाकारणें थोर अन्याय झाला ।
महा लाभ तो लालचीनें बुडाला ॥
बरें स्वप्नसूखांसि वायां शिणावें ।
मनीं व्यर्थ मागील कां वोसणावें ॥ ४ ॥

बहु सोशितां सोशितां शीण झाला ।
महामूर्ख मी कष्टवीलें तुम्हांला ॥
म्हणे दास मानेल तैसें करावें ।
बरें वोखटें सर्वही वीसरावें ॥ ५ ॥

## (१२) "भेद"

तुरंगा खरा एक कैसें करावें ।
गजा सूकरा साम्य कैसें भरावें ॥
बळें मार्जरा व्याघ्र कैसें करावें ।
फणी दानवें एक कैसें गणावें ॥ १ ॥

सदा देखिजे कोकिळा काक लोकीं ।
बळें सेवितां दुग्ध कीं ताक सेकीं ॥
जगीं पाहतां सारिके हंस ढेकें[1] ।
बळया दूधडी बैसलीं चक्रवाकें ॥ २ ॥

जनामाजि तो चातकू आणि होला ।
सदा ऐकिजे सिंह आणिक कोल्हा ॥
मयूरें बहू कोंबडी देखिजे तीं ।
चकोरें तथा तीतरें वर्ततातीं ॥ ३ ॥

बहू लागल्या खारिका आणि सिंदी ।
तथा वृक्ष दाळिंब आणिक मैंदी ॥
पहा इक्षु येरंड तें एक तोयें ।
स्वतां आपुलें लेइजे आणि जाये ॥ ४ ॥

## १३ " गर्व "

बहू थोर मी शूर मी शहाणा मी ।
बहू दक्ष मी धूर्त मी जाणता मी ॥
बहू नाटकू नेटकू चाळकू मी ।
बहूतांमध्यें मान्य सौजन्य तो मी ॥ १ ॥
बहू बोलणें नीट नेमस्त माझें ।
बहू चालणें सत्य नेमस्त माझें ॥

---

१ करकोचा पक्षी.

बहु साल संगीत कर्तृत्व माझें।
बहुतांमध्यें गोड हें सर्व माझें ॥ २ ॥

बहु चांगली चांगली नेटकी मी।
बहु जाणती जाण चातुर्य ते मी ॥
बहु बोलकी चालकी सुग्रिणी मी।
बहु भाग्य सौभाग्य लावण्य ते मी ॥ ३ ॥

बहु साल हें गोजिरें मूल माझें।
बहु सासुरें थोर माहेर माझें ॥
बहुतांमधें उंच तें कूळ माझें।
बहु गोत माझें बरें सर्व माझें ॥ ४ ॥

मी माझें मी माझेंचि सौख्य वाटे।
विटे गर्व कालांतरीं सौख्य आटे ॥
म्हणे दास विश्वास हा कासयाचा।
जनीं सार तें काय ऐसें विवंचा ॥ ५ ॥

## १४ " जन्मसफलता "

निरुपणीं बरवें मन घालां।
विवरतां अभिमान निघाला ॥
षड्रिपू वरता वरघाला।
उरि पहा न दिसेचि अघाला ॥ १ ॥

भवभवीं सगळा बुडवावा ।
आळस तो अवघा दवडावा ॥
निरुपणें श्रम तो बडवावा ।
मन मनें भजनें चढवावा ॥ २ ॥

संसार हा दुर्लभ लागला रे ।
विवेकयोगें बहू शोभला रे ॥
नेणें तया ईश्वर क्षोभला रे ।
भक्तीभरें जाइल तो भला रे ॥ ३ ॥

जनीं जनाला बहु सांगताती ।
कांहीं तरी वीषय मागताती ॥
आशेच मागें जन लागताती ।
देहांतकाळीं मग भागताती ॥ ४ ॥

निघोनि जावें कठिणा वनाला ।
अखंड गावें मग पावनाला ॥
ऋणी करावें जगजीवनाला ।
प्रीति धरावी पदसेवनाला ॥ ५ ॥

## १५ " मुलांना शिकवण "

बरें सत्य बोला यथातथ्य चाला ।
बहू मानिती लोक तेणें तुम्हांला ॥

धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो ।
बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥

बरें दांत घासोनियां तोंड धोवें ।
कळाहीन कां शूद्रमूर्खीं नसावें ॥
सदा सर्वदा प्रेत्न सोडूं नको रे ।
बहुसाल हा खेळ कामा नये रे ॥ २ ॥

दिसामाजि कांहीं तरी तें ल्याहावें ।
प्रसंगें अखंडीत वाचीत जावें ॥
वयें श्रेष्ठ रे दास्य त्यांचें करावें ।
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥

बहु खेळ खोटा सदालस्य खोटा ।
समस्तांसि भांडेल जो तोचि खोटा ॥
बहुतां जनालागि जीवें झिजावें ।
भले सांगती न्याय तेथें भिजावें ॥ ४ ॥

हिशेबीं सदा न्याय सांडूं नका रे ।
कदाचित अन्याय होतां धका रे ॥
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें ।
महा दुःख तेंही अकस्मात जातें ॥ ५ ॥

प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वाया।
विवेकेविणें सर्वही दंभ जाया ॥
बहु सज्जला नेटका साज केला।
विचारेविणें सर्व ही व्यर्थ गेला ॥ ६ ॥

वरी चांगलें अंतरीं गोड नाहीं।
तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं ॥
वरीं चांगलें अंतरीं गोड आहे।
तयालागिं कोणी तरी शोधिताहे ॥ ७ ॥

सदा अंतरीं गोड तें साठवेना।
कदा अंतरीं वोखटें तें खपेना ॥
म्हणोनि बरा गूण आधीं धरावा।
महाघोर संसार हा नीरसावा ॥ ८ ॥

भला रे भला बोलती तें करावें।
बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें ॥
पुढें शेवटीं सर्व सांडूनि जावें।
मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥

बरा वोखटा सर्व संसार झाला।
अकस्मात येईल रे यमघाला ॥
म्हणोनि भले सांगती सत्य चाला।
जनीं दास तो शीकवीतो मुलांला ॥ १० ॥

## १६ " कर्ता कोण "

निराकार तें ब्रह्म आकार माया ।
निराभास तें ब्रह्म रे भास माया ॥
परब्रह्म तें पाहतांही दिसेना ।
दिसे सर्व मायाचि हें नीरसेना ॥ १ ॥

दिसें सर्व माया परी कोण कर्ता ।
करी सृष्टी रे कोण तो विश्वभर्ता ॥
निराकार आकार होणार नाहीं ।
रचे दृश्य तें ब्रह्म जाणार नाहीं ॥ २ ॥

अकर्तें कदा ब्रह्म कांहीं करीना ।
सदोदीत निर्घून कांहीं धरीना ॥
अविकार विकार तेथें घडेना ।
करी सर्व हें कोण ठायीं पडेना ॥ ३ ॥

कळे त्या कळे काय सांगोनि आतां ।
विवंचील त्या निश्चयो जात जातां ॥
मनींचे मनीं सज्जनीं वोळखावें ।
जिवींचे जिवीं सर्व शोधोनि घ्यावें ॥ ४ ॥

म्हणे दास लोकांसि मी काय सांगों ।
तरायां जनीं मीच कासेसि लागो ॥

वरीं साक्षपें औषधें मेळवावीं ।
जया लागला रोग तेणेंचि घ्यावीं ॥ ५ ॥

## १७ " जनीं जाणिजे योग हा सुकृताचा "

मनासारिखी सुंदरा ते अनन्या ।
मनासारिखे पुत्र जामात कन्या ॥
सदा सर्वदा बोलती रम्य वाचा ।
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥ १ ॥

भलीं मायबापें भले मित्र बंधू ।
भले सोयरे राखती स्नेहवादु ॥
मुलें लेकुरें एक मेळा सुखाचा ।
जनीं० ॥ २ ॥

भले धाकुटे थोरले सर्व कांहीं ।
भले गोत्रजु भिन्न भावार्थ नाहीं ॥
अखंडीत हा काळ जातो सुखाचा ।
जनीं० ॥ ३ ॥

धनें धान्य पानें अलंकार चीरें[१] ।
विसोरे घरें सुंदरें रम्य सारें ॥
देह चालतो सर्व आरोग्य ज्याचा ।
जनीं० ॥ ४ ॥

---

१ वस्त्रें

मनासारिखे ग्राम ग्रामाधिकारी ।
मनासारिखे लोक शोकापहारी ॥
मनासारिखा संग साधू जनाचा ।
जनीं० ॥ ५ ॥

म्हणे दास सायास केल्या घडेना ।
विकल्पें जनीं एक ठायीं पडेना ॥
घडे योग होतां विवेकीं जनाचा ।
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥ ६ ॥

## १८ " निरूपणें मानस आवरावें "

संसार माया ममता नसावी ।
नैराशता दुर्लभ ते असावी ॥
आनंदरूपीं भजनीं भरावें ।
निरूपणें मानस आवरावें ॥ १ ॥

कल्याणकारी भवशोकहारी ।
सत्संगती मानव मूढ तारी ॥
ग्रंथांतरीं अंतर विवरावें ।
निरूपणें मानस आवरावें ॥ २ ॥

परत्रिचें साधन सार आहे ।
नानाप्रकारीं तुळणा न साहे ॥

अद्वैतबोधें श्रवणें तरावें ।
निरूपणें० ॥ ३ ॥

ब्रह्मादिकां मानस आवरेना ।
नाना उपायीं मरतां मरेना ॥
तें निर्गुणीं पांगुळतां मरावें ।
निरूपणें० ॥ ४ ॥

जनीं मनावांचुनि सूख नाहीं ।
मनेंचि लाभे गुज सर्व कांहीं ॥
परंतु तें स्वाधिन हो करावें ।
निरूपणें० ॥ ५ ॥

## १९ " परम सुंदर तें पद पावसी "

बहुत सार विचार करी मना ।
दृढ धरी रघुनाथ उपासना ॥
रघुविरा भजतांचि सुखावसी ।
परम सुंदर तें पद पावसी ॥ १ ॥

तनु मनु धनु या रघुनायका ।
निरवणें धरणें सुखदायका ॥
भवभयासि बळें भडकाविसी ।
परम सुंदर० ॥२॥

बहुत आठवले जिविचा जिवीं ।
परि कदापि न ये सुखपालवीं ॥
वरदराम तरी बळकावसी ।
परम सुंदर० ॥ ३ ॥

अभय दे हरि बोलत बोलतां ।
अभय दे हरि चालत चालतां ॥
अभय सूख विलास विळासती ।
परम सुंदर० ॥ ४ ॥

सुरपती सुरबंद विमोचना ।
भज मना भजतां सुख सज्जना ॥
सगुण दास म्हणे मग धांवसी ।
परम सुंदर० ॥ ५ ॥

## २० " राघव नीरवीला "

तपोवना सानुज राम जातां ।
समागमें जानकि दिव्य कांता ॥
माता म्हणे राघव वाट पाहे ।
प्रयाण पायीं तुजला न साहे॥ १ ॥

पृथ्वी तुला राघव नीरवीला ।
याच्या ह्मणीं रूतासि पाउलाला ॥

जामात तूझा प्रतिपाळि यातें ।
फळीं तऱ्हीं शीघ्र हरी क्षुधेतें ॥ २ ॥

आपापतीं प्रार्थित तूजलागीं ।
जनासि जातो रघुराज योगी ॥
नद्या तटाकें करिं पूर्ण येथें ।
तृषा क्षणीं पीडिल हो तयातें ॥ ३ ॥

श्री सूर्यराजा कुळदीप तूझा ।
वनासि जातो रघुराज माझा ॥
स्पर्शों नको तीव्र करें तयातें ।
ध्यानीं क्षिती वाटत योगियातें ॥ ४ ॥

वाजो नको कर्शश रे समीरा ।
असेल जेथें नृपरत्न हीरा ॥
तो स्वामि रे हा तुझिया सुताचा ।
सधूशरें होईल देह त्याचा ॥ ५ ॥

रघूत्तमू सादृश वेशधारी ।
सौमित्र तो सुंदर ब्रह्मचारी ॥
वनस्पती हो तुम्हीं तोषवा हो ।
छाया सुगंधें श्रम हार वाहो ॥ ६ ॥

---

१ समुद्रा. २ तपासि क-पा.

सपक्षिकुळासह कोकिळा हो ।
सीते सुशद्वीं तुम्ही रंजवा हो ।
हे धाकुटी योगिणि कुंजवासी ।
तुम्ही च तेथें सखिया तियेसी ॥ ७ ॥

सगद्गदें बोलतसे सुशब्दें ।
श्रवताति नीरें नयनारविंदें ॥
पुसोनियां राघव वास पाहे ।
कैं मागुतां देखिन यासि माये ॥ ८ ॥

जो राम विश्राम योगेश्वरांचा ।
त्या गौरवी भाक्ति माता सुवाचा ॥
क्षमेंचि रामें भवशोकहाला ।
मग दासस्वामी वनासि गेला ॥ ९ ॥

## २१ " अभिमान "

बरा देह माझा बरा गूण माझा ।
बरा वेष हो नेटका साज माझा ॥

बरा काळ माझा बरा योग माझा ।
बरा पाहतां सर्व संसार माझा ॥ १ ॥
बरा घर्म माझा बरा मूत्र माझा ।
बरा पू बरा वाहतो कान माझा ॥

बरा ओक माझा बरा नर्क माझा ।
बरा खोकला दाट शेंबूड माझा ॥ २ ॥

बरी युक्ति माझी बरी बुद्धि माझी ।
बरी वासना पाहतां स्थीति माझी ॥
बरी दृष्टि माझी बरी पुष्टि माझी ।
बरी कांति माझी बरी शांति माझी ॥ ३ ॥

बरे हात माझे बरे पाय माझे ।
बरे दात माझे बरे कान माझे ॥
बरे चक्षु माझे बरे ओठ माझे ।
बरे शब्द माझे बरे गूण माझे ॥ ४ ॥

बरें कूळ माझें बरें गोत माझें ।
बरें ग्राम माझें बरें गृह माझें ॥
बरें शेत माझें बरें वित्त माझें ।
बरें पाहतां चांगलें सर्व माझें ॥ ५ ॥

बरें तें बरें दुसरें आढळेना ।
बरें तें बरें वीवरे ही कळेना ॥
बरें एक तें पाहतां ब्रह्म आहे ।
तया तूळितां तूळणा ही न साहे ॥ ६ ॥

वृथा साभिमानें चि देहाभिमानें ।
वृथा मानमानेंचि दुराभिमानें ॥

मी मोठा मी मोठाचि हा व्यर्थ ताठा ।
विचारेंविणें सर्व खोटाचि खोटा ॥ ७ ॥

## २२ "हरिपद"

भज दया करिं रे करुणालया ।
सफळ वीफळ जाइल वीलया ॥
लय तुझें श्रीहरीं हृदयीं वसे ।
मजमनीं विपरीत कदा नसे ॥ १ ॥

उपजणें मरणें चुकवी हरी ।
तुजरहीत नसो दुसरी परी ॥
भजन हें गुज हें गुज मागणें ।
बहु नसें इतुकें तुज सांगणें ॥ २ ॥

तुजरहीत स्वहीत कसें घडे ।
अनुदिनीं सदनीं पतनीं पडे ॥
पतितपावन नाम तुझें हरी ।
पतित मी शरणागत उद्धरी ॥ ३ ॥

हरिपदें विशदें करिं रे मना ।
मग चुकेल जनीं यम यातना ॥
उगम सुगम होय विलक्षणा ।
अनुभवें मग जाणाणि तूं खुणा ॥ ४ ॥

मरण रे रण रे रण माजलें ।
मन तरे, नतरे, जन गाजले ॥
मन भरे न भरे न भरे तरी ।
भवजळीं बुडतां हरि उद्धरी ॥ ५ ॥

## २३ 'निंदक'

नको रे नको मानवा साधुनिंदा ।
नको रे नको निंदतां थोर बाधा ॥
जितां सिद्धची यातना पावशील ।
अंतीं रव रव भोगितां जागवेल ॥ १ ॥

जना सज्जना निंदता देव कोपे ।
करी दुर्जना दंड कृतांत रूपें ॥
महाराज तो कोपतां कोण वारी ।
किती मानव देहधारी भिकारी ॥ १ ॥

जया मानवा लागला हाचि धंदा ।
सदा सर्वदा मानसीं साधुनिंदा ॥
सवें मत्सरें येति वादा विवादा ।
तया जाणत्या लागली थोर बाधा ॥ ३ ॥

जना दुर्जनाचा नको संग रामा ।
जनीं वृत्ति हे पावताहे विरामा ॥

सदा सर्वदा संग दे सज्जनासी ।
जनीं नित्य आनंद वाटे मनासी ॥ ४ ॥

जनीं निंदिता सूटला कोण आहे ।
जन सर्वदा सर्व निंदून राहे ॥
जया वर्णिता शीणली वेदवाणी ।
जनीं निंदता राम कोदंडपाणी ॥ ५ ॥

## २४ "गुरुगम्य गोप्य"

गुरूनें तुला काय निरूपिलें रे ।
जप ध्यान कीं देखणें सांग पां रे ॥
पहा पूसिलें श्रोतयानें गुमानें ।
महा थोर गर्वेंचि ज्ञानाभिमानें ॥ १ ॥

भले पूसती रे कृपाळू स्वभावें ।
तया ज्ञानगर्वेंचि कैसें म्हणावें ॥
भले नष्ट दोघे कसे ओळखावे ।
क्रियाभ्रष्ट ते नष्ट जाणोन घ्यावे ॥ २ ॥

भला तोचि जो मुख्य आचार राखे ।
गुरू देव लोकीक वेदांसि धाके ॥
करूं ये बरें जें असे तें करीतो ।
महावाक्य तत्वादिकें वीवरीतो ॥ ३ ॥

सदा सर्वदा बोलणें प्रत्ययाचें ।
अनुद्वेग तें गौल्य नाना सुखाचें ॥
नव्हे बंड पाषांड मत्तें विवादे ।
भले बोलती बोलणें ज्ञानबोधें ॥ ४ ॥

नव्हे बोध जो मत्त उन्मत्त व्हावें ।
नव्हे बोध जो साधका भ्रष्टवावें ॥
नव्हे बोध जो निंद्य चोरूनि खावें ।
नव्हे बोध जो ज्ञानगर्वें बुडावें ॥ ५ ॥

पुसो जाणताहे परी सांगवेना ।
तया बोलण्यासारिखे चालवेना ॥
विचारें बरा त्याग कांहीं घडेना ।
न होतां मनासारिखे त्या पडेना ॥ ६ ॥

कसा न्याय अन्याय तोही कळेना ।
कदा बोलणें वेदशास्त्रीं मिळेना ॥
सदा पूर्व पक्षांत सिद्धांत आणी ।
कपाळीं बळें न्याय होतां झणाणी ॥ ७ ॥

इहीं तक्षणीं मूर्ख तो वोळखावा ।
नव्हे निश्चयो, संग त्याचा त्यजावा ॥
भला तोचि तो सर्व सत्याभिमानी ।
नव्हे वाष्कळू भ्रष्ट ज्ञानी गुमानी ॥ ८ ॥

असो पूसिलें तेंचि आतां वदों रे ।
गुरूनें तुला काय निरोपिलें रे ॥
महावाक्य सांगितला अर्थ त्याचा ।
गुणी संत जो बोध त्या निर्गुणाचा ॥ ९ ॥

विचारें बरें पाहतां तत्वझाडा ।
विवंचूनिया मीपणाचा निवाडा ॥
मला शोधितां शोधितां मीच नाहीं ।
स्वभावेंचि आकारलें सर्व कांहीं ॥ १० ॥

बरी शोधिली पिंड ब्रह्मांड माया ।
भजायासि म्यां पाहिलें देवराया ॥
तया पाहतां मीच तद्रूप झालों ।
बहू संग सोडूनि सूखें निवालों ॥ ११ ॥

गुरूनें देहातीत बोधूनि केलें ।
पुढें जागृती पाहतां स्वप्न गेलें ॥
तयाचे परी देह संसार माया ।
क्रिया कर्म नानापरी सर्व काया ॥ १२ ॥

घडे स्वप्न सांडूनि जागृति जेव्हां ।
कळों नीवळों लागतें सर्व तेव्हां ॥
मनामाजि तो आठवीतो पहातो ।
प्रबोधेंचि विस्मीत होऊनि जातो ॥ १३ ॥

तयाचे परी स्वप्न अज्ञान झालें ।
विविकेंचि तें जागृतिज्ञान आलें ॥
प्रचीतीविणें तो गुरूहि कळेना ।
मनीं पाहतां प्रत्ययो नीवळेना ॥ ११ ॥
गुरूच्या प्रतापें अहंभाव खंगे ।
बरें पाहतां सर्व ही संग भंगे ॥
मुळीं बद्ध नाहीं तया मोक्ष कैचा ।
जनीं साधकू साध्य होता विवंचा ॥ १२ ॥
गुरुगम्य तें गौप्य तेथें पुसावें ।
म्हणें दास भावें नुरावें नुरावें ॥
असावें परी सर्व कांहीं नसावें ।
कळेना तरी सज्जनाला पुसावें ॥ १३ ॥

## २५ " भवाचा वीट "

मना चाल ऊठीं वना दुर्गमातें ।
न गुंते भवागारदारादिकातें ॥
विवेकें विचारें विवंचूनि पाही ।
जनीं पाहतां सर्वथा ऊ[1]रि नाहीं ॥ १ ॥
अती दुष्करें क्लेश कीजेत देहीं ।
तथापी तरी वीषयो प्राप्त नाहीं ॥

---

१ ठाव.

कदापी जरी लाहिजे प्राप्ति याची।
तरी इंद्रियालागि संतृप्ति कैंची ॥ २ ॥

तिहीं लोकिंच्या सुंदरा व्यक्तिमात्रा।
जरी दाविल्या एक वेळेंची नेत्रा ॥
तरी तृप्ति नाहीं शिखा[1] वाढता हे।
जसा इंधनें दिक्पती[2] दीप्त होये ॥ ३ ॥

फळें अष्टगंधें तथा गंधचूर्णें।
निमग्नें तयामाजि संपूर्ण घ्राणें ॥
दुराशा तरी शूकरी आवरेना।
पुढें धांवता मागुती हे फिरेना ॥ ४ ॥

वहू वीट आला भवाचा न सावे।
अटव्यांत देऊनियां हांक जावें ॥
मनातें दमावें श्रीरामीं रमावें।
दिगंती फिरावें जना न स्मरावें ॥ ५ ॥

सुषुप्ति अवस्थेसि भूमीं निजावें।
उसें रामपाद स्मरोनी धरावें ॥
दिशांचा महा पाट[3] तो पांघरावा।
सिताकारणें साह्य वन्ही करावा ॥ ६ ॥

---

१ ज्वाला. २ अग्नि. ३ वस्त्र.

यथावीध देहो वनामाजि जावा।
तथागारदारादिकींही पडावा ॥
श्रीरामोस्मि बोधें स्मरावा स्मरावा।
रामीं रामदास्यें स्वशांती निवावा ॥ ७ ॥

## २६ ' नित्यानित्य '

इतिश्री भुतांची इतिश्री गुणांची।
इतिश्री नव्हे सर्वथा निर्गुणाची ॥
तया नेणता हो तसे सर्व ची ची।
अहा रे असें काय केलें विरंची[1] ॥ १ ॥

जनीं पाहतां सर्व ही जात आहे।
सदा सर्वदा निर्विकारीच राहे ॥
तयाच्या विचारामधें मग्न व्हावें।
देहाच्या मदें भ्रांत कांहीं नसावें ॥ २ ॥

मदें साभिमानें असंभाव्य ताठा।
पुढें बैसला काळदंडे चपेटा ॥
तयासारिखें व्यर्थ भूलों नको रे।
समस्तांपुढें नीति सांडूं नको रे॥ ३ ॥

बरा काळ देखोन सर्वे मिळालीं।
अभाग्यास देखोन सर्वे पळालीं ॥

---

१ ब्रह्मदेवा.

नसे भीड कांहीं दया धर्म नाहीं ।
अपेशी तयालागि कांहींच नाहीं ॥ ४ ॥

म्हणे दास सायास नाना उपायें ।
मला काढिलें राघवें देवरायें ॥
समर्था तया लागली सर्व चिंता ।
मिळाले बहू दास दासी अनंता ॥ ५ ॥

## २७ " शहाणे "

जगीं शहाणे तेचि तारुण्यकाळीं ।
करीना कदा वीषयांची धुमाळी ॥
जगीं शहाणे जे अहंभाव जाळी ।
सदा सर्वदा मानसीं चंद्रमौळी ॥ १ ॥

जगीं शहाणे ते कसें वोळखावे ।
भजे शंकरालागि अनन्य भावें ॥
म्हणेना कदा आपुले कीं परावे ।
दया सर्वभूतीं जयाची स्वभावें ॥ २ ॥

जगीं शहाणे बोलतां सौख्य वाटे ।
जयाचेनि बोले अहंभाव तूटे ॥

---

१ गर्दी.

जगीं शहाणे भक्तिपंथेंचि लावी ।
जगीं मूर्ख ते वीषयीं चित्त गोवी ॥ ३ ॥

जगीं शहाणे ते कदा सिंतरेना ।
भवाचे भरी सर्वथा ही भरेना ॥
तनू चालतां राघवा वीसरेना ।
तया भाग्य वैराग्य तें ओसरेना ॥ ४ ॥

## २८ " रामराज्य "

असंख्या दळाचा अचाटा बळाचा ।
वदे सत्य वाचा जपू त्या शिवाचा ॥
कुंवासा दिनाचा गुणी सज्जनाचा ।
प्रभू राम हा देव ब्रह्मादिकाचा ॥ १ ॥

बहू राज्यधारी जना सौख्यकारी ।
नव्हे तो विकारी गुणी एकनारी ॥
सदा सत्यवादी असत्यास खेदी ।
महादुष्ट तो दुर्जनाचा विरोधी ॥ २ ॥

बहू वृष्टि नाहीं अनावृष्टि नाहीं ।
कदाही भुमी पीक सांडीत नाहीं ।
जना दंड नाहीं तथा मार नाहीं ।
जरा मृत्यु ना व्याधि कांहींच नाहीं ॥ ३ ॥

पहा बंध निर्बंध कोणा असेना ।
जनीं मत्सरू पाहतांही दिसेना ॥
कुरूपी नसे शब्द कापट्य कांहीं ।
जनीं पाहतां वादवेवाद नाहीं ॥ ४ ॥

सुखानंद आनंद उल्हास वाटे ।
महा सुकृती लोक धार्मिक मोठे ॥
शोकसंतापहारी असा कोण कैचा ।
जगीं धन्य हा रामदाता दिनाचा ॥ ५ ॥

## २९ " शिका रे शिका रे "

मनामाजि जो हेत तो चेतवावा ।
बरा गूण तो लागवेगें धरावा ॥
धरेना तरी सर्वथाही धरेना ।
जनामाजि नेणीव तेही हरेना ॥ १ ॥

बरें जाणतां तें कळे सर्व कांहीं ।
मनें नेणतां हीत कांहींच नाहीं ॥
जनीं जाणतां शीकतां हीत होतें ।
न शीके तरी व्यर्थ आयुष्य जातें ॥ २ ॥

शिकेना तरी त्यास कांहींच येना ।
शिके तो गुणाला कदा जाउं देना ।

गूणें श्रेष्ठ तो श्रेष्ठसा वोळखावा ।
गुणेंवीण तो हीन जाणोन घ्यावा ॥ ३ ॥

शिका रे शिका रे फिका जन्म जातो ।
नका रे नका रे तुका घात होतो ॥

तुटे तुकं त्या भीक तेही मिळेना ।
गूणेवीण लोकांस कांहीं कळेना ॥ ४ ॥

गुणे पाविजेते जनीं वैभवाला ।
विवेकीं विभांडितसे रौरवाला ॥

कळों दे कळों दे मनीं नीवळों दे ।
गळो दे गळो दे अहंता गळो दे ॥ ५ ॥

## ( ३० ) " स्फूर्ति "

हवाया नळे बाण भांडीं अनंतें ।
बळें सोडितां जाति आकाशपंथें ॥
वत्ती लागतां वेळ नाहीं उडाया ।
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ १ ॥

वरी पाहतां दृष्टि हे दूर धांवे ।

---

१ महत्व

तयाचे परी कल्पना हे उठावे ॥
उठे मारुती वेळ नाहीं उडाया। तयाचे० ॥२

फिरे वावरे वात सर्वांत जैसा
चळे नीवळेंही कळे स्पष्ट तैसा ॥
बहुतांपरी संधि नाहीं धराया । तयाचे० ॥३।

विवेकीं विवंचूनिया लागवेगें ।
पळे सर्वही दृश्य सांडूनि मागें ।
विवेकेंचि तो जाय लंघूनि माया । तयाचे० ॥४।

असावें तरी सर्व कांहीं असावें ।
नसावे तरी लेश तेंही नसावें ॥
परब्रह्म तें वीवराया वराया । तयाचे० ॥५ ॥

## ( ३१ ) " काम "

फळें तोय सांडुनियां थोरथोरी ।
गिरींकंदरीं राहिजे निर्विकारी ॥
तया ऐसिया काम बाधून गेला ।
धरे धीर कैसा तया मानवाला ॥ १ ॥

सदन्नें वरी सद्य नानापरीची ।
रसाळें रसामाजि ते कुसरीची ॥
जनीं भोजनीं जो मनीं तृप्त होतो ।
तया काम तो नष्ट कैसा रहातो ॥ २ ॥

जरी पक्षपाती खडे भक्षिताती ।
तया काम प्राप्ती नव्हे नित्य तृप्ती ॥
महा मस्त तो हस्त मारी चपेटे ।
तया एक संवत्सरें काम उठे ॥ ३ ॥

मनीं काम तो काम सर्वांस लावी ।
मनीं नष्ट तो नष्ट सर्वांस भावी ॥
मनीं पातकी पाप लावी जनाला ।
जनीं दोषिया निंदितो सज्जनाला ॥ ४ ॥

## ( ३२ ) "अद्वैत चर्चा"

अद्वैत चर्चा जंव हे कळेना ।
विकल्प भ्रांती तव हे टळेना ।
प्रत्ययेंविणें तो मन तें वळेना ।
श्रीराम भक्तीविण आकळेना ॥ १ ॥

अद्वैत चर्चा कंटाळवाणी ।
सांडूनि वर्णा कोदंडपाणी ॥
कैलासवासी ठेवा प्रभूचा ।
अलभ्य हा रे सकळास कैचा ॥ २ ॥

अद्वैत चर्चा गुरुगम्य आहे ।
कळे म्हणे तो सहसा न लाहे ॥

चोरूनि जागे हृदयीं अहंता ।
फळे म्हणे त्या न कळेंचि भ्रांता ।। ३ ।।

## २३ प्रसंग बरा वाईट

न जावें चि तेथें लागेल जावें ।
न खावें चि जें तें लागेल खावें ।।
वदावें चि ना तें लागे वदावे ।
स्वभावें चि निर्माण केलेंचि देवें ।। १ ।।

प्रसंगें घडे तेंचि माणूनि घ्यावें ।
अहंतागुणें दुःखशोका न घ्यावें ।।
पुढें काय होईल तें तें पहावें ।
विवेकें चि ज्ञानें सूखें राहावें ।। २ ।।

देहभोग होणार कांहीं सुटेना ।
जनाच्या मना सांगता हीं तुटेना ।।
म्हणे दास उदास कांहीं न व्हावें ।
बरें वोखरें सर्व साहोनि न्यावें ।। ३ ।।

## २४ "सुपुत्र"

क्रियेवीण पाषाण तें नोवलावें ।
क्रियेवीण थोतांड तेंही त्यजावें ।।
सदा सर्वदा भक्तिपंथेंचि जावें ।
सुपुत्रें बळें पूर्वजा उद्धरावें ।। १ ।।

मनीं गर्व हा सर्व सांडूनि द्यावा ।
अहंभाव तो वाव जीवीं नसावा ॥
महाघोर संसार हा निस्तरावा ।
बरा गूण तो आदरेसीं धरावा ॥ २ ॥

जिणें तें चि जें कीर्तिरूपें जगावें ।
कळेना अकस्मात कोठें मरावें ॥
तनू[1] चालतें तेंचि आश्चर्य आहे ।
जनीं पाहतां कीर्ति जे तेंचि राहे ॥ ३ ॥

## ३४ "स्फुट श्लोक"

आला आला जीव जन्मासि आला ।
झाला झाला वाढला थोर झाला ॥
केला केला व्याप ऊदंड केला ।
गेला गेला बापुडा व्यर्थ मेला ॥ १ ॥

अनेक शास्त्री पाहतां पडेना ।
आयुष्य थोडें पाहणें घडेना ॥
विश्वास एके वचनीं धरावा ।
संसार हा दुस्तर नीरसावा ॥ २ ॥

---

१ देह-क. पा.

असें अर्थ तें सार्थकें धन्य होतें ।
नसें अर्थ तें बोलणें व्यर्थ जातें ॥
कणेवीण कब्राड तें व्यर्थ जाणा ।
बरें शोधितां ही नसें एक दाणा ॥ ३ ॥

नुठे घोष ज्या मंदिरीं राम नामें ।
जळो संपदा जाळिं तें हेमधामें ॥
जळो बोल ते फोल वाचाळ ज्ञानी ।
नसे मानसीं राम कैवल्य दानी ॥ ४ ॥

कल्याणकारी निजहितकारी ।
आनंदकारी अतिसौख्यकारी ॥
परोपकारी निज निर्विकारी ।
कोदंडधारी लीळावतारी ॥ ५ ॥

करावी हरीभक्ति ते पर्वकाळीं ।
यथासांग रे अन्न खावें सुकाळीं ॥
बरा काळ कांहीं अखंडीत नाहीं ।
बहू लोक गेले विचारूनि पाही ॥ ६ ॥

किती घालणें भार या देवराया ।
पडो रे वनामाजि हे सर्व काया ॥
अहा रे मना तूजला काय झालें ।
रघूनायका त्वां बहू कष्टवीलें ॥ ७ ॥

करें पूजन राघवाचें करावें ।
पदें राघवा--आश्रमासीच जावें ॥
बरे कर्णबीळीं कथे ऐकवावें ।
सदा सर्वदा साधुसंगीं बसावें ॥ ८ ॥

कळेना पुढें काय होणार आहे ।
कळेना देह कोठपरियंत राहे ॥
कळेना मरावें स्वदेशीं विदेशीं ।
कळेना पुढें वेळ येईल कैशी ॥ ९ ॥

धरें आपणाला वधू आपणाला ।
मुलें आपणाला धनें आपणाला ॥
पशू आपणाला कणें आपणाला ।
बहुतापरी पाहिजे आपणाला ॥ १० ॥

घरें सुंदरें मंदिरें रम्य दारा ।
झणीं आपुली मानिसी रे गव्हारा[1] ॥
जिवा जन्मतां निर्मिलें तें टळेना ।
क्षणा काय होईल ऐसें कळेना ॥ ११ ॥

चिंता चिंता व्यर्थ चिंता करीतां ।
किंता[2] किंता वाय किंता धरितां ॥

---

१ मूर्खा. २ संशय.

सिताकांतां सेवकाची अहंता ।
दाता दाता राम हा सौख्यदाता ॥ १२ ॥
जनीं खेळतो खेळ नानापरींचे ।
परी खेळतां व्यर्थ आयुष्य वेचें ॥
न कंठे तया काळ कंठोन जातो ।
दिसंदीस तो अंत येतो पहातो ॥ १३ ॥
जगीं गाढवें राखतां जन्म गेला ।
नव्हे भोग्य हें तुच्छ वाटे तयाला ॥
मुळींचा करंटा तया योग्य कैचें ।
महद्भाग्य हें देखवेना जनाचें ॥ १४ ॥
जनीं पाहतां कर्म तेंही घडेना ।
जनी पाहतां भक्ति ते आतुडेना ॥
जनीं पाहतां ज्ञान ही शुद्ध नाहीं ।
मना सज्जना हीत शोधूनि पाही ॥ १५ ॥
जनीं लाविती नष्ट संदेह वेडे ।
तेणें थोर भांबावती लोक वेडे ॥
सदा सद्गुरुसंतगाचेनि योगें ।
कदा संशयो भूतबाधा न लागे ॥ १६ ॥
जळो भाग्य वैराग्य हे शीघ्रकोपी ।
जळो ज्ञान विज्ञान हें लोभरूपी ॥

जळो भक्ति वीभक्ति जेथें सुटेना ।
जळो व्युत्पत्ति वाद जेथें तुटेना ॥ १७ ॥

जनाचार संपादितां जन्म गेला ।
यथासांग रे सर्व लौकीक केला ॥
जप ध्यान पूजा मनामाजि नाहीं ।
वृथा निश्चयेंवीण तें सर्व कांहीं ॥ १८ ॥

तमोगुणें ईश्वर पाविजेना ।
स्वहित होणें सहसा दिसेना ॥
सद्भाव सत्वें जंव दृढ नाहीं ।
तंव भ्रांत प्राणी पडिला प्रवाहीं ॥ १९ ॥

तुला नेणतां जन्मलों आणि मेलों ।
किती वेळ मी सर्व सृष्टीच झालों ॥
तुला जाणतां तूंचि होऊनि गेलों ।
विचारें कृपासागरें मुक्त केलों ॥ २० ॥

न चालतां पाउल तीर्थं जोडे ।
जे जोडतां कैकट सर्व मोडे ॥
ज्या दर्शनें आपण देव व्हावें ।
संतीं सदा सेउनियां रहावें ॥ २१ ॥

---

१ पाखांड.

नव्हे बोलतें तें नव्हे चालतें तें ।
परब्रम्ह कांहीं नव्हे हालतें तें ॥
नव्हे पापकारी नव्हे पुण्यकारी ।
परब्रह्म तें सर्वदा निर्विकारी ॥ २२ ॥

निंदूनि सिंधू बुडसी तळाथीं[1] ।
त्यजूनि सोनें धरिसील माती ॥
ऐसा प्रपंचीं भुललासि कामा ।
सांडूनि रामा फिरसी रिकामा ॥ २३ ॥

परम कोमळ राम कठीण कां ।
दिन दयाळ दया नुपजेचि कां ॥
मज बहूत उदासीन वाटलें ।
न धरितां नयनीं जळ लोटलें ॥ २४ ॥

पतितपावन तूं जनपावना ।
पतितपावन सज्जनजीवना ॥
पतितपावन पावनपावना ।
जनरहीत रहीत निरंजना ॥ २५ ॥

बरें दुग्ध तें मद्यपात्रीं कुपात्रीं ।
पुढें देखतां तें त्यजावेंचि श्रोत्रीं ॥

---

१ डबक्यांत.

जरी ज्ञान झालें जनीं नाचि याती ।
तरी ते नव्हे वंद्य कांहीं महंतीं ॥ २६ ॥

बहू पाप होतांचि दारिद्र्य येतें ।
बहू पुण्य होतांचि तें भाग्य येतें ॥
बरें कोण मानेल तैसें करावें ।
मनीं थोर पाहोन हातीं धरावें ॥ २७ ॥

बहू बोल तें फोल कंटाळवाणें ।
जया शांति ते दांति ते दीन बाणे ॥
बहू क्रोध त्या बोध होईल कैचा ।
जळों तें जिणें लेश नाहीं सुखाचा ॥ २८ ॥

मध्रीं शोभे राम लावण्यखाणी ।
पृष्ठीं भाता बाण कोदंडपाणी ॥
वामे सीता दक्षिणे शेषबंधू[१] ।
पुढें ऊभा मारुती वीर--सिंधू ॥ २९ ॥

मानें मानें चालती सर्व मानें ।
यानें यानें चालवीसी शुमानें ॥
हा हा हो हो होतसे दों दिसांची ।
चीचिं चीचि शेवटीं सर्व चीची ॥ ३० ॥

---

१ लक्ष्मण.

मेल्या ओटे बांधिती आपुलाले ।
आले गेले लोक कीती निमाले ॥
ज्याची त्याची पालवी चालवीते ।
वेळां येता सर्व ही हालवीते ॥३१॥

मनांतील जाणे असा कोण आहे ।
कसें काय तें सर्व शोधून पाहे ॥
किती एक ते पाहतांही कळेना ।
किती एक तें चित्त चित्ता मिळेना ॥३२॥

महा मूर्ख नाहीं अत्रीं परत्रीं ।
सदा घातला कूजतो देहयंत्रीं ॥
सदांचा करंटा अखंडीत ताठा ।
तयालागि नाहींत रे स्वर्गवाटा ॥ ३३ ॥

रघूनायकासारिखा स्वामिदाता ।
असोनी शिरीं वाहसी व्यर्थ चिंता ॥
नको वीसरों राघवा भूजकांता ।
नुपेक्षी नुपेक्षी कदा तूज भ्रांता ॥३४॥

रघूकूळवल्ली बरी पद्मिणी हे ।
तिथें शाम रामाकृती पद्म आहे ॥
तिच्यागूणगंधें धरा दाटलीसे ।
तिथें षट्पदीं वृत्ति हे रंगलीसे ॥३५॥

राम राम रसने रस घेई ।
जन्ममृत्युसि तिलांजलि देई ॥
नित्य राम गुण रंगाणि रंगे ।
रंग राम करिसी अनुरागे ॥३६॥

वसे अंतरीं राम विश्वास जेथें ।
नसे मानसीं नष्ट संदेह तेथें ॥
विवेकें अहंभाव ज्याचा गळाला ।
सदा राघवीं ऐक्य रूपें मिळाला ॥३७।

वसे न्याय तेथें भल्यानें असावें ।
नसे न्याय तेथें कदा ही नसावें ॥
प्रमाणोत्तरें चित्त तें ही न घाली ।
तया पापरूप्यासि कां रांड व्याली ॥३८॥

सलगिचा लगिचा गुरु तो नको ।
वळखिचा सखिचा गुरु तो नको ॥
भ्रमभरू भ्रमरू गुरु तो नको ।
मुढमती प्रचितीविण तो नको ॥ ३९ ॥

श्वासोच्छ्वासें नीघतां काळ जातो ।
पात्या पातें लागतां काळ जातो ॥
वीवेकीं तो सर्व कांहीं पहातो ।
सारासारें ज्ञानयोगें रहातो ॥४०॥

सदा तेल आणा सदा मीठ आणा ।
सदा धान्य आणा सदा द्रव्य आणा ॥
सदा वस्त्र आणा सदा शास्त्र आणा ।
सदा सर्वदा सर्व आणाचि आणा ॥४१

सदा मागतां दास देवा न साहे ।
न मागे तयाचि रमा दासि होये ॥
असे आस तो दास झाला जगाचा ।
नसे आस तो ईशु ब्रह्मादिकाचा ॥४२॥

स्वधामासि जातां महा रामराजा ।
हनूमंत तो ठेविला याच काजा ॥
सदा सर्वदा रामदासासि पावे ।
खळीं गांजितां ध्यान सांडून धावे ॥४३॥

तारुण्य– लावण्य–संपन्न नारी ।
कौशल्यता वैभव चित्तहारी ॥
एकांत काळीं पडतां संबंधू ।
अभिलाष न करी तो धन्य साधू ॥४४॥

श्री रामचंद्रा करुणासमुद्रा ।
ध्यातों तुझी राजस योगमुद्रा ॥
नेत्रीं न ये रे तुजवीण निद्रा ।
कै भेटसी बा मजला समुद्रा ॥४५॥

हासहोरा चालतो दो दिसांचा ।
जेंव्हां तेंव्हां सारिखा काळ कैचा ॥
संसाराचा भर्वसा कोण कैंचा ।
कायावाचा राम ध्यावा जिवाचा ॥४६॥

जया यत्न फावेल तेणें करावा ।
महोत्सव या राघवाचा भरावा ॥
महायत्न देखोनियां काळ धाके ।
प्रतापें बळें गाजवावे तडाखे ॥४७॥

## ३६ "वृद्धाप्यकाळ."

वण वण वण हिंडे चित्त वृद्धाप्यकाळीं ।
भण भण भण माशा भोंवतीं सर्व नाळीं ॥
चण चण चण पीसा आणि ढेकूण खाती ।
सण सण सण मुंग्या तीडका फार येती ॥१॥

गड गड कफ कंठीं सर्वदा दाटलासे ।
भड भड भड वांती वस्त्र सर्वांग नासे ॥
धड धड धड शीतें कांपतां जीव त्रासे ।
चड चड चड गांधी सूटली ते न सोसे ॥ २ ॥

भर भर भर वातें सर्वदा अंग सूजे ।
पर पर पर कांहीं बोलतां तोंड वाजे ॥

गर गर गर भोंवें आंग हें भोंवडीनें ।
हर हर हर प्राणी सांडिला वैभवानें ॥ ३ ॥

तर तर तर केलीं वैभवें दों दिसांची ।
मर मर मर अंतीं होतसे यातनेची ॥
कर कर कर दाढा वाजती पाय खोडी ।
फर फर फर देहे सूजतां प्राण सोडी ॥४॥

न करित हित कांहीं बापुडा व्यर्थ मेला ।
भजनरहित पापी काळ मूर्खीं निमाला ॥
तनु मन धन वेचे सार्थकी देह ज्याचें ।
हरिहरवर दासा धाम लाभे कवीचें ॥ ५ ॥

## ३७ "रामपंचायतन"

सिंहासनावरि रघूत्तम मध्यभागीं ।
बंधू तिघे परम सुंदर पृष्ठिभागीं ॥
वन्हीसुता निकट शोभत वामभागीं ।
वीलासतो भीम भयानक पूर्वभागीं ॥ १ ॥

आनंदकंद रघुनंदन शोभताहे ।
कंदर्पकोटि वदनीं उपमा न साहे ॥
आकर्णपूर्ण नयनीं रमणीय शोभा ।
विस्तीर्ण कीर्ण भुषणीं जगदीश ऊभा ॥ २ ॥

## ३८ " रविकुळटिळक "

रविकुळटिळकाचें रूपलावण्य पाहे ।
रविकुळटिळकाचे चिंतनीं चित्त राहे ॥
रविकुळटिळकाची कीर्ति जीवीं भरावी ।
रविकुळटिळकाची मूर्ति ध्यानीं धरावी ॥१॥

बहुविध भजनाचीं दैवतें पाहिलीं हो ।
सकल त्यजुनि रामीं वृत्ति हे राहिली हो ॥
विमलगुणशिलाची लागली प्रीति मोठी ।
विमल हृदय होतां उद्धरे कूळकोटी ॥ २ ॥

विमलगुणशिलाचे आदरें गूण गावे ।
विमलगुणशिलाचे दास वाचें वदावे ॥
विमलगुणशिलाचा अंतरीं वेध लागो ।
विमलगुणशिलाचा रंगणीं रंग जागो ॥ ३॥

सकळगुणनिधींचा रामःलावण्यसिंधू ।
अगणित गणवेना शक्तिरूपें अगाधू ॥
प्रबळ बळ चळेना वायुगे व्यर्थ कामीं ।
म्हणउनि मन रामीं लागलें पूर्णकामी ॥४॥

सकळ भुवन तारीं राम लीलावतारी ।
भवभय अपहारी राम कोदंडधारी ॥

मनन करि मना रे धीर हे वासना रे।
रघुविरभजनाची हे धरी कामना रे ॥ ५ ॥

## ३९ " झडकरि मज रामा सोडवी पूर्ण कामा "

वण वण विषयांची सर्वथाही शमेना।
अनुदिन भवमाया[1] लागली हे तुटेना ॥
झडकरि मज रामा सोडवी पूर्णकामा।
तुजविण गुणधामा कोण रक्षील आम्हां ॥१॥

विषयविष वमावें कल्पनेला दमावें।
निजपद निजभावें दृढ चित्तीं धरावें ॥
भवभय निरसावें साधुसंगीं वसावें।
सगुण भजन द्यावें स्वामि देवाधिदेवें ॥ २ ॥

विगलित मन माझें तूं करी देवराया।
हरिभजन कराया पाहिजे दृढ काया ॥
निरुपण निवराया तर्कपंथेंचि जायां।
रघुपति गुणछाया चित्त माझें निवाया ॥३॥

## ४० " स्वतंत्र श्लोक. "

जन वमनपरी तूं टाकि थुंकून चित्ता।
वन विजन धरी तूं ज्ञानवैराग्यवंता ॥

---

१ मोहमाया--क पा.

विसर सकळ दुःखें पावती शांति रामीं ।
पहुडसि सुख शेजे सर्व कल्याणधामीं ॥ १ ॥

स्मरण स्मर हरीतो भ्रांत प्राणी करीतो ।
मन बहु विकरीतो शाहणे सिंतरीतो ॥
विवेक विसरवीतो नष्ट धारिष्ट नेतो ।
रघुविरस्मरणें तो काम ही जिंकिजेतो ॥ २ ॥

सुतक सुतवधूचें बंधुमातापित्याचें ।
उपजत मरतां ही गोत्रजा-गोत्रजांचें ॥
परि हरिहरदासां त्यागितां देह कांहीं ।
इतर जड जिवाला सूतकीं चाड नाहीं ॥ ३ ॥

समरस विषयांची वाउगी व्यर्थ वायां ।
तरुणपण शरीरीं घेतलें सर्व जाया ॥
कठिण विषमकाळीं सर्व सांडूनि जावें ।
म्हणउनि रघुनाथीं सर्व भावीं भजावें ॥ ४ ॥

करकर न करावी प्रीति रामीं धरावी ।
गरगर फिरवी ते वासना वीसरावी ॥
हरिहर म्हणता तो देव तत्काळ पावे ।
अति विमळ पवाडे मानसीं आठवावें ॥ ५ ॥

हुरहुर हुर वाटे अंतरीं बाष्प दाटे ।
तुजविण रघुनाथा लोचनीं नीर लोटे ॥

तनुमनधन वीटे दुःख देहीं न कंठे ।
बहुविध उपचारें शोभलें चित्त ऊठे ॥ ६ ॥

सहज पडत आहे तैसतैसें करावें ।
अनुकुल पडताहे तेथतेथें फिरावें ॥
अवचट घडतें तें सज्ज होऊन येतें ।
खटपट करणें तें शेवटीं व्यर्थ जातें ॥ ७ ॥

स्वजन जन त्यजावे देश लंघूनि जावें ।
कठिण मन करावें झाडखंडीं भरावें ॥
अनुदिन विवरावें दूरि देशीं भरावें ।
निरुपण विवरावें तर्क पंथेंचि जावें ॥ ८ ॥

रतिमद पळ पाहे पापकल्पांत राहे ।
सुख लघुतर आहे दुःख अंतीं न साहे ॥
त्यजि पर वनितेचा लोभ हा अंतरींचा ।
यजिं पति जगतीचा नाथ योध्यापुरीचा ॥ ९ ॥

परहित निवटाया वेश केला नटाया ।
करिसि किति धिटाया देह आलो विटाया ॥
स्वहित करिं सुटाया काळ येतो कुटाया ।
भज सुरमुगटा या कर्मबुद्धी सुटाया ॥ १० ॥

## ४१ "लोकमान्य व वेदमान्य"

भक्तिज्ञान योगध्यान हें प्रमाण जाणिजे ।
कर्मनीति न्यायनीति सर्व नीति मानिजे ॥
थानमान्य भेदमान्य लोकमान्य चालणें ।
धन्य धन्य धन्य तेंचि धन्य वेदमान्य बोलणें ॥१॥

देवदेव मुख्य देव वासुदेव ओळखा ।
काय काय कोण काय हा उपाय तो सखा ॥
हिति हीत तें स्वहित सप्रचीत बोलणें ।
भक्त भक्त देवभक्त बोलणें न चालणें ॥ २ ॥

रामदास देवदास नीजदास दास तो ।
दासदास तो उदास आसपास भासतो ॥
गुप्त पीर तो फकीर त्या जिकीर कासया ।
पीर पीर बेफिकीर तो जिकीर हो तया ॥ ३ ॥

## ४२ " भजन "

भेटो कोणी एक नर धेड महार चांभार ।
त्याचें राखावें अंतर याचें नांव भजन ॥
दुःख न द्यावें कोणाला उंच नीच जरी झाला ।
अंतरात्मा वोळखिला तोचि जाणा सज्जन ॥

मिळाला तो भक्त झाला दोष मिळेना तयाला ।
देव प्रत्यक्ष कोपला अहंभाव दुर्जन ॥
राजी राखावें सकळ बरेंपण सर्वकाळ ।
नित्य आनंदाची वेळ काळ करी वंदन ॥१॥

## ४३ "रामगुण"

रामो राज्य करी, जरा दुरि करी, मृत्यूसि नाहीं उरी ।
राजा एकशरी, बळें बहु परी दूजी नसे अंतुरी ॥
रामालागि सरी नसेल दुसरी श्रीराम एकोत्तरी ।
वैकुंठानगरी सगामग वरी नेली अयोध्यापुरी ॥१॥

## ४४ "राममहिमा"

आला राजा महीचा दिनकर कुळीचा
ख्यात वंशावळीचा ।
आला आत्मा जगाचा मुनिजन ऋषिचा
प्राण त्या साधकांचा ॥
आला दाता दिनाचा जप पशुपतिचा
[१]ध्याड त्या वाल्मिकाचा ।
आला सिंधू सुखाचा सुरवर म्हणती
काळ हा राक्षसांचा ॥ १ ॥

---

१ ञी.

## ४५ " रामप्रसाद "

चित्ता चातक होउनी रघुपती
ध्यायें सदा सर्वदा ।
दाता एक सितापतीविण मुखीं
आणीक नेणे कदा ॥
निंदा वाद प्रपंच खेद न करी
भेदासि दे आपदा ।
क्षांति शांति धरी दया भुर्ति करी
तेणें चुके आपदा ॥ १ ॥

## ४६ " प्रपंच "

कां बापा शिणसी प्रपंच म्हणसी
माझाचि हा आखिला ।
तूझा पाड किती समर्थ नसतां
तेही असे टाकिला ॥
लोभें तूं वदसि बहू दगदगसी
कां देह रे वीकिला ।
अंतीं भ्रांति पडे स्वहित न घडे
जाशील घोकावला ॥ १ ॥

## ४७ " अंती सोडविता. "

कांता कांचन पुत्र मित्र दुहिता
जामात माता पिता।
बंधू ईतर पीशुनें बहुजनें
संख्या नसे मोजितां ॥
देहांतीं सकळैक माइक नरा
सोडूनि येती घरा।
तेथें सोडविता नसे
रघुवरी वाचूनिया दुसरा ॥ १ ॥

## ४८ " श्रीराम ऐसें वदा "

विघ्नघ्ना रघुनायका गुणनिधी
भक्तांसि मानी सदा।
तूझें दास्य विशेष जाणति भले
त्यां दुःख नाहीं कदा ॥
विश्वासें निजदास ध्यास करितां
तात्काळ पावे पदा।
सांडा रे अभिमान माइक सदा
श्रीराम ऐसें वदा ॥ १ ॥

## ४९ " न पवसि मज कां रे० "

( श्री समर्थांना एकदां कफाची व्यथा झाली, त्या वेळीं हे करुणाष्टक केलें अशी कथा आहे. )

फणिवर उठवीला वेग अद्भूत केला ।
त्रिभुवनजनलोकीं कीर्तिचा घोष गेला ॥
रघुपतिउपकारें दाटलें थोर भारें ।
परम धिर उदारें रक्षिलें सौख्यकारें ॥ १ ॥

सबळ दळ मिळालें युद्ध उदंड झालें ।
कपिकटक निमालें पाहतां येश गेलें ॥
परदळशरघातें कोटिच्या कोटि प्रेतें ।
अभिनव रणपातें दुःख बीभीषणातें ॥ २ ॥

कपिरिसघनदाटी जाहली थोर आटी ।
म्हणवुनि जगजेठी धांवणी चार कोटी ॥
मृत विर उठविले मोकळे सिद्ध झाले ।
सकळ जन निघाले धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥

बहु प्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राणनाथा ।
उठवि मज अनाथा दूरि सारुनि वेथा ॥

---

१ सैन्य.

झडकरि भिमराया तूं करी दृढ कायां[1] ।
रघुविरभजना या लाग वेगें चि जाया ॥ ४ ॥
तुजविण मज पाहे पाहतां कोण आहे ।
म्हणउनि मन माझें रे तुझी वाट पाहे ॥
मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें ।
सकळिक निजदासांलागि सांभाळवीलें[2] ॥ ५ ॥
उचित हित करावें उद्धरावें धरावें ।
अनुचित न करावें त्वां जनीं येश द्यावें ॥
अघटित घडवावें सेवकां सोडवावें ।
हरिभजन घडावें दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥
प्रभुवर विरराया जाहली वज्रकाया ।
परदळ नित्रटाया[3] दैत्यकूळें कुटाया ॥
गिरिवर उतटाया[4] रम्यवेशें नटाया ।
तुजचि अगलटाया ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥
बहुत सबळ साठा मागतों अल्प वाटा ।
न करित हितकांटा थोर होईल ताठा ॥
कृपणपण नसावें भव्य लोकीं दिसावें ।
अनुदिन करुणेचें चिन्ह पोटीं वासवें ॥ ८ ॥

---

१ शरीर २ स्वाधीन केलें ३ नाश करण्यास ४ उचलून नेण्यास.

जळधर करुणेचा अंतरामाजि राहे।
तरि तुज करुणा हे कां नये सांग पाहे॥
कठिण हृदय झालें काय कारुण्य गेलें।
न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें॥ ९॥

वडिलपण करावें सेवका सावरावें।
अनहित न करावें तूर्त हातीं धरावें॥
निपटचि हटवादें प्रार्थितों शब्दभेदें।
कपि घन करुणेचा बोळला रामवेधें॥ १०॥

बहुतचि करुणा या लोटली देवराया।
सहजचि कफकेतें जाहली वज्रकाया॥
परम सुख विलासें सर्व दासानुदासें।
पवन तनुज तोषें वंदिला सावकाशें॥ ११॥

## माहिन्म धाटीचे श्लोक.

### स्तवन

गणाधीशा ईशा परम रमणीया कमाणिया।
कृपाळूवा देवा झडकरि मला करणें दया॥
समर्थानें दीनें सकळिक गुणीं करणें सदा।
दिनानाथा वेथा चुकवुनि बळें बसवी पदा॥१॥

---

मेघ.

सदा विद्या बुद्धि तुजविण केव्हां न घडे जनीं ।
विधीसूतें मातें निकटाचि जनीं वसासि मनीं ॥
स्फुरद्रुपें सोपें अनुभव तुझा ध्यास धरतां ।
सदानंदें छंदें अवघड पदें ध्यान धरितां ॥ २ ॥
गुरूदेवा सेवा बहुतचि घडो हेतु पुरता ।
महंतांच्या संगें पतितचि परी होय सरता ॥
प्रचीतीनें न्यासें सकळिक जनामाजि वरता ।
अधोमूखी माया त्यजुनाचि बळें सर्व परता ॥ ३ ॥

## कथा

वंदे वक्ता साक्षी नवविध भरें भाव परता ।
प्रसंगाचें गाणें चढताचि, नव्हे रंग सरता ॥
सिमा नाही तेथें, परतर सुखामाजि झुलती ।
सदा श्रोते वक्तें अभिनव मनामाजि डुलती ॥ १ ॥
कथा हे देवाची अगणित सिमा पुण्यमाहिमा ।
कथेमध्यें देवो वसताचि असे हेचि साहि मा ॥
तदाकारें थोरे निसिदिन मनामाजि धमके ।
निजध्यासें तोषें स्मरताचि सुखें चित्त चमके ॥ २ ॥

## गायन

समारंभें गावें प्रगटाचि जनामाजि सुख तें ।
सदा वाचे देवा अनुदिन वदे नाम मुख तें ॥

भले गाती ध्याती प्रगटाचि सुखें दूरि दुख तें।
करी वेळे वारी स्वहिताचि सदानंद तुकते ॥१॥
सदा वाचीताहे विवरत मनीं तोचि पुरता।
प्रचीतीचें बोले, समजत मनीं तो चि सरता ॥
जनीं तारीताहे निज बिज मुखे तोचि परता।
भजावें देवाला नवविध जनीं तोचि तरता ॥२॥

## विष्णू

चतुर्भूजा देवा क्षिरनिधिवरी शेषशयना।
तुझे भेटीसाठीं बहुताचि जिवीं आस नयना ॥
त्रिलोकींच्या नाथा निपटाचि हिनाहूनि हिन मी।
समर्था मी तूझा म्हणविन जनीं व्यर्थ सिण मी॥१॥
चरित्रें देवाचीं अगणित नसे त्यास गणना।
समर्थाची लीला अतुळचि किती देउं तुलना॥
बहुताला देवें बहुताचि बरें सौख्य दिधलें।
तुझे सेवेसाठीं नकळत मुखें दीन वदलें ॥२॥
दिनानाथा स्वामी उचिताचि बरें नाम न टळे।
महीमा देवाचा सुरवरविधीलागीं न कळे ॥
उपाधीचा साक्षी सकाळिक जिवालागीं जिववी।
दयासिंधू दाता हिन दिन जनालागीं निववी॥३॥

समर्था मी तूझा तुजवीण मला कोण पाहता।
सदा सांभाळावें जवळचि जिवामाजि राहतां॥
सुखानंदें छंदें तव गुणकथा गात वदनीं।
विवेकाचे वाटे अघटित घडे मार्ग सदनीं ॥४॥

सुरांचा कैवारी विलसत जनामाजि न कळे ।
सदा पाळीताहे हरिजन सखा ब्रीद न चळे ॥
करीतो कर्ता तो सहजचि सुखे भेटी दिधली ।
भरीतो भर्ता तो सहजचि पुढें सृष्टि रुधिली ॥५॥

## शंकर

महादेवा शंभो प्रगटचि सदा योग सदना।
दयाळू दासाचा मुदितचि सुखें हास्यवदना ॥
महायोगी त्यागी दमितचि बळें काममदना।
प्रतापाचा सिंधू सुखरारिपुकूळकंदना ॥१॥

महामेरूमाथां रमणिय पहा तीन शिखरें।
तयामध्यें शोभे धवळित प्रभा भासत भरे ॥
हरू तो कैलासीं मिरवत रुपें ध्यानीं धवळा ।
तया ध्यानीं राहे निरखित सदा दास जवळा ॥२॥

## भवानी

भवानी वानी तों न कळत लिळा अल्पवदनीं ।
जगन्माता ज्ञाता तिजविण कवी कोण भुवनीं॥
मुळीं काया माया अगणित धरी गुप्त न कळे ।
दयेनें पाहे त्या अवचट मनामाजि निवळे ॥१॥
समस्तांचे राजे हरिहरविधी त्यास वर तूं ।
चतुर्खाणी वाणी सकळिक परेहूनि परतू ॥
जगन्माते माते प्रगटाचि कळा कीर्तिमहिमा ।
दुजी कोठें पाहों अभिनव तुझी तूज उपमा ॥२॥
तुझीं तानीं बाळें हरिहरविधी लोक सकळै ।
तुझ्या लोभें चाले न करित दया सर्व विकळै ॥
जना माया पाळी जिववित सदा जीव जिवनें ।
तुझी कृपा होतां सकळिक सुखानंद भुवनें ॥ ३॥
प्रकृतीचें कर्णें त्रिभुवनवनामाजि वसतें ।
त्रिगूणापर्तें तें मुनिजनकवीलागिं दिसतें ॥
उदो झाला तीचा प्रचालित कळा सृष्टिरचना ।
परा वाचा तीची बहुविध जनीं मूळवचना ॥४॥
किती एके ठायीं न कळत जनीं गुप्त प्रगटे ।
नटे नाना वेषें भुलवित कळा वेष विनटे ॥

समस्तांचे अंगीं भरताचि सदा काळ फिरवी ।
स्मरावें जाणावें बहुविध जनीं खेद नुरवी ॥५॥

## रघुनाथ

अनंता नामाचा रघुविर जनांमाजि वसतो ।
विवेकी लोकांला प्रगटचि मनामाजि दिसतो ॥
तनूपूरीं[1] वर्ते पुरुषचि तयालागि म्हणती ।
तया लक्षी जो तो तद्रुपचि पहा व्यर्थ शिणती ॥१॥
शिणावें कोणाला जगदिश तरी बाह्यभितरीं ।
तिहीं लोकांमध्यें सकळिक जिवां पाळण करी ॥
कळेना दीसेना जववरि नसे ज्ञान पुरतें ।
असारा त्यागाचें तदुपरि पुढें काय उरतें ॥ २ ॥
विसर्जावी पूजा, सकळाचि पुढें त्याग करणें ।
विसर्जनें जो तो सदृढाचि मनामाजि धरणें ॥
धरीतो धर्ता तो विलसत जनांमाजि पुरता ।
करीतो कर्ता तो सहजचि अहंभाव नुरता ॥३॥
अनन्याची लीला हरिरुप रुपामाजि सरली ।
अहंत्यागें बुद्धि अगणित सुखामाजी भरली ॥
मिळाला तो झाला, नसतचि वसे सर्व भुवनीं ।
घनाचें जें वाहे मिसळत मिळे तोय जिवनीं ॥४॥

---

१ देहपूरी क. पा.

महासंख्यें झालें त्रिभुवन सर्वें एक समता।
विराली ते गेली सकळिक जनामाजि ममता ॥
नसेना ही कैचा हरिजन हरीमाजि मिळला।
महाज्ञानी त्याला समजत मनामाजि कळला ॥५॥

रवि

रवी कीर्णें उष्णें उजळत दिशा स्पष्ट प्रगटे।
दिसों लागे लोकां बहुविधजनीं दृष्टी निवटे ॥
पळों लागे मेळा निशिचर किती थार धरती।
दिवाभितें भीती पळतचि वनामाजि भरती ॥१॥

पृथ्वी

गुणी अष्टै भोगें नृपवर सदानंद करिती।
पदर्थांचीं नामें न कळत जनीं तेचि धरिती ॥
निदानीं तें सर्वें मरतचि भुमीमाजी भरती।
किती येती जाती सुरवरमुनी हेचि जगती ॥१।

आप

पडे पाणी तेथें सकळिक जिवा जन्म घडतो।
नसे पाणी तेथें विकळचिपणें देह पडतो ॥
पिकें झाडें वल्ली करपत नसे जीवन जरी।
बरी पाणी होतां रसमस दिसे सार कुसरी ॥१॥

## तेज

पहा तेजें बिंबें सकळिक जिवामाजी जठरीं ।
सदा नेत्रीं गात्रीं लखलख दिसे सार विवरीं ॥
बळें बोले चाले चळवळ करी तेज नसतां ।
न बोले ना चाले हिणरुप दिसे, तेज नसतां ॥१॥

## वायु

सदा प्राणापानें वसताचि सदा देहममता ।
वदे व्यानोदानें कळिवर भरे सर्वसमता ॥
वसे प्राणी प्राणें नसताचि पुढें प्रेत सकळै ।
चळे वायो तेणें विपरित दशा देह विकळै ॥१॥

## आकाश

धरित्री हे मोठी तिजहूनि बहू थोर जळ तें ।
जळापेक्षां मोठें कडकत बरें तेज जळतें ॥
तया तेजापेक्षां कडकत बळें वात सुटला ।
तया वातावर्ता धडकत नभीं शृंग फुटला ॥१॥

## प्रवृत्ति

नभाकारें सारें विमळचि सदोदीत भरलें ।
विवेकाचे वाटे असताचि नसे दृश्य सरलें ॥

अखंडै खंडेना न चळतं वसे पार न दिसे ।
रितें नाहीं कोठें अणुभरि कदा एक विलसे ॥१॥
परत्रीचा सांठा श्रवणाचि सदाऽद्वैत करणें ।
विवेकी लोकांचा निकटाचि बरा संग धरणें ॥
सदा भक्तीयोगें उमजत सुखें दुःख तरणें ।
कथायोगें रंगे विवरत मही कीर्ति भरणें ॥२॥

## वैराग्य

मना रे त्वां आतां समजत जिवीं सांडि करणें ।
विवेकाचा काचा नसतच्चि बरा संग धरणें ॥
जना तारी मारी हरिजन सदा देव भजतो ।
दयाळू देवाचा मुनिवर मुनीनाथ मज तो ॥१॥

## निश्चळ

दिसे तें नासे रे निगमचि वदे सारवचनें ।
पहाना कां आधीं सुरवर मनीं योग सुमनें ॥
विवंचावें भावें प्रचलित जनीं काय चळतें ।
प्रचीतीनें शोधा सहजचि पुढें सार कळतें ॥१॥

## निराकार

निराकारीं सारीं बहुविध पदें सर्व चळतीं ।
विवेकाच्या पंथें विचरत पुढें सर्व कळती ॥

विवेकी लोकांचे भ्रमरुप बहु गर्व गळती ।
कळेना जें कोणा समजत बरें सर्व वळती ॥१॥
विहंगाच्या पंथें परतर सुखें होत जवळी ।
प्रचीतीचा साधू वद्‌वित बळें चित्त निवळी ॥
नव्हे योगें यागें जपतपव्रतें प्राप्त कवणा
विचारानें होतें सहजचि नसे त्यास तुळणा॥२॥
करावीं सत्कर्मे सुखरुप जनामाजि असतां ।
विचारावीं तत्त्वें मरमर घडे ज्ञान नसतां ॥
नसे ज्ञाना ऐसें जनहित सदा सर्व भुवनीं ।
समस्तांचीं बीजें निरसुनि पहा एक जिवनीं॥३॥

# ६ रामायण—सुंदरकांड.

नमूं सर्वकर्ताचि तो विश्वभर्ता ।
गुणी शोकहर्ताचि हर्ता विधर्ता ॥
परेहूनि पर्ताचि पर्ताचि पर्ता ।
भुतेंभूत धर्ताचि धर्ता [1]उधर्ता ॥ १ ॥

मही मंडळीचे कपी रीस राजे ।
तया मध्यभागीं महावीर साजे ॥
महारुद्र आज्ञेप्रमाणें निघाला ।
सिताशुद्धि आणावया सिद्ध झाला ॥ २ ॥

[2]सर्वे मंडळ्या चालल्या वानरांच्या ।
नभोमंडळामाजि फौजा विरांच्या ॥
गिरीकंदरें देश नाना परीचे ॥
[3]तडागें नद्या ओघ जाती गिरीचे ॥ ३ ॥

पुरें पट्टणें [4]आटणें धुंडिताती ।
कपीवीर दाही दिशा हिंडताती ॥
सिता शोधितां शुद्धि कोठें न लागे ।
बळें धुंडितां तो [5]विरंवीर [6]भागे ॥ ४ ॥

---

१ उद्धर्ता. २ चराचर. ३ सरोवरें ४ वनें. ५ सर्ववीर. ६ श्रमले.

कपी बोलती काय आतां करावें ।
न लागे सिताशुद्धि तेव्हां मरावें ॥
म्हणे मारुती वीर हो स्थीर बैसा ।
तिन्ही लोक पाहोन येतों तमासा ॥ ५ ॥

भयासूर तो भीम सिंधू उडाला ।
त्रिकूटाचळाहूनि पैलीड[1] गेला ॥
पुढें सर्वही पाण-जंजाळ[2] आहे ।
हनूमंत विस्मीत होऊनि राहे ॥ ६ ॥

समुद्रामधें भेटला तो अतीतूं[3] ।
म्हणे रे अरे रे अरे कोण रे तूं ॥
नमस्कार घाली हनूमंत त्याला ।
मनामाजि तो थोर संतुष्ट झाला ॥ ७ ॥

मुनी तो त्रिकूटाचळीं शुद्धि सांगे ।
किराणें उडाला कपी-वीर मागें ॥
अकल्पीत लंकापुरी कांचनाची ।
पुढें देखिली सौख्यदा ती मनाची ॥ ८ ॥

बहू सज्ज तें राज्य लंकापुरीचें ।
पुरीमाजि ते सैन्य मोठ्या बळाचें ॥

---

१ पलीकडे. २ पाणी च पाणी. ३ अतिथि.

उफाळेंचि जाती भुजा फुर्फुरीती ।
तया देखतां देव ते थर्तरीती ॥ ९ ॥

त्रिकुटाचळीं मारुती सर्व पाहे ।
लघूरूप होउनि तो हिंडताहे ॥
गृहें गोपुरें पाहिल्या धर्मशाळा ।
अकस्मात त्या देखिल्या बंदिशाळा ॥ १० ॥

हिनासारिखे देव ते दीन झाले ।
नसे शक्ति ना युक्ति पोटीं गळाले ॥
भयाभीत ते कापती दैन्यवाणें ।
बहू गांजिलें दुःख तें कोण जाणें ॥ ११ ॥

मनामाजि आवाकिलें सर्व कांहीं ।
सिमा सांडिली तूळणा त्यासि नाहीं ॥
बहू मातले गर्व मोठ्या बळाचा ।
तया झोडितों दास मी राघवाचा ॥ १२ ॥

बहू व्यापिती वेढिली सर्व लंका ।
कितेकां मनीं वाटली थोर शंका ॥
गृहांतूनि अंतर्गृहीं पुच्छ घाली ।
बहू पीडितां फोडितां हाक झाली ॥ १३ ॥

उदासें घरें मंदिरें थोरथोरें ।
महापुच्छ तें वावरे अंधकारें ॥
भुजंगापरी सर्व वेटाळिताहे ।
विरें वीर चाकाटला[1] सर्व पाहे ॥ १४ ॥

मुलेंलेंकरांमाजि तें खेळताहे ।
निजेल्यामधें पुच्छ तें लोळताहे ॥
कुमारीकुमारागळां हार घाली ।
भयाभीत अंतःपुरीं हाक झाली ॥ १५ ॥

नव्हे जी नव्हे सर्व सामान्य मातू[2] ।
महा घोर हा थोरला पुच्छकेतू ॥
सभामंडपीं कोप रायासि आला ।
म्हणे सांगती त्यास मारूनि घाला ॥ १६ ॥

कपीवीर रायाकडे शीघ्र गेला ।
बळें थाप मारूनि मूगूट नेला ॥
बरें ठोसरें मारिलें रावणाला ।
म्हणे मारितों रे तुझ्या अक्षयाला ॥ १७ ॥

चिरें[3] सुंदरें फोडिलीं रावणाचीं ।
करी भूषणें चूर मुक्ताफळांचीं[4] ॥

---

१ चकित झाला २ मात-गोष्ट ३ वस्त्रें ४ मोत्यांचीं

कपीनें सभा सर्वही नग्न केली ।
त्रिकूटाचळीं ख्याति ऊदंड झाली ॥ १८ ॥

सभामंडपामाजि धांवोनि आले ।
तेणें नागवे लोक लाजित झाले ॥
महावीर मागें पुढें हात देती ।
कपीनें बहूसाल केली फजीती ॥ १९ ॥

कपीवीर तेथूनि वेगीं उडाला ।
अशोकावनामाजें वृक्षीं दडाला ॥
अधोमूख ते जानकीलागिं पाहे ।
कपी राममुद्रा पुढें टाकिताहे ॥ २० ॥

सितेनें पुढें मुद्रिका ओळखीली ।
बहुतांपरी शुद्ध कारुण्य बोली ॥
पुढें मारुती भेटला जानकीला ।
समाचार सांगोनि आनंद केला ॥२१॥

क्षुधाक्रांत मी जाहलों फार माते ।
तनू चालितां चाचरी सर्व जाते ॥
बहूतांपरी बोलिला जानकीला ।
निरोपेंचि आज्ञेप्रमाणें निघाला ॥२२॥

---

१ तरतरितपणा.

बळें धांविला कूमरू रावणाचा ।
सदा अक्षै वीर मोठ्या बळाचा ॥
असंमान्य राक्षस धावोनि आले ।
कपीलागि मारावया सिद्ध झाले ॥२३॥

मुखें बोलती मर्कटा बैसलेंसी ।
समारंगणामाजि युद्धा न येसी ॥
कपी वीर तो गर्जला भूभुकार ।
समारंगणीं चालिला घोर मारें ॥२४॥

रिपू झोडिले पाडिलें वृक्षघातें ।
भुमी लोळती दैत्य होऊनि प्रेतें ॥
पुढें देखितां जंबुमाळी कुटीला ।
बळें आखया आपटीला पिटीला ॥ २५ ॥

पळाले फळी फूटली राक्षसांची ।
पुढें हाक गेली तया आखयाची ॥
त्रिकुटाचळीं शोक आरंभ झाला ।
प्रितीचा महा आखया तो निमाला ॥ २६ ॥

विधीलागि बोलाविलें रावणानें ।
कठीणोत्तरीं गांजिलें दुर्जनानें ॥

म्हणे जाण रे आण वेगीं कपीला।
तया नाणितां शीघ्र ताडीन तूला ॥२७॥
विरंची पुढें घातला चालवीला।
असंभाव्य तो लोक मागें मिळाला ॥
वनामाजि येतां नमस्कार घाली।
तया मारुतीची बहू स्तुति केली ॥२८॥
बहूतापरी कीर्तिचें येश घ्यावें।
दयाळा कपी ये घडी शांत व्हावें ॥
न होतां मला मारिती ब्राह्मणाला।
बहूसाल कल्याण व्हावें तुम्हांला ॥२९॥
कपी वीर तो थोर कोपें कडाडी।
करी गर्जना मेघ जैसा घडाडी ॥
परी सांकडीमाजि कांहीं न चाले।
मिळाले कपीलागि घेऊनि आले ॥ ३० ॥
अरे मर्कटा थोर अन्याय केला।
म्हणे रावणू मारितो शीघ्र तूला ॥
तुझा मृत्यु कोठें खरें सांग आतां।
मुढा कश्मळा मारितों जात जातां ॥ ३१ ॥

१ न आणल्यास. २ पाप्या.

म्हणे मारुती काळ मारूं शकेना ।
कृपाळूपणें तोषला रामराणा ॥
न वाटे खरें सांगतां रावणाला ।
म्हणे वानरू-लांगुळीं अग्नि घाला ॥ ३२ ॥

म्हणे रावणू पाहतां काय आतां ।
चिरें आणवा सांगतां हे समस्ता ॥
असंभाव्य ते वीर धांवोनि गेले ।
त्रिकूटाचळीं लोक ते नग्न केले ॥ ३३ ॥

किती एक ते लाविलीं आज्यें तेलें ।
किती एक हें मोगरेलें फुलेलें ॥
महा पुच्छ तें सर्व ही भीजवीलें ।
पहा हो कपी बापुडें व्यर्थ मेलें ॥ ३४ ॥

तया लावितां वन्हि तेथें न लागे ।
बळें फुंकितां तो विरेंवीर भागे ॥
तया देखतां रावणू शीघ्र आला ।
बळें फुंकितां फुंकितां तो गळाला ॥ ३५ ॥

पुढें रावणूं थोर कोपें कडाडी ।
बळें फुंकितां ज्वाळ नेटें भडाडी ॥

---

१ शेंपटामध्यें. २ तूप. ३ अत्तरें.

जळालीं मुखें भस्मल्या खांडमीशा।
बहूसाल लंबीत होत्या विशेषा ॥ ३६ ॥

बहू चेतला वन्हि नेटें भडाडी।
कडाडीत ज्वाळा दडाडी धडाडी ॥
कपी वीर तो वाडें झाला उडाला।
पुढें जाळितां जाहला त्रीकुटाला ॥ ३७ ॥

समुद्रीं शुचिष्मंत होऊनि आला।
नमस्कार घाली तये जानकीला ॥
म्हणे जानकी एकला बा विदेशीं।
कपी रे बहुतां परी कष्टलासी ॥ ३८ ॥

म्हणे मारुती धन्य हे दीसें आले।
तुम्हां देखतां सर्वही कष्ट गेले ॥
प्रभू वाट पाहेल तो रामराजा।
निरोपेंचि मी शीघ्र जाईन काजा ॥३९॥

कपी मागुती मागुती वाट पाहे।
उदासीन जातो ग्रीवा दाटताहे ॥
विवेकें जिवामाजिं तो धीर केला।
पुढें मारुती शीघ्र सिंधू उडाला ॥४०॥

---

१ मोठा. २ दिवस.

कपीलागिं सिताशुद्धि झाली ।
सुखें ऐकतां मंडळी ते निवाली ॥
समस्ता जणालागिं आनंद झाला ।
कपी मारुती रामभेटीं निघाला ॥४१॥

कपी लागवेगें मुखें बोलताहे ।
अशोकीं जगन्मात कल्याण साहे ॥
पुढें मारुती तो नमस्कार घाली ।
चितोवृत्ति[1] ते राघवाची निवाली ॥४२॥

## २ युद्धकांड. ( शतप्रथम )

नमस्कारिला राम कोदंडपाणी ।
पुढें गावया रामरामेति वाणी ॥
भविष्योत्तरें बोलिलीं जीं पुराणीं ।
उमाकांत ध्यातो सदा शूलपाणी ॥१॥

कथा शंकराची कथा कार्तिकाची ।
कथा चंडिकेची कथा मोरयाची ॥
कथा व्यंकटाची कथा विठलाची ।
कथा मल्लयाची कथा भैरवाची ॥ २॥

१ चित्तवृत्ति.

कथा नृसिंहा वामना भार्गवाची ।
कथा कौरवा पांडवा माधवाची ॥
कथा देव इंद्रादि ब्रह्मादिकांची ।
समस्तांमध्यें श्रेष्ठ या राघवाची ॥३॥
जयें फोडिला पांग[1] ब्रह्मादिकांचा ।
बळें फोडिला बंध त्या त्रिदशांचा[2] ॥
म्हणोनी कथा थोर या राघवाची ।
जनीं ऐकतां शांत होते भवाची ॥ ४ ॥
कथा संपली कांड सुंदर्य मागें ।
प्रवाहो पुढें चालिला लागवेगें ॥
स्वयें श्रोतयातें कवी प्रार्थिताहे ।
पुढें युद्धकांडीं कथा रम्य आहे ॥ ५ ॥
ऋषी पर्वतीं[3] रामसौमित्र होते ।
अकस्मात आला हनूमंत तेथें ॥
म्हणे जानकी देखिली रामचंद्रा ।
क्षमारूप लंकेसि आहे नरेंद्रा ॥ ६ ॥
पुढें राघवें सुग्रिवाचेनि मतें ।
विचारुनिया सर्वही वानरांतें ॥

---

१ पराधीनपणा. २ देवांचा. ३ ऋष्यमुक पर्वतावर.

दळेंसी बळें दक्षिणें चाल केली ।
विरांची असंभाव्य सेना मिळाली ॥ ७ ॥

अती आदरें स्कंध भागीं विरानें ॥
रघूनायका घेतलें मारुतानें ॥
सुमित्रासुतांलागि त्या अंगदानें ।
प्रभू चालिले ते बळी थोर मानें ॥ ८ ॥

पुढें चालतां भार [1]गोलांगुलांचे ।
कडे लागले थोर विंध्याचलाचे ॥
तया पर्वतामाजि चंडे उदंडे ।
विशाळें बहू लागलीं झाडखंडें ॥ ९ ॥

गिरिशृंगपाठार पाहोनि वेगीं ।
बळें चालिले भार ते दक्षिणांगीं ॥
पुढें चालतां चालतां अस्तमाना ।
समुद्रातिरीं लोटली भीम[2] सेना ॥१०॥

कपीभार ते सर्व ही स्वस्थ झाले ।
महापर्वतांचे परी ते मिळाले ॥
समुद्रातिरीं राहिलें सैन्य ऐसें ।
पुढें वर्तलें त्रीकुटामाजिं कैसें ॥११॥

---

१ वानरांचे. २ भयंकर.

सिताशुद्धि घेवोनियां रुद्र गेला ।
तईं अक्षयातें क्षयो प्राप्त केला ॥
बहू मानसीं दुःख मंदोदरीला ।
तिनें शीघ्र पाचारिलें देवराला ॥१२॥

म्हणे देवरालागि बीभीषणा हो ।
तुम्ही आजि वेगीं सभेमाजिं जा हो ॥
मदोन्मत्त तो अंकुशें आवरावा ।
विवेकें बळें राव तैसा वळावा ॥१३॥

म्हणे धन्य हो धन्य तूं राजकांते ।
मनीं माझिये हीत ऐसेंचि होतें ॥
बरी अंतरीं मात घेऊनि पूर्ती ।
निघाला सभेमाजि तो धर्ममूर्ती ॥१४॥

तया रावणाच्या गृहामाजीं गेला ।
बहूतांपरी रावणू शीकवीला ॥
पुढें दोनही सभेमाजि आले ।
महावीर राक्षस सर्वै मिळाले ॥१५॥

तया रावणें सर्व सांडूनि शुद्धी ।
पुढें भेरितां जाहला पापबुद्धि ॥

---

१ बोलाविलें. २ दिराला-बिभीषणाला.

म्हणे ऐक गा बुद्धिवंता प्रहस्ता ।
करीं रे मला वश्य[1] ते रामकांता ॥१६॥

सितेकारणें म्यां बहू कष्ट केले ।
परी पाहतां सर्व ही व्यर्थ गेले ॥
मनीं चिंतिलें कोडें[2] कांहीं पुरेना ।
उरे शिण, तो शोक पोटीं धरेना ॥१७॥

सिते–सुंदरी–लागि संभोग द्यावा ।
समूळें बळें रामशत्रू वधावा ॥
इतुकेनही सर्व ही कृत्य झालें ।
सुखें सर्वदा चित्त माझें निवालें ॥१८॥

अहंकारला रावणू कोटिगूणें ।
मनीं मानलें सर्व ब्रम्हांड ऊणें ॥
समस्तामधें आगळा मेघवर्णू ।
पुढें बोलतां जाहला कुंभकर्णू ॥१९॥

कपी मानवी सर्व कैसे मिळाले ।
क्षुधेकारणें माझिये प्राप्त झाले ॥
रिपू घालितो उदरामाजिं[3] साठा ।
नरें वानरें ग्रास घेतों गटाटा ॥२०॥

---

१ वश. २ इच्छा. ३ पोटामध्यें.

तया बोलतां रावणा सूख झालें ।
प्रतीउत्तरें आदरें गौरविलें ॥
महावीर पारश्व उद्दीत वेगीं ।
पुढें बोलतां जाहला ते प्रसंगीं ॥२१॥

सितेची बहू प्रार्थना कां करावी ।
प्रभू सांगतो बुद्धि पोटीं धरावी ॥
म्हणें वीर पारश्व त्या रावणाला ।
बलात्कार राया करावा सितेला ॥२२॥

म्हणें रावणू धन्य गा बुद्धिवंता ।
तुझें बोलणें मानलें दृढ चित्ता ॥
परी श्राप आहे मला ब्रह्मयाचा ।
करीना बलात्कार हें सत्य वाचा ॥२३॥

तया बोलतां दुःख बीभीषणाला ।
बहूसाल संतापला क्रोध आला ॥
म्हणे रे रघूनाथ पूर्णप्रतापी ।
दुरात्मे तुम्ही नष्ट चांडाळ पापी ॥ २४॥

कपी वीर ते दूरि टाकूनि शंका ।
मिळाले करायासि निर्मूळ लंका ॥

त्रिकूटाचळीं दृश्य नाहीं तयाला ।
तंव जानकी भेटवा राघवाला ॥ २५ ॥

तया बोलतां ते सभा तप्त झाली ।
सुता मंत्रियांचें मुखीं तीव्र बोली ॥
असंभाव्य त्या रावणा कोप आला ।
कुशब्दें बहू त्रास बीभीषणाला ॥ २६ ॥

सभेमाजि धिक्कारिलें रावणानें ।
उठोनी पदें ताडिलें दुर्जनानें ॥
बहुतांमधें एकला धर्ममूर्ती ।
मनीं खोचला तो उदासीन चित्तीं ॥ २७ ॥

पुरोहीत चत्वार ते पृष्ठिभागें ।
त्वरें उत्तरें चालिला लागवेगें ॥
समुद्रास लंघून पैलाड गेले ।
नभीं पारखें सुग्रिवें ओळखीलें ॥ २८ ॥

मिळाले कपी बोलती त्यासि वाचा ।
अकस्मात आलासि तूं कोण कैचा ॥
म्हणे बंधु मी होय लंकापतीचा ।
परी दास अंकीत या राघवाचा ॥ २९ ॥

---

१ आकाशांत. २ परीक्षेनें.

उभें राहिलें भाग्य बीभीषणाचें ।
करी अंतरीं ध्यान पादांबुजांचें[1] ॥
भिजे दिव्य सर्वांग त्या आश्रुबिंदीं ।
मिठी घातली राम पादारविंदीं[2] ॥ ३० ॥
कृपासागरें ठेविला हस्त माथा ।
चिरंजीव लंकापती होय आतां ॥
मधुरा गिरा राघवें ऊठवीला ।
पुढें तिष्ठतू हात जोडोनि ठेला ॥ ३१ ॥
प्रसंगीं तये थोर आनंद झाला ।
दिसे अक्षयीं राज्य बीभीषणाला ॥
कपी सुग्रिवादीक मांदी[3] मिळाली ।
समस्तें विरीं[4] आदरें स्तूति केली ॥ ३२ ॥
म्हणे राम बीभीषणा बैस अतां[5] ।
त्रिकूटाचळू सांग साकल्य वार्ता ॥
वदे राज्य, लंकापुरी सर्व सेना ।
मनामाजिं संतोषला रामराणा ॥ ३३ ॥
पुढें राम बीभीषणा मंत्र पूसे ।
कपीभार पैलाड जातील कैसे ॥

---

१ चरणकमलाचें. २ पाद+अरविंद-पदकमल.
३ समूह. ४ वीरांनीं. ५ अलीकडे.

विचारूनिया सुग्रिवाचेनि मतें ।
म्हणे हो क्षमा मागिजे मार्गयांते ॥३४॥

समुद्रासि देऊनियां श्रेष्ठ मानू ।
करावा अती आदरें सुप्रसन्नू ॥
मनीं बोलणें सत्य मानूनि देवें ।
समुद्रा तिरीं बैसिजें शुद्ध भावें ॥ ३५ ॥

त्रिकूटाचळीहूनि तो हेर आला ।
पुढें सर्व पाहोन शार्दूल गेला ॥
समाचार सांगे तया रावणाला ।
म्हणे वानरेंसी बळे राम आला ॥ ३६ ॥

प्रभू सांगतो सिद्ध आतां असावें ।
पुरीमाजि दुश्चित कांहीं नसावें ॥
तया सांगतां थोर उद्वेग जीवा ।
म्हणे मागुता कोण रे पाठवावा ॥ ३७ ॥

पुढें शूकें बोलाविला आदरेंसी ।
म्हणे जाय रे बोल त्या सुग्रिवासी ॥
म्हणावे कपी तूं सखा आमुचा रे ।
अनूचीत हें वाउगें कासया रे ॥ ३८ ॥

---

१ मार्ग—समुद्र यांस २ नावाचा राक्षस.

नभो मंडळीं शीघ्र उड्डाण केलें ।
देह आपुलें सर्वही पालटीलें ॥
रुपें सुंदरू जाहला शुद्ध पक्षी ।
निराळा नभामाजिं तो सैन्य लक्षी ॥ ३९ ॥

म्हणे सुग्रिवा ऐक रे एकभावें ।
कपी व्यर्थ आलासि मागें फिरावें ॥
त्वरें आपुल्या भूवनांमाजि जावें ।
समारंगणीं वाउगें कां मरावें ॥ ४० ॥

त्रिकूटाचळीं रामकांतेसी नेलें ।
कपी सांग पां रे तुझें काय गेलें ॥
तया मानवा साह्य झालासि कैसा ।
मनीं नेणता चालिला मूर्ख जैसा ॥ ४१ ॥

शुकें निंदिलें सर्व ही वानरू तें ।
बहुसाल धिक्कार केला तयातें ॥
तिहीं ताडिला पाडिला कुस्त केला ।
पुढें सोडिला तो नभामाजि गेला ॥ ४२ ॥

पुन्हां बोलतां जाहला घोर वाणी ।
कपी मागुतें क्षोभले द्रुमपाणी ॥

---

१ घरामध्यें. २ झाडे आहेत हातांमध्ये असे.

धरूनी बळें आणिला पक्षि—याला ।
तिहीं राक्षिलें पाशबंदीं तयाला ॥४३॥

२ (शताद्वितीय)

समुद्रा तिरीं राम राजीवनेत्रें ।
भुमी शेज दर्भासनीं तीन रात्रें ॥
बहूतांपरी दीधला श्रेष्ठ मानू ।
परी सागरू तो नव्हे सुप्रसन्नू ॥१॥

फळें तोय सांडूनियां नित्य नेमें ।
बहूतांपरी प्रार्थिला सिंधु रामें ॥
परी नायकें जो बळें धुंद झाला ।
रघूनायका कोप तत्काळ आला ॥ २ ॥

उभा राहिला काळ कृतांत जैसा ।
बळें सिंधु जाळावया राम तैसा ॥
दिसे रूप अद्भूत वज्रांग ठाणें ।
करीं चाप तें साजिलें अग्निबाणें ॥ ३ ॥

बहू क्षोभला राम जाळूं निघाला ।
पुढें सिंधु भेटावया शीघ्र आला ॥

१ कारागृहांत.

म्हणे स्वामिया थोर अन्याय झाला ।
समुद्रासि हो शीघ्र पाल्हाणे[1] घाला ॥४॥

नळाचेनि हस्तें जळीं चंड शीळा ।
गिरीशृंग तर्तीलें[2] हो जी भुपाळा ॥
वदे निश्चयें आदरें तो समुद्र ।
तेणें थोर आनंदला रामचंद्र ॥ ५ ॥

बळें सेतु बांधावया वेग केला ।
शतयोजनें लांब विस्तीर्ण झाला ॥
दशयोजनें भव्य रुंदी तयाची ।
जळीं बांधणी सर्व पांचा दिसांची ॥६॥

दळें[3] सर्वही वानरांचीं निघालीं ।
पुढें चालतां दाटणी थोर झाली ॥
कडेचा पडे तो उडे अंतराळीं ।
सुवेलाचळू पावले शीघ्रकाळीं ॥ ७ ॥

त्रिकूटा-गिरी-शीखरीं दिव्य जे कां ।
रघूनायकें देखिली रम्य लंका ॥
दिसे तेज पुंजाळ लावण्यराशी ।
तया देखतां पारणें लोचनासी ॥ ८ ॥

---

१ पूल. २ तरतलि. ३ सैन्यें.

कपीभार ते सर्वही स्वस्थ झाले ।
पुढें धर्मता उत्तरीं राम बोले ॥
म्हणे सुग्रिवा बापुडें शूक सोडा ।
तया पायिचे सर्वही पाश तोडा ॥ ९ ॥

तया सोडितां अंगदें तो उडाला ।
मुखें रामनामें नभीं गुप्त झाला ॥
बळें चालिला मुक्त सूखें त्वरेसी ।
त्रिकूटाचळीं भेटला रावणासी ॥ १० ॥

म्हणे रावणू गा शुका काय झालें ।
नवरात्र पर्यंत कोठें क्रमीलें ॥
वदे शूक हो लंकनाथा वरिष्ठा ।
मुखें व्यर्थ बोलूं नये अप्रतिष्ठा ॥ ११ ॥

तया वानरांच्या दळामाजि गेलों ।
तनू पालटीली स्वयें शूक झालों ॥
नभोमंडळीं राहिलों अंतराळीं ।
बळें वानरांचीं दळें ते न्यहाळीं ॥१२॥

समुद्राचिये उत्तरे भीमसेना ।
दहा योजनें दाट भूमी दिसेना ॥

तिथें मुख्य ते राम सौमित्रबंधू ।
कपीश्रेष्ठ सुग्रीव राजा अगाधू ॥१३॥

बहू कष्ट झाले प्रभू या जिवासी ।
नको वोखटी वेळ ते वैरियासी ॥
रिसांवानरांची असंभाव्य मांदी ।
पुढें घातलें हो मला पाशबंदीं ॥ १४ ॥

कृपाळूपणें बोलिला रामचंद्रू ।
कपीला म्हणे शूक सोडा नरेंद्रू ॥
पुढें वानरीं सोडिलें लागवेगीं ।
समर्था तुला भेटलों ये प्रसंगीं ॥ १५ ॥

प्रभू सांगतों बुद्धि ऐसी करावी ।
त्वरें जानकी राघवा भेटवावी ॥
सिता पाठवितां बरें लंकनाथा ।
न होतां असे प्राप्त होईल वेथा ॥१६॥

शुकें सांगतां रावणा कोप आला ।
म्हणे कोण लेखा नरा वानराला ॥
रणमंडळीं सोडितां बाण वृष्टी ।
बळें आपुल्या सर्व जाळीन सृष्टी ॥ १७ ॥

---

१ गर्दी.

पुढें हेर बोलाविले आदरेंसी ।
शुकासारणातें[1] म्हणे गर्वराशी ॥
मिळालीं दळें श्रावणारीसुताची[2] ।
तुळा रे वळें त्या रिसावानरांची ॥ १८ ॥
सभे अंतरें लक्ष लावून ठेलें ।
अकस्मात बीभीषणें ओळखीलें ॥
धरीलें करी तें शुकासारणातें ।
म्हणे दूत हे धाडिले लंकनाथें ॥ १९ ॥
तव बोलिला राम बीभीषणाला ।
दळें सर्वही दाखवा शीघ्र याला ॥
तुळा जा बळे तें शुकासारणा हो ।
तुम्ही आपलें कार्य सिद्धीस न्या हो ॥ २० ॥
निरोपेंचि तत्काळ ते हेर गेले ।
तया रावणाला नमस्कार केले ॥
प्रभू मृत्यु आला बळें लागवेगें ।
परी सूटका जाहली सर्व भाग्यें ॥ २१ ॥
दळामाजीं बीभीषणें ओळखीलें ।
धरूनी बळें तें सभेमाजि नेलें ॥

---

१ शुक-सारण-रावणाचे दोन अमात्य.

२ श्रावणशत्रू-दशरथ-त्याचा मुलगा-राम

उदारें रघूनायकें सोडविलें ।
कृपाळूपणें नृपती मुक्त केले ॥२२॥
मनीं वाटते बुद्धि ऐसी करावी ।
सिता आदरें राघवा भेटवावी ॥
तया बोलतां कोपला गर्वराशी ।
म्हणे ताडिलें काय नेणो तुम्हांसी ॥२३॥

भय सांगतां त्या नरावानरांचें ।
सदा सर्वदा भक्ष्य जें राक्षसांचें ॥
मज रावणासारखा कोण आहे ।
समारंगणीं काळ भीडो न राहे ॥२४॥

सुवेळाचळीं दृष्टि लावून पाहे ।
असंभाव्य तें सैन्य पोटीं न साहे ॥
पुढें रावणू शारणालागि पूसे ।
कपी सांग रे सर्व आहेत कैसे ॥२५॥
म्हणे शारणू ते कपी वीर जेठी ।
मिळाले असंभाव्य कोट्यानुकोटी ॥
देह पर्वतासारिखे काळरूपी ।
रणीं भीडतां शूर संग्राम कोपी ॥२६॥

---

१ पहिलवान.

कपींचें बहूसाल सामर्थ्य वानी ।
मुखें बोलतां रावणू वीट मानी ॥
म्हणे रावणू शारणा मूर्ख होसी ।
मज देखतां मर्कटा वर्णितोसी ॥ २७ ॥

असो दे रिसेंमर्कटें ये प्रसंगीं ।
रिपू राम तो दाखवी मुख्य वेगीं ॥
अभिप्राव जाणोनि लंकापतीचा ।
वदे शारणू मागुती रम्य वाचा ॥ २८ ॥

म्हणे राम तो पैल कोदंडपाणी ।
रुपें सावळा राम कैवल्यखाणी ॥
रतीचा पती तूळीतां तुच्छ होये ।
विराजे रिसांवानरांमाजी पाहे ॥ २९ ॥

तया दक्षणें दूसरा बैसला हो ।
महावीर सौमित्र राया पहा हो ॥
असंभाव्य सामर्थ्य यांचें कळेना ।
बळें आगळा जिंकितां जिंकवेना ॥ ३० ॥

सिता शोधिली मारिलें कूमरासी ।
वनें मोडिलीं जाळिलें त्रिकुटासी ॥

---

१ वर्णन करी.

बळें आगळा नृपती पैल आहे ।
समस्तांमध्यें मारुती शोभताहे ॥ ३१ ॥

उतावेळ मारावया दैत्य पाहे ।
महावीर बीभीषणू शोभताहे ॥
तयां सांगतां रावणा दुःख झालें ।
असंभाव्य कोपानळें तप्त केलें ॥ ३२ ॥

करीं खड्ग घेऊनियां शारणाला ।
प्रसंगीं तये शीघ्र मारूं निघाला ॥
म्हणे शारणू जी पिडा कां करितां ।
मुखें बोलिलों सर्वही सत्यवार्ता ॥ ३३ ॥

तुझ्या या दळें पाठविलें भुपाळें ।
रिपूचीं दळें पाहिलीं तीं विशाळें ॥
तयासारिखें बोलिलों सत्यभावें ।
समर्थांपुढें मिथ्य कैसें वदावें ॥३४॥

प्रभू आमुचा कोण अन्याय झाला ।
खरे सांगतां कोप येतो तुम्हांला ॥
नसे पाहतां अल्प अन्याय कांहीं ।
नसे मिथ्य आम्हीं नव्हे स्वामिद्रोही ॥३५॥

समाचार तो सर्वही श्रूत केला ।
तया सांगतां रावणा कोप आला ॥
पुढें राक्षसें शीर केलें रिपूचें ।
वनीं चालिला सत्व घ्याया सितेचें ॥ ३६ ॥

अशोकीं वसे जानकी भूमिबाळा ।
वदे रामनामावळी सत्वशीळा ॥
पहा रावणें शीर मायिक केलें ।
छळाया सितेकारणें शीघ्र नेलें ॥ ३७ ॥

म्हणे रावणू व्यर्थ त्वां धीर केला ।
रणीं वीर भर्तार तूझा निमाला[1] ॥
कपी राक्षसातें महामारु झाला ।
प्रहस्तू जयो शीघ्र घेऊनि आला ॥ ३८ ॥

रिपू सांगतां ते भयातूर झाली ।
भयें जानकी शोकसिंधू बुडाली ॥
शिरा देखतां मूर्छना शीघ्र आली ।
तनू सांवरेना भूमी अंग घाली ॥ ३९ ॥

बहू शोक होतां देहभाव सांडी ।
म्हणे रावणू सत्व सीता न सांडी ॥

---

१ मेला.

महा प्रेत्न सायास म्यां व्यर्थ केला ।
पुढें शीघ्र लंकापुरीमाजी गेला ॥४०॥
दळें सिद्ध केलीं बळें लंकनाथें ।
प्रतीमल्ल राक्षस चत्वारपंथें ॥
महावीर ते सर्वही शस्त्रपाणी ।
बुझूं पाहती भूमि आकाश वाणीं ॥४१॥
कपीचक्रही बळें सिद्ध झालें ।
निळें वानरेंसी प्रतीमल्ल केलें ॥
महावीर ते गर्जती मेघ जैसे ।
भुतां खेचरां थोर कल्पांत भासे ॥ ४२ ॥

## ३ ( शत तृतीय )

पुढें चालला शीघ्र तो रामराजा ।
कपी धावती वीर वेष्टीत फौजा ॥
करीं हात घेऊनि बीभीषणाचा ।
बळें वेधले शृंग[१] त्या पर्वताचा ॥ १ ॥
सुवेळागिरीं शीखरीं राम पाहे ।
अती साजिरें श्रीकूट शोभताहे ॥

१ शिखर.

उभा रावणू गोपुरीं थोर ताठा।
तिथें पावला सुग्रिवाचा चपेटा ॥ २ ॥
पुढें देखतां रावणा कोप आला।
पदा झाडिलें ताडिलें सुग्रिवाला ॥
मदें मातले दूरि टाकूनि शंका।
कळा लाविती नीकुरें[1] एकमेकां ॥ ३ ॥

विरश्रीवळें वीर झोंबीस आले।
झडां[2] चांचरें[3] भूतळामाजि गेले ॥
पुढें रावणें देह संकोचवीले।
अनर्थासि भीवोन गंतव्य[4] केलें ॥ ४ ॥

कपीसीं सुवेळाचळा राम आला।
असंभाव्य तो वीरमेळा मिळाला ॥
दळें भूतळीं दाटले भार सैरा।
पुढें आणिलें राजनीति विचारा ॥ ५ ॥

कपी शोधितां शोधितां लक्ष कोटी।
तयामाजि हा अंगदू वीर जेठी ॥
बळें आगळा दक्ष चातुर्य जाणे।
वय अल्प लावण्य तारुण्य बाणे ॥ ६ ॥

१ निश्चयानें. २ वेगानें. ३ चांचपटत. ४ गमन..

स्तुतीउत्तरें राम बोले तयासी ।
म्हणे धन्य गा अंगदा गुणराशी ॥
मिळालासि तूं आमुच्या स्नेहवादा ।
विवेकें त्वां सांडिलें पितृद्वंद्वा ॥ ७ ॥
म्हणे रामराणा तया अंगदासी ।
त्रिकुटाचळीं भेट रे रावणासी ॥
तया सांग भीमूं पुरुषार्थ माझा ।
वडे व्यर्थ संहारिसी कोणें काजा ॥ ८ ॥
प्रसंगोत्तरें अंगदा त्वां वदावें ।
बहुतांपरी रावणा बोधवावें ॥
सिताकारणीं युद्ध मागोनि घ्यावें ।
परी शेवटीं भाग तोडूनि यावें ॥ ९ ॥
नमस्कारिलें त्या रघूनायकाला ।
समस्तांसि सन्मानिलें सिद्ध झाला ॥
कपी राम आज्ञेसि घेऊनि माथां ।
उडाला बळें चालिला व्योमपंथां ॥ १० ॥
नभामाजि झेपावला वेग केला ।
बळें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥

---

१ भीम-भयंकर. २ कोणत्या कामाकरितां. ३ आकाश-मार्गानें. ४ झडप मारून गेला.

अकस्मात खालावला व्योमपंथें ।
रिपूची सभा बैसली भीम जेथें ॥ ११ ॥
बहुतांपरी रावणू बोधवीला ।
परी नायके मानसीं गर्व केला ॥
म्हणे कायरे पहातां या कपीला ।
महावीर तो अंगदू आक्रमीला ॥ १२ ॥
पुढें अंगदू भेटला रामचंद्रा ।
नमस्कारिलें आदरें त्या नरेंद्रा ॥
कपी वर्तला तो समाचार सांगे ।
म्हणे शत्रुचा गर्वताठा न भंगे ॥ १३ ॥
बहु बोलिलों जी तया रावणासी ।
परी नायके मातला गर्वराशी ॥
भिजेना जळामाजि पाषाण जैसा ।
धरीना मनीं सांगतां शब्द तैसा ॥ १४ ॥
म्हणे राम गा सुग्रिवा ये प्रसंगीं ।
त्रिकूटाचळू पालथा घाल वेगीं ॥
कपींद्रू वदे शीघ्र सेनापतीला ।
निठें सर्व सैन्यासि संकेत केला ॥ १५ ॥

---

१ गांठला.

त्रिकूटाचळीं वानरीं लाग केला ।
कपी राक्षसातें महामार झाला ॥
बहू कोपले वीर तें चंडकोपा ।
बळे हाणती मस्तकीं वज्रथापा ॥ १६ ॥

पुढें धाविले पायिचे शस्त्रधारी ।
जया देखतां रोम अंगीं थरारी ॥
कपी राक्षसाते महामार झाला ।
तेणें शोणितांचे नदीपूर आला ॥ १७ ॥

निमाले रणीं देह त्या पायिच्यांचे ।
बळें ऊठले भार त्या राउतांचे ॥
तनू टाकितीं झुंजतीं स्वामिकाजा ।
पुढे धावति वीर मागील फौजा ॥ १८ ॥

रथी सारथी सर्वही चूर्ण केले ।
महावीर ते घोर मागून आले ॥
रणीं राक्षसाते क्षयो प्राप्त झाला ।
जयो वानरा शीघ्र ठाकून आला ॥ १९ ॥

दळीं राक्षसांचे हाहाकार झाला ।
दळेंनीं बळें वीरुपाक्षी निमाला ॥

१ रक्ताचे. २ घोडेस्वार.

कपी राक्षसाची बहुसाळ सेना ।
रणीं माजले युध्य ते अे हटेना ॥२०॥

निसे प्रात झाली रणीं घोरमारें ।
महावीर ते झुंजती अंधकारें ॥
बळें हाणती कोण कोणा कळेना ।
विरश्री बळें मातली ते ढळेना ॥ २१ ॥

पुढें शीघ्र चंद्रोदये शुद्ध झाला ।
दिसो लागले राक्षसा वानरांला ॥
रिपू हाणती एकमेकां धडाडा ।
नद्या वाहती शोणितांच्या भडाडा ॥ २२ ॥

क्षयो प्राप्त झाला बहु राक्षसातें ।
पुढें युद्ध आरंभिलें इंद्रजीतें ॥
दिसे पाहतां सर्वही येश गेलें ।
तया राक्षसें शीघ्र कापट्य केलें ॥ २३ ॥

अकस्मात तो इंद्रजीतू उडाला ।
नभोमंडळीं रावणी गुप्त झाला ॥
पुढें घोर नीशाचरी तेचि काळीं ।
करी पाडिले सर्व ही सर्पजाळीं ॥ २४ ॥

---

१ रात्र. २ रक्ताच्या.

कपीभार ते सर्व निर्जीव केले ।
निचेष्टित ते राम सौमित्र ठेले ॥
रिपू पाडिले थोर आनंद झाला ।
पुढें शीघ्र लंकापुरीमाजी गेला ॥ २५ ॥

बहू सूख झालें तया रावणासी ।
तेणें शीघ्र पाचारिलें त्रीजटेशी ॥
म्हणे हो विमानीं सिता बैसवावी ।
रिपू मारिले शीघ्र तेथेचि न्यावी ॥ २६ ॥

रणीं पाडिले ते तया दाखवावे ।
सिता वीट मानेल ऐसें करावें ॥
बहूतांपरी रावणें शीकवीली ।
वनामाजि ते त्रीजटा शीघ्र गेली ॥ २७ ॥

पुसे जानकी ते तये त्रीजटेला ।
सभामंडपीं कोण वृत्तांत झाला ॥
म्हणे त्रीजटा सोडि चिंता स्वभावें ।
रणमंडळा राज आज्ञेचि जावें ॥ २८ ॥

सिता ऐकतां शोक सांडूनि ठेली ।
तये-त्रीजटेची बहू स्तूति केली ॥

पुढें बैसल्या शीघ्र दोघी विमानीं ।
रणूमंडळया पातल्या घोर वागीं ॥ २९ ॥

पुढें जानकी बोलिली त्रीजटेसी ।
रणीं पाडिलें सर्वही प्रेतराशी ॥
महावीर ते कोण वेळा तयातें ।
म्हणे त्रीजटे दाखवीं शीघ्र मातें ॥ ३० ॥

रणीं त्रीजटा दाखवी जानकीसी ।
महावीर ते पाडिले नागफासीं ॥
दिसे राम सौमित्र तो ही निमाला ।
पुढें जानकीनें महा शोक केला ॥ ३१ ॥

बहूतां परी जानकी शांत केली ।
तये त्रीजटा शीघ्र घेऊनि गेली ॥
समाचार सांगे तया रावणाला ।
वनामाजि आली सिते रक्षणाला ॥ ३२ ॥

कपी पावले सर्व ही मृत्युपंथू ।
जिती मारुती आणि नैऋत्यनाथू[1] ॥
जयालागीं झाली दया राघवाची ।
पहाया तया शक्ति काळासि कैंचि ॥ ३३ ॥

---

१ राक्षसांचा नाथ–बिभीषण.

रणें शोधिलीं सर्व बीभीषणानें ।
विरालागि आस्वासिलें थोरमानें ॥
पुढें दृष्टिनें पाहिलें राघवानें ।
गरूडास्त्र नीरोपिलें व्योमजानें ॥ ३४ ॥

विहंगीं तिहीं सर्पसंहार केला ।
कपीभार तो मोकळा सिद्ध झाला ॥
गिरीशिखरीं सर्व सेना घडाडी ।
त्रिकूटाचलीं घोष तेणें गडाडी ॥ ३५ ॥

म्हणे रावणू थोर आश्चर्य झालें ।
कपीचक्र ते सर्व निर्जीव केलें ॥
सुतें वैरियां दाविली थोर ख्याती ।
रणीं मागुती ते कपी गर्जताति ॥ ३६ ॥

रणीं वीर धूम्राक्ष तो वज्रदंष्ट्री ।
दुजा अकंप चालिला भार पृष्ठीं ॥
रणू-मंडळीं थोर संहार केला ।
पुढें राक्षसा तें क्षयो प्राप्त झाला ॥ ३७ ॥

पुढें रावणू चालिला लागवेगें ।
तया लागिं मंदोदरी नीति सांगे ॥
न मानीत तो चालिला आवरेना ।
बळें लोटिली ते असंभाव्य सेना ॥ ३८ ॥

बहु त्रासिलें सैन्य गोलांगुलांचे ।
रिपू बाण जाळे बहू साल खोंचे ॥
महावीर तेही बळें भग्न केले ।
पळाले कपी राघवा आड गेले ॥ ३९ ॥

तया देखतां राम कार्मूक[1] ओढी ।
पुढें शीघ्र सौमित्र तो हात जोडी ॥
म्हणे विर तो स्थीर व्हावें समर्थें ।
करीतों बळें भग्न या रावणातें ॥ ४० ॥

सुमित्रा सुता रावणा युद्ध आतां ।
पुढें देईजे आदरें चित्त श्रोता ॥
म्हणे दास हा वीर कोदंडपाणी ।
रणीं रावणालागि त्रासील बाणीं ॥ ४१ ॥

४ (शतचतुर्थ.)

दशांशीर[2] सौमित्र युद्धा निघाले ।
समारंगणीं वीर सन्मूख झाले ॥
महाशूर संग्राम आवेश पोटीं ।
पुढें देखिले एकमेकांसि दृष्टी ॥ १॥

१ बाण. २ रावण.

रणीं भीडतां हाणती एकमेकां ।
म्हणे रावणू लक्ष्मणू वीर नीका[1] ॥
पुढें शक्ति काढूनिया ब्रह्मयाची ।
बळें सोडिली ओळ विद्युल्लतेची ॥२॥

शरें वारितां बैसली शक्ति अंगीं ।
रणीं वीर सौमित्र तो देह त्यागी ॥
पुढें रावणू धाविला शीघ्र तेथें ।
बळें ताडितां जाहला मुष्टि घातें ॥ ३ ॥

तया देखतां मारुती कोप आला ।
अकस्मात तो व्योमपंथें उडाला ॥
कठोरें करें ताडिला वज्रमुष्टी ।
वमूं लागला रावणू रक्तसृष्टी ॥ ४ ॥

रिपू रावणू मागुता शीघ्र गेला ।
पुढें लक्ष्मणू ऊठिता स्वस्थ झाला ॥
पुढें रावणू कोपला काळरूपी ।
निराराक्षसांमाजि चंडप्रतापी ॥ ५ ॥

बहु बाण झुंजाड[2] बांधोन पृष्ठीं ।
दहाही धनुष्यें करी दृढमुष्टी ॥

१. खरा. २. समूह.

करूं लागला मागुता बाणवृष्टी ।
रघूनायकें देखिलें त्यास दृष्टी ॥ ६ ॥

उभा राहिला राम वज्रांग ठाणें ।
करीं सज्जिलें चापचंद्रार्ध बाणें ॥
दहा हेम मूकूट छत्रें धनुष्यें ।
बळें तोडिलीं पाडिलीं ते निमिष्यें ॥ ७ ॥

पुढें रावणू तो भयातूर झाला ।
बहुतांपरी राघवें शीकवीला ॥
म्हणे जाइ रे रक्षिलें आजि तूला ।
रिपू प्राण घेऊनि तैसा पळाला ॥ ८ ॥

भयातूर लंकापती दैन्यवाणा ।
म्हणे ऊठवा हो बळें कुंभकर्णा ॥
तयावीण आणीक कोणी दिसेना ।
रिपू घोर हा थोर संहारवेना ॥ ९ ॥

गदा तोमरें हाणती वज्रघातें ।
महा मार आरंभिला राक्षसातें ।
कळा लाविती टाकिती वृक्ष नाना ।
गळाले परी कुंभकर्णू उठेना ॥ १० ॥

---

१. लोखंडी सोटे २. टोंचण्या.

नव्हे कार्य तेणें बहूसाल शंका।
पुढें बोलती वीर ते एकमेकां॥
उठेना महावीर कैसें करावें।
तंव जाहालें अंतरीं वर्म ठावें॥ ११॥

तिथें गायनाची कळा रम्य झाली।
तिणें कुंभकर्णासि जागृति आली॥
भुकेला दिसे बैसला काळ जैसा।
बहू भक्षिलें श्रोणिता मद्यमांसा॥ १२॥

पुढें कुंभकर्णू सभेमाजि गेला।
नमस्कारिलें भेटला रावणाला॥
म्हणे भोगणें लागतें कर्म केलें।
सिता आणितां दुःख हें प्राप्त झालें॥ १३॥

मनीं भंगला राव जाणोनि तेणें।
पुन्हां तोषविलें विरें कुंभकर्णें॥
रिपू मारणें हेंचि आतां प्रतिज्ञा।
उभा राहिला शीघ्र घेऊनि आज्ञा॥ १४॥

रिसावानरा मांडिली थोर आटी[1]।
कपी गीळिले लक्ष कोट्यानुकोटी॥

---

१. नाश.

उठे सृष्टि भक्षावया काळ जैसा ।
रणीं नावरे तो महावीर तैसा ॥ १५ ॥

तया सुग्रिवे कर्ण नासीक नेलें ।
पुढें पाहतां दर्पणीं दुःख केलें ॥
म्हणे व्यर्थ आतां जिणें रूपहाणी ।
रणीं मागुतां लोटला शूलपाणी ॥ १६ ॥

महा चंड त्या मुद्गलाचेनि हातें ।
रणीं हाणतां जाहला राघवातें ।
रघूनायकें छेदिला तोचि बाहो ।
भुमी चालिला श्रोणिताचा प्रवाहो ॥ १७ ॥

बहू कोपला दैत्य सन्मूख आला ।
रणीं पाद छेदूनि चौरंग केला ॥
पदेंवीण चाले महा सर्प जैसा ।
बळें ऊदरें चालिला वीर तैसा ॥ १८ ॥

पुढें राघवें शीर छेदूनि नेलें ।
बहूसाल ते व्योमपंथें उडालें ।
रणीं कोथळा फोडिला बाणघातें ।
महावीर तो चालिला मृत्युपंथें ॥ १९ ॥

---

१. हातपाय रहीत.

करूं लागला रावणू शोक भारी ।
पुढें त्रीशरा त्यासि बोधें निवारी ।
म्हणे हो रणीं आज युद्धास जातों ।
रिपू थोर सामर्थ्य याचें पहातों ॥ २० ॥

महा मत्त मोहोदरें सिद्ध केला ।
तुरंगी नरा अंतकू स्वार झाला ॥
बहूसाल तेजाळ तें खड्ग हातीं ।
बळें चालिले वीर ते राजपंथीं ॥ २१ ॥

महा मार दोन्हीं दळीं एक झाला ।
कपी वीर राक्षस किती निमाला ॥
पुढें वानरीं घोर घातें निघातें ।
रणीं भग्न केलें तया राक्षसातें ॥ २२ ॥

तया देखितां लोटला दिव्य घोडा ।
नरा अंतकू कोपला वीर गाढा ॥
बळें हाणतां शस्त्र वाजे धडाडा ।
तुटों लागले पाद पाणी थडाडा ॥ २३ ॥

कपी वीर ते खोचले भग्न झाले ।
महा मार देखोनि मागें पळाले ॥

---

२. राक्षसाचें नांव ३. हत्ती.

किती एक ते सुग्रिवा आड गेले ।
पुढें अंगदें सर्वही स्वस्थ केले ॥ २४ ॥

नरा अंतका मारिलें अंगदानें ।
पुढें वीर उठावले थोर त्राणें ॥
रणामंडळामाजि ते शीघ्र आले ।
तयां अंगदाही कपी साह्य झालें ॥ २५ ॥

बळें कोपला तो अती चंड काया ।
रथू लोटिला मुख्य शत्रू जिणाया ॥
कपी वीर ते आडवे शीघ्र आले ।
पुढें चालतां सर्वही भग्न केले ॥ २६ ॥

रथीं बैसला पर्वतासारिखा तो ।
म्हणे राम कोण हा युद्धासि येतो ।
वदे शीघ्र बीभीषणू रम्य वाचा ।
रघूनायका पुत्र हा रावणाचा ॥ २७ ॥

सखा होय सौमित्र तुम्हास जैसा ।
अती काय तो मेघनादासि तैसा ॥
न लेखी कपीवाहिनीचा उठाना ।
तुम्ही कां सुमित्रा सुतें हा वधावा ॥ २८ ॥

---

१ जोरानें. २. जिंकण्यास ३. वानर सैन्याचा

शरीं राक्षसें व्योम संपूर्ण केलें।
विरें लक्ष्मणें सर्व छेदूनि नेलें।
रिपू कोपला मागुतें बाण सोडी।
बळें वीर सौमित्र तत्काळ तोडी ॥ २९ ॥

पुढें वीर सौमित्र तो वज्रठाणें।
बळें तोडिलें शीर चंद्रार्ध बाणें ॥
रणीं पाडिला तो अतीचंड काया।
भये लागले दैत्य मागें पळाया ॥ ३० ॥

पुढें रावणी तो भुमी अंग घाली।
तया ऐकतां मूर्छना शीर आली ॥
शरीरीं नसे शुद्धि सर्वे उडाली।
बहू दैन्यवाणी दशा प्राप्त झाली ॥ ३१ ॥

करी रावणू शोक शंकारहीतू।
सभामंडपीं धाविला इंद्रजीतू।
पिता शीघ्र आलिंगिला मेघनादें।
म्हणे काय जी शीणता व्यर्थ खेदें ॥ ३२ ॥

बहूतां परी जन्नकू शिकवीला।
म्हणे शीघ्र मारूति येतो रिपूला ॥
तेणें रावणू शोक सांडोनि ठेला।
बहुसाल सन्मानिलें त्या सुताला ॥ ३३ ॥

महा वैभवेसी रणामाजि आला ।
तया इंद्रजीतें रणीं होम केला ॥
तयालागि पूर्णाहुतीचेनि तोषें ।
रथू दीधला अग्नि पूर्णाहुतानें ॥ ३४ ॥

रथू तोमरें खड्ग बाणी विराजे ।
वरी रावणी तो महावीर साजे ।
उडाला रथेंसि बळें अंतराळे ।
असंभाव्य सोडी तळीं बाणजाळें ॥ ३५ ॥

कपीवाहिनीमाजि आकांत झाला ।
रणीं तो विरेंवीर सर्वे निमाला ॥
सुमीत्रासुतू बोलिला राघवेंसी ।
बहू आट झाला रिसावानरांसी ॥ ३६ ॥

पुढें बोलतां बोलतां तेचि काळीं ।
अकस्मात ते भेदिलें बाण–जाळीं ॥
निचेष्टीत भूमी धनुष्यें गळालीं ।
विरे इंद्रजीतें रणीं ख्याति केली ॥ ३७ ॥

रिसांवानरा सर्व संहार केला ।
पुरीमाजि तो येश घेऊनि गेला ॥

२. बाणांचा समुदाय.

नमस्कार केला तया रावणाला ।
दळेंसी बळें राम शत्रू निमाला ॥ ३८ ॥

कपी वीर ते पर्वता तुल्य ऐसे ।
निमाले रणीं पाडिलें वृक्ष जैसे ॥
तयामाजि कल्याण दोघा जणाला ।
कपी मारुती आणि बिभीषणाला ॥ ३९ ॥

बहूसाल तो रीस घायाळ झाला ।
बहू बाणजाळें रणीं आकळीला ॥
महावीर बीभीषणें ऊठवीला ।
बळीं बाण ओढोनिया स्वस्थ केला ॥ ४० ॥

पुढें ऋक्ष बीभीषणालागि पूसे ।
महावीर ते मुख्य आहेत कैसे ॥
म्हणे जांबुवंतासि नैऋत्यनाथू ।
विरा पूससी काय झाला अनर्थू ॥ ४१ ॥

महावीर दोघे निचेष्टीत झाले ।
कपी सुग्रीवादीक सर्वै निमाले ॥
रणामाजि ते शोधिली सर्व सेना ।
समस्तांमध्यें एक तोही वदेना ॥ ४२ ॥

---

१ सैन्यासहित २ अस्वल—जांबुवंत

म्हणे ऋक्ष तो मारुतीवीण कांहीं ।
विरा ऊठवाया दुजा प्रेत्न नाहीं ॥
क्षिराब्धि तटीं योजनें चार कोटी ।
गिरी द्रोण आणील हा वीर जेठी[1] ॥ ४३ ॥

महारम्य द्रोणाचलु भव्यरूपी ।
तया मस्तकीं औषधीं दिव्यरूपी ॥
बळें आणितां ऊठती सर्व सेना ।
कपी मारुतीवीण दूजा दिसेना ॥ ४४ ॥

५ " शतपंचम "

उभा राहिला वीर मांदार[2] जैसा ।
मनाहूनि पूढें बळें वेग तैसा ॥
रुपें कर्कशू पाहतां साहवेना ।
बहूसाल उच्चाट[3] त्या राहवेना ॥ १ ॥

अकस्मात तो व्योम पंथें उडाला ।
मही झोंकली पन्नगा भार झाला ॥
बहू घोकले[4] कूर्म वाराह दंती ।
झडा[5] चांचरे[6] ते धरां[7] सावरीती ॥ २ ॥

---

१. बलाढ्य. २. मंदारपर्वत ३. उतावीळपणा ४. हालले ५. झुरकर ६. हालणारी. ७. पृथ्वी

बहू लंघिली पोकळी वेग केला ।
द्विपें पांचही शीघ्र टांकून गेला ॥
उडाला बळें पांच सिंधू अगाधू ।
पुढें देखिला साहवा क्षिरसिंधू ॥ ३ ॥

तयाचे तिरी उंच आकाशपंथें ।
विरें देखिलें रम्य द्रोणाचळातें ॥
तया मस्तकीं दिव्य वल्ली अपारा ।
प्रभा फांकली दिव्य कल्लोळ सैरा ॥ ४ ॥

तया पर्वताची बहू स्तुति केली ।
परी नायके सर्व ही व्यर्थ गेली ॥
बहूसाळ त्या आचळें[2] गर्व केला ।
पुढें मारुता कोप तत्काळ आला ॥ ५ ॥

महा थोर धिक्कार केला तयासी ।
बळें शीघ्र उत्पाटिलें पर्वतासी ॥
गिरी घेतला पुच्छ वेष्टीत माथां ।
कपीराज तो चालिला व्योमपंथा ॥ ६ ॥

रणीं जाहला सर्व संहार जेथें ।
महावीर आला अकस्मात तेथें ॥

१. खोल २. पर्वतानें.

निसी दाटली अंधकारें दिसेना ।
गिरी ठेविता देखिली सर्व सेना ॥ ७ ॥

पिता पावला तो बळें मारुतीचा ।
रणीं वास नेला तया औषधींचा ॥
सुगंधोचि वीर आरोग्य झाले ।
कपी सर्वही मृत्यु मारूनि ठेले ॥ ८ ॥

दळेंसि बळें ऊठिला रामराजा ।
फुराणें कपी गर्जती वीर फौजा ।
पुढें मारुतें घेतलें पर्वताला ।
क्षिराब्धितटीं शीघ्र ठेवूनि आला ॥ ९ ॥

नमस्कारिलें त्या रघूनायकासी ।
उभा राहिला हात जोडूनि पासी ।
म्हणे राम तो धन्य गा धन्य वीरा ।
कपी काय द्यावें तुझ्या ऊपकारा ॥ १० ॥

म्हणे मारुती सर्व स्वामीप्रतापें ।
प्रभू काय कीजेल म्यां दीनरूपें ॥
समर्था तुझीये कृपेवीण कांहीं ।
स्वता अल्पही कार्य होणार नाहीं ॥ ११ ॥

---

१. रात्र २. नजीक.

कपीनाथ बोले रघूनायकासी ।
नये रावणू चंड दुःखें रणासी ॥
तरी शीघ्र लंकापुरी जाळवावी ।
समर्थें कपीलागि आज्ञा करावी ॥ १२ ॥

पुढें बोलिजे सुग्रिवालागि देवें ।
तुम्ही कल्पिलें कार्य सिद्धीस न्यावें ।
कपी राम आज्ञेसी घेऊनि वेगीं ।
विरांलागि आज्ञापिलें ते प्रसंगीं ॥ १३ ॥

चुड्या पावकें सर्वही दीप्त केल्या ।
अकस्मात् लंकापुरी माजि नेल्या ॥
बळाचे कपी धांवती लक्ष कोटी ।
चुड्या खेळती थोर आनंद पोटीं ॥ १४ ॥

मळें धूपवीलीं तया रावणानें ।
सळें ऊसणें घेतलें पावकानें ॥
बळें लागतां थोर पोटीं कडाडी ।
बहू वाजला वन्हि पोटीं धडाडी ॥ १५ ॥

त्रिकूटाचलीं थोर आकांत झाला ।
असंभाव्य राक्षस किती निमाला ।

---

१. अग्नीनें

स्त्रिया बालकें जेथें जेथें पळालीं ।
शिखा लागतां तेथें तेथें जळालीं ॥ १६ ॥

तया रावणा वाहिली सर्व चिंता ।
म्हणे पाठवावा रणीं कोण आतां ॥
न दीसे मुखीं मंदली सर्व शोभा ।
पुढें बोलला शीघ्र कुंभा निकुंभा ॥ १७ ॥

म्हणे वानरी जाळिली दिव्य लंका ।
तयासी करा युद्ध टाकूनि शंका ॥
तया सांगता शीघ्र उदीत झाले ।
महावीर ते सात युद्धा निघाले ॥ १८ ॥

बहू होत लंकापुरी दग्ध जेथें ।
बळें चालिले भार तेणेंचि पंथे ॥
निमीषांत कुंभें विरें तेचि काळीं ।
महामेघ तो पाडिला बाण जाळीं ॥ १९ ॥

बळें मातला वन्हि तो विझवीला ।
त्रिकूटाचलीं लोक आनंदवीला ॥

---

१. अग्नींची ज्वाळा.

विझाली पुरी तेणेंचि मार्गें ।
निघाली पुढें वाहिनी वातवेगें ॥ २० ॥

रणमंडळा पारिखें वीर आले ।
कपी द्रूमपाणी बळें सिद्ध झाले ॥
समस्तांपुढें अंगद्र वीर रागें ।
रणीं लोटला क्रोधनू लागवेगें ॥ २१ ॥

शिळा शीखरें वृक्ष पाषाण घातें ।
कपी वीर ते हाणिती राक्षसांतें ॥
समारंगणीं दूर टाकूनि शंका ।
बळें नीकुरें भेडिती एकमेकां ॥ २२ ॥

रणीं कुंभ तो मल्लयुद्धासि आला ।
बळें ताडितां जाहला सुग्रिवाला ॥
तया सुग्रिवें दीधली वज्रमुष्टी ।
रणीं कुंभ तो पाडिला प्रेतसृष्टी ॥ २३ ॥

त्रिकुटाचळामाजि घायाळ गेले ।
रिपू प्राण घेऊनि तैसे पळाले ॥
भयातूर ते सांगती रावणाला ।
बळी तो विरेंवीर सर्वै निमाला ॥ २४ ॥

बहू दुःख झालें तया रावणासी ।
पुढें धाडिलें शीघ्र तिघां सुतांसी ॥
विशाळाक्ष मकराक्ष आगी खरातें ।
रणा पाठवीलें तिन्हां कूमरांतें ॥ २५ ॥
रणमाजि मकराक्ष तो शीघ्र कोपें ।
पुढें चालिला चापपाणी प्रतापें ॥
स्वयें आपुलें सैन्य घेऊनि मागें ।
कपी भेदितां जाहला लागवेगें ॥ २६ ॥
म्हणे राम हो कोण सामर्थ्य याचें ।
रणीं भंगिलें सैन्य गोलांगुळांचें[1] ॥
वरीं अंतराळीं बहू बाणजाळें ।
क्षणामाजि तें तोडिलें शीघ्र काळें ॥ २७ ॥
विरें मागुतें घोर संधान केलें ।
रिपूचें रणीं शीर छेदूनि नेलें ॥
महावीर मकराक्ष तो बाणघातें ।
निमाला रणीं चालिला मृत्युपंथें ॥ २८
तिहीं राक्षसीं घोर संधान केलें ।
विरा वाटलें थोर कल्पांत आलें ॥

---

१ वानरांचें

पुढें तोडिलें सर्व बाणासि रामें ।
प्रतापें रणामाजि ते पूर्णकामें ॥ २९ ॥
पुढें रावणानें बहू दुःख केलें ।
नसे अंतरीं सौख्य टाकूनि गेलें ॥
दशग्रीव बोलें विरा इंद्रजीता ।
प्रतापें रणामाजि तूं जाय आतां ॥३०॥
दळें चालिलीं राक्षसाचीं अचाटें ।
पुढें वानिती भाट वेताळ थाटें ॥
बळी रावणी तो रथारूढ झाला ।
म्हणे शीघ्र संहारितो वैरियाला ॥३१ ॥
रणामाजि येवोनियां होम केला ।
महाभीम कृत्यारथू प्राप्त झाला ॥
रथारूढ होऊनि वेगीं उडाला ।
नभोमंडळामाजि तो गुप्त झाला ॥३२॥
असंभाव्य ते मोकली बाणजाळें ।
बळें धांवती प्रेरिलें दूत काळें ॥
कपींचीं तुटों लागलीं कंठनाळें ।
रणीं लोळलीं वीरश्रेष्ठें विशाळें ॥ ३३ ॥

---

१ आरक्त वर्ण शिरस्त्राण धारण केलेल्या स्त्रिया.

२ सोडिलीं.

बळें खोंचली ते असंभाव्य सेना ।
दिशा दाटल्या बाणजाळें दिसेना ॥
कपीवाहिनीमाजि आक्रांत झाला ।
पुढें मारुतीचा पिता शीघ्र आला ॥ ३४ ॥
निरोपें अती आदरें राघवासी ।
म्हणे अंगिराशस्त्र योजा त्वरेसी ॥
पुढें राम तत्काळ तें शस्त्र घाली ।
तेणें तूटली शीर कृत्या निमाली ॥ ३५ ॥
पुढें रावणी भूतळामाजि आला ।
रणामंडळीं मृत्यु जैसा उदेला ॥
भयासूर तो वीर घोरप्रतापी ।
शरा सोडितां जाहला काळरूपी ॥ ३६ ॥
रणीं रावणी एकला वीरजेठी ।
कपी लोटले लक्ष कोट्यानुकोटी ॥
रिसींवानरीं थोर कल्लोळ केला ।
बळें ताडिते जाहले राक्षसाला ॥ ३७ ॥
रिपूचीं दळें पाडिलीं इंद्रजीतें ।
रणामाजि झाली बहूसाल प्रेतें ॥
रिसेंवानरें राम सौमित्र बाणीं ।
बळें भेदुनी चालिला चापपाणी ॥ ३८ ॥

६ ( शतषड्रम )

समें बैसला राव त्रीकूटवासी ।
पुढें भेटला इंद्रजीतू तयासी ॥
नमस्कार केला तया रावणाला ।
म्हणे शत्रुचा सर्व संहार केला ॥ १ ॥

तया रावणा थोर संतोष झाला ।
बळें अमृताचे नदी पूर आला ॥
अकस्मात संताप सर्वै बुडाला ।
पुढें बोलता जाहला कूमराला ॥ २ ॥

अगीं इंद्रजीता तुझे गोत्रबंधू ।
प्रतापें बळें आगळे वीरसिंधू ॥
निमाले रणीं वैरियांचेनि हस्तें ।
बहूसाल वाटे मनीं दुःख मातें ॥ ३ ॥

अगा इंद्रजीता तुवां सौख्य द्यावें ।
प्रतापें बळें सर्व शत्रू वधावे ॥
मला सांगसी लाविले मृत्युपंथीं ।
परी मागुती ते रिपू उठताती ॥ ४ ॥

बहू वेळ त्वां युद्धसामर्थ्य केलें ।
परी पाहतां सर्वही व्यर्थ गेलें ॥

प्रतापें रणीं मारिसी वाणघातीं ।
समारंगणीं मागुते सिद्ध होती ॥ ५ ॥
महीमंडळीं नाम त्यांचें नसावें ।
विरा विक्रमा त्वां मला सौख्य द्यावें ॥
पिता बोलतां धीर पोटीं धरेना ।
असंभाव्य कोपानळू सावरेना ॥ ६ ॥
उभा राहिला वाक्य बोले पित्यासी ।
म्हणे आजि संहारितों वैरियासी ॥
समरंगणामाजि ऐसें न होतां ।
तरी जाणिजे भेटि ते हेचि आतां ॥ ७ ॥
बहू कोपला चालिला वीरजेठी ।
प्रतापें म्हणे सर्व जाळीन सृष्टी ॥
पुढें वानरें बापुडीं दैन्यवाणीं ।
खिळीतों बळें सर्व ब्रम्हांड बाणीं ॥ ८ ॥
तुरें वाजती नाद गेला भुगोळा ।
दळेंसी बळें पावला होमशाळा ॥
तया राक्षसें मागुती होम केला ।
महावीर मेघासनीं गुप्त झाला ॥ ९ ॥

---

१. वाद्यें.

वरी पाहतां युद्धकर्ता दिसेना।
धडाडां पडों लागली सर्व सेना॥
महावीर ते घोर मागें गळाले।
चळां कापती राघवा आड गेले॥ १०॥
म्हणे राम तो सुग्रिवा मारुता हो।
नभोमंडळीं युद्धकर्ता पहा हो॥
प्रतापें बळें वीर रुसे उडाले।
असंभाव्य ते पोकळीमाज गेले॥ ११॥
महा थोर तें युद्धसामर्थ्य नेलें।
तया इंद्रजीतें पुढें काय केलें॥
अकस्मात तो भूतळामाजि आला।
रणामंडळीं सैन्यसिंधू मिळाला॥ १२॥
कपी वीर राक्षस सन्मूख झाले।
समारंगणामाजि युद्धा निघाले॥
पुढें राक्षसें रूप केले सितेचें।
महा रम्य लावण्य तें जानकीचें॥ १३॥
म्हणे रे कपी हे सिता राघवा।
गुणी स्वामिनी हे तुम्हां मर्कटांची॥
महा पापिणी सर्पिणी दुःखदाती।
त्रिकुटाचळीं राक्षसी कूळहंती॥ १४॥

अशोकावनामाजि हे शोकवल्ली ।
अकस्मात कोठोनि निर्माण झाली ॥
तया दीवसापासुनी दुःख झालें ।
त्रिकुटाचळा थोर दारिद्र आलें ॥ १५ ॥
बळाचे बहू वीर हे पापिणीनें ।
सखे आमुचे ग्रासिले सर्पिणीनें ॥
कळहो मांडिला त्यासि हे मूळ सीता ।
करीतो इच्छा शीघ्र संहार आतां ॥ १६ ॥
तया राक्षसें मारिलें जानकीला ।
म्हणे रे कपी सांग त्या राघवाला ॥
समारंगणीं शीर छेदूनि नेलें ।
तया राक्षसें शीघ्र गंतव्य केलें ॥ १७ ॥
शिरा देखतां मारुती अंग घाली ।
प्रसंगें तया मूर्छना शीघ्र आली ॥
महाशोक आरंभिला त्या कपीनें ।
म्हणे काय केलें जगज्जननीनें ॥ १८
तया सांगतां मांडिला शोक रामें ।
मिळालीं दळें वानरांचीं विरामें ॥

---

१ गमन.

कपीवाहिनीमाजि आक्रांत झाला ।
सुमित्रासुतें राम तो शांत केला ॥ १९ ॥

तया इंद्रजीतें रणीं माव केली ।
नव्हे सत्य तें मिथ्य होऊनि गेली ॥
परी होम आरंभिला मेघनादें ।
पुरा जाहलिया कोण घेईल द्वंद्वें ॥ २० ॥

तया इंद्रजीतासि आधीं वधावें ।
वृथा शोक सांडूनिया सिद्ध व्हावें ॥
पुरा होम होतां रिपू आवरेना ।
समारंगणीं मारितांही मरेना ॥ २१ ॥

प्रतापें समारंगणीं त्या वधावें ।
बळें आजि ब्रम्हादिकां सौख्य द्यावें ॥
पुढें ऊठिला शीघ्र सौमित्र कैसा ।
समारंगणीं तीव्र आदित्य जैसा ॥ २२ ॥

जया देखतां काळ कापे थरारा ।
सवें दीधलें राघवें पंचवीरा ॥
हनूमंत बीभीषणू जांबुवंतू ।
सुगंधू कपी रूशभू वीर्यवंतू ॥ २६ ॥

समस्तीं विरींही नमस्कार केले ।
पुढें सैन्य घालूनि तैसें निघाले ॥
अती आदरें स्कंधभागीं विरानें ।
सुमित्रासुता घेतलें मारुतानें ॥ २४ ॥

भुमीपंथ नाहीं पुढें जावयातें ।
उडाले महावीर आकाशपंथें ॥
समीरासि सांडूनि वेगीं निघाले ।
बळें शीघ्र नीकुंभळेमाजि गेले ॥ २५ ॥

पुढें काळ विक्राळ ते वीर गाढे ।
बळें राक्षसी घातलें सप्त वेढे ॥
तया मध्यभागीं विरें इंद्रजीतें ।
त्वरें आणिली होमद्रव्यें बहूतें ॥ २६ ॥

सहस्त्रेक आहूतिचा नेम केला ।
म्हणे म्या वधावें नरावानरांला ॥
शतें भक्तिसंख्याहुती लागवेगें ।
त्वरें घातल्या वान्हिमूखें प्रसंगें ॥ २७ ॥

तंव बोलिला रुक्ष तो जांबवंतू ।
म्हणे वीरहो आइका एक मातू ॥

---

नांवांचें अरण्य. २ भक्तीचें प्रकार ९ आहेत.

तुम्हीं होम विध्वंसिजे लागवेगें ।
रणामाजि मी पाडितों दैत्यदुर्गें ॥२८॥

रथू मोडिला फोडिलीं सर्व पात्रें ।
विरें पाडिले कुंड संकेतमात्रें ॥
पुढें वन्हि वीदारिला वेग केला ॥
कितीएक राक्षस भंगोन गेला ॥ २९ ॥

बळें होम विध्वंसिला मारुतानें ।
देहधर्म संपादिला रूषभानें ॥
पुढें पाहतां होम भंगोन गेला ।
महावीर राक्षस युद्धा निघाला ॥ ३० ॥

महावीर ते घोर राक्षस होते ।
कपी वीर ते धांविले शीघ्र तेथें॥
समारंगणीं मारमारी मिळाले ।
कितीएक ते भंडितां भग्न झाले ॥ ३१ ॥

रणीं पाडिले दैत्य कोट्यानुकोटी ।
बहुतीं विरीं दीधली त्यास पुष्टी ॥
पुढें देखतां कोपला काळ जैसा।
रणीं लोटला रावणी वीर तैसा ॥ ३२ ॥

कपी मारुतीसारिखे भग्न केले ।
कितीएक ते वीर धाकें पळाले ॥
पुढें पाहतां वीर सौमित्र कैसा ।
गजा देखिला उठिला सिंह जैसा ॥ ३३ ॥

भिडाया रणीं लोटला वीर कोपें ।
बळें सृष्टि जाळील नेणो प्रतापें ॥
तंव शीघ्र बीभीषणें वेग केला ।
गदा घेउनी वीर सन्मूख झाला ॥ ३४ ॥

सुमित्रासुतालागि घालूनि मागें ।
पुढें धांवला वीर तो लागवेगें ॥
रणीं देखिला वीर बीभीषणू तो ।
तया बोलतां जाहला रावणी[1] तो ॥ ३५ ॥

म्हणे रे बहुतां दिसा देखिलासि ।
वृथा पुष्ट रे राक्षसांमाजि होसी ॥
नरेंवानरें दास झालासि त्यांचा ।
मनू भंगिला रे तुवा पूर्वजांचा ॥ ३६ ॥

म्हणे इंद्रजीतासि नैऋत्यनाथू ।
बळेंवीण तूं बोलसी व्यर्थ मातू ॥

---

१ रावणपुत्र-इंद्रजीत.

मजलागि तो काळ मारूं शकेना ।
वरू दीधला तोषला रामराणा ॥ ३७ ॥
बहू शिकवीलें तुम्हा दुर्जनासी ।
परी नायका रे तुम्ही पापराशी ॥
मज सांगतां हीत अव्हेर केला ।
समस्तांसि येणें गुणें मृत्यू आला ॥ ३८ ॥
सभामंडपीं फार त्वां गर्व केला ।
कळेना तुला मृत्यु सन्निध आला ॥
तुला आजि मारीन सौमित्र बाणीं ।
मुढा राक्षसा जाण हे सत्य वाणी ॥ ३९ ॥

## ७ ( शतसप्तम )

फणी रावणी वीर सन्मूख झाले ।
बळाचे महाकाळ जैसे उदेले ॥
करायासि निर्वाण ते एकमेकां ।
विरश्री बळें सांडिली सर्व शंका ॥ १ ॥
पुढें बोलतां जाहला इंद्रजीतू ।
कृतांतापुढें निर्बला मानवा तूं ॥
मरायासि तूं व्यर्थ आलासि येथें ।
निमीषांत मारीन रे बाणघातें ॥ २ ॥

रणामाजि सन्मूख होतां ब्रळेंसी ।
समस्तां तुम्हां पाडिलें नागपाशीं ॥
पुन्हां मागुतें सर्वही बाणजाळीं ।
निमालेति माझ्या करें युद्धकाळीं ॥ ३ ॥
बहू बोलिला [1]वांजटू घोर शत्रू ।
प्रतीउत्तरें बोलिला तो सुमित्रू ॥
मि हा कोण तो नेणसी काय मूढा ।
वृथा विक्रमू बोलली [2]वोड [3]गाढा ॥ ४ ॥
मही रुंद विस्तीर्ण छपन्न कोटी ।
गिरी दिग्गजाची असामान्य दाटी ॥
तडागे नद्या मातले भव्य सिंधू ।
वरी दाटती जीव सृष्टि अगाधू ॥ ५ ॥
स्वभावें शिरीं ठेविजे पुष्प जैसें ।
तयासारिखें घेतलें विश्व तैसें ॥
तयाहून तो कोण आहे विशेषू ।
मुढा नेणसी कां स्वयें मीच शेषू ॥ ६ ॥
रिपू ब्रोलितों जाण रे सत्य वाणी ।
प्रतापें तुझें शीर छेदीन बाणीं ॥
तया बोलतां [4]तावेली भीमदृष्टी ।

---

१ वाचाळ. २ पुष्कळ. ३ धीटा. ४ तापली.

उभा काळ जाळावया जीव सृष्टी ॥ ७ ॥
बळें छेदिता जाहला ओष्ट्र दंती ।
सिमा फांकली वैभवांची दिगंती ॥
करारां रणीं खादल्या वज्रदाढा ।
शतें सोडिली बाण वोढोनि मेढा[1] ॥ ८ ॥
कडाडां खडाडां गडाडां घडाडां ।
तडाडां थडाडां दडाडां धडाडां ॥
बहूतां परीचे बहू घोष झाले ।
महां चंद्रसूर्यादिकां कंप आले ॥ ९ ॥
वरी पाहतां बाण बाणीं खणाणा ।
रिपू एकमेकासि तो भेदवेना ॥
रथारूढ तो रावणी धावतां हे ।
पदीं चालतां शेषरुक्षों[2] न साहे ॥ १० ॥
पुढें चालिला वीर तो जांबुवंतू ।
शिळा घेतली धांविला काळकेतू ॥
बळें हांक देऊनियां चक्रचाली ।
उफाळे सळें रणामाजि घाली ॥ ११ ॥
रथा मोडिलें फोडिलें भग्न केलें ।

१ पिळदार दोरी-धनुष्य. २ लक्ष्मण व जांबुवंत असे दोघे.

सुमित्रासुता रावणीं साम्य झालें ॥
सुगंधें वीरें वैभव लागवेगें ।
महाअश्व ते चूर्ण केलें प्रसंगें ॥ १२ ॥
म्हणे रावणू हा रिपू आवरेना ।
बहूसाल सामर्थ्य याचें सरेना ॥
शरें मारितां सर्व जोडीत आहे ।
पुढें अग्नि शस्त्रासि तो सोडिताहे ॥ १३ ॥
कपी ऋक्ष तेणें भयातूर झाले ।
किती एक वीर पोटीं गळाले ॥
बहू सोडिला धीर नैऋत्यनाथें ।
म्हणे गा विरा सर्व गेलो अनर्थें ॥ १४ ॥
सुमित्रासुतें देखिलें अग्निशस्त्रा ।
पुढें सोडितां जाहला मेघशस्त्रा ॥
तया सोडितां मेघ तैसे उदेले ।
गिरीचे परी अंबरीं[1] भार आले ॥ १५ ॥
सुमित्रासुतें थोर अद्भूत केलें ।
जनाला गमे आजि कल्पांत आलें ॥
बुडों लागलें भार त्या राक्षसांचे ।
बहूसाल ते धीर गेले विराचें ॥ १६ ॥

---

1 आकाशांत.

रणीं सोडिलें शस्त्र नेटें विझालें ।
पुढें राक्षसा थोर कल्पांत आलें ॥
त्वरें रावणी वायुशस्त्रास सोडी ।
असंभाव्य ते वात नेटें झडाडी ॥ १७ ॥

सुमित्रासुतें देखिला चंड वारा ।
गिरीशस्त्र सोडूनि केला निवारा ॥
असंभाव्य ते चालिलीं शैल्यशृंगें[१] ।
बहू वात निर्वात केला प्रसंगें ॥ १८ ॥

गिरी चालिले असंभाव्य कैसे ।
नभीं धांवती मातले मेघ जैसे ॥
महावीर तो वज्रशस्त्रास सोडी ।
रणीं रावणी शैल्य तत्काळ तोडी ॥ १९ ॥

पुढें वीर सौमित्र ब्रम्हास्त्र सोडी ।
तयापासुनी वन्हि नेटें भडाडी ॥
गमे कोटिविद्युल्लता एक मेळा ।
महा लोळ कल्लोळ भासे भगाळा ॥ २० ॥

तया देखतां रावणी तेंचि सोडी ।
रणामंडळीं एकमेकांसि तोडी ॥

---

१ पर्वतांचीं शिखरें.

रणामाजि तत्काळ सन्मख आले ।
महाजाळ ते एक होतां विझाले ॥ २१ ॥

पुढें घोर रुद्रास्त्र त्या रावणीनें ।
बळें सोडिलें शीघ्र माहाविरानें ॥
रणामाजि तीं चालिलीं एक वेळें ।
भुमी पाय आकाशपंथीं शिसाळें ॥ २२ ॥

तया देखतां तो फणी सिद्ध झाला ।
पुढें सोडिलें शीघ्र माहेश्वराला ॥
उठे मातला काळ कल्पांत काळीं ।
दिशा दाटल्या सर्व आकाश जाळीं ॥ २३ ॥

तया देखतां शस्त्र मागें पळालें ।
बहू कूळ तें खेचराचें जळालें ॥
पुढें देखतां रावणी भ्रांत झाला ।
भयें भूलला वारवेना तयाला ॥ २४ ॥

मनीं भावितों कोण राखेल गेलों ।
कळेना मला व्यर्थ येथें जळालों ॥
तव शीघ्र रामानुजें काय केलें ।
प्रतीज्ञापणाला मनीं आठवीलें ॥ २५ ॥

---

१ मस्तकें.

म्हणे हो रणीं शीर छेदूनि न्यावें ।
म्हणोनी बळें शस्त्र मागें वळावें ॥
रणामंडळामाजि वीरें सुमित्रें ।
बळें वारिलें शस्त्र तें बीजमंत्रें ॥ २६ ॥

म्हणे मेघनादू मला विघ्न आलें ।
परी थोर आश्चर्य कां वांचवीलें ॥
भला वीर सौमित्र हा वीर्यवंतू ।
मनासारिखें युद्ध मोठें करीतू ॥ २७ ॥

असेना पुढें वीर होणार नाहीं ।
बहू देखिले पाहिले झुंजतांही ॥
महावीर हे सूर्यवंशी बळाचे ।
रिपूलागि रक्षावया कोण कैंचे ॥ २८ ॥

महावीर दोघे रणीं तेचि काळे ।
पुन्हां सोडिलें जाहले बाणजाळें ॥
रणामाजि ते भेदिती एकमेकां ।
नभीं सोडिल्या बाणमाला अनेका ॥ २९ ॥

पुढें काय केलें सुमित्रासुतानें ।
गुणीं सज्जिलें त्या रवीचक्र बाणें ॥
मुखीं धांवती त्या शिखा पावकाच्या ।
बहू चंचळा कोटि विद्युल्लताच्या ॥ ३० ॥

सुमित्रासुतें शीघ्र संधान केलें ।
रणीं रावणी शीर छेदूनि नेलें ॥
समस्तां सुरांलागि आनंदवीलें ।
सुरेशा मनींचे बहू शैल्य गेलें ॥ ३१ ॥

रणीं इंद्रजीतासि प्राणांत झालें ।
कपी ऋषभानें सर्व शीर नेलें ॥
निचेष्टीत काया रणीं स्तब्ध ठेली ।
प्रियेलागि सांगावया भुज गेली ॥ ३२ ॥

त्रिकूटाचळीं भुवनें रावणाचीं ।
तयासारिखीं रम्य निकुंभळेचीं ॥
तया भुवनामाजि सुलोचनांते ।
सुखें वैभवाची बरी वेळ जाते ॥ ३३ ॥

अकस्मात तेथें ध्वनीघोष झाला ।
परीचारिका सांगती भूज आला ॥
भुमी रम्य राजांगणीं पाचबंद ।
पुढें भुज तेथें सवे रक्तबिंदू ॥ ३४ ॥

मनामाजि वोसावली दिव्य बाळा ।
रणामाजि भ्रतार त्या कोण वळा ॥

---

१ उदास झालें.

अमें चित्त दुःचित्त बाहेर आली।
फणीचे परी भूज ते ओळखिली ॥ ३५ ॥
खुणा दाविले लीहिलें पत्र तेथें।
म्हणे चालिलों मी पुढें मुक्तिपंथें ॥
तुझ्या कारणें धाडिली मूळ[1] बाहे[2]।
प्रिये चाल वेगीं तुझी वाट पाहे ॥ ३६ ॥
तया वाचितां थोर आक्रांत झाला।
दुखामाजि तो सौख्य-सिंधू बुडाला ॥
मनीं वैभवाची तिनें सांडि केली।
त्रिकूटाचळीं जावया सिद्ध झाली ॥ ३७ ॥
पुढें शीघ्र ती आश्विनारूढ झाली।
बहू वेग लंकापुरीमाजि गेली ॥
नमस्कार केला तया रावणाला।
पुढें वाचितां पत्र आक्रांत झाला ॥ ३८ ॥
म्हणे सासऱ्यालागि सूलोचना ते।
घडीनें घडी आमुची वेळ जाते ॥
समर्थें मला शीर आणून द्यावें।
पुढें कार्य मानेल तैसें करावें ॥ ३९ ॥
बहूसाल तो कोप रायासि आला।

---

१ बोलावणें. २ बाहू.

पुढें मंदिरामाजि नेलें सुनेला ॥
तयेलागि मंदोदरी हीत सांगें ।
रघूनायका भेट गे लागवेगें ॥ ४० ॥
त्वरें ऐकतां उठिली शब्द नेटें ।
पुढें वानिती भाट वेताळ थाटें ॥
कपीवाहिनीनें महद्भूत केलें ।
त्वरें बोलती जानकी पाठवीलें ॥ ४१ ॥
म्हणे राम हे सर्वथा ही घडेना ।
रिपू मारल्यावीण दृष्टी पडेना ॥
असंभाव्य सेना सभा दाटली ते ।
पुढें शिघ्र सूलोचना भेटली ते ॥ ४२ ॥
पुढें देखतां राम सुखें निवाली ।
कृपा भाकितां ते नमस्कार घाली ॥
कृपासागराची बहू स्तूति केली ।
सुशब्दें रघुनायकें तोषवीली ॥ ४३ ॥
प्रसंगीं तये थोर आश्चर्य झालें ।
निचेष्टीत शीरें बरें हास्य केलें ॥
कृपें पाहिलें रामचंद्रें भुपाळें ।
पती उठवीतों तुझा शीघ्र काळें ॥ ४४ ॥
खुणा दाविती हो वदावें दयाळा ।

सभें घालिती एकमेकांसि डोळा ॥
कपी वीर ते सांगती कानगोष्टी ।
पुढें ऊठतां सर्व आटीलं सृष्टी ॥ ४५ ॥
वदे ऋक्ष स्वामी बरेंसें विचारा ।
रिपूला न ठावे कदा उपकारा ॥
वदे मारुती राघवालागि रागें ।
रघूनायकें सांडिली गोष्टि मागें ॥ ४६ ॥
उदासीन देखोनि सूलोचना ते ।
नमस्कार केला त्वरें चालिली ते ॥
प्रभू सव्य घालूनि तैसी निघाली ।
मनोभावना सर्वही सिद्ध केली ॥ ४७ ॥
समुद्रातिरीं भीमकुंडा प्रचंडा ।
बळें चेतल्या अग्निशीखा उदंडा ॥
दशग्रीव मंदोदरी राजभारें ।
सवें चालली ग्रामलोकें अपारें ॥ ४८ ॥
ऋषी देव गंधर्व मांदी मिळाली ।
समस्तीं तियेची बहू स्तूति केली ॥
करीती ऋषी नायका अक्षवाणें ।
उडी घातली अग्निमुखें फुराणें ॥ ४९ ॥

---

जिंकील.

८ ( शतअष्टम )

सुमित्रासुतें पाडिला इंद्रजितू ।
रणीं ग्रासला काळ जैसा कृतांतू ॥
दळें फुटलीं वीर मागें पळाले ।
किती एक घायाळ लंकेंत गेले ॥ १

तया रावणा मूर्छना सांवरेना ।
भुमीं आंग घाली कदा आवरेना ॥
स्त्रियापुत्रकन्यादिकें तोंड घेती ।
प्रसंगीं तये थोर झाली रुदंती ॥ २

त्रिकुटाचळीं मृत्यु आला बहुता ।
समस्तांसि संहार हे मूळ सीता ॥
सुपार्श्व संमोहिता ते प्रसंगीं ।
पिशाच्यापरी उठिला लागवेगीं ॥ ३

अशोका वनामाजि तो शीघ्र गेला ।
सितेलागीं मारावया सिद्ध झाला ॥
पुढें देखतां तो भयातुर झाली ।
सुपार्श्व धांवोनियां आड घाली ॥ ४

बहूतापरी राव तो बोधविला ।
पुढें रावणू क्रोध सांडूनि ठेला ॥

---

१ यम. २ रडणें.

महावीर दोघे पुरीमाजि आले ।
रणा जावयालागि ते सिद्ध झाले ॥ ५ ॥
विरूपाक्ष युध्यन्मतू आणि मत्तू ।
रथारूढ होवोनियां लंक-नाथू ॥
महाशस्त्र सामग्रिया तो समर्थू ।
बळें चालिला रूधिला राजपंथू ॥ ६ ॥
कपी सर्वही भेदिले मुख्य शत्रू ।
रणामंडळीं गर्जना तो अमित्रू ॥
कपी खेचिले नेट पोटीं धरेना ।
पराधीक तें सुग्रिवा साहवेना ॥ ७ ॥
पुढें रावणें देखिला थोर यावा ।
असंभाव्य त्या सुग्रिवाचा उठावा ॥
कपी चक्र तें थोर अद्भूत आलें ।
मनामाजि तें थोर आश्चर्य केलें ॥ ८ ॥
रणा-मंडळीं शांति झाली रिपूची ।
दळें गर्जतीं जाहलीं वानरांचीं ॥
पुढें देखितां रावणा कोप आला ।
प्रतापें रणामाजि युद्धा निघाला ॥ ९ ॥

१ सामग्रीनें.

रथू लोटिला रावणू शिघ्र काळें ।
बहूसाल ते सोडिली बाणजाळें॥
पुढें देखतां राम तत्काळ छेदी ।
पुन्हां रावणू घोर संधान साधी ॥ १० ॥

नभीं सोडले बाण कोट्यान कोटी ।
असंभाव्य ते जाहली थोर दाटी ॥
महा मेघ तो मोकली मेघधारा।
रघूनायकें छेदिले ते सरारां ॥ ११ ॥

पुढें रावणू थोर कोपें कडाडी ।
करी गर्जना मेघ जैसा धडाडी ॥
बहू कोपला तो असूरास्त्र सोडी ।
तेणें चालिल्या त्या नभीं चक्रकोडी॥ १२ ॥

पुढें देव गंधर्वशस्त्रास सोडी ।
तेणें तोडिल्या सर्वही चक्रकोडी ॥
रणीं रावणू रुद्रशस्त्रास घाली ।
शुळामूसळांची नभीं दाटि झाली ॥ १३ ॥

धुधाटे कपीच्या दळामाजि यावें ।
तंव योजिले तें महाशस्त्र देवें ॥

---

१ असंख्य चक्रें.

महाघोर माहेश्वरी मूळमंत्रें ।
तया सोडितां सूटलीं वज्रशस्त्रें ॥ १४ ॥

लोहो मुसळें तें गदा शूळ हातें ।
बळें तोडिलें पाडिलें वज्रघातें ॥
दशग्रीव तो क्षोभला काळ जैसा ।
तेणें भेदीलें पंचबाणें सुरेशा ॥ १५ ॥

रणीं उसणें घेतलें राघवानें ।
दशग्रीव तो भेदिला सप्तबाणें ॥
महादुःख झालें तया रावणाला ।
सुमित्रा सुता थोर आवेश आला ॥ १६ ॥

तया अग्रजालागि घालूनि मागें ।
महावीर तो चालिला लागवेगें ॥
सुमित्रासुतें बाणघातें निघातें ।
रिपू सारथी धाडिला मृत्युपंथें ॥ १७ ॥

पुढें मागुतें घोर संधान केलें ।
रिपूच्या धनुष्यासि छेदूनि नेलें ॥
तया वीर बीभीषणा कोप गाढा ।
रणीं चालिला चंड वारूनि मेढा ॥

---

१ प्रचंड धनुष्याची दोरी ओढून.

महाशक्ति ब्रम्ही तया रावणानें ।
अनुजावरी टाकली ते फुराणें ॥
कडाडीत धावे महावीज जैसी ।
करी शेष मागें रिपू बांधवासी ॥ १९ ॥

सुमित्रासुतें थोर संधान केलें ।
महाशाक्तिला शीघ्र छेदूनि नेलें ॥
शरें तोडितां पावकें वृष्टि केली ।
किती एक राक्षससेना निमाली ॥ २० ॥

रणीं रावणू तो कडाडीत कोपें ।
सिमा सांडिली घोर रूपें प्रतापें ॥
धुधुःकार सांडीत घर्डीत दाढा ।
अनर्थासि उठावला वीर गाढा ॥ २१ ॥

महाशक्ति काढूनि मायासुराची ।
बहूकाळ सन्निध स्वयंवराची ॥
तयेलागि त्या रावणें सिद्ध केलें ।
जयेमाजि ब्रह्मांड बिंबोनि गेलें ॥ २२ ॥

सुमित्रा-सुता लक्षिलें रावणानें ।
त्वरें टाकिली शक्ति महावीरानें ॥
बळें आदळे ते अकस्मात अंगीं ।
रणीं वीर सौमित्र तो प्राण त्यागी ॥ २३ ॥

पुढें शोक आरंभिला राघवानें ।
तया वारिलें शीघ्र बीभीषणानें ॥
म्हणे काय जी स्वामिया कोण वेळा ।
उभा रावणू तो पिटावा भुपाळा ॥ २४ ॥
बळें हाक देऊनि क्रोधें नरेंद्रें ।
सिमा सांडिली रामकाळाग्नि-रुद्रें ॥
करीं बाण कोदंड चंड प्रतापी ।
रणीं रावणा भासला काळरूपी ॥ २५ ॥
रणीं भ्रटला तो भयातूर झाला ।
पुढें रावणू मंदिरामाजि गेला ॥
समाचार मंदोदरी-लागि बोले ।
म्हणे आजि युद्धीं बहू कष्ट झाले ॥ २६ ॥
समाचार तो सर्वही सांगताहे ।
म्हणे काय होणार तें होत आहे ॥
बहूतांपरी त्वां मला शीकवीलें ।
परी मूर्ख मी सर्वही तुच्छ केलें ॥ २७ ॥
करूं काय आतां प्रिये सांग वेगीं ।
बहू बोलतां जाहला ते[illegible]संगीं ॥
त्वरें काळनेमी पुढें पाठवाला ।
स्वयें शीघ्र ऊठान होमास गेला ॥ २८ ॥

पुढें चालिला वीर तो काळनेमी ।
बहूसाल तो थोर कापट्यवर्मी ॥
हनूमंत जाईल द्रोणागिरीला ।
पथीमाजि तो बैसला योग केला ॥२९॥
पुढें राघवा शोक तो आवरेना ।
धरीतां बळें धीर पोटीं धरेना ॥
मिळालीं बळें भोंवती दैन्यवाणी ।
विलापें वदे राम कारुण्यवाणी ॥ ३० ॥
पुढें बोलतां जाहला वैद्य तेथें ।
प्रभू शोक केल्या पुढें काय होतें ॥
म्हणे औषधी शीघ्र त्या आणवाव्या ।
न जाता निशी सर्व देहीं पिळाव्या ॥ ३१ ॥
म्हण राम गा मारुती ये प्रसंगीं ।
विरासारिखी युक्ति तूं बोल वेगीं ॥
वदे मारुती स्वामि देवाधिदेवा ।
गिरी आणितों शीघ्र सांगाल तेव्हां ॥ ३२ ॥
म्हणे मारुता जाय गा ये प्रसंगीं ।
गिरी आणिला पाहिजे रात्रभागीं ॥
कपी मारुती वीर तैसा उडाला ।
अकस्मात तो आश्रमामाजि आला ॥ ३३ ॥

स्थळें निर्मिलीं रम्य नानापरीचीं ।
बहूसाल ते भूवनें कूसरीचीं ॥
मुनी बोलती हो पुढें शीघ्र यावें ।
फळें तोय भक्षूनि सूखें रहावें ॥ ३४ ॥
म्हणे मारुती राहतां पूरेवना ।
तृषा लागली धीर पोटीं धरेना ॥
मुनीनें तडागा जळा दाखवीलें ।
जळा सेवितां थोर अद्भूत झालें ॥ ३५ ॥
जळांतूनि धाविन्नली ते विशाळा ।
विरें मारुतें देखिलें तीस जेळां ॥
मिठी घातली मारुतें चूर्ण केली ।
तिच्या मेदमांसें भुमी तृप्त झाली ॥ ३६ ॥
निघाली तियेतूनि ते दिव्य कांता ।
निरोपी मुखें सर्व साकल्य वार्ता ॥
म्हणे राक्षसू बैसला कूडभावें[१] ।
समर्था प्रभू त्यासि आधीं वधावें ॥ ३७ ॥
महावीर राक्षस कैसा कुकर्मी ।
बहूसाल ते जाहले काळनेमी ॥

---

१ कपटानें.

प्रसंगें तये थोर संग्राम झाला ।
कपीच्या करें काळ नेमी निमाला ॥ ३८ ॥
विरें सुंदरीलागि उद्धार केला ।
उडाला बळे तो नभामाजि गेला ॥

गिरीचंद्र टाकूनिया लागवेगीं ।
कपी वीर द्रोणाचळी ते प्रसंगीं ॥ ३९ ॥
वटा वेढितां जाहला शेष तैसा ।
गिरी घेतला शीघ्र बांधोनि तैसा ॥

उडाला नभामाजि तो लागवेगें ।
बळें जातसे मारुती व्योममार्गें ॥ ४० ॥
कपी लागवेगें बळें जात आहे ।
मही मंडळी तेज हेलावताहे ॥
अयोध्यापुरीमाजि रामानुजानें ॥
कपी भेदिला पाडिला एक बाणें ॥ ४१ ॥
मुखीं रामनामें सखा वाटतोसी ।
विरा कोण तूं कोठपर्यंत जासी ॥
म्हणे मारुती ओखटें थोर झालें ।
सुमित्रासुतालागि देहांत आलें ॥४२॥
कपी कष्टलासी बहू दुरि जातां ।
सुखें बाणमुखावरी बैस आतां ॥

म्हणे मारुती सर्वथाही घडेना ।
उडाला नभीं लंघितो देश नाना ॥४३॥
त्रिकूटाचळीं राम तो वाट पाहे ।
विरेंवीर तो सर्वही बैसलाहे ॥
अवस्ता बहू लागली आवरेना ।
बहू रात्रि झाली कपी कां दिसेना ॥४४॥
बहू राम तेथें उतावीळ झाला ।
अकस्मात तो मारुती शीघ्र आला ॥
सुशेणें रसू काढिला औषधीचा ।
क्षतामाजि तो ओतिला अमृताचा ॥४५॥
सुमित्रासुता-लागिं आरोग्य झालें ।
समस्तीं विरीं मारुता गौरवीलें ॥
त्वरें ऊठिला वीर सौमित्र बा हो ।
रघूनायकें देखिला दिव्यदेहो ॥४६॥

९ ( शतनवम )

म्हणे वीर सौमित्र स्वामी समर्था ।
बळें तोडिजे थोर चत्वार चिंता ॥

म्हणे शीघ्र त्या रावणाच्या वधांती ।
समाधान तें पाविजे तें समस्तीं ॥ १

वदे रावणानूज वाक्यें प्रमाणें ।
प्रभू कल्पवृक्षातळीं काय ऊणें ॥
परी होम आरंभीला रावणानें ।
पुर्ण झालिया भीडिजे त्यास कोणें ॥ २ ॥
कपी वीर ते पाठवीं भुपाळें ।
महा होम विध्वंसिजे शीघ्र काळें ॥
कितीएक राक्षस ते रक्षणासी ।
कपीनें बळें युद्ध केलें तयांसी ॥ ३ ॥

गुहेचे मुखीं लाविली चंडशीळा ।
तये भोंवते जाहले वीर गोळा ॥
पुढें मारुती चालिला लागवेगें ।
करी सर्वही चाउठे मागमागें ॥ ४ ॥

महायोगियाचे परी बैसला तो ।
नभीं पावकू तो धडाडीत जातो ॥
शिळा शीखरे हाणिती तो उठेना ।
कपी कोटिनी ध्यान त्याचें सुटेना ॥ ५ ॥

---

१ अभि

बहूतांपरी मांडिले प्रेत्न नाना ।
परी रावणू कांहिं केल्या उठेना ॥
विरें अंगदें थोर वीचार केला ।
बळें शीघ्र अंतःपुरामाजि गेला ॥ ६ ॥
बहूसाल अंतःपुरें त्या सुरारी ॥
तयामाजि मंदोदरी मुख्य नारी ॥
तियेलागि घेऊनि वेगें उडाला ।
महावीर तेथें अकस्मात आला ॥ ७ ॥
अलंकार चोरें चर्ण केलीं ।
बहू भूषणें कंकणें भग्न झालीं ॥
कपी कंचुकी केश ओढूनि घेती ।
विटंबूनि लोटूनियां शीघ्र देती ॥ ८ ॥
करूणास्वरें रावणालागि बाहे ।
प्रभू धांव रे वानरू नेत आहे ॥
प्रसंगी तये थोर आभांत झाला ।
भुमीकंप होतांचि पाहों निघाला ॥ ९ ॥
पुढें अंगदा लाथ हाणोनि पाडी ।
तया जाम्बुवंतासि वेगीं लिथाडी ॥

१ वस्त्रं. २ लाथाडी.

कितीएक ते ताडिले मुष्टिघातें ।
किती ओढिले पाडिले व्योमपंथें ॥ १० ॥

नभीं ऊर्ध पाहोनि वेगीं उडाला ।
बळें झोडिलें पाडिलें मारुताला ॥
धरीं हृदयीं शीघ्र मंदोदरीला ।
विवेकेचि संमोखिले वधूला ॥११॥

बहुतापरी ते सती तोषवीली ।
पती धाडितां भूवनामाजि गेली ॥
दळें सिद्ध केलीं रथारूढ झाला ॥
रणीशूर संग्रामसौरा[1] निघाला ॥ १२ ॥

गळाले महावीर धाकें पळाले ।
चळी कांपती राघवा आड गेले ॥
उभा राहिला राम तो वीर गाढा ।
करीं घेतला चंड बाऊनि मेढा ॥ १३ ॥

पुढें रावणू पन्नगाशस्त्र सोडी ।
तेणें चालिल्या त्या नभीं सर्प कोडी ॥
उभे वानरांमाजि आकांत झाले ।
मुखें बोलती सर्प रे सर्प आले ॥ १४ ॥

---

१ शूर.

गरूडास्त्र तें राम सोडी भडाडा ।
नभीं चाललीं पक्षकूळें झडाडा ॥
तिहीं तोडिलीं सर्पकूळें तडाडा ।
कपी गर्जती नामघोषें धडाडा ॥ १५ ॥

पुढें रावणें सोडिलीं तीं अचाटें ।
नभीं चाललीं थोर गंधर्व-थाटें ॥
भुमी पायें आकाशँपंथीं सिसाळें ।
बहू भार ते चाललें एक वेळें ॥ १६ ॥

निवारावया राम तो तेंचि सोडी ।
नभामाजि तें शस्त्रास तोडी ॥
वमी रावणू थोर क्रोधाग्निज्वाळा ।
रूपें जाहला थोर कर्कोट काळा ॥ १७ ॥

रथारूढ झाला रणीं लंकनाथू ।
पदीं चालतो रामराजा समर्थू ॥
नभीं देव ते देखवेना तयाला ।
रथू मातुळी शीघ्र तो पाठवीला ॥ १८ ॥

पुढें बोलता जाहला घोर वाणी ।
तुळा साह्य झाला रणीं वज्रपाणी ॥

---

१ गंधर्वास्त्रें.

उभा रे रिपू खीळितों आजि बाणीं ।
तुम्हीं झुंजतां थोर वाटे शिराणी ॥ १९ ॥
तुझा बंधु म्यां पाडिला एक वेळा ।
रणामंडळीं पाहिलें त्वांसि डोळां ॥
तयासारिखें तूज मारीन आतां ।
पतंगापरी जाळितों जान जातां ॥ २० ॥
पुढें ऐकतां राम बोले तयासी ।
म्हणे ऐक रे रावणा गर्वरासी ॥
असंभाव्य रे वैभवें मातलासी ।
मरायां रणीं आजि तूं पातलासी ॥ २१ ॥
म्हणे राम रे रावणा वीरधर्में ।
रणामाजि मी तूज मारीन नेमें ॥
पळालासि कोठें तरी हें सुटेना ।
तुझी मृत्युवेळा कदा पालटेना ॥ २२ ॥
रिपू जाण रे तूजला मृत्यु आला ।
दिलें अक्षै राज्य बीभीषणाला ॥
सितेकारणें थोर कापट्य केलें ।
अभाग्या तुझें सर्वही राज्य गेलें ॥ २३ ॥

---

१ मांज.

तया बोलतां कोपला वीर गाढा ।
रणामाजि त्या घडिल्या वज्रदाढा ॥
पुढें शूळबाणें करी सज्ज मेढा ।
बळें वोढितां चूकला रामयोढा ॥ २४ ॥

पडे मातुळी अश्व ते पोळविले ।
ऋषी देव गंधर्व साशंक झाले ॥
कपी बोलती मांडलें विप्र हें कीं ।
रणामाजि त्या रावणें जिंकिलें कीं ॥ २५ ॥

अगस्ती ऋषी तो वनामाजि आला ।
रवीमंत्र सांगे रघुनायकाला ॥
जपे राम तो आदरें मुख्यमंत्रें ।
रवी शीघ्र घेऊनि दे सार शस्त्रें ॥ २६ ॥

असंभाव्य त्या राक्षसा कोप आला ।
बळें टाकिलें शीघ्र तेणें शुळाला ॥
बहू बाणसंभार जातां जळाला ।
पुढें शूळ पाशुपतें भग्न केला ॥ २७ ॥

पुन्हां सोडिलीं राघवें बाणजाळें ।
बहूसाल सुंसाटती अंतराळें ॥

---

१ मोठा. २ धनुष्य. ३ रामाचा ढाल. ३ आदित्यहृदय.

रथीं खीळितां प्राण व्याकूळ झाला ।
बहू मूर्छना सांवरेना तयाला ॥ २८ ॥
रिपू भेदिला थोर लक्षूनि वर्मे ।
उभा राहिला राम तो वीरधर्में ॥
रथीं सारथी शीघ्र घेऊनि गेला ।
पुढें शुद्धि झाली तया रावणाला ॥ २९ ॥
समारंगणीं रावणू शीघ्र आला ।
वदे घोर वाणी तया राघवाला ॥
नुलंघी सिमा शीघ्र मृत्युंजयाला ।
रणीं कोण लेखा तुला मानवाला ॥ ३० ॥
रणीं लोटला राम हा सूर्यवंशी ।
महायुद्ध आरंभिलें रावणेसी ॥
उभे राहिले काळ कृतांत[1] जैसे ।
महावीर त्या घोर आक्रांत भासे ॥ ३१ ॥
रिपू सोडिती घोर शस्त्रें सणाणा ।
बळें वाजती बाण भाली खणाणा ॥
बहूसाल स्फुलिंग जाती फणाणा ।
महीमंडळीं घोष उठे दणाणा ॥ ३२ ॥

---

१ यम.

पुढें राघवें लक्षिलें रावणातें ।
बळें मस्तकें तोडिलीं बाणघातें ॥
गिरीशिखराचे परी ते विशाळे ।
पुन्हां निघतीं कंठनाळें दिसाळे ॥ २३ ॥

शिरें देखतां राम चक्कीत झाला ।
म्हणे मृत्यु नाहीं गमे रावणाला ॥
वदे मातुली स्वामि देवाधिदेवा ।
सुधापेक्ष भेदूनि शत्रू वधावा ॥ २४ ॥

कुपी फोडिली बाणघातें निघातें ।
तेणें रावणू चालिला मृत्युपंथें ॥
ऋषी देव गंधर्व ते सर्व तोषें ।
विमानीं मुखें गर्जती नामघोषें ॥ २५ ॥

समस्तां सुरां मानसीं सूख झालें ।
परी दुःख बीभीषणा प्राप्त केलें ॥
रणीं रावणू श्रेष्ठ बंधू निमाला ।
झळंबें मनीं शोक उत्पन्न झाला ॥ २६ ॥

मुखें श्वास सांडूनि पाणी पुगीतो ।
भुमी मस्तकू आपटीतो पिटीतो ॥

---

१ हृदयांतील अमृत.

म्हणे वीर तो वोखटा काळ आला ।
त्रिकूटा-चळींचा अहंकार गेला ॥ ३७ ॥
नव्हे रावणासारिखा संपतीचा ।
नव्हे रावणासारिखा व्युत्पतीचा ॥
बहू सांगतां वैभवालागि कांहीं ।
प्रतापी तयासारिखा वीर नाहीं ॥ ३८ ॥
मनाचा उदारू धनाचा कुबेरू ।
बहूसा विचारू जनीं दानशूरू ॥
गळाला बहू धीर त्या राक्षसांचा ।
महीमंडळीं धाक गेला सुरांचा ॥ ३९ ॥
बहूता जणांचें बहू भाग्य गेलें ।
गमे सर्व ब्रम्हांड हें ओस झालें ॥
जया कारणें देव लीलावतारी ।
तयाच्या गुणा तूळणा कोण सारी ॥ ४० ॥
उदासीन वाटे जनीं पाहवेना ।
मनीं स्वस्थ नाहीं कदा राहवेना ॥
गताच्या गुणें वीर तो मग्न झाला ।
तयालागि वारावया राम आला ॥ ४१ ॥
म्हणे गा विरा थोर आश्चर्य झालें ।
मोहसागरीं ज्ञानतारू बुडालें ॥

तयासारिखें आजि हो दीसताहे ।
प्रभू बोलतां वीर तत्काळ राहे ॥ ४२ ॥

१० ( शतदशम )

तया रावणालागि देहांत आलें ।
प्रधानासि बीभीषणें पाठवीलें ॥
तुम्ही शीघ्र अंतःपुरामाजि जावें ।
समस्तांसि पाहावया आणवावें ॥ १ ॥

पुढें सर्व राजांगना त्या निघाल्या ।
दशग्रीव तेथें रणामाजि आल्या ॥
रणीं कांत देखोनि आक्रांत केला ।
बहू पाप हो वोखटीं काठ आला ॥ २ ॥

अकस्मात तें सर्व सौभाग्य गेलें ।
समर्था प्रभू कां उदासीन केलें ॥
समस्तांसि शोकार्णवीं मोकलीलें ॥
असंभाव्य तें दुःख दाटूनि आलें ॥ ३ ॥

म्हणे राम बीभीषणा जाय आतां ।

---

१ मरण. २ वाईट. ३ ढकलेलें.

बहूतांपरी तोषवावें समस्तां ॥
निवाल्यावरी वैर कांहो करावें ।
विवेकेंचि मंदोदरी नीववावें ॥ ४ ॥

कृपासागरें वीर तो पाठवीला ।
अकस्मात राजांगनामाजि आला ॥
प्रबोधेंचि नानापरी शांत केल्या ।
समस्ताजणीं भूवना पाठवील्या ॥ ५ ॥

वदे मागुता राम बीभीषणातें ।
रणीं रावणू अग्नि द्या जा तयातें ॥
पुढें ऊठिला तो रणामाजि आला ।
यथासांग त्या रावणा वीधि केला ॥ ६ ॥

वदे राम तैसाचि त्या बांधवातें ।
कपीनाथ सुग्रीव राजा तयातें ॥
तुम्हीं शीघ्र नैॠत्यनाथासि न्यावें ।
विधीयुक्त भद्रासनीं बैसवावें ॥ ७ ॥

तया राजद्वारीं बहू दाटि झाली ।
सभामंडळीं मंडळी ते निघाली ॥

---

१ अंत्यविधि. २ राक्षसांचा नाथ-बिभीषण.
३ सिंहासनीं.

पुढें रावणानूज श्रृंगारवीला ।
विधीयुक्त भद्रासनीं बैसविला ॥८ ॥
धमामा नभीं दुंदुभी नाद झाला ।
सुरीं अंबरीं पुष्पवर्षाव केला ॥
रघूनायकें सेवका राज्य दीलें ।
सुरां सोडिलें थोर आनंदवीलें ॥ ९ ॥
म्हणे राम गा मारुती ये प्रसंगीं ।
अशोकावनीं जाय तूं लागवेगीं ॥
समाचार सांगें तये सुंदरीला ।
कपी वीर तो शीघ्र तैसा निघाला ॥ १० ॥
अशोकीं वसे जानकी शोकभारीं ।
अकस्मात तेथेंच आला वनारी[1] ॥
नमस्कार घालून तो बोलताहे ।
सुवेळे समस्तांसि कल्याण आहे ॥ ११ ॥
दशग्रीव संहारिता लंकवासी ।
प्रतापें दिलें राज्य बीभीषणासी ॥
प्रभूनें समाचार हा सांगवीला ।
तेणें जानकी थोर आनंद झाला ॥ १२ ॥
नमस्कार केला तये जानकीसी ।

१ मारुति.

म्हणे रे कपी तूं चिरंजीव होसी ॥
त्वरें चालिला भेटला राघवाला ।
पुन्हां मागुत पाठवीलें तयाला ॥ १३ ॥
म्हणे गा विरा सांग बीभीषणातें ।
वना जाउनी आणिजे जानकीतें ॥
दिजे मंगळस्नान नाना प्रकारें ।
सुगंधें फुलें अलंकार चीरें ॥ १४ ॥
महावीर ते शीघ्र तैसे निघाले ।
पाहाण्या सीता सर्वही सिद्ध झाले ॥
बहूसाल वाद्यें दळेंसी निघाले ।
अशोकावनामाजि ते सर्व आले ॥ १५ ॥
सुवेलाचलामाजि तो रामराजा ।
पाहाण्या तयाची लिला देवफौजा ॥
मदोन्मत्त ऐरावतारूढ झाला ।
सुरेंसीं[1] सुरेश[2] पुढें शीघ्र आला ॥ १६ ॥
विधी मुख्य हंसासनीं सृष्टिकर्ता ।
तयाचेन हे उत्पती विश्वभर्ता ॥
ऋषी देव गंधर्व मेळा निघाला ।
सुखें[3] चालिले राम पहावयाला ॥ १७ ॥

---

१ देवांबरोबर. २ इंद्र. ३ महादेव.

समस्तांसि तो भेटला तो रामचंद्र ।
मही लोटला सर्व सूखें समुद्र ॥
रघूनायकें मारुती पाठविला ।
पुढें शीघ्र लंकापुरीमाजि आला ॥ १८ ॥

पुढें भेटला शीघ्र बीभीषणातें ।
बहूसाल सन्मानिलें मारुतातें ॥
पुढें मारुतें मात तें जाणवीली ।
म्हणे जानकी वैभवें आणवीली ॥ १९ ॥

पुढें भेटते जाहले जानकीला ।
नमस्कार साष्टांग केला तयेला ॥
अनुवादिजे शीघ्र नैऋत्यनाथें ।
तुम्हा न्यावया पाठवीलें समर्थें ॥ २० ॥

तरी जननी शीघ्र आतां उठावें ।
महा मंगल स्नान आधीं करावें ॥
अलंकार चिरें पुढें सिद्ध केलीं ।
सुगंधेल तेलें बहू आणवीलीं ॥ २१ ॥

बहूसाल उष्णोदकें सिद्ध होतीं ।
बहू कूगळा राक्षसी माखितातो ॥

---

१ गोरा.

चिरें सुंदरें कंचुकी रत्नमाळा ।
सुगंधें बहू घातल्या पुष्पमाळा ॥२२॥

तया मारुतें बैठका सिद्ध केली ।
जगज्जननी बैसली सिद्ध झाली ॥
पुढें ठेविलें पात्र सूधाफळांचें ।
शकूनार्थ घ्यावें म्हणे रम्यवाचें ॥२३॥

मिळाले कपीसि कोट्यानुकोटी ।
सिता आणितां जाहली थोर दाटी ॥
शतांचीं शतें धांवती नेत्रपाणी ।
दळें वारिती गर्जती घोर वाणी ॥२४॥

समस्तीं सिता देखिली आदरेंसी ।
असंभाव्य सौंदर्य लावण्यराशी ॥
तये देखतां सर्व सूखें निवाले ।
कपी बोलती आजि निःपाप झालें ॥२५॥

सिता देखिती जाहली रामचंद्रा ।
नमस्कार तैसाचि केला महेंद्रा ॥
तथा राघवें पाहिलें जानकीला ।
पुढें भूलता वक्र आव्हेर केला ॥२६॥

उदासीन ते जानकीलागि केलें ।
सभामंडळी सर्व वोरंग झाले ॥
सभेमाजि ते बोलती एकमेका ।
सितेलागि आव्हेरिलें राघवें कां ॥ २७ ॥

म्हणे राम तो जानकीलागि जावें ।
स्वइच्छासुखें त्वां दिगंतीं भ्रमावें ॥
अधोमूख सीतावलोकीं[1] भुमीते ।
महा भीजली जाहली अश्रुपातें ॥ २८ ॥

म्हणे न्याय अन्याय सर्वै बुडाला ।
दिसे आजि कल्पतरू वांज झाला ॥
बहूसाल बोलोनियां काय आतां ।
महा सौख्य तें पावकें भस्म होतां ॥ २९ ॥

म्हणे जानकी त्या रिसांवानरांसीं ।
बहूसाल रे कष्ट झाले तुम्हासी ॥
परी मागुतें एक जीवीं धरावें ।
बहूसाल त्या पावका चेतवावें ॥ ३० ॥

मनामाजि पूजा यथासांग केली ।
पुढें जानकी पावकामाजि गेली ॥

---

१ सीता अवलोकी.

तया स्पर्शतां पावकू शुद्ध झाला ।
प्रसंगें तये शांत झाला निवाला ॥ ३१ ॥

तयामाजि ते जानकी शोभताहे ।
समस्तै सभा लोक त्रैलोक्य पाहे ॥

पुढीं घालिजे पूतळी कांचनाची ।
तयाहूनि ते दिव्य काया सितेची ॥ ३२ ॥

सिता मुख्य ते पावकामाजि होती ।
वृथा रावणें चोरिली हे वदंती ॥

रमा सागरांतूनि नेली हरीनें ।
तयाचे परी जानकी राघवानें ॥ ३३ ॥

पुढें जानकी रामअंकीं विराजे ।
रमा आदि नारायणीं जेवि साजे ॥

असंभाव्य तो वाद्यकल्लोळ गाजे ।
कपी-वाहिनीमाजि आनंद माजे ॥ ३४ ॥

( १ ) शत एकादश

वसे भस्म अंगीं प्रभू वीतरागी ।
उदासीन जो सर्वसामर्थ्य त्यागी ॥

---

१ अग्नि. २ वार्ता ३ शोभते.

विधी शक्र हे सर्व ध्याती जयाला ।
महादेव तो वर्णितो राघवाला ॥ १ ॥

म्हणे धन्य रामा विरा पूर्णकामा ।
असंभाव्य सीमा कळेना महीमा ॥
महाथोर अद्‍भूत सामर्थ्य केलें ।
प्रतापेंचि ब्रह्मादिकां सोडवीलें ॥ २ ॥

तया रावणालागि प्रसन्न आम्ही ।
वरें मातला जाहला पापकर्मी ॥
ऋषी देव माझे बहू कष्टवीले ।
समर्था तुवां सर्वही सोडवीले ॥ ३ ॥

पुढें बोलतां जाहला तो विरंची ।
म्हणे धन्य हे आजि वेळा सुखाची ॥
तुझा योग होतां घडी अमृताची ।
बहू स्तुति केली रघूनायकाची ॥ ४ ॥

तुम्हा वेगळें सर्वही दीन झालों ।
त्रिकूटाचळीं बंदिशाळें मिळालों ॥
हिनासारिखे जाहलों दैन्यवाणें ।
प्रभू आमुचें दुःख तें कोण जाणें ॥ ५ ॥

---

१ माजला. २ ब्रह्मदेव.

बहू कष्टवीलें तया रावणानें ।
घडीनें घडी त्रासिलें दुर्जनानें ॥
बहू वोखटी वेळ येऊनि गेली ।
कृपासागरें धावणी शीघ्र केली ॥ ६ ॥

स्तुतीउत्तरें बाळक काय जाणे ।
बरें वोखटें सर्व कांहींच नेणें ॥
मुलें खेळतां मायबापासि चिंता ।
तयाचेपरी बोलताहे विधाता ॥ ७ ॥

पुढें बोलता जाहला वज्रपाणी[1] ।
सदासर्वदा देव ऐको पुराणीं ॥
तया सुकृतांचा[2] बरा काळ आला ।
प्रभू रामचंद्रा तुझा योग झाला ॥ ८ ॥

म्हणे इंद्र तो स्वामि देवा-धि देवें ।
जनीं सेवका आपुलेसें म्हणावें ॥
घडेना मला भक्ति भावार्थ नाहीं ।
प्रभू सांगिजे जी मुखें कार्य कांहीं ॥९॥

म्हणे राम गा वज्रपाणी प्रसंगें ।
रघू मातुली धाडिला लागवेगें ॥

---

( १ ) इंद्र. ( २ ) पुण्याईचा.

तुवां कार्य तें सर्व पूर्वीच केलें ।
रथारूढ होऊनियां यश आलें ॥१०॥

पुन्हां मागुतें एक आतां करावें ।
निमाले[1] कपी ऋक्ष त्या उठवावें ॥
सुधामेघ[2] पाडूनियां लागवेगीं ।
कपी वीर ते ऊठवी ये प्रसंगीं ॥११॥

जळेशासि आज्ञापिलें तेचि काळीं ।
महामेघ ते चालिले अंतराळीं ॥
असंभाव्य ते जाहली मेघवृष्टी ।
तेणें भीजली सर्वही प्रेतसृष्टी ॥१२॥

निमाले कपी पावले दिव्य देहो ।
मिळाला रिसा वानरांचा समूहो ॥
सुवेलाचलामाजि ते भार[3] आले ।
क्षमारूप तैसेंचि सर्वै मिळाले ॥१३॥

रवी पावकें येम नैऋत्यनाथें ।
जलाढ्यें धनाढ्यें रघुनायकातें ॥
गुरू अंगिरा देव गंधर्व तेही ।
बहू बोलिते जाहले सर्व कांहीं ॥ १४॥

---

१ मृत झालेले—गेलेले. २ अमृताचे मेघ. ३ समुदाय

प्रतीउत्तरें राम बोले समस्तां ।
बरें हो म्हणे जाइजे शीघ्र आतां ॥
समस्तीं तुम्हीं भूवनामाजि जावें ।
विलासें बहू राज्य सूखें करावें ॥१५॥

निरोपेंचि त्या चालिल्या देव कोडी ।
पुढें शीघ्र बीभीषणू हात जोडी ॥
समर्थें मला थोर आतां करावें ।
घडी एक लंकापुरीमाजि यावें ॥१६॥

प्रतीउत्तरीं राम बोले तयासी ।
म्हणे धन्य बीभीषणा पूणराशी ॥
सखा सुग्रिवासारिखा कोण आहे ।
मनामाजि बीभीषणा तूंचि पाहे ॥१७॥

जनीं मैत्रिकी राखिली सुग्रिवानें ।
बहूसाल हा कष्टला जीवप्राणें ॥
स्वयें देखिलें सांगणें काय तुम्हां ।
कपी पूजितां पावतें सर्व आम्हां ॥१८॥

कपी वृक्ष घेऊनि तैसा निघाला ।
पुढें शीघ्र लंकापुरी माजि गेला ॥
रिसावानराला पुजा सांग झाली ।
बहूसाल बीभीषणें स्तूति केली ॥१९॥

प्रसंगे तये राम बीभीषणाला ।
सुधा उत्तरीं बोलतां शीघ्र झाला ॥
म्हणे गा गिरा त्वां पुरीमाजि जावें ।
धृवाचेपरी राज्य सूखें करावें ॥२०॥

पुढें बोलिजे शीघ्र नैरुत्यनाथें ।
म्हणे वासना पुरवावी समर्थें ॥
प्रभू बोलतां चित्त माझें न राहे ।
पहा कीं अयोध्यापुरी वासना हे ॥२१॥

सवें[1] घेतलें वीर बीभीषणाला ।
रघूराज तो वानरेंसी निघाला ॥
असंभाव्य तों वाद्यकल्लोळ झाला ।
पुढें सिद्ध केलें महापुष्पकाला ॥२२

विमानावरी रामराजा विराजे ।
वरी बैसले ते कपी ऋक्ष राजे ॥
सुमित्रासुत् बैसला मध्यभागीं ।
जगन्मात सीता तया वाम भागीं ॥२३॥

पुढें चालतां चालतां लागवेगीं ।
सितेलागि तो राम सांगे प्रसंगीं ॥

---

१ बरोबर

असंभाव्य पाल्हाणिला[1] सेतु जेथें ।
स्वयें वास दर्भासनीं योग तेथें ॥२४॥

बळें आगळें वीर वाली निमाला ।
दिलें राज्य जेथें कपी सुग्रिवाला ॥
अकस्मात झाली हनुमंत भेटी ।
तडागें नद्या दाखवी वीरजेठी ॥२५॥

पुढें धाडिलें मारुतीलागि देवें ।
म्हणे गा विरा भ्रातया जाणवावें ॥
पुढें बोलतां वीर तैसा निघाला ।
तया गुह्यकानें नमस्कार केला ॥२६॥

कपी देखला भव्य रामानुजानें ।
नमस्कार केला तया बांधवानें ॥
म्हणे मारुती राघवाच्या वियोगें ।
पळें भासती ते किती काळ यूगें ॥ २७ ।

उदासीन तो बंधु ता राघवाचा ।
वदे मारुतीलागि कारुण्यवाचा ॥
बहू कष्टलों काळ गेला दुखाचा ।
कधीं राम येईल सिंधू सुखाचा ॥ २८ ॥

---

१ पूल बांधिला.

वृथा संपदा राज्य हें काय कीजे।
उदासीन या राघवाला न कीजे॥
पदें भोगतां त्या मदें बाधिजे तें।
दिसंदीस आयुष्य तें व्यर्थ जातें॥ २९॥

कितीएक ते भाग्य भोगूनि गेले।
पुन्हां मागुतें मृत्युपंथें निमाले॥
कितीएक साधू उदासीन झाले।
महीमंडळीं लोक सूखीं निवाले॥ ३०॥

भले जाणती संपदा दुःखदाती।
स्वहीता परत्रासि होते नियंती॥
हरादीक ते तापसी याचलागीं।
सदासर्वदा फीरती वीतरागी॥ ३१॥

म्हणोनी मला राघवेवीण कांहीं।
सदा सर्वदा वैभवीं चाड नाहीं॥
मला भेटवी राम आत्मा जगाचा।
वदे मारुतीलागि तो दीन वाचा॥ ३२॥

म्हणे मारुती धन्य गा धन्य साधू।
महाशक्तिवीरक्ति-बोधें अगाधू॥
म्हणे वीर अद्‌भूत वैराग्य कैसें।
महद्भाग्य हें मानिलें तृण जैसें॥ ३३॥

पुढें वीर रामानुजें न्याय केलें ।
पुरीमाजि शत्रुघ्ना त्या पाठवीलें ॥
सुमंता वसिष्ठादिकां जाणवीलें ।
असंभाव्य तें सैन्य पाल्हाळवीलें ॥ ३४ ॥

तया सांगतो मारुती राम आला ।
नभामाजि त्या पुष्पकारूढ झाला ॥
पुढें राम भ्राता नमस्कार घाली ।
सुखाची असंभाव्य हे वेळ आली ॥ ३५ ॥

त्वरें चालतां धांवतो रामभ्राता ।
नसे धीर त्या भेटिचा काळ येतां ॥
पदीं ठेविला मस्तकू बांधवानें ।
तया उठविलें त्वरें राघवानें ॥३६॥

सुमित्रा सुता भेटला वीतरागी ।
नमस्कारिली जानकी ते प्रसंगीं ॥
नमस्कार केला समस्तां विरांला ।
तया अंतरीं थोर आनंद झाला ॥३७॥

रुढांच्या मनासारिखे वर्तताहे ।
महीमंडळीं यानें येऊनि राहे ॥

१ रुढीप्रमाणें वागणाऱ्यांच्या. २ वाहन—विमान.

भुमी उतरे रामबंधू सितेसी ।
कपीनाथ सुग्रीव बीभीषणेसी ॥३८॥

पुढे देखिला तो ऋषी ब्रह्मनिष्ठू ।
कुळा रक्षिता तो कुळामाजि श्रेष्ठू ॥
रघूनाथ तेथें नमस्कार घाली ।
स्तुती उत्तरें आदरें भेटि झाली ॥३९॥

प्रसंगें नमस्कारिली मुख्य-माता[१] ।
बहु सौख्य झालें तया भेटी होतां ॥
समस्तां जणींना नमस्कार केले ॥
तया देखतां प्राण त्यांचें निवाले ॥४०॥

सिता सुंदरीनें नमस्कार केले ।
असंभाव्य ते लोक तेथें मिळाले ॥
स्तुती उत्तरें एकमेकांसि झाली ।
प्रसंगें तये अंतरीं ते निमाली ॥४१॥

१२ (शतद्वादश.)

पुढें चालिली ते असंभाव्य सेना ।
रजें[२] मातलें व्योम पूढें दिसेना ॥
कितीएक ते भार सन्मुख आले ।
समर्थास तेहीं नमस्कार केले ॥ १ ॥

---

१ कौसल्या. २ धूळ.

दळें राहिली दूर वेष्टित पाळा ।
कपी चक्र एकीकडे चंड मेळा ॥
तया मध्यभागीं ऋषी बंधुमाता ।
महावीर ते मुख्य चत्वार कांता ॥२॥

उभा राहिला राम तो राजभारें ।
गृहें निर्मिलीं अंबराचीं अपारें ॥
सभामंडपे धर्मशाळा विशाला ।
गृहें रम्य अंतर्गृहें चित्रशाळा ॥३॥

नभामाजि त्या दिव्य नक्षत्र माळा ।
तयाचे परी शोभती मुक्तमाळा ॥
विराजे तया मंडपा मध्यभागीं ।
ऋषी राम माता सखे बंधुवर्गी ॥४॥

असंभाव्य ते संपदा वैभवाची ।
मुखें सर्व बोलावया शक्ति कैंची ॥
वरी पाहतां उंच आकाशपंथें ।
असंभाव्य ते भव्य लावण्य तेथें ॥५॥

कपीनाथ बीभीषणाला भुपाळें ।
रहाण्या स्थळें दीधलीं ते विशाळे ॥

---

१ वेढा, समुदाय. २ चार.

तयामाजि ते सर्वही स्वस्थ झाले ।
समर्थे बहु सोहळे दाखविले ॥६॥
समस्तांसि तत्काळ अभ्यंग[1] झालें ।
महा लोकतें सर्व सूखें निवाले ॥
किती एक [2]सामग्रिया सिद्ध केल्या ।
कपीनाथ बीभीषणा पाठवील्या ॥७॥
पुढें राम बोले वसिष्ठा वरिष्ठा ।
किजे मंगल स्नान हो सर्व श्रेष्ठा ।
सखे बोलती स्वामि देवाधि देवा ।
तुम्हीं सांग अभ्यंग आधीं करावा ॥८॥
उभी मंडळी कूशला नापिकाची[3] ।
तीहीं मांडिली सांग सेवा प्रभूची ॥
जटाजूट[4] ते मोकळे सर्व केले ।
स्नेह[5] घालिता रम्य चक्षु निवाले ॥९॥
शिरीं घालिती तोय[6] नेटें घळालां ।
नद्या वाहती उष्ण ओघें खळालां ।
सुगंधेंचि दोहीं तिरीं [7]पंक झाला ।
असंभाव्य तो भृंग तेथें मिळाला ॥१०॥

---

१ स्नान. २ सामग्री—जिन्नस. ३ न्हाव्याची ४ जटाचे भार ५ तेल ६ पाणी ७ चिखल

बहू कस्तुरी केशरें तेचि काळीं ।
ऋषी राम वीलेपनें भव्य भाळीं ॥
बहू भूषणें रत्नमंडीत रामें ।
अमोल्यें सुखें घातली पूर्णकामें ॥११॥

प्रसंगें समस्तांसि अभ्यंग झालें ।
सभेते सखे आप्त सर्वे मिळालें ।
अलंकार स्त्रिया बरें दिव्य माता ।
सुखें पाहती राघवा त्या समस्तां ॥१२॥

फळें खाद्य नैवेद्य नानापरीचे ।
फळाहार ते आणिते कूझरीचे ॥
बहुता परीचे बहु उंच मेवे ।
म्हणे राम सर्वांतही पाठवावें ॥१३॥

समस्तांसि उदंड ते पाठवीले ।
फळें सेवितां लोक संतुष्ट झाले ॥
पुढे भोजना सर्वही सिद्ध झाले ।
कितीएक ते लक्ष कोटी मिळाले ॥१४॥

पूढें वाढिते झाहले पात्रधारी ।
असंभाव्य ते वाढिले एकहारी ॥

---

१ एका ओळीनें.

रुची रायती लोणची रम्य ओळी ।
बहूसाल शाखावळी शीघ्र काळीं ।। १५ ।।

पुढें शीघ्र दध्योदनें लागवेगीं ।
बहू वाढते जाहले ते प्रसंगीं ।।
ऋषी रामबंधू सखे आणि माता ।
मुखें बोलती सर्व संतृप्ति आतां ।। १६ ।।

सुवासें रुचीचीं असंभाव्य तेकें ।
कदाही कधीं नेणिजे स्वाद शकें ।।
सुखें सेविती जेंविती लोक इच्छा ।
यथासांग संपूर्ण झाले स्वइच्छा ।। १७ ।।

कपी रीस ते सर्वही तृप्त झाले ।
बहू भक्षिलें अन्न सूखें निवाले ।।
गिरी सारिखीं राहिली सर्व अन्नें ।
विडे घ्यावया धाडिलीं त्यांसि पानें ।। १८ ।।

पुढें मांडिली ब्राह्मणीं धर्मचर्चा ।
मुखें बोलती धन्य दीनू सुखाचा ।।
पुढें दीन तो चालिसा अस्तमाना ।
नमायासि आली असंभाव्य सेना ।। १९ ।।

---

१ दहीभात. २ पुष्कळ प्रकारचें ताक.

विराजे सभेमाजि तो रामराजा ।
पुढें चालिल्या त्या कळावंत फौजा ॥
विसर्जी सभा तो पुढें रामराजा ।
निरोपेंचि गेल्या बहू लोकफौजा ॥ २० ॥

समस्तीं घडी एक विश्रांति केली ।
अकस्मात प्रभात ते प्राप्त झाली ॥
पुढें सारितें जाहले नित्य नेमें ।
महावीर ते आपुल्याला स्वधर्में ॥ २१ ॥

सभे बैसिजे राम देवाधिदेवें ।
म्हणे आजि वेगें अयोध्येसि जावें ॥
पुरी सर्व शृंगारमंडित केली ।
असंभाव्य ते सर्व सेना निघाली ॥ २२ ॥

महीमंडळीं मुख्य आर्षी पुराणीं ।
मुखें बोलिजेते रवीवंश खाणी ॥
अयोध्या पुरी धन्य हे पुण्यरासी ।
किती राहिले तापसी तीर्थवासी ॥ २३ ॥

मुनी संत योगी सदा वीतरागी ।
उदासीन साधू पराचे विभागी ॥
ऋषी मंडळी सात्विका सज्जनाची ।
महायोग्य व्युत्पन्न विद्वज्जनाची ॥ २४ ॥

पुरीमाजि ते सर्वही लोक कैसे ।
सुवर्णाचळीं नांदती देव जैसे ॥
प्रतापी बळाचे सदा सत्यवाचे ।
पुरीमाजि लावण्यदेहे जनाचे ॥ २५ ॥
पुरीमाजि तें सर्व चातुर्य मोठें ।
कदाही मनीं नावडे त्यासि खोटें ॥
विलासे वसे ते रमा आणि विद्या ।
कला सर्व साधारणा सर्व सद्या ॥ २६ ॥
अलंकार दिव्यांबरें सर्व लोकां ।
सदा प्रीतीनें बोलती एकमेकां ॥
महा वैभवाचे बहू सुकृताचे ।
पुरीमाजि ते लोक नाना गुणाचे ॥ २७ ॥
पुरीमाजि आरोग्य ते लोकभारीं ।
मुलें लेकुरें थोरलीं आणि नारी ॥
करंटे तयामाजि कोणीच नाहीं ।
नसे दोष ना मत्सरू सर्व कांहीं ॥ २८ ॥
गृहें गोपुरें निर्मिलीं कांचनाचीं ।
बहूसाल विश्रांति-दातीं मनाचीं ॥
महारत्न-मंडीत ते थोरथोरें ।
किती धाकुटीं भव्य मोठीं अपारें ॥ २९ ॥

किती अन्नशाळा किती वस्त्रशाळा ।
कितीएक विस्तीर्ण त्या होमशाळा ॥
किती नाट्यशाळा किती रत्नशाळा ।
किती एक त्या धर्मशाळा विशाळा ॥ ३० ॥
सभामंडपीं ते असंभाव्य शोभा ।
बहू शोभतो हेम कल्लोळ गाभा ॥
फुलोरे बहू लाविले माणिकांचे ।
किती एक ते घोस मुक्ताफळाचे ॥ ३१ ॥
रवीवंशीचे स्वर्गविख्यात राजे ।
जयांच्या प्रतापें विधीगोळ गाजे ॥
करी कोण संख्या तया वैभवाची ।
उणी वर्णितां बुद्धि ब्रम्हादिकाची ॥ ३२ ॥
किती कोण लेखा मला मानवाला ।
मतीमंद तीं काय वर्णू तयाला ॥
म्हणें दास त्या अल्पशा भक्तिभावें ।
प्रभू बोबड्या उत्तरीं तोषवावें ॥३३॥

१३ ( शतत्रयोदश )

पुरी वर्णिली हो यथासांग येथें ।
परी पाहतां दीसती अल्प तेथें ॥

मनीं संशयो श्रोतया प्राप्त झाला ।
प्रती उत्तरें काय दिल्हीं तयाला ॥ १ ॥
अयोध्यापुरी स्वर्गलोकास गेली ।
पुढें वोस होतांचि ते भग्न झाली ॥
असेना जना राहणें वास्ति जेथें ।
खडे माणिकें कोण ठेवील तेथें ॥ २ ॥
असो तूटला संशयो श्रोतयाचा ।
पुढें राहिला ओघ जातां कथेचा ॥
अयोध्यापुरा चालिले वार जेठी ।
निघाले असंभाव्य कोठ्यानकोटी ॥ ३ ॥
ऋषी राम ते चालिले राजभारें ।
दळें चालिलीं पृष्ठिभागीं अपारें ॥
शिबीका पुढें चालती दिव्यहारी ।
सखे लोक बंध मधें रावणारी ॥ ४ ॥
करीं रत्न-ताटें कितीएक हारी ।
असंभाव्य त्या चालिल्या दिव्य नारी ॥
बहूसाल नीरांजनें लक्ष कोटी ।
पुरींतूनि येतां पुढें थोर दाटी ॥ ५ ॥
रुपें राजसा[1] सुंदरा त्या प्रितीनें ।

---

१ सुकूमार.

रघूनाथ ओवाळिती आवडीनें ॥
मनामाजि ते लागलीसे अवस्था ।
सुखें पाहती एकपत्नी व्रतस्था ॥ ६ ॥

पुढें सर्वही भूवनामाजि गेले ।
महावीर ते बैसले स्वस्थ झाले ॥
पुरीमाजि सर्वांसि आनंद झाला ।
उभे राहिले भाग्य हा राम आला ॥ ७ ॥

ऋषी सांगती हे बरी शुद्ध वेळा ।
त्वरें बैस भद्रासनीं तूं भुपाळा ॥
समस्तांसि आनंद राज्याभिषेकें ।
ऋषी अक्षता टाकिती मंत्रघोषें ॥ ८ ॥

विधीयुक्त भद्रासनीं रामराजा ।
यथायोग्य संपादिली सांग पूजा ॥
कितीएक पुष्पांजळी ते वहाती ।
सदानंद आनंद सूखें पहाती ॥ ९ ॥

असंभाव्य नानापरी दान केलें ।
बहूतापरी याचकां तोषवीलें ॥
महादिव्य सिंहासनीं रामराजा ।
पहाण्या उभो लागल्या वीरफौजा ॥ १०

वरी रामराज्यें गुडी ऊभवीली ।
गजेंबें सुखें लोकेंमांदी भिळाली ॥
झडा घालिती राम पहावयाला ।
समस्तां मनीं थोर आनंद झाला ॥ ११
घनें सुस्वरें नादकल्लोळ झाला ।
बहुतापरींचा बहू लोक आला ॥
महद्भूत ते माजली रंगवेळा ।
दणाणी मही नाद गेला भूगोळा ॥ १२ ॥
निसी प्राप्त झाली असंभाव्य दाटी ।
बहू दीवट्या लक्ष कोट्यानुकोटी ॥
किती एक ते उंच नेलें उमाळे ।
नळे जाळितां घोष तैसें उमाळे ॥ १३ ॥
पुढें ऊठिला राम तो ते प्रसंगीं ।
प्रभू चालिले भूवनामाजि वेगीं ॥
समस्तांस आरोगेणा सांग केली ।
विडे कर्पुरें घेतली तृप्ति झाली ॥ १४ ॥
सुवर्णाचिया मंचकीं मृदु शय्या ।
वरी सूमनें शेज त्या देवराया ॥

---

१ गजबजून. २ गर्दी. ३ रात्र. ४ आगीचे लोट.
५ भोजन.

सभामंडपीं ते निशी अर्ध गेली ।
प्रभूनें यथासांग विश्रांति केली ॥ १५ ॥
प्रभातेचि ऊठोनिया नित्यनेमें ।
किजे स्नानसंध्यादिकें सांग कर्में ॥
किती एक दानें कितेकां रसांचीं ।
धनें कांचनें भव्य नानापरींचीं ॥ १६ ॥
ऋषीं बांधवीं सारिलीं स्नानदानें ।
यथायोग्य उंचासनें स्थानमानें ॥
सभेमाजि तो बैसला रामराजा ।
निघाल्या कपीविरि राक्षस फौजा ॥ १७
कपीनाथ तो अंगदू जांबुवंतू ।
कुमोदू गजू वीनतू वीर्यवंतू ॥
महावीर लंकापती मारुती तो ।
सुमूखू द्विवीधू कपी केशरी तो ॥ १८ ॥
कपी वीर राक्षस कोट्यानुकोटी ।
असंभाव्य तें चालिले रामभेटीं ॥
समस्तीं प्रभूला नमस्कार केले ।
पुढें सर्वही हात जोडूनि ठेले ॥ १९ ॥
समस्तीं विरीं राम गुणागराला ।

— गुणांचे आगर वसतिस्थान-अशा रामाला.

बहू प्रार्थिलें त्या दयासागराला ॥
समस्तांसि देवें निरोपासि द्यावें ।
म्हणे राम तो शीघ्र जेऊनि जावें ॥ २० ॥
कपी रूक्ष राक्षस सर्व मिळाले ।
असंभाव्य ते भोजनालागि आले ॥
बहू पाकनिष्पत्ति नानापरींची ।
प्रकारें रसाळें कळा कूसरींची ॥ २१ ॥
जगज्जननी जानकी वाढताहे ।
सुवासें महा सौख्य तें होत आहे ॥
यथासांग संपूर्ण तें अन्न झालें ।
पुढें शीघ्र तें शर्करा आज्य[1] आलें ॥ २२ ॥
सभामंडपीं सर्वही स्वस्थ झालें ।
सुगंधें विडे शीघ्र ते आणवीलें ॥
समस्तांस संपूर्ण नाना सुवासें ।
कपी पूजिलें सर्व नाना विलासें ॥ २३ ॥
अलंकार चीरे बहू सिद्ध केली ।
असंभाव्य दिव्यांबरें आणवीलीं ॥
बहू भाषणाचे बहू ढीग केले ।
जगन्नायकें ते कपी गौरवीले ॥ २४ ॥

---

१ तूप.

स्तुतीउत्तरें सर्व लावण्यखाणी।
मुखें बोलिला राम कारुण्य वाणी ॥
तुम्ही कष्ट केलें जिवें सर्व भावें ।
तुम्हालागि उत्तीर्ण म्यां काय व्हावें ॥ २५ ॥
कपी सुग्रिवा अंगदा जांबुवंता।
गजा मारुता आणि नैऋत्यनाथा ॥
समस्तांसि सन्मानिलें रामचंद्रें ।
सुधाउत्तरीं तोषवीलें नरेंद्रें ॥ २६ ॥
मुखें बोलिजे वैद्यराजासि देवें ।
कपी तूज ऊचीत म्यां काय द्यावें ॥
वरू दीधला रामचंद्रें उचीती ।
तुझ्या दर्शनें लोक आरोग्य होती ॥ २७ ॥
समस्तांकडे पाहिलें राघवानें।
तया सर्व रोमांच आले स्फुराणें ॥
नमस्कारिलें स्वामि देवाधिदेवा ॥
म्हणे राम तो लोभ आतां असावा ॥ २८ ॥
असंभाव्य केली स्तुती राघवाची ।
वदो लागली मंडळीं प्रेमळांची ॥
कपी बोलती सर्व कारुण्य वाचा।
स्तुती ऐकतो राम सिंधू सुखाचा ॥२९ ॥

कृपाळूपणें राघवें थोर केलें ।
वरें वोखटें सर्व साहोनि नेलें ॥
बहू देखिलें सौख्य नानापरीचे ।
प्रभू श्वापदांलागि हे प्राप्त कैचे ॥ ३० ॥
सभाग्या-चिये संगतीनें असावें ।
बहूतांपरीचें बहू सौख्य घ्यावें ॥
तयासारिखे सर्व आम्हांसि झालें ।
महा वैभवें चित्त सूखें निवालें ॥ ३१ ॥
नव्हे भेटि नानापरी योगयागें ।
नव्हे भेटि नानापरी भोगत्यागें ॥
नव्हे भेटि ब्रम्हादिकां शीघ्र काळें ।
त्रिकूटाचळीं दाखवीलें भुपाळें ॥ ३२ ॥
कपीरीस ते बोलती दैन्यवाणें ।
कृपासागरू जीविचा भाव जाणें ॥
तयाच्या शिणें देव तो शीणताहे ।
बहूतांपरी राम संमोखिताहे ॥ ३३ ॥
प्रभूसंगतीची सवे दृढ केली ।
अकस्मात कां सव छेदूनि नेली ॥
तया बोलतां जाहला रावणारी ।
तुम्हा भेटि देईन कृष्णावतारीं ॥ ३४ ॥

दयाळासि तेही नमस्कार केलें ।
प्रभू सव्य घालूनि तैसे निघाले ॥
समस्तीं समस्तांस वंदून वेगीं ।
पुढें जीवतें जाहले ते प्रसंगीं ॥ ३५ ॥
मनें विकळें भक्तपाळें भुगाळें ।
मनामाजि ते खंति केली दयाळें ॥
जनीं सेवकालागि देखोनि उणें ।
बहू कष्ट घेऊनियां सौख्य देणें ॥ ३६ ॥
मनीं भावना भक्त लोकांसि जैसी ।
तयासारिखा देवरायासि तैसी ॥
जनीं सेवकाकारणें जन्म घेणें ।
महद्भाग्य सांडूनियां नीच होणें ॥ ३७ ॥
पडे सांकडें सर्वदा सेवकांचें ।
दिनानाथ हें ब्रीद विख्यात सांचें ॥
मनामाजि ते जैसजैसी अपेक्षा ।
करीना कदा राम त्याची उपेक्षा ॥ ३८ ॥
असंभाव्य अन्याय तो आठवीना ।
बहू चूकतां देव कांहीं शिणेना ॥
तया मानसीं लागली प्रेममाया ।
करी सेवकालागि नाना उपाया ॥ ३९ ॥

सदा सर्वदा देव दासाभिमानी ।
कृपा भक्तितां शीघ्र पावे निदानीं ॥
तया अंतरीं थोर लहान नाहीं ।
परी पाहिजे दृढ भावार्थ कांहीं ॥ ४० ॥

जया अंतरीं भाव होईल जैसा ।
तयालागि तो देव पावेल तैसा ॥
यदर्थीं कदा संशयोही असेना ।
अभावें तरी देव तो पालटेना ॥ ४१ ॥

किती एक अन्याय कोट्यानुकोटी ।
भ्रमें होय नानापरी बुद्धि खोटी ॥
तरी पाहतां लोभ त्याचा सरेना ।
कृपासागरू तो कदा ओसरेना ॥ ४२ ॥

दयाळूपणें देव राजाधिराजे ।
शिरीं वाहिजे सर्वही भक्तओझें ॥
जनीं दास देखोनियां दैन्यवाणा ।
मनामाजि वोसावतो देवराणा ॥ ४३ ॥

बहूसाल हें बोलणें काय कीती ।
स्वयें जाणती जे असें सप्रचीती ॥
अयोध्यापुरीमाजि तो रामराजा ।
कृपाळू सुखें राहिला भक्तकाजा ॥ ४४ ॥

कपी वीर गेले स्थळें जेथ जेथें ।
प्रिती मारुती राहिला राम तेथें ॥
रघूनाथ सीता तये बंधुवर्गीं ।
उभें राहिजे सेवकें पूर्वभागीं ॥ ४५ ॥
अखंडीत या राघवाच्या प्रतापें ।
विवेकें विचारें समाधान सोपें ॥
पदीं लागतां निर्गुणी भक्त झाले ।
बहूसंग निःसंग होऊनि गेले ॥ ४६ ॥
असो हें जनीं प्राप्त तेणें धरावें ॥
अनुर्वाच्य तें वाच्य कैसें म्हणावें ।
सदा नित्य नीरूपणीं वीवरावें ॥
नुरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ४७ ॥
असो हे कथा बोलिली राघवाची ।
जनीं सर्वदा ऐकती धन्य त्यांची ॥
कथा ऐकतां ते महादोष जाती ।
दुःखें नासती लोक ते धन्य होती ॥ ४८ ॥
करी राम तो राज्य नाना विलासीं ।
जनामाजि उपासना रामदासीं ॥
यथासांग तेरा शतें श्लोक झाले ।
गुणीं ऐकतां चित्त सूखें निवालें ॥ ४९ ॥

# ७ ओव्या.

ओवीचे आरंभीं वंदूं विनायक । बुद्धीचा दायक लोकामधें ॥ १ ॥ लोकामधें बुद्धिविण कामा नये । बुद्धीचा उपाय सर्वत्रासी ॥ २ ॥ सर्वत्रांसि बुद्धि देतो गणनाथ । करीतो सनाथ अनाथांसि ॥ ३ ॥ अनाथांचा नाथ कळे जयाचेनी । तो हा धरा मनीं लंबोदर ॥ ४ ॥ लंबोदर विद्यावैभवें पुरता । दास म्हणे माता सरस्वती ॥ ५ ॥

## ( १ ) शतक पहिलें

नमन योगीराया स्वामी दत्तात्रया । गाईन ओवीया संसारींच्या ॥ १ ॥ संसारींचें दुःख आठवतें मनीं । मागें नाना योनी भोगीलीया ॥ २ ॥ भोगीलीया परी नाहीं आठवण । दुःख तें कठीण विसरलों ॥ ३ ॥ विसरलों राम, चित्तीं दृढ काम । तेणें गुणें श्रम थोर झाला ॥ ४ ॥ झालों कासावीस थोर गर्भवासी । नको त्या दुःखासी सांगवेना ॥ ५ ॥ सांगवेना शीण अत्यंत कठीण । रामा तुजवीण दुःख झालें ॥ ६ ॥ दुःख झालें भारी मातेचे उदरीं । नव

मासवरी कोंडियलें ॥ ७ ॥ कोंडियेलें मज अत्यंत सांकडी । रामा कोण सोडी तूजवीण ॥ ८ ॥ तुजवीण मज जाहलें बंधन । जठरीं शयन जननीचे ॥ ९ ॥ जननीजठर संकोचित थोर । विष्टा आणी मूत्र नाकीं तोंडीं ॥१०॥ थोरं झाले कष्ट मातेचे उदरीं । टाळिलो श्रीहरी दास तूझा॥ ११ ॥ फोडियला टाहो॥ पडतां भुमीवर । दिवसें दिवस हरी विसरलों ॥ १२॥ अंतरलों सुख तूज विसरतां । विषयो भोगितां दुःख झालें ॥ १३ ॥ दुःख झालें फार ऐसा हा संसार। पुढें षड्विकार उद्भवले ॥ १४ ॥ दुःख होय देहीं माता नेणें कांहीं । मज वाचा नाहीं काय करूं ॥१५॥ भोगवेना दुःख संसारीचे आतां । धांवें वा अनंता पावे वेगीं ॥ १६ ॥ पावें वेगीं दास सोडवी आपुले । लोभें वाहवले मायाजाळीं ॥ १७ ॥ मायाजाळीं दृढ झालें माझें माझें । रामा नाम तुझें आठवेना ॥ १८ ॥ आठवेना चित्तीं स्वहिताचें ज्ञान । माय बापीं लग्न केलें लोभें ॥ १९॥ बंधनाची बेडी प्रबळला काम । मग कैंचा राम आठवेल ॥ २० ॥ आठवेना राम स्वामी त्रैलोक्याचा । झालों कुटुंबाचा भारवाही ॥ २१ ॥ काय करूं मज कामाचें सांकडें । संसाराचें

कोडें उगवेना ॥ २२ ॥ प्रपंचाचें ध्यान लागलें मानसीं । चित्त अहर्निशीं दुश्चंचळ ॥ २३ ॥ माझी माता पिता माझे बंधुजन । पुत्र कांता धन सर्व माझें ॥ २४ ॥ सर्व माझं ऐसे मानिला भर्वसा । तुज जगदीशा विसरलों । २५ ॥ विसरलों तुज वैभवाकरितां । शेखीं माता पिता राम झाली ॥ २६ ॥ राम झाली माता देखत देखतां । तरी म्हणे कांता पुत्र माझे ॥ २७ ॥ नाहीं नाहीं सुख संसारीं पाहतां । पुरे देवा आतां जन्म नको ॥ २८ ॥ कामा नये कोणी तुजवीण रामा । नेई निजधामा माहेरा । २९ ॥ सर्व माझें गेलें झालों निःकारण । स्वामीचे चरण अंतरलों ॥ ३० ॥ वृद्धपणीं माझें चळलें शरीर । श्रवण बधीर नेत्र गेले ॥ ३१ ॥ नेत्र गेले मज पाहतां दिसेना । स्वयें उठवेना पाय गेले ॥ ३२ ॥ धरवेना तृष्णा क्षुधा आणि दिशा । पराधीन आशा प्रबळली ॥ ३३ ॥ नेदी कोणी कांहीं क्षीण झालों देहीं । जिवलग तेही वोसंडीले ॥ ३४ ॥ दुःख झालें थोर क्षुधा आवरेना । अन्न हा जिरेना वांती होये ॥ ३५ ॥ बोलवेना अंतकाळींच्या त्रित्ती । सर्व म्हणती हा मरेना कां ॥ ३६ ॥ मरेना कां आतां कासया वांचला । देव विस-

रला नेणो यासी ॥ ३७ ॥ उचलावी माती सर्वांचें अंतरीं । सुखाची सोयरी दुरी ठेली ॥ ३८ ॥ सोडवीना कोणी श्रीरामावांचूनि । संकटीं धावणो राम करी ॥ ३९॥ राम करीतसे दासांचा सांभाळ। भक्तांचा स्नेहाळ राम एक ॥ ४० ॥

( २ ) शतकदुसरें

संसाराची कथा आतां सांगईन । सुखासाठीं लग्न आरंभिलें ॥ १ ॥ आरंभिलें लग्न आणिली नोवरी ऋणें घरोवरीं मागतसे ॥ २ ॥ सांडी स्नान संध्या सांडी नित्य नेम । रात्रंदिवस काम संसाराचें ॥ ३ ॥ आरंभीं नोवरी म्हणे आणा आणा । रात्रंदिस आणा आरंभिल्या ॥ ४ ॥ तेल मीठ आणा भाजीपाले आणा। धान्य घरा आणा कांहीं तरी ॥ ५ ॥ ठायीं पडे अन्न तरी हा भाग्याचा। धोका संसाराचा रात्रंदिस ॥६॥ आला गेला लोक पाहेना विचार । पाहुण्यांनीं घर बुडाविलें ॥ ७ ॥ दोघेजण होतीं बहुजणें झालीं । भिकेसी लागलीं दारोदारीं ॥ ८ ॥ दारोदारीं दोघें मागती उसणें । ऋणें केलें दुणें देया नाहीं ॥ ९ ॥ काय करूं आतां कर्म बळीवंत । आम्हा भगवंत कोठें गेला ॥१०॥ गेला हा लौकिक आतां राहे कैसा । ऐसा

दाही दिशा एकवटीं ॥ १० ॥ बोलतसे एक चालतसे एक। मागें पुढें लोक हांसताती ॥ ११ ॥ बरें पहा मनीं लोक जाणते हो। बांयावीण मोहो धरीतसां ॥ १२ ॥ कोठें तरी देव पावेल निर्वाणीं। नित्यनीरूपणीं संतसंगें ॥ १३ ॥ संतसंगें दोष नासती विशेष। आणि जगदीश ठायीं पडे ॥ १४ ॥ ठायीं पडे तेव्हां जिणें धन्य झालें॥ सार्थकची केलें संसाराचें ॥ १५ ॥ संसाराचें कोण शाश्वत मानावें। म्हणोनि जाणावें परब्रह्म ॥ १६ ॥ निरंजनीं जन जनीं निरंजन। जाणती सज्जन विवेकाचे ॥१७॥ पोटासाठीं रडे कष्टती बापुडे॥ त्यासी कोणीकडे परलोक ॥ १८ ॥ परलोक घडे बहुत सायासें। तेथें ऐसें कैसें बाह्यात्कारें ॥ १९ ॥ परब्रह्म-एक तें नव्हे अनेक। पाहतां विवेक नित्यानित्य ॥२०॥ विवेकाचें वाक्य विवेकी जाणती। ज्ञानी ओळखती पर्ण ब्रह्म ॥ २१ ॥ परब्रह्म एक नित्य निराकार। धरी ते जोजार मूळमाया ॥ २२ ॥ मूळमाया देव चंचल ईश्वर। विधी. हरीहर तेथूनियां ॥ २३ ॥ तेथूनियां पंचभूतें हें निर्माण। उत्पत्ति लक्षण इच्छारूप ॥ २४ ॥ इच्छारूप वृत्ति कल्पना कामना। जया पुनः पुन्हा

---

१. व्यर्थ.

गर्भवास ॥ २५ ॥ समाधान झालें मींपण शोधितां । वस्तुसी बोधितां वस्तूरूप ॥ २६ ॥ पूर्ण बोध झाला संदेह तूटला । संसारीं सूटला येणें रीती ॥ २७ ॥ येणें रीती आतां समाधान झालें । शरीर लागलें भजनासी ॥ २८ ॥ भजन रामाचें त्रैलोक्य पावन । करीतो चिंतन शूलपाणी ॥ २९ ॥ विवरतां जड चंचल निश्चल । तुटे खळखळ मींपणाची ॥ ३० ॥ मींपण रामपदीं निवेदिलें । समाधान झालें रामदासीं ॥ ३१ ॥

## ३. ( शतक ३ रें. )

संतांचे संगतीं काय प्राप्त होतें । तें आतां निरुतें सांगईन ॥ १ ॥ संतसंगें तुटे जननीं जठरें[1] । दुस्तर संसार मायाजाळ ॥२॥ पापबुद्धि झडे संतांचे संगती ॥ नाहीं अधोगती गर्भवास ॥३॥ संत संग धरी धन्य तो संसारीं । बोलिले श्रीपती भागवतीं ॥ ४ ॥ भागवत–गीता–सार निरूपण । त्याचें विवरण संतसंगे ॥ ५ ॥ संतसंगें कळे सर्व शास्त्रभाग । आणि ज्ञानयोग अप्रयासें ॥ ६ ॥ प्रयासें साधितां कदा नये हातां ॥ ते लाभे तत्वतां साधुसंगें ॥ ७ ॥ साधुचेनि संगें

१ उदर.

अलभ्याचा लाभ ॥ मुक्ति हे सुलभ होत आहे ॥ ८ ॥ आहे एक देव परी तो कळेना । जयासि मिळेना संतसंग ॥ ९ ॥ संतसंग नाहीं जया लागीं जनीं ॥ तया कां जननी प्रसवली ॥ १० ॥ सर्वकाळ होय सार्थक श्रवणें । ब्रह्मनिरूपणें संतसंगें । ११ ॥ संतसंगें ब्रह्मपद ओळखावें । विवेकें पावावें निरंजना ॥ १२ ॥ झालियानें कृपा संतसज्जनाची । मग विवेकाची वाट फुटे ॥ १३ ॥ मागें पुढें सर्व देवांचा नायक । सांपडे विवेक झालियानें ॥ १४ ॥ संतसंगेवीण त्याग हा घडेना । श्रीहरी पडेना कदा ठायीं ॥ १५ ॥ सज्जनाचें वर्म सज्जना आतुडे । इतरां कुवाडे मायाजाळ ॥ १६ ॥ साधुविणें प्राणी पडती आटणी । तपीं तीर्थाटणीं नाना कर्मीं ॥ १७ ॥ सारिखाचि दिसे जनाचिये परी । परी तो अंतरीं वेगळाची ॥१८॥ तया नाहीं काम तया नाहीं क्रोध ॥ तया नाहीं खेद स्वार्थ बुद्धि ॥ १९ ॥ बुद्धि निश्चयाची स्वरूपीं जयाची ॥ कल्पना ठायींची निर्विकल्प ॥ २० ॥ निर्विकल्प मद मत्सर सारीला ॥ दुरी ओंसरीला अहंकार ॥ २१ ॥ मोंकलीली भ्रांता शरीर

---

१ प्राप्त होतें. २ दूर केली.

संपत्ती । वैभव संतती लोलंगता ॥ २२ ॥ समाधान शांती क्षमा आणि दया ॥ रंका आणि राया सारिखाची ॥ २३॥ हरीभक्ति करी जन तारावया ॥ स्वधर्म विलया जाऊं नेदी ॥ २४ ॥ निरंतर भाव सगुण भजन ॥ येणें बहुजन उद्धरती ॥ २५ ॥ लागावया भावें सक्रिया भजन ॥ करी तो सज्जन मुक्तिदाता ॥ २६ ॥ लोकाचार करी तो जना उद्धरी ॥ ज्ञाता अनाचारी कामा नये ॥ २७ ॥ क्रियावंत साधु विवेकी विरक्ती । तोचि तो लौकिकीं मान्य आहे ॥ २८ ॥ क्रियाभ्रष्ट त्यागें लौकिका सांडावें । आणि वसवावें ब्रम्हारण्य ॥ २९ ॥ ब्रम्हारण्य सेवी तो साधु एकला ॥ जना नाहीं आला उपेगासी ॥ ३० ॥ निंदूं नको शास्त्र निंदूं नको वेद ॥ तरीच स्वानंद पावशील ॥ ३१ ॥ पावशील राम जिवांचा विश्राम । अहंतेचा श्रम सांडिताची ॥३२॥ पावशील गती शुद्ध निरुपणें । रामदास म्हणे क्षमा करी ॥३३॥

## ४ ( शतक ४ थें )

उपदेशपद्धती आतां सांगईन। होई सावधान आलया रे ॥१॥ आलया रे सांग तूं कोण आहेसी ॥ वेगीं आपणासी ठायीं पाडी ॥२ ॥ ठायीं पाडी तूज तूंचि चूक-

लासी । देहाचा धरीसी अभिमान ॥३॥ स्थूळदेह दृश्य याचा तूं जाणता । देह मी म्हणतां जीवदशा ॥ ४ ॥ जीवदशा गेली साक्षत्वें वर्ततां ॥ ईश्वरु तत्वतां याचें नांव ॥५॥ नांवरुप देहीं साक्षी तो विदेही । या विवेकें नाहीं देहबुद्धी ।६॥ देहबुध्दी गेली या स्थूळदेहाचा । उरी संदेहाची लिंगदेहे ॥७॥ पंचवीस तत्वें या लिंग-देहाचीं ॥ साक्षी वेगळाची अनुभवें ॥ ८ ॥ तुझें तूंचि बा रे नेणे म्हणतोसी ॥ तोंचि निश्चयेंसी रूप तुझें ॥९॥ साक्षरूप सर्व पदार्थ जाणतां ॥ तो कांहीं तत्वतां आत्मा नव्हे ॥ १० ॥ निवृत्ती उन्मनी निःशब्द विज्ञान ऐसें समाधान अनुर्वाच्य ॥ ११ ॥ अनुभवेंवीण उडे जाणपण ॥ जाणपणें शीण वाउगाची ॥ १२ ॥ समाधान तें तूं वाक्य तत्वमसी । सोहं हंसा ऐसी मात आहे ॥ १३ ॥ पाहे अहंब्रह्म ऐसेंचि वचन ॥ ब्रम्ह सनातन तूंचि बापा ॥ १४ ॥ तूंचि एक ब्रम्ह येर सर्व भ्रम । दृढ धरीं वर्म अंतरीचें ॥ १५ ॥ जाणोनियां सर्व नाशिवंत ऐसें । शाश्वतीं विश्वासे मन-बुध्दी ॥ १६ ॥ स्वरूपीं आसाक्ति याचें नांव भक्ती ॥ पाहतां विभाक्ति जेथें नाहीं ॥ १७ ॥ जेथें नाहीं देह-बुध्दीचें अज्ञान । तया नांव ज्ञान बोलिजेतें ॥१८॥

ज्ञान आणि भक्ति एकचि असती ॥ वैराग्याची स्थिती बोलिजेल ॥ १९ ॥ जाणोनि माईक सर्वही त्यागिलें । मन सुखावलें संगत्यागें ॥ २० ॥ एकरूप झालें भक्ति आणि ज्ञान ॥ वैराग्यही जाण एकरुप ॥ २१ ॥ वैराग्यावाचूनि सर्व खंडे ज्ञान ॥ त्यागाचें लक्षण तेथें नाहीं ॥ २२ ॥ बोलेनियां मुखें तैसी क्रिया करी ॥ धन्य तो संसारी ब्रम्हज्ञानी ॥ २३ ॥ ब्रह्मज्ञानी भला-वर्तणुकेपाशीं ॥ कोरडया शब्दासी कोण पुसे ॥ २४ ॥ कोण पुसे बापा ज्ञान हें शाब्दिक । क्रिया अलौकिक सत्य जाण ॥ २५ ॥ सगुणीं आदरें देह झीजवावें । भजन करावें नवविधा ॥ २६ ॥ सर्वभावें सदा सगुणीं भजावें ॥ कोरडें त्यागावें शब्द ज्ञान ॥ २७ ॥ शब्द ज्ञान भक्ति संसारीं आसक्ति ॥ त्या नांव विभक्ति सत्य जाण ॥ २८ ॥ मोडतो आचार कर्म कुलाचार । करी भ्रष्टाकार पापरूपी ॥ २९ ॥ वीतरागें मन मोकळें करावें ॥ सुख न धरावें संसाराचें ॥ ३० ॥ सर्वकाळ त्याग करूनि उदास ॥ योगीये तापस दिगंबर ॥३१॥ बाह्यअभ्यंतरीं त्याग निरंतरी ॥ वैराग्य यापरी आचरावें ॥ ३२ ॥ आचरावें कर्म ज्याचा जो स्वधर्म ॥ आणि नित्य नेम साधनाचा ॥ ३३ ॥ भक्तिपंथें जातां

सायुज्यता होय ॥ निश्चयो तत्वतां दास म्हणे ॥ ३४॥

५ ( शतक ५ वें. )

पृथ्वी आप तेज वायु तें आकाश। ऐसें सर्व दृश्य नाशिवंत ॥ १ ॥ सुखी झाले संत शोधतां अनंत ॥ कल्पनेचा प्रांत परब्रह्म ॥ २ ॥ निःसंदेह भाक्ति केल्या होय मुक्ति ॥ दास म्हणे युक्ति सावधान ॥ ३ ॥ सावधान आतां वृत्ति हे करावी ।। भक्ति ओळखावी नववीधा ॥ ४ ॥ विचारणा करीं श्रवण मनन ।। ध्यास समाधान पाविजेतें । ५ । हे चि बापा भाक्ति प्रथम जाणावी ॥ दुजी ओळखावी हरीकथा ॥ ६ ॥ देव आहे सदा तिष्टत किर्तनीं । भाक्ति श्रेष्ट जनीं हरी कथा ॥ ७ ॥ पडो नये भ्रांति नामस्मरणाची । तृतीये भक्तींची ओळखण ॥ ८ ॥ ओळखण होय उच्चारितां ।। उद्धार बहुतां रामनामें ॥ ९॥ उद्धरले संत सज्जन शोधितां । हेंचि जाण आतां चौथी भाक्ति ॥ १० ॥ उरी नाहीं दोषा सज्जन सेवितां ॥ मुक्ति सायुज्यता पाठीं लागे ॥ ११ ॥ सांगों आतां भक्ति पांचवी अर्चन ॥ तें पूजाविधान विधियुक्त । १२ । विधियुक्त पूजा देवब्राह्मणाची ॥

संतसज्जनाचीं सर्वकाळ॥ १३ ॥ उद्धरले देवां ब्राम्हणां वंदितां ॥ सहावी ते आतां भक्ति जाण । १४ । भक्ति जाण सार सर्वां नमस्कार ॥ घाली अधीकार पाहोनिया ॥ १५ ॥ आहे आतां भक्ति सातवी ते कैसी। सेवा सर्वेश्वसी दास्य जाण॥ १६ ॥ दास्य करूनियां देवा-सि पावले॥ ऐसें उध्दरले नेणों किती ॥ १७ ॥ उपे-क्षीना देव हें सत्य वचन ॥ अष्टमी ते जाण सख्यभक्ती ॥ १८ ॥ देवापाशीं सुखदुःख तें सांगावें ॥ कैवारी करावें ईश्वरासी ।' १९ ॥ ईश्वरीं टाकितां संसाराचा भार ॥ मग हा संसार सुखरूप ॥ २० । सांगईन भक्ति सर्वांमध्यें सार । पावती साचार मुक्ति जेणें । २१ ॥ मुक्ति जेणें होय ते भक्ति नवमी ॥ जेथें नाना उर्मी मावळती ॥ २२ ॥ मावळे अज्ञान होय शुद्धज्ञान । आत्म-निवेदन भक्तिसार ॥ २३ ॥ तदाकार होणें आत्म-निवेदनें ॥ मग येणें जाणें निरसलें ॥ २४ ॥ गुरुवाक्यें होय ज्ञान समाधान ॥ आत्मनिवेदन याचें नांव ॥२५॥ नवविधा भक्ति केल्या होय मुक्ति ॥ चळेना कल्पांतीं सायुज्यता । २६ । नाशिवंत मुक्ति जाण चतुर्विधा । तया अनुवादा चित्ता देई ।२७॥ चित्त देई एकी मुक्ति सलोकता ॥ दुजी समीपता सत्य जाण ॥ २८॥ सत्य

जाण मुक्ति तिजी स्वरूपता । चौथी सायुज्यता मुक्ति जाण ॥ २९ ॥ ठाव हा स्वलोकीं तेचि मुक्ति एकी । दुजी समीप कीं समीपता ॥ ३० ॥ समीपता मुक्ति समीप असावें । स्वरूपता व्हावें स्वरूपचीं ॥ ३१ ॥ सायुज्यता मुक्ति ज्ञानाचेनि द्वारें । आपण निर्धारें सस्वरूप ॥ ३२ ॥ प्रलयाचे काळीं शत संवत्सर । अनावृष्टि थोर वोढवेल ॥ ३३ ॥ वोढवे प्रलय सूर्य बाराकळीं । तेणें होय होळीं वसुंधरा ॥ ३४ ॥ वसुंधरा बुडे प्रलय उदकीं । झालें एकाएकीं जलमय ॥ ३५ ॥ जलमय झालें तें तेजें सोखीलें । तेज झडपिलें समीरानें ॥ ३६ ॥ समीर आकाशीं सर्व वितुळला । त्याचा नाश केला तमोगुणें ॥ ३७ ॥ तमोगुणा रज ग्रासुनियां जाये । रजोगुणा खाये सत्वगुण ॥ ३८ ॥ सत्वगुणा माया माये मूळमाया । गुणसाम्य तिया निर्दाळील ॥ ३९ ॥ निर्दाळील गुण साम्यतें निर्गुणी । ऐसी संहारणी विवेकाची ॥ ४० ॥ प्रळयाचे अंतीं देवची नासती । तेथें कैच्या मुक्ती राहतील ॥ ४१ ॥ अनुभवी ज्ञानी तेचि समाधानी । आत्मनिवेदनीं रामदास ॥ ४२ ॥

## ६ ( शतक ६ वें )

देवासी सांडूनि देऊळ पुजीती । लोकिकाची रीति काय सांगों ॥ १ ॥ समाधान नाहीं देवावांचूनियां ॥ सर्व कर्म वाया निरर्थक ॥ २ ॥ निरर्थक तीर्थें व्रतें तपें दानें । एका ब्रह्मज्ञानें वांचूनीया ॥ ३ ॥ दुरावला देव दुरी सांडू नये । धरावा उपाय साधुसंग ॥ ४ ॥ साधुसंगें साधा सद्वस्तु विवेकें । तुम्हास लोकिकें काय काज ॥ ५ ॥ काय काज आहे परलोका जातां लौकिक तत्वता इहलोकीं । ६ ॥ इहलोकीं करा लोक संपादणीं । त्रैलोक्याचा धणी ओळखावा ॥ ७ ॥ समाधान केलें संसार करीतां । देवासी नेणता जन्म गेला ॥ ८ ॥ प्रगटला देव जयाचे अंतरीं । धन्य सृष्टीवरी तोची एक ॥ ९ ॥ सर्व काळ गेला कथा निरूपणें । अध्यात्मश्रवणें निजध्यासें ॥ १० ॥ ब्रह्मरूप झालें । लोकिकीं वर्तलें । साधु ओळखिलें साधुजनीं ॥ ११ ॥ जनामधें आहे जनासी कळेना । जैसा आकळेना निरंजन ॥ १२ ॥ सावधान मन करूनी मनन । मनाचें उन्मन होत आहे ॥ १३ ॥ होत आहे परी केलेंची पाहीजे । विचारें लाहिजे मोक्षपद ॥ १४ ॥

विचारणा करी तो धन्य संसारीं । संदेह अंतरीं आढळेना ॥ १५ ॥ सांडूनिया दृश्य आणि मनोभास । मग जगदीश ओळखावा ॥१६॥ ओळखावें तया असावें अनन्य। तरी संतमान्य होईजे तें ॥ १७ ॥ जन्ममृत्यु यमयातना दारुण। चुकवील कोण ज्ञानेंवीण ॥ १८ ॥ ज्ञानेवीण जीणें व्यर्थ दैन्यवाणें । वाचितो पुराणें पोटासाठीं ॥ १९॥ पोटासाठीं लोकां करी नमस्कार होतसे किंकर किंकराचा ॥ २० ॥ किंकराचा दास भूषण मिरवी । सृष्टीचा गोसावी ओळखेना ॥ २१ ॥ सान्निधान ज्याचें ईश्वरीं सर्वदा । संसारआपदा तय नाहीं ॥ २२ ॥ संताचिया गुणा जे गुणग्राहिक । तया नाहीं नर्क येरा बाधी ॥ २३ ॥ बाधीतसे येरा सर्वही संसार । ज्ञानी पैलपार उतरले ॥ २४ ॥ ज्ञानमार्ग सर्व मार्गामधें श्रेष्ठ । बोलिले वरिष्ठ ठायीं ठायीं ॥ २५ ॥ ठायीं ठायीं देव मांडूनि बैसती । तेणें कांहीं मुक्ति पाविजेना ॥ २६ ॥ पाविजेना मुक्ति भक्तिवांचूनियां । भक्तीविण वायां गेलें लोक ॥ २७ ॥

७ (शतक ७ वें)

अहो जना तुम्ही भजा निरंजना । चुकती यातना

संसारीच्या ॥१॥ अंतकाळीं करी कोण सोडवण । सोईरे पिसुण दुरावले ॥२॥ जीवलगे जाती फिरोनिया घरा। मग तुज दारापुत्र कैंचे ॥ ३ ॥ कैंचे पुत्र जन आपुले पारिखे ॥ सर्वही सारिखे कळो आले ॥ ४ ॥ कळो आले परी आयुष्य वेचले । चुकोनिया गेले सर्व कांहीं ॥ ५ ॥ लाउनिया जीव जीवें मेळविले । तें घरीं राहीलें सर्व कांहीं ॥ ६ ॥ सर्व कांहीं नये तुज समागमें । म्हणोनिया भ्रमें भुलो नको ॥ ७ ॥ भुलो नको भ्रमें संसारीं आलिया । कैसी आहे माया ओळखावी ॥ ८ ॥ ओळखावी माया आणि परब्रह्म ॥ तेणें तुझा भ्रम नासईल ॥ ९ ॥ नासईल भ्रम श्रवण करितां । विचार पाहतां सारासार ॥ १० ॥ अंतरली मुक्ति झाली अधोगती । निरंजन चित्तीं न धरितां ॥ ११ ॥ समाधान घडे सज्जनसंगती । चुके अधोगती गर्भवास ॥ १२ ॥ गर्भवास चुके सद्गुरु करितां । विवेके धरितां नित्यानित्य ॥ १३ । निरंतर जेथें श्रवण मनन । निजध्यासें जाण साक्षात्कार ॥ १४ ॥ साक्षात्कार जंव सिद्ध पाविजेना । तरी हे यातना चूके केवी ॥ १५ ॥ विवरतां ब्रह्म जीव माया भ्रम । देव भक्त वर्म ओळखावें ॥ १६ ॥ ओळखावें वर्म हें

मीतुपणाचें । नित्य निर्गुणाचें निरूपण ॥ १७ ॥ सर्व कांहीं कळे विवेकें निवळे । आपेआप गळे मीतूंपण ॥ १८ ॥ समाधान झालें मी पण बुडालें । प्रबोधें उडालें सर्व कांहीं ॥ १९ ॥ मीपणाचें मूळ शोधितां सूटलें विवेकें तुटलें मायाजाळ ॥ २० ॥ कोण करी सर्व तें तरी पहावें । पाहोनि राहावें समाधानें ॥ २१ ॥ निर्गुणाचा अंत पाहतां अनंत । तेथें अंतवंत लाऊं नका ॥ २२ ॥ बरें शोधूं जातां जीव माया देव । या तिघा कर्तृत्व आढळेना ॥ २३ ॥ आढळेन भूतीं कर्तृत्व पाहतां । कोणीकडे आतां धुंडाळावें ॥ २४ ॥ ब्रम्ह निर्विकार त्या नाहीं आकार । जीव तो साचार अंश त्याचा ॥ २५ ॥ त्याचा अंश देह संबंध कल्पिलें । ब्रम्हांशानें केलें हें घडेना ॥ २६ ॥ घडेना कीं प्राण कर्ता अप्रमाण । श्वासोच्छवास जाण करणें त्याचें ॥ २७ ॥ त्याचें करणें नव्हे स्थूळ अचेतन । अंतःकरण मन जाणतेंचि ॥ २८ ॥ जाणतेंचि परी ते कांहीं करीना । वायो तो जाणीना कांहीं केल्या ॥ २९ ॥ कर्तेपण नाहीं एकाचें मस्तकीं । हें बरें विवेकीं ओळखावें ॥ ३० ॥ ओळखावें करणें आहे समस्तांचें । त्रिगुण भूतांचें विचारावें ॥ ३१ ॥

विचारावें झालें बहुतांचें केलें । तें मज लाविलें कोणेपरी ॥ ३२ ॥ माझें मज नाहीं पाहतां मीपण । तेथें कर्तेपण वांव झालें ॥ ३३ ॥ समाधान देहीं असोनि विदेही । कर्तृत्वाचा नाहीं अभिमान ॥ ३४ ॥ साभिमान कैचा मेळ हा भुतांचा ॥ भूतें त्रिगुणांचा सृष्टीभाव ॥ ३५ ॥ सृष्टीभाव झाला भूतांचा उद्भव देव निरवयव जैसा तैसा ॥ ३६ ॥ जैसा तैसा देव जाण अनुभवें । दृश्य हें स्वभावें होत जातें ॥ ३७ ॥ सार्थकता झाली रामासी भजतां । दृढ धरूं आतां उपासना ॥ ३८ ॥ उपासना भक्त होऊनि करीन ज्ञानें उद्धरीन अज्ञानासी ॥ ३९ ॥ अज्ञानासी ज्ञान रामाचें करणें । शीघ्र उद्धरणें रामदासी ॥ ४० ॥

## ८ (शतक ८ वें )

करी चापबाण माहेश्वरी ठाण । रूप हें सगुण राघवाचें ॥ १ ॥ राघवाचें रूप निर्गुण जाणावें । सगुण स्वभावें नाशिवंत ॥२॥ नाशिवंत देव कदा म्हणो नये। निर्गुणासी काय पाहाशील ॥३॥ पाहतां निर्गुण देवासी दुर्लभ । याचा लाभ होय पूर्वपुण्यें ॥ ४ ॥ नवविध भक्ति करितां तरले । जीव उद्धरलें नेणो किती ॥ ५ ॥

नेणोनियां देव मायिक भजतां । मुक्ति सायुज्यता अंतरली ॥ ६ ॥ अंतरली भक्ति मुक्तिमागें धावें । राघवाच्या नांवें निरंतर ॥७ ॥ निरंतर देव अंतरी नेदावा । विवेक पाहावा सज्जनाचा ॥८॥ आढळेना जया संतांची संगती । तया अधोगती गर्भवास ॥ ९ ॥ अनाथाचा नाथ पतीतपावन ॥ १० ॥ तया संतजन दाखवीती रामासी मिळतां संतांचे मिळणी । मग दुजेपणी उरी नाहीं ॥ ११ ॥ संत संगतीचा निर्गुण पवाड । मज वाटे गोड रामकथा ॥१२ ॥ कथा निरूपण श्रवण मनन । होय समाधान संतसंगें ॥१३॥ संतसंगें बोध होय निर्गुणाचा । मोडे सगुणाचा भक्तिभाव ॥ १४ ॥ संतजन ज्ञानी पूर्ण समाधानी। तेही जपध्यानी सर्वकाळ ॥१५॥ सर्वकाळ ध्यान करीती सज्जन । परी ते निर्गुण ध्यान त्यांचें ॥ १६ ॥ निर्गुणासी पावे सगुणाकरितां । सगुण पाहतां तेथें नाहीं ॥ १७ ॥ नाहीं कां म्हणसी सद्गुरू सगुण । आणि निरूपण बहुविधा ॥ १८ ॥ सद्गुरुसी गेला जो कोणी शरण । तयासी सगुण कोण म्हणे ॥ १९ ॥ सगुणाची नव्हे निर्गुणाची सत्ता । निर्गुणाकरितां सर्व झाले ॥ २० ॥ सर्व झालें जेव्हां निर्गुणाकरितां । तेव्हां सगुणता निर्गुणासी

॥ २१ ॥ निर्गुण हे सर्व करूनि वेगळा । ऐसी आहे लिळा निर्गुणाची ॥ २२ ॥ निर्गुणाची लीळा वांजेची कुमारी । बोलली चतुरीं मानिजेना ॥ २३॥ मानिजेना जरी सृष्टीसी रचिलें । सर्व कोणें केलें तयावीण ॥२४॥ सगुणाचा संग ज्ञानियासी नाहीं । ज्ञानिया विदेही पुरातन ॥२५॥ पुरातन देहीं तरीच विदेही । देहावीण नाहीं विदेहता ॥२६॥ सगुणाची भक्तीअज्ञानें करावी । सज्ञानें करावी निर्गुणाची ॥ २७ ॥ निर्गुणाचा बोध संसार निरसी । तेथें अज्ञानासी रीग नाहीं॥२८॥ उद्धरावें एका सज्जनसंगती । ऐसें वेद श्रुती बोलताती ॥२९॥ मिथ्या शब्दज्ञानें माया वोसरेना । अभक्त तरेना मायापुरी ॥ ३० ॥ मायामोहपूर दुस्तर संसार । अद्वैत विचार जंव नाहीं ॥ ३१ ॥ जंव नाहीं भावें श्रीहरी अर्चिला । तंव नव्हें भला ज्ञानगर्वी ॥ ३२ ॥ संतसंगें धरी सगुण-भजन । स्वधर्मसाधन क्रियाकर्म ॥ ३३ ॥ क्रियाकर्म कैचे ज्ञानियांचें अंगीं । मुक्त ज्ञानी जगीं विचारीतां ॥ ३४ ॥ सांडू नयें भक्ती स्वधर्म विरक्ति । ब्रह्मज्ञान प्राप्ती रामदासीं ॥ ३४ ॥

९ ( शतक ९ वें )

जें जें कांहीं दिसे तें तें सर्व नासे । सर्वातीत असे परब्रह्म ॥१॥ परब्रह्म आहे सर्व विस्तारलें आकारासी आलें तेंचि एक ॥ २ ॥ सर्व कांहीं जीव आणी किडा मुंगी । ब्रह्म, राजयोगी बोलताती ॥ ३ ॥ बोलताती ब्रह्म कल्पना वेगळे । श्रुतीसी नाकळे पार ज्याचा ॥ ४ ॥ पार ज्याचा कळें सज्जनसंगती । सर्व ब्रह्म श्रुती बोलतसे ॥ ५ ॥ बोलतसे श्रुति दृश्य नाशीवंत । स्वरूप ते संत सर्व काळ ॥ ६ ॥ तुज नाहीं झालें ज्ञान शाश्वताचें । ध्यान या भूनांचें करीतोसी ॥७॥ ब्रह्मरूप नव्हे अरूप ठाईचें। रूप तेथें कैचें लावितोसी ॥८॥ सर्व ब्रह्मी बुद्धी तया कैची शुद्धी। कुबुद्धी सुबुद्धी सारीखीच ॥ ९ ॥ सारीखीच बुद्धि झालिया अंतरीं । मग लोकाचारी काय काज ॥ १० ॥ पाहातोसी माया हें तुज दीसतां । एरवी हें सत्य सत्य ब्रह्म ॥११॥ सर्व ब्रह्मीं मन कैसें विश्वासलें । अंतवंत गेले हारपोनी ॥१२॥ हारपोनी गेलें रूप हें थीजलें ।

जरी विघूरलें तरी तूप ॥१३॥ तूप हें चळोन जाहलें पातळ। ब्रह्म हें अचळ चळेना कीं ॥१४॥ चळेना कीं तूपपण त्या तुपाचें। तैसें जाण साचे सर्व ब्रह्म ॥ १५ ॥ भावितां तरंग कोणीकडे गेला। सागरु सचला जैसा तैसा ॥१६॥ तैसा हा विस्तार तरंगाचे परी। साच हा चतुरीं मागिजेना ।१७। योगीयांचा भाव योगीच जाणती। सर्वही देखती ब्रह्मरूप ॥१८॥ ब्रह्मरूप होतां भावार्थे मोडला। आत्मा हा जोडला आत्मरूपें ॥१९॥ रुपें ब्रह्म झाला तया सर्व ब्रह्म। भ्रमिष्टासी भ्रम भासतसे ॥ २० ॥ जाणिजेना सर्व ब्रह्म ऐसी खूण। तयासी संपूर्ण ज्ञान कैंचें ॥ २१ ॥ ऐक्य रूपें जया बाणला विश्वास। तया भेदभास आढळेना ॥ २२ ॥ बोलतोसी परी नाहीं समाधान। तुज हें अज्ञान मागें पुढें ॥२३॥ विस्तारलें सर्व मायेचें स्वरूप। माया मिथ्या रूप जाण बापा ॥ २४ ॥ जाण बापा सर्व ब्रह्माचें स्वरुप। माया मिथ्या रूप कल्पना हे ॥ २५ ॥ सर्व कांहीं मिथ्या मग सर्व ब्रह्म। दृश्यातीत वर्म अनुर्वाच्य ॥२६॥

आधी सर्व मिथ्या होउनियां गेलें। मग पुढें झालें अनुर्वाच्य ॥ २७ ॥ अनुर्वाच्य झालें ब्रह्म बोलों नये। न्यूनपूर्ण काय पाहाशील ॥२८॥ पाहाणें खुंटलें बोलणें तुटलें। सस्वरूपीं झालें ऐक्यरूप ॥ २९ ॥ ऐक्यरूपें रामीं रामदासीं झालें। बोलणें खुंटलें तेथुनियां ॥३०॥

## १० ( शतक १० वें. )

पृथ्वी आप तेज वायु हें आकाश। ऐसें सर्व दृश्य कोणें केलें ॥ १ ॥ केलें हें देवानें सर्व चराचर। आपण ईश्वर वेगळाचि ॥२॥ संतजनीं काय कोणासी सांगाव। लोक कुडभावें पुसताती॥३॥ अंतरींचें गूज शाश्वत जाणावें। संतासी भजावें गुरुरूप॥४॥ जन्म त्ररी संतसाधूसी भजतां। मग संदेहता कोठें राहे ॥ ५ ॥ अंतरलें गूज हातासी चढेल। जरी ते घडेल संतसेवा ॥ ६ ॥ संतसेवा करी विवेक अंतरीं। पाहातां संसारीं तरीजेल ॥ ७ ॥ तरीजेल

२. दुष्ट भावनेनें.

सर्व कांहीं न करितां। संतांसी भजतां सर्व-काळ ॥ ८ ॥ अविश्वासें कदा भजन घडेना । प्रत्ययोचि येना कदा काळीं ॥ ९ ॥ कदा काळीं प्राणी जरी विवरेना । तरी तें घडेना समाधान ॥ १० ॥ समाधान धरे हें तुम्ही करावें । मन विवरावें ज्ञान-मार्गीं ॥ ११ ॥ ज्ञानमार्गीं तूझें मनाचि निघेना । तेथें विवंचना पाहिजे तें ॥ १ ॥ अनाथाचा नाथ श्रीराम तारील । विचार देईल सेवकांसी ॥ १३ ॥ ज्ञानमार्गे-वीण सर्वकाळ शीण। संसार कठीण चुकेना कीं ॥१४॥ चुकेना संसार हे लज्जा तुम्हांसी । मज पतीतासी कोण पुसे ॥ १५ ॥ सावधानपणें काय म्यां करावें । हें मज सांगावें निश्चयेंसी ॥ १६ ॥ निश्चयेंसी देव आधीं ओळखावा । निश्चयो राखावा मनामध्यें ॥१७॥ घडे मनोजय मनासी जाणतां । निश्चयो तत्वतां परब्रह्म ॥ १८ ॥ रीती या ब्रह्माची निरूपणीं कळे । सर्व ही निवळे समाधान ॥१९ ॥ आतां एक करी तत्व विचारणा । तेणें निजखुणा पावशील ॥ २० ॥ तत्वें

तत्वज्ञाना करूनि पाहावें। मीपणाच्या नांवें शून्याकार ॥२१॥ तत्वामधें राहे पाहे सर्व कांहीं। तरी तुज नाहीं मीं तू पण ॥ २२ ॥ मीं तूंपण नाहीं विचारें पाहतां। मज वाटे आतां समाधान॥ २३ ॥ समाधान आहे संगत्याग होतां । हेतूनें दुश्चित होऊं नको ॥ २४ ॥ नको देवा आतां हेतूची संगती । व्यर्थ अधोगती हेतूसंगें ॥ २५॥ सर्वकाळ मज साधूची संगती । विचारानें गती पावईन ॥ २६ ॥ पाविजेते परी वृत्ति शून्य होतां । हेतू आठवीतां असमाधान ॥ २७॥ असमाधान घडे ऐसें न करावें । देवें उद्धरावें भक्तजना॥२८॥ समाधान माझें मीपण सोडितां । हें तो मज अतां कळों आलें । २९ ॥ नरदेहीं ज्ञान पाहतां सुटिजे । येर सर्व कीजे निरर्थक ॥ ३० ॥ समाधान रामीं रामदासीं झालें । विचारानें केलें संगातीत ॥३१ ॥

## ११. ( शतक ११ वें. )

वैराग्यापरतें आनु नाहीं भाग्य । धन्य तें

१. दुसरें.

वैराग्य ज्ञानियांसी ॥ १ ॥ ज्ञानियांसी काय करावें वैराग्यें । ज्ञानियांसी भाग्य तत्वबोधें ॥२॥ तत्व-बोधें घडे शब्दज्ञान सोपें । परी अनुतापें त्याग घडे ॥ ३ ॥ आलया संसारीं अनुतापेंवीण । शब्दज्ञान शीण वाउगाची ॥ ४ ॥ सार जाणोनियां असार त्यागावें । तरीच भोगावें मुक्तिपद ॥ ५ ॥ पद हें मुक्तिचें तत्वज्ञान जोडे । बोडके उघडे कासयासी ॥ ६ ॥ कासया करावें वैराग्याचें दंभ । सुखाचें स्वयंभ मोक्ष-पद ॥ ७ ॥ आत्मज्ञानें त्याग सर्वांचा करावा । मग उद्धरावा विश्व-जन ॥ ८ ॥ विश्वजनीं भोग तोचि राजयोग । भोगितांचि त्याग ज्ञानीयांसी ॥ ९ ॥ विवेचना भ्रमें होय मूढजना । ज्ञानी तो लिंपेना करूनियां ॥ १० ॥ त्यागितांचि भोग भोगितांचि त्याग । ऐसा ज्ञानयोग जाण बापा ॥ ११ ॥ करावा आदरें वृत्ति उदासीन । तेणें तुटे ध्यान विषयांचें ॥१२॥ सांग बापा कोण विषयीं तरला । कोण उद्धरला भोगितांचि ॥ १३॥ ॥ भोगितांचि सर्व सज्जन तरले । विषय भोगिले पंच-

विधा ॥१४॥ पंचही विषय त्यागूनी बाधक । शुद्ध ते साधक सेविताती ॥१५" आलया रे त्यागी तयासी म्हणावें । जेणें हें जिणावें[1] शिस्नोदर[2] ॥१६॥ संतसंगें त्याग अंतरींचा होय । बाह्यात्कार काय करूनीयां ॥१७॥ संतसगें बाणे विवेक वैराग्य । योगियांचे भाग्य पाठीं लागे ॥१८॥ लागतो विवेक अंतरीं धरावा । संसार करावा सुखेनीवें[3] ॥१९॥ भिक्षाटण वायां कासया करावं । आश्रमीं भजावें अतीतासी ॥२०॥ तीर्थाटण काय पहाशील मूढा । पाणी आणि धोंडा जेथें तेथें ॥२१॥ तीर्थाटणें सदा इच्छिती साधूसी । तीर्थें साधूपासीं शुद्ध होती ॥२२॥ होती परी साधु कोणासी दिसेना । साधू तो असेना मायाधारी ॥२३॥ मायाधारी साधू जनासी दिसतो । परी जाणावा तो पद्मनेत्र ॥२४॥ पद्मपत्रा ऐसे संसारीं असती । हें कदा कल्पांतीं सत्य नव्हे ॥ २५ ॥ सत्य नव्हे कैसे दुर्वास श्रीपती । आणि चक्रवती जनक एक ॥ २६ ॥ होती निस्पृहत तेचि झाले मान्य । येर ते जघन्यं[4] लोलंगतां[5] ॥ २७ ॥

---

१ जिंकावें. २ जननेंद्रिय + उदर = काम + जिव्हालौल्य ३ सुखानें. ४ अधम. ५ लोभ.

पापरूपी मनीं परस्त्री चिंतितो। संसारीं भोगितो आपु-
लीच ॥ २८। निश्चयो चळतां योगी तापसांचा। मग
तया कैसा परलोक ॥ २९ ॥ ब्रह्माचि होऊनि संसारीं
असावें। परी न लिंपावें कर्मवेळीं ॥३०॥ गोड वाटे
जया सर्व ब्रह्ममाया । जन वन तया सारिखेचि
॥ ३१ ॥ गुरूमुखें झालें ज्याचें समाधान। त्यासी
वणवण कदा नाहीं ॥ ३२ ॥ नाहीं जया आला
संसाराचा वीट। तया मोक्ष वाट सांपडेना ॥ ३३ ॥
कदाकाळीं प्राप्त भोगावें सुटेना । देहाची भावना
वेगळाली ॥ ३४ ॥ केलियानें होतें केलेंची पाहिजे।
जे मनीं धरिलें तेंचि होतें ॥ ३५ ॥ होतो प्रयत्न
खरा प्रारब्धासारिखा। कांहीं पूर्व रेखा पाहिजे ते
॥ ३६ ॥ पाहिजे तो यत्न आदरेंसी केला ॥ मग
प्रारब्धाला शब्द घडे ॥ ३७ ॥ होत जात परी
प्रयत्नेंविण नाहीं। आधीं प्रयत्न कांहीं पाहिजे तो
॥ ३८ ॥ भक्तिमात्र क्रिया मोक्षाचें साधन। वीत-
रागी मन सर्वकाळ ॥ ३९ ॥ सर्वकाळ जेथें कथा

निरूपण । श्रवण मनन निजध्यास ॥ ४० ॥ निज-ध्यास मन वृत्ती उदासीन । नावडे कांचन आणि कांता ॥ ४१ ॥ कांता पुत्र धन वैभव स्वजन । गामत्रीण अन्य आवडेना ॥ ४२ ॥ आवडेना भार नाथीलीं संसार रामदासीं सार रामदास्य ॥ ४३ ॥

## १२ ( शतक १२ वें )

प्रयत्न आहे थोर पाहावा विचार । येणें पैल पार पाविजे तो ॥ १ ॥ होत नाहीं प्रयत्नें ऐसें काय आहे । विचारूनी पाहे आलया रे ॥२॥ कांहीं तरी केलें पाहिजे संसारीं । कांहींच न करी ऐसा कोण ॥ ३ ॥ ऐसा कोण आहे प्रारब्धावेगळा । होणाराची कळा वेगळी ते ॥ ४ ॥ वेगळीच कळा जाण जाणत्याची केल्याही होताचि विवंचना ॥५॥ सर्व कांहीं प्रयत्न

---

१. लटका

केलियानें होतो । आळसी पडतो सावकास ॥ ६ ॥
होत आहे परी प्रयत्नेंवीण नसे । केल्याविण कैसे
भोग होती ॥७॥ अकस्मात तरी प्रयत्नीच भोगील ।
आळसी पडेल सावकास ॥८॥ पूर्वदत्त केलें प्रयत्न
करुनियां । वाउगेचि वायां बोलतोसी ॥९॥ बोलतोसी
परी प्रारब्ध सोडीना । धावतांनें जना होत नाहीं॥१०॥
होत नाहीं जरी कां यत्न करिसी । खातो जेवितोसी
कासयासी ॥११॥ पूर्व रेखा कोणी लिहिली अदृष्टीं ।
हेंचि एक गोष्टी बरी पाहे ॥ १२ ॥ पाहील कोण
संचिताविाचून । देह कर्माधीन चालतसे ॥ १३ ॥
चालतसे परी चालवावें लागे । कांहीं तरी मागें
कोणी एक ॥१४॥ निश्चयेंसी आतां होणार म्हणसी ।
कांहींच यत्नासी करूं नको ॥१५ ॥ करूं नको ऐसें
व्यर्थाचि उत्तर । पूर्वींच होणार होउनी गेलें ॥ १६ ॥
होउनी गेलें तरी कां करावें । उगेंचि राहावें पडोनिया

॥ १७ ॥ होत आहे तोगें तोचि प्रयत्न जाण । प्रयत्नेवीण कोण जन्मा आला ॥ १८ ॥ कोणें परी आतां अदृष्ट चुकतें । न पेरितां होतें धान्य कैसें ॥ १९ ॥ कैसें होतें धान्य पेरिल्यावांचून । बोलिलें वचन सांडू नका ॥ २० ॥ विषय सोडूनी भजावें देवाला । देव होणाराला पालटीना ॥ २१ ॥ पालटीना देव ऐसें म्हणो नये । देवचि उपाय भक्तजना ॥ २२ ॥ ब्रह्म प्राप्त होतें संतांचे संगती । येरा अधोगतीं गर्भवास ॥ २३ ॥ गर्भवास होती पूर्वीच्या संचीतें । आतां कांहीं येथें यत्न नाहीं २४ यत्न नाहीं कोणा ज्या नाहीं कैपक्षी ॥ भक्तजना रक्षी देवराणा ॥ २५ ॥ निश्चयेसी भक्त प्रारब्धा आधीन । येथें भक्तजन काय करी ॥ २६ ॥ कैसें बोलतोसी मर्यादा सांडूनी । रावण मारुनि मुक्त देव ॥ २७ ॥ आहे यत्नकर्म तोडावया। लागी। मुक्तीचें विभागी भक्तजन ॥ २८॥ भक्तजन

दोनी प्रारब्धापासूनी। प्रारब्धावांचुनी थोर नाहीं ॥ २९ थोर नाहीं ऐसें कैसेनि जाणावें। रूप ओळखावें उभयतांचें ॥ ३० ॥ उभयतां कोण प्रारब्ध प्रयत्न। आधीं जे निर्माण तेंचि थोर ॥ ३१ ॥ थोर मूळमाया निराकारीं झाली। प्रारब्धीची ओळी तेथें नाहीं ॥ ३२ ॥ नाहीं क्रियमाण ते शब्द स्फुरण। जें महाकारण ब्रह्मांडीचें ॥ ३३ ॥ जीवसृष्टी झाली उत्पत्ति संहार। प्रारब्ध व्यवहार ऐलीकडे ॥ ३४ ॥ ऐलीकडे कर्म मुळीचा तो प्रयत्न। श्रोत्रीं सावधन विवरावें ॥ ३५॥ आहे निराकार निर्मळ निश्चळ। तेथूनी चंचळ प्रयत्न झाला ॥ ३६ ॥ प्रयत्न झाला आधीं म्हणोनियां थोर। प्रारब्ध विचार ऐलीकडे ॥ ३७ ॥ ऐलीकडे कर्म पाहतां भूतळीं। प्रयत्न अंतराळीं मुळारंभ ॥ ३८ ॥ आरंभापासूनी सर्व ही शोधावें। कर्म पडे ठावे विवरतां ॥ ३९ ॥ विवरतां सर्व आशंका फिटली। जाण तया भली विवंचना ॥ ४० ॥ मावळला भ्रम रामगुण गातां। उपासना आतां सांडूं नये ॥ ४१ ॥

## १३ ( शतक १३ वें )

### ( रामचरित )

नमूं एकदंता माता ब्रह्मसुता । सद्गुरू समर्था दंडवत ॥ १ ॥ तरावया रामनामाची सांगडी । साधनें बापुडीं शिणावया ॥ २ ॥ शिणावया मूळ लोभची केवळ । जाहाला चांडाळ वाल्हा कोळी ॥ ३ । वाल्हा कोळी लोभ सांडुनि बैसला । नामें उद्धरला रामाचेनि ॥ ४ ॥ रामाचेनि नामें वाल्हा तो वाल्मिक । तया ब्रह्मादीक जाणतील ॥ ५ ॥ जाणतील शत कोटी रामायण । भविष्य कवण दुजा करी ॥ ६ ॥ सांगईन रामचरित्र तें निर्मळ । जैसें तें मंडळ मार्तंडाचें[1] ॥ ७ ॥ मार्तंडाचे कुळीं राघव जन्मला । भाग्योदय झाला विबुधांचा[2] ॥ ८ ॥ जोड झाली थोर ऋषी संतोषले । यज्ञ सिद्धी नेले रामचंद्रें ॥ ९ ॥ रामचंद्रें बाणीं ताटीका

---

१ सूर्याचें. २ देवांचा.

पिटिली । शिळा उद्धरीली हेळामात्रें ॥ १० ॥ हेळा॰
मात्रें रामें त्रिंबक भंगिलें । आणि प्रणीयेलें जानकीसी
॥ ११ ॥ जानकीस केला रामें वनवास । पितयाची
भाषा मुक्त केली ॥ १२ ॥ मुक्त करावया त्रिदश
देवासी । रामें वैभवासी सोडियलें ॥ १३ ॥ सोडीयलें
सर्व जाहला तापसी । पंचवटीकेसी वास केला
॥ १४ ॥ वास केला रामें मारीले राक्षस । खरदुषणास
संहारीलें ॥ १५ ॥ संहारीलें दैत्य कुरंगा पिटीलें ।
तंव मागें नेले जानकीसी ॥ १६ ॥ जानकीसी नेलें
रावणें चोरूनि । बंधू दोघे वनीं पाहताती ॥ १७ ॥
पाहताती पुढें जटायू भेटला । रामें केला मुक्त निज॰
हस्तें ॥ १८ ॥ निजहस्तें वनीं कबंधा मारीलें । राम
मुक्त केलें निजदासा ॥ १९ ॥ राघवासी भावें भेटला
मारुती । रामचंद्र चित्तीं संतोषिले ॥ २० ॥ निजदास
रामें सुग्रीव रक्षिला । वाली वधीयेला दुष्टबुद्धी

---

१ सहज. २ शिवधनुष्य. ३ लग्न केलें.
४ हरणास

॥ २१ ॥ दुष्टांचा संहार धर्माची स्थापना । जानकी-जीवना राघवासी ॥ २२ ॥ असंख्यात कपी सुग्रीवें आणिलें । जैसें उचललें कुलाचळ ॥ २३ ॥ कुलाचळा ऐसें वानर मिळालें । लंकेवरी भार चालीयेले ॥ २४ ॥ लंकेवरी कपी दळभारं आला । सिंधू पाल्हाणिला[1] रामचंद्रें ॥ २५ ॥ रामचंद्रें आपंगिलों[2] बिभीषण । पुढें कपीगण धाविन्नले ॥ २६ ॥ धाविन्नले तेंही त्रिकुट वेष्टीलें । राक्षसांचें थाट चालियेले ॥ २७ ॥ चालीले राक्षस भीडती वानर । दैत्यांचा संहार आरंभिला ॥२८॥ लक्ष्मणें वीर इंद्रोजी दारुण । मारिला रावण रामचंद्रें ॥ २९ ॥ फोडियेल्या रामें सर्व बंदीशाळा । आपुलाल्या स्थळा देव गेले ॥३०॥ देव गेले सर्व मारिला रावण । लंके बिभीषण स्थापियेला ॥ ३१ ॥ स्थापीयेला रामें जानकी आणिली । अग्नींतूनि झाली दिव्यरूप ॥ ३२ ॥ झळकती विमानें

---

१ समुद्रावर पूल बांधला. २ आश्रय दिला.

दिव्य महाथोर । बैसले वानर तयामधें ॥ ३३ ॥ तयामध्यें मुख्य राम लक्ष्मण । सीता सुलक्षणें पतीव्रता ॥ ३४ ॥ राम आले शीघ्र भेटी भरतासी । मातै अयोध्येसी जाणवली ॥ ३५ ॥ जाणवली मात जाहला आनंद । आनंदाचा कंद राम आला ॥ ३६ ॥ सुखी केल्या माता कौसल्या सुमित्रा । कैकयी सुंदरा सुखी केलें ॥ ३७ ॥ आशीर्वादीं राम पूजिला ब्राह्मणीं । मग सिंहासनीं आरूढला ॥ ३८ ॥ मायबापें रामें सर्व सुखी केलें । मग बोळविलें निजदास ॥ ३९ ॥ नाहीं नाहीं जनीं बंधनाचें पाप । सुखी सुखरूप रामराज्य ॥ ४० ॥ रामराज्यीं नाहीं जनासी ताडण । धर्म संरक्षण राम एक ॥ ४१ ॥ राज्य केलें रामें सुख सर्व जना । वैकुंठ भुवना पुरी नेली ॥ ४२ ॥ निजदास मागें मारुती ठेविला । चिरंजीव केला कल्प कोडी ॥ ४३ ॥ वैकुंठासी राम गेले विश्रांतीये ।

१ गोष्ट, बातमी.

जनासी उपाया हनुमंत ॥ ४४ ॥ हनुमंतीं आहे राम निश्चयेसी । रामीं रामदासीं ऐक्यभाव ॥ ४५ ॥

## श्रीकृष्णचरित्र

### १४ ( शतक १४ वें )

नमस्कार माझा विघ्नविनाशना । शारदा आनना[1]-माजीं राहो ॥ १ ॥ सर्वकाळ मुखीं गोविंदाचें नाम । कीर्तन उत्तम यादवांचें ॥ २ ॥ यादवाचे कुळीं गोकुळीं गोविंद । आनंदाचा कंद अवतरला ॥ ३ ॥ कारागृहीं माता पिता वासुदेव । तेथें आले देव सोडवणें ॥ ४ ॥ निजरूप देवें सांडुनी कौतुक जाहला बाळक नंद-जीचे ॥ ५ ॥ नंदजीचे बाळ करी पंथे[2] मोकळा जावया गोकुळा विश्रांतिये ॥ ६ ॥ विश्रांतीसी आलें स्थल पालटीलें । तंव जाणविलें कंसराया ॥ ७ ॥ कंस-

१ मुखामध्यें. २ मार्ग.

राय जाये मारू आपटूनी । मणकट मोडुनी उसळली ॥ ८ ॥ उसळती म्हणे कसा तुझा वैरी । गोकुळा माझारीं वाढतसे ॥ ९ ॥ झाली तळमळ ऐकोनी कंसासी । लागली मानसीं थोर चिंता ॥ १० ॥ माभळभट आले रायें सन्मानिलें । तयाप्रती बोलें कांहीं एक ॥ ११ ॥ कां करितां चिंता तया बालकाची । वधूनी शीघ्रची येतों आतां ॥ १२ ॥ नंदजीचें बाळ आले मुटावरी । बैसउनी नारी सांगतसे ॥ १३ ॥ लेकुरासी क्रोध ऐकोनी वचन । मग पढिदान आरंभिलें ॥ १४॥ पृष्टभागीं थोर जाहलें ताडण । भेटीं बहु शीण पावलेती ॥ १५ ॥ पावली पूतना म्हणे काय झालें । बाळकें मारिलें ब्राह्मणासी ॥ १६ ॥ बालकासी जेणें दिलें पढिदान । तयासी मारीन शिघ्रकाळें ॥ १७ ॥ शीघ्रकाळें विषें भरले पयोधर ।

---

१ मारणें

पावली मंद्रार पूतना ते ॥१८॥ बालकासी पुढें घेऊनी चुंबन । देते स्तनपान आदरेसी ॥ १९ ॥ सोसीलि पूतना आक्रंदे मानसीं । मुकली प्राणासी कृष्णमुखें ॥ २० ॥ कृष्णमुखें रीद्वासुर रगडीला । लाता विघडिला सगटासूर ॥ २१ ॥ विश्वलोक नांदे जयाच्या उदरीं । गाई राखी हरी गोवळीयांच्या ॥२२॥ गोपाळाचा चेंडू खेळतां उडाला । जाउनी बुडाला डोहामध्यें ॥२३॥ डोहामध्यें कृष्णें टाकियेली उडी । पाहतातां गडी संवगडे ॥ २४ ॥ संवगडे गेले सांगों नंदापासीं । यशोदे मातेसी सांगताती ॥ २५ ॥ सांगताती कृष्ण बुडाला तुमचा । जेथें कालयाचा डोह आहे ॥२६॥ डोहामाजीं क्रूर काळया मिखार । परस्परें थोर युद्ध झालें ॥२७॥ युद्ध झालें थोर काळया नाथिला । गोकुळासी आला कृष्णनाथ ॥ २८ ॥ समुदाय सर्व गोपाळ स्वजन । बेळें गोवर्धन उचलीला ॥ २९ ॥

उचलीला तळीं राखिलें गोकुळ । इंद्राचा सर्व गर्व नेला ॥ ३० ॥ नेले मथुरेसी अक्रूर कृष्णासी । मल्लचाणुरासी वधीयेलें ॥ ३१ ॥ वधीयेला कंस घातलें आसन । तेथें उग्रसेन बैसवीला ॥३२॥ मारीला शिशुपाल आणि भस्मासूर । मारीला असूर जरा-संध ॥३३॥ थोर ख्याती केली अर्जूना रक्षीलें । सर्व साह्य केलें पांडवांचें ॥ ३४ ॥ पांडवांचा सखा सर्व साह्यकारी । संकटीं कैवारी द्रौपदीचा ॥ ३५ ॥ गोपां-गना राधा रुक्मिणी सुंदरी । सुखें राज्य करी यादवेंसीं ॥३६॥ यादवासी श्राप दिला ऋषेश्वरीं । मांडली बोहरी तेणें मिषें ॥३७॥ तेणें मिषें सर्व आटले यादव । ते काळीं उद्धव उपदेशिला ॥३८॥ उपदेशिला दास श्रीकृष्णें आपला । आवतार झाला पूर्ण आतां ॥३९॥

———:०:———

# ८ स्फुट ओव्या

१ काया माया छाया हे कांहीं तगेना । वैभव जगेना जन्मवरी ॥ १ ॥ जन्मवरी लोक देखत आहेती । कितीएक जाती सांडूनिया ॥ २ ॥ सांडूनिया जाती कन्या पुत्र धन । सर्व साभिमान लौकिकाचा ॥ ३ ॥ लौकिकाचा भाव लौकिक राहिला । प्राणीमात्र गेला एकलाची ॥ ४॥ एकलाची येतो एकलाची जातो । मध्येंची भुलतो मायाजाळें ॥ ५ ॥ मायाजाळ माया हें कांहीं सुटेना । नाचवी वासना अनावर ॥ ६ ॥ अनावर मन कदा आवरेना । धारितां धरेना आनुमानें ॥ ७ ॥ अनुमानें काहीं नव्हे समाधान । जंव आत्मज्ञान पाविजेना ॥ ८ ॥ पाविजेना मोक्ष तुटेना बंधन । श्रवण मनन जेथें नाहीं ॥ ९ ॥ जेथें नाहीं सारासार विचारणा । या जन्म मरणा ठाव तेथें ॥ १० ॥ तेथें ठाव झाला देह-संदेहासी । होती पापराशी अनुमानें ॥ ११ ॥ अनुमानें पाप अनुमानें पुण्य । अनुमानें धन्य होईजेना ॥ १२॥ होईजेना धन्य विचारणेविण । लौकिकाचा

क्षीण व्यर्थ जातो ॥ १३ ॥ व्यर्थ जातो क्षीण देखत देखतां । लोकिक-तत्वता राखवेना ॥ १४ ॥ राखवेना परी राखीला पाहिजे । मनामध्यें किजे विचारणा ॥ १५ ॥ विचारणा कीजे या देवभक्तांची । कर्ता कोण तोची ओळखावा ॥ १६ ॥ ओळखावा कर्ता सर्वत्र सृष्टीचा । मी तो कोण कैचा धुंडाळावें ॥ १७ ॥ धुंडाळावें महावाक्य पंचीकरण । तत्वाचें विवरण यथासांग ॥ १८ ॥ यथासांग व्यंग पडोचि नेदावें । अत्यंतची व्हावें सावधान ॥ १९ ॥ सावधानपणें देवासी पाहणें नाशीवंत जाण सांडूनिया ॥ २० ॥ परब्रह्म तेचि आपणची आहे । दास म्हणे पाहे अनुभवें ॥ २१ ॥

२ अज्ञान जनाचे देव नानापरी । त्याची संख्या कोण करी आतां ॥ १ ॥ कोण आतां देव पावेल तयासी । जन्म मरणासी चूकवीता ॥ २ ॥ सार्थकाचा देव तरीच सांपडे । जरी कांहीं घडे संतसेवा ॥ ३ ॥ संतसेवा भावें करितां तरले । जन उद्धरले नेणो किती ॥ ४ ॥ नेणो किती जन साधूचे संगती । आपुले प्रचीति मुक्त झाले ॥ ५ ॥ मन्त

झाले ज्ञानें विचारें पाहता । स्वरूपी राहतां निरंतर ॥ ६ ॥ निरंतर देव फुटेना तुटेना । चळेना ढळेना कदा काळीं ॥ ७ ॥ निरंतर देव पाहतां दिसेना । परी तो नासेना कल्पकोटी ॥ ८ ॥ कल्पकोटी गेले देवासी नेणतां । यातना भोगितां जन्मोजन्मीं ॥ ९ ॥ जन्मोजन्मी देव जवळी चूकला । प्राणा भांबावला मायाजाळीं ॥ १० ॥ गुरुमुखें ब्रह्मविचार पाहावा । निश्चयो राहावा निर्गुणाचा ॥ ११ ॥ निर्गुणाचा ध्यास निर्गुण करील । मग उद्धरील आपणासी ॥ १२ ॥ आपणासी पाहे जो कोणी शोधूनी । तो जन्मा पासूनी मुक्त झाला ॥ १३ ॥ दुःख-मूळ जन्म झाले नीरसावा । विवेक पहावा सारासार ॥ १४॥ समाधान राहे निःसंग राहतां । संग पाहे जातां कासावीस ॥ १५॥ समाधान राहे संताचे संगती । वस्तूची प्रचीती वस्तूरूप ॥ १६ ॥ लोकांमध्यें परलोकची साधावा । भगवंत शोधावा नानापरी ॥ १७ ॥ नानापरी सांगे रामीं रामदास । भाविकें विश्वास सोडूं नये ॥ १८ ॥

( ३ ) संसार करितां । होय सायुज्यता ऐसें कांहीं आतां सांगा स्वामी ॥ १ ॥ सांगा स्वामी कोण स्थिती जनकाची । राज्य करितांचि मुक्त कैसा ॥ २ ॥ मुक्त कैसा होता देहींच वेदेही । कैसा लिप्त नाहीं करूनीया ॥३॥ करूनीयां सर्व आपण वेगळा । सांगा तेची कळा आम्हालागी ॥४॥ आम्हालागीं सांगा त्याचें समाधान । रामदास खूण पुसतसे ॥ ५ ॥ पुसतसे आतां पाहिजे बोलिले । कैसें राज्य केलें विदेह्यानें ॥ ६॥ विदेह्यानें सत्य स्वामीचें वचन । तेथें विश्वासोन वर्ततसे ॥ ७ ॥ वर्ततसें जनीं अहंता सोडूनी । आदीकारणी प्रकृति हे ॥ ८ ॥ प्रकृतीचा प्रांत आद्य मध्य अंत । तेंचि तें निवांत रूप तुझें ॥ ९ ॥ आपणा पाहतां झाली तन्मयता । सोहं हे तत्वतां मनीं धरी ॥१०॥ मनीं धरी सोहं आत्मा हें वचन । तेणें समाधान पावशील ॥ ११ ॥ पावशील निज स्वरूप आपलें । जरी विश्वासलें मन तेथें ॥ १२ ॥ मन तेथें जाये वचनासरीसे । तव मनीं नसे मनपण ॥ १३॥

मनपण गेलें स्वरूप पाहतां । तैसेची राहतां समाधान ॥ १४ ॥ समाधान बाणे त्यागितां संगासि । जनकें शुकासी सांगितलें ॥ १५ ॥ सांगितले संग त्यक्त्वा सुखी भव । मग अनुभव शुक पाहे ॥ १६ ॥ शुक पाहे संग काय म्यां धरीला । विवरों लागला सस्वरूपीं ॥ १७ ॥ सस्वरूपी शुक नामरूप नाहीं । जनक विदेही आढळेना ॥ १८ ॥ आढळेना तुटी तेथें कैंची भेटी । आठवण पोटीं स्वरूपाची ॥ १९ ॥ स्वरूपीं आठवी आपुला विसरूं । शुक योगेश्वरू संगातीत ॥ २० ॥ संगातीत झाला निःसंग पाहतां । येणें रीती आतां समाधान ॥ २१ ॥ समाधान बाणे सज्जन संगती । तिन्हीही प्रचीती ऐक्य रूप ॥ २२ ॥ प्रकृतीचें रूप नव्हे तूं स्वरूप । पुण्य आणि पाप देहसंगें ॥२३॥ देहसंग बापा निःसंगासी कैंचा । वृत्तिनिवृत्तीचा शून्याकार ॥ २४ ॥ संतजन तेणें सुखें सुखावले । तेंचि हें बोलिलें ओवीमीषें ॥ २५ ॥ ओवीमीषें गुप्त पंथ हा सांपडे । गुज ठायीं पडे योगीयांचें ॥ २६ ॥ योगीयांचें गुज योगीच जाणती । जेथें नेति नेति वेद बोले ॥ २७ ॥ वेद बोलियेला त्रिविध वचन । कर्म उपासना आणि ज्ञान॥२८॥समाधान घडे साधूचे संगती। गीता भागवती हेंचि आहे ॥२९॥ संतसंगें देव पाविजे

तत्वता । शास्त्रें धुंडाळिता आढळेना ॥ २० ॥ साधुसंगें ज्ञान रामदासीं झालें । शरीर लागलें भक्तिमार्गें॥२१॥

(४) आम्हा नाहीं चाड ते कोणी एकाची । दृढ राघवाची कास धरूं ॥ १ ॥ कास धरूं जेणें पावनची केलें । तेथें माझें झालें समाधान ॥ २ ॥ समाधान झालें प्रत्ययासी आलें । धन्य ते पाउले राघवाचीं ॥३॥ राघवाचीं पदें मानसीं धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रें ॥ ४ ॥ हेळामात्रें मुक्त करीन या जना । तरीच पावन राघवाचा ॥ ५ ॥ राघवाचा दास मी झालों पावन । पतीत तो कोण उरो शके ॥ ६ । उरो शके ऐसें कल्पांतीं घडेना ॥ ७ ॥ जो कोणी पुसेना त्यासी उणें ॥ ८ ॥ आम्हा नाहीं उणें राघवाच्या गुणें । ब्रीदची राखणें पावनाचे ॥ ९ ॥ पावनाचें ब्रीद आम्हा प्राप्त झालें । प्रचीतीस आलें किती एक ॥ १० ॥ किती एक जन ज्ञानें उद्धरिलें । कृतकृत्य झाले तत्काळची ॥ ११ ॥ तत्काळची मोक्ष हें ब्रीद रामाचें । होत आहे साच येणें काळें ॥ १२ ॥ येणें काळें मोक्ष जरी मी देईना । दास म्हणवीना राघवाचा ॥ १३ ॥ राघवाचा वर पावलों सत्वर । जनाचा उद्धार करावया ॥ १४ ॥ राम आहे वनीं राम आहे जनीं । राम नीरंजनीं सारीखाची ॥ १५ ॥ सर्वकाळ देही असतां त्रिदेही

रामदासी नाहीं जन्ममृत्य ॥ १६ ॥

( ५ ) प्रथम लिहीणें दुसरें वाचणें । तिसरें सांगणें अर्थांतर ॥ १ ॥ आशंका निवृत्ति ऐसी चौथी स्थिती । पांचवी प्रचीती अनुभवें ॥ २ ॥ सहावें तें गाणें सातवें नाचणें । टाळी वाजवणें आठवें तें ॥ ३ ॥ नववा अर्थ भेद दहावा प्रबंध । अक्रावा प्रबोध प्रचीतीसी ॥ ४ ॥ बारावें वैराग्य तेरावा विवेक चौदावा तो लोक राजी राखे ॥ ५ ॥ पंध्रावें लक्षण तें राजकारण । सोळावें तें जाण अव्यग्रता ॥ ६ ॥ प्रसंग जाणावा हा गूण सत्रावा । काळ समजावा सर्वाठायीं ॥ ७ ॥ आठरावें लक्षण वृत्ति उदासीन । लोलंगता जाण तेथें नाहीं ॥ ८ ॥ एकोणिसावें चिन्ह सर्वांसीं समान । राखे समाधान ज्याचें त्याचें ॥ ९ ॥ विसावें लक्षण रामउपासना । वेध लावी जना भक्तिरंगें ॥ १० ॥ जन्मासी येऊनी अध्यात्म साधावें । नित्य विवरावें सारासार ॥ ११ ॥ एकलेची यावें एकलेची जावें । मधेंची स्वभावें मायाजाळ ॥ १२ ॥ मायाजाळ तुटे तरी देव भेटे । दास म्हणे खोटें भक्तीहीन ॥ १३ ॥

( ६ ) संसार करावा जीवें सर्वभावें । तुज [1]विसंभावें अंतरगा ॥ १ ॥ ऐसें मज नको करूं रे राघवा

१ विसरावें.

माझा सांवाधावा तूंची एक ॥ २ ॥ स्वयें महा पापी पापची वर्तावे । सज्जना निंदावें सावकास ॥ ३ ॥ दोष राहाटणें या पोटा कारणें । सज्जनाचें उणें काढूं पाहे ॥ ४ ॥ कर्म करवेना धारणा धरवेना । भक्ती उपासना अंतरली ॥ ५ ॥ विषयाचें ध्यान लागलें अंतरीं । दंभ लोकाचारी खटाटोप ॥ ६ ॥ निष्ठा भ्रष्ट झाली स्नान संध्या गेली । दुराशा लागली कांचनाची ॥ ७ ॥ देव धर्म घडे ते ठायीं वेचीना । पुण्य ते साचीना कदाकाळीं ॥ ८ ॥ अशक्त दुर्जन पाहे पर-न्यून । अभिलाषीं मन गुंतलेसें ॥ ९ ॥ कीर्तनीं बैसला पाहे परनारी । परद्रव्यावरी मन गेलें ॥ १० ॥ स्वयें नेणें हित श्रवणीं दुश्चित्त । चंचल हें चित्त स्थिर नाहीं ॥ ११ ॥ तुझीये रंगणीं राहे अभिमान । नाहीं समाधान दास म्हणे ॥ १२ ॥

(७) देह हें असार कृमीचें कोठार । परी येणें सार पाविजे तें ॥ १ ॥ लागवेग करी लागवेग करी । स्वहित विचारी आलयारे ॥२॥ देहसंगें घडे संसारयातना । परी ह्या भजना मूळ देहो ॥ ३ ॥ देहाचेनीं संगें हिंपुटी होईजे । विचारें पाविजे मोक्षपद ॥ ४ ॥ जन्मास कारण मूळ देह—बुद्धि । परी ज्ञान--सिद्धी देहसंगें

१ गडबड. २ कष्टी.

॥ ५ ॥ देहसंगें वाटे स्वयें अभिमान। आणि समाधान देह–संगें ॥ ६ ॥ देहसंगें उठे स्वयातीमत्सर। आणि पैलपार देहसंगें ॥ ७ ॥ देहसंगें जीव होतसे चांडाळ। आणि पुण्यशील देहसंगें ॥ ८ ॥ देहसंगें प्राणी अधोगती जाती। आणि धन्य होती देससंगें ॥ ९ ॥ देहसंगें बद्ध देहसंगें मुक्त। देहसंगें भक्त होत असे ॥ १० ॥ देहसंगें देव आणि भावाभाव। पापपुण्य सर्व देहसंगें ॥ ११ ॥ देहसंगें रोग देहसंगें भोग। देहसंगें योग साधनाचा ॥ १२ ॥ देहसंगें देही विदेही संसारी। सद्भाव अंतरीं देहसंगें ॥ १४ ॥ देहसंगें गती रामदासी झाली। संगती जोडली रामदासी ॥ १४ ॥

(८) संसार करिती म्हणती हा दोषी। न करितां आळशी पोटपोसा ॥ १ ॥ ऐसा हा लौकीक कदा राखवेना। पतितपावना देवराया ॥ २ ॥ भक्ती करूं जाता म्हणती हा पसारा। न करीतां नरा निंदीताती ॥ ३ ॥ आचारें असतां म्हणती नाकधरी। येर अनाचारी पापरूपी ॥ ४ ॥ सत्संग धरीतां म्हणती उपदेशी। येर अभाग्यासी ज्ञान कैंचें ॥ ५ ॥ अभाग्यासी म्हणती ठार्यांचा करंटा। समर्थासी ताठा लावीतसे ॥ ६ ॥ वहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ। न

बोलतां सकळ म्हणती गर्वी ॥ ७ ॥ भेटीस न जातां म्हणती हा निष्ठूर । जातां म्हणती घर बूडवीलें ॥८॥ धर्म न करीतां म्हणती हा सांचितो । करीतां काढितो दिवाळें कीं ॥ ९ ॥ लग्न करूं जातां म्हणती हा मातला । न करीतां झाला नपूंसक ॥ १० ॥ निपुत्रिका म्हणती पहा हा चांडाळ । पातकाचें फळ पोरवडा॥ ११॥ लोक जैसा ओक धरीतां धरेना । अभक्ती सरेना अंतरींची ॥ १२ ॥ दास म्हणे मज तुझाची आधार । दुःसार संसार तरीजेल ॥ १३ ॥

( ९ ) होणार तें कांहीं आतां पालटेना । तरी चिंता मना कां करीसी ॥ १ ॥ हानी मृत्यु लाभ होणार जाणार। सर्वही संसार संचिताचा ॥ २ ॥ लल्लाटीं लीहिलें होऊनीयां गेलें । संचीत भोगीलें पाहिजे तें ॥ ३ ॥ त्यागूनीयां देश सेविला विदेश । तरी सावकाश भोगप्राप्ती ॥ ४ ॥ सुखाचा आनंद दुःखें होय खेद । ऐसें दोनी भेद पुरातन ॥ ५ ॥ देहाचें निमित्त चुकवितां नये । आतां चिंता काय करूनिया ॥६॥ प्रारब्ध चुकेना ब्रह्मादिकांचेनी । सर्व देव, यांनीं भोगयिलें ॥ ७ ॥ रावण वो[१]हर आणि कंसासूर । परी

( १ ) दंपत्य.

तें होणार होत आहे ॥ ८ ॥ ऐसे थोर थोर सांगतां अपार । भोगीले साचार होणारातें ॥ ९ ॥ होणार तें आहे देहाचा संबंध । रामदासी बोध देहातीत ॥ १० ॥

( १० ) अस्थिचा विटाळ होता स्नान केलें । चुडे दातवले कासयाची ॥ १ ॥ आचमन करावें शूद्राच्या विटाळें । हाटाचे चौढाळे कोण जाणे ॥ २ ॥ नदीचे प्रवाहीं अंत पाहों नये । स्नान संध्या होये अग्रोदकें ॥ ३ ॥ ओलें चर्मी शुद्ध होत आहे हिंग । स्वयंपाकी सांग सेवीताती ॥ ४ ॥ रामदास म्हणे हें कोणी न पाहे । देह मुळीं आहे विटाळाचा ॥ ५ ॥

( ११ ) शौच केला तेणें शुचिर्भूत झाला । जल-स्नानें केला मळत्याग ॥ १ ॥ मळ त्यागें झालें शरीर निर्मळ । अंतरीचा मळ कैसा जातो ॥ २ ॥ कैसा जातो काम लोभ आणि दंभ । नांदती स्वयंभु अंतर्यामीं ॥ ३ ॥ अंतर्यामीं आधीं होईजे निर्मळ । तेणें तुटे मूळ संसाराचें ॥ ४ ॥ निष्ठावंत ज्ञान पूर्ण समाधान । मग संध्या स्नान सफळीत ॥ ५ ॥ वर-पंगें देव कदा सांपडेना । निष्ठेचा घडेना भक्तिभाव ॥ ६ ॥ निरर्थक तीर्थें निरर्थक व्रतें । दास म्हणे जेथें ज्ञान नाहीं ॥ ७ ॥

---

१ बाजार. २ गर्दी.

( १२ ) कोणाचें हें घर कोणाचा संसार। सांडुनी जोजार जाणें लागे ॥ १ ॥ जाणें लागे अंतीं एकले शेवटीं। व्यर्थ खटपट सांडूनीयां ॥ २ ॥ जन्मवरी देह संसारीं गोंविले। नाहीं कांहीं केलें आत्महित॥३॥ आत्महित गेलें संसाराचे वोढी। अंतीं कोण सोडी रामेवीण ॥ ४ ॥ रामेवीण कोणी सोडवीना अंतीं। वायाची रडती जीवलगें ॥ ५ ॥ जीवलगीं राम दुरी दुऱ्हावीला। विचार आपुला जाणवेना ॥ ६ ॥ जाणवेना पूर्वसुकृतावांचुनी। पापीयाचे मनीं राम कैचा ॥७॥राम कैचा तया लौकिकाची चाड। पुरविती कोड संसाराचें॥८॥संसाराचें कोड तेंचि वाटे गोड। जया नाहीं वाड[१] अनुताप ॥ ९ ॥ अनुतापी झाले संसारीं सूटलें। राजे राज्य गेले सांडूनीया॥१०॥ सांडूनीया गेले। वैभव संपत्ती। पुढें यातायाती-चेनि भेणें[२] ॥ ११ ॥ भेणं ते शरण रीघाले[३] देवासी। नेले वैकुंठासी भक्तराज ॥१२॥ भक्तराज भावें भेटले देवासी। रामी रामदासी धन्य वेळा ॥ १३ ॥

( १३ ) अनाथांचा नाथ भक्तांचा कैवारी। सिंहासनावरी शोभताहे ॥ १ ॥ शोभताहे राम प्रतापें आगळा। दिसे सौम्य लिला सत्वगुणी ॥ २ ॥ सत्व-

---

१ मोठा. २ भीतीनें. ३ गेले.

गुणी होणें सात्विकाकारणें। कोपें संहारणें दुर्जनासी ॥ ३ ॥ दुर्जना संहार सज्जना आधार। भाविकासी पार पावि-जे-तो ॥ ४ ॥ पाववी तो पार या भव-सिंधूचा। राघव दिनाचा दिनानाथ ॥ ५ ॥ दिनानाथ हरी पतीतपावन। योगीयां जीवन योग—लीला ॥ ६ ॥ लीलावेषधारी भक्तांचें माहेर। ध्यानी गौरीहार चिंती-तसे ॥ ७ ॥ चिंतितसे रामनाम पूर्णकाम। पावला विश्राम रामनामें ॥ ८ ॥ महाभय कैचें रामासी भजतां हें जाण अन्यथा वाक्य नव्हे ॥ ९ ॥ नव्हे सोडवण रामनामेविण। रामदास म्हूण सांगतसे ॥ १० ॥

(१४) देव सर्व जेणें घातले बांदोडीं[1]। त्याची मुरकुंडी[2] रणांगणीं ॥ १ ॥ ऐसा काळ आहे सर्वा गिळीताहे। विचारूनि पाहे आलया रे ॥ २ ॥ इंद्र-जीत नामें इंद्रासी जिंकीलें। त्याचें शीर नेलें गोलां-गुळीं[3] ॥ ३ ॥ देवा दैत्या वाली बळी भूमंडळीं। तया एका काळीं मृत्यु आला ॥ ४ ॥ करें भस्म करी नामें भस्मासुर। तयाचा संहार विष्णु करी ॥५॥ प्रल्हादाचा पिता चिरंजीव होता। नृसिंह मारिता त्यासी होय ॥ ६ ॥ ऐसे थोर थोर प्रतापी अपार। गेले कलीवर[4]

---

१ बंदीखान्यांत. २ शरीराचें संकोचन. ३ वान-रांनीं. ४ शरीर.

सांडूनीयां ॥ ७ ॥ शरीर संपत्ती सर्व गेली अंतीं ! सोसील्या विपत्ती एकाएकी ॥ ८ ॥ म्हणोनी वैभवा कदा भुलों नये । क्षणा होय काय तें कळेना ॥ ९ ॥ रामदास म्हणे स्वहित करणें । निर्धार मरणें मागें पुढें ॥ १० ॥

( १५ ) स्वामीयांची सेवा करीतां उत्तम । स्वामी सुप्रसन्न होत असे ॥१॥ होत असे देव संतुष्ट भजतां । मुक्ति सायुज्यता तेणें लाभे ॥ २ ॥ सज्जनासी पुसा देहास भजतां । भार भगवंता कैसा पडे ॥ ३ ॥ देव पावतसे भजतां देवासी । सेवितां देहासी देव कैचा ॥ ४ ॥ देव कैचा देव सेविल्यावांचुनी । तत्व विवंचनीं दास म्हणे ॥ ५ ॥

( १६ ) सर्व कांहीं चिंता केली भगवंतानें। आपुलें चिंतेनें काय होतें ॥ १ ॥ काय होतें देव कांहीं कां करीना । विश्वासानें मना ऊर्ध गती ॥२॥ ऊर्ध गती हे तो बुद्धीच्या वैभवें । उतराई व्हावें काय आतां ॥ ३ ॥ आतां काय द्यावें काय आहे माझें । मीपणाचें ओझें कासयासी ॥ ४ ॥ कासयासी चित्त दुश्चित करावें । संसारीं तरावें देवाचेनी ॥ ५ ॥ होत असे गती देवीं विश्वासतां । चिंता नाहीं आतां कासयाची ॥ ६ ॥ कासयाची चिंता कासया करावी ॥

भक्ती हे धरावी राघवाची ॥ ७ ॥ राघवाची भक्ती तेणें होय मुक्ती । भक्तिविण युक्ती कामा नये ॥ ८ ॥ कामा नये युक्ती धराया विश्वास । सांगतसे दास प्रचीतीनें ॥ ९ ॥

( १७ ) आतांची ये देहीं मुक्ति पाविजेना । तरी कां सज्जना शरण जावें ॥ १ ॥ शरण जातां भावें सज्जनची व्हावें । शीघ्र उद्धरावें निरूपणीं ॥ २ ॥ निरूपणें निज स्वरूप सांपडे । गुज ठायीं पडे अकस्मात ॥ ३ ॥ अकस्मात ठाव न दिसे आपुला । निरजनीं झाला निरंजन ॥ ४ ॥ विचारणा झाली रामीरामदासीं । आतां या जन्मासी ठाव नाहीं ॥५॥ ठाव नाहीं ऐसें राघवाचें देणें । थोराहूनी होणें थोर स्वयें ॥ ६ ॥

( १८ ) धन्य त्याचें कुळ धन्य त्याचा वंश । जे कुळीं हरिदास अवतरला ॥ १ ॥ धन्य ते जननी धन्य ते कुसी । जे हरिप्रियासी प्रसवली ॥ २ ॥ धन्य ते संबंधी संतांचे सोईरे । प्रसंगें उद्धरे कुळ त्यांचें ॥ ३ ॥ धन्य तो पै देश धन्य तो पै ग्राम । जेथें नित्य-वास वैष्णवाचा ॥ ४ ॥ धन्य ते भाविक वंदिती हरि-दास । तया हृषीकेश वंदीतसे ॥ ५ ॥ धन्य ते निंदक निंदिती सज्जन । येणें भावें घडे ध्यान त्यांचें ॥ ६ ॥

धन्य दास दासी सज्जन सेवसी। ते सुरवरासी वंद्य होती ॥ ७ ॥ धन्य पशु श्वान वैष्णवागृहींचे। कळी काळ त्यांचे पाय वंदी ॥ ८ ॥ रामदास म्हणे तरीच धन्य होणें। जरी संग लाधणें सज्जनाचा ॥ ९ ॥

रामाचें चरित्र सांगता आपार। जाहला विस्तार तिहीं लोकीं ॥ १ ॥ रामनामें कोटी कुळें उद्धरती। संशय धरिती तेची पापी ॥ २ ॥ गर्जती पुराणें आणि संतजन। करावें भजन राघवाचें ॥ ३ ॥ राघवाचें ध्यान आवडे कीर्तन। तोची तो पावन लोकांमध्यें॥४॥ लोकांमध्यें तरे आणि जनातारी। धन्य तो संसारी दास म्हणे ॥ ५ ॥

( १९ ) कण सांडुनियां घेऊं नये भूस। गर्भेंवीण फणस खाऊं नये ॥ १ ॥ खाऊं नये नारिकेळाचें करोटे[१]। सालपट खोटें डाळिंबाचें ॥ २ ॥ डाळिंबाची त्वचा[२] चोवंड[३] उसाचा। स्तंभ कर्दळीचा खातां नये ॥ ३ ॥ खातां नये नाना फळांची आंठोळी। अस्ते हे वाचाळी वाउगीच ॥ ४ ॥ वाउगें सांडुनी सार तेंचि घ्यावें। येर तें सांडावें मिथ्याभूत ॥५॥ नाशीवंत आहे नाम आणि रूप। पाहे आपेआप दास म्हणे ॥ ६ ॥

---

१ मिळवणें. २ कवच. ३ चोयटी.

(२०) रावणासारखी कोणाची संपत्ती। तोहि गेला अंतीं एकलाची ॥१॥ एकलाची गेला तो वाली वानर। कपी थोर थोर तेही गेले ॥ २ ॥ गेले चक्रवर्ती थोर वैभवांचे। फारा आयुष्याचे ऋषीश्वर ॥ ३ ॥ ऋषीश्वर गेले मार्कंडीसारखे। इतराचे लेखे कोण करी ॥ ४ ॥ कोण करी सर्व शाश्वत आपुलें। सर्व राज्य गेलें कौरवांचें ॥ ५ ॥ कौरव निमाले पांडव गळाले यादवही गेले एकसरे ॥ ६ ॥ एकसरां गेले राजे थोर थोर। आणिक श्रीधर भाग्यवंत ॥ ७ ॥ भाग्यवंत गेले एकामागे एक। हरिश्चंद्रादिक पुण्यशील ॥ ८ ॥[1] पुण्यशील गेले कीर्ति ठेउनीयां। पापी गेले वायां अधोगती ॥ ९ ॥ अधोगती गेले देवा न भजतां। [1]संसारीं असतां माझें माझें ॥ १० ॥ माझें माझें सा[2]चाचियेपरी। शे[3]खीं दुराचारी एकलाची ॥ ११ ॥ एकलाची येतां एकलाची जातां। मध्येंची दुश्चिता मायाजाळीं ॥ १२ ॥ मायाजाळीं पापी जन गुंडाळले। पुण्यशील गेले सुटोनीयां ॥ १३ ॥ सुटोनीया गेले सायुज्य पदासी। रामी रामदासी चिरंजीव ॥ १४ ॥

(२१) चंदनसंगती चंदनची होती। होय

१ गणना २ खऱ्यासारखें. ३ शेवटीं.

काळी माती कस्तूरिका ॥ १ ॥ कस्तूरिका होय कस्तूरीच्या योगें । साधुचेनि संगें साधुजन ॥ २ ॥ साधुजन होती संगती धरीतां । मीळणी मीळतां गंगा जेवी ॥ ३ ॥ जेवितां अमृत अमर होईजे । अचळ पाविजे साधुसंगें ॥ ४ ॥ साधुसंगें देव आपणची होणें । अद्वैत लक्षणें बाणलीया ॥ ५ ॥ बाणलीया तया निःसंगाचा संग। होइजे निःसंग आपणची ॥६॥ आपणची ध्यानीं बैसला आसनीं । जनीं आणि वनीं देव भासे ॥ ७ ॥ देव भासे तेणें आपण भुलला । तेणें गुणें झाला देव अंगें ॥ ८ ॥ देवाचे संगती देवची होइजे । चतुर्भुज राजे वैकुंठीचे ॥ ९ ॥ वैकुंठीचे राजे ध्याती अहर्निशीं । वंदिती साधुसी दास म्हणे ॥ १० ॥

( २२ ) दुर्जन संगती कदा धरूं नये । घडती अपाय बहुविधा ॥ १ ॥ बहुविधा झालें अपाय बहुता तेची सांगो आतां सावकाश ॥ २ ॥ कुसंग हे माया धरीतां संगती । गेले अधोगती नेणो कीती ॥ ३ ॥ चांडाळ संगतीं होईजे चांडाळ । होय पुण्यशलि साधुसंगें ॥ ४ ॥ बहुविध रत्न फुटोनियां गेलें । संगतीनें केलें रुधीराचे ॥ ५ ॥ कुरुंद संगती झीजला

१ तांबडा दगड.

चंदन । कुसंगें जीवन नासतसे ॥ ६ ॥ खाराचे संगती नासे मुक्ताफळ । होतसे तत्काळ कळाहीन ॥ ७ ॥ लाखेचे संगती सोनें होय ऊणें । दूध हें लवणें नासतसे ॥ ८ ॥ दुर्जन संगती सज्जन ढासळे । क्रोध हा प्रबळे अकस्मात ॥ ९ ॥ दास म्हणे संग त्याग। दुर्जनाचा । धरा सज्जनाचा आदरेंसी ॥१०॥

( २३ ) जाणे सुखदुःख राम माझा एक । येर तें माईक वैभवाचीं ॥ १ ॥ वैभवाचीं सखी वोरंगोनी[1] जाती । आत्माराम अंतीं जिवलग ॥ २ ॥ जीवलग नाहीं श्रीरामावांचुनी । हाची माझें मनीं दृढ भाव॥३॥ भाव अन्यत्रांचा आहे वरपंगाचा । रामेवीण कैचा अंतरंग ॥ ४ ॥ अंतरींची व्यथा श्रीरामा समर्था । जाणवल्या चिंता दुरी करी ॥ ५ ॥ करी प्रतिपाळ शरण आलियांचा । राम त्रैलोक्याचा मायबाप ॥६॥ मायबाप सज्जन सोयरा । एका रघुवीरा-वीण नाहीं ॥ ७ ॥ नाहीं मज चिंता श्रीराम असतां । संकटीं बोहातां[2] उडी घाली ॥ ८ ॥ उडी घाली मज अनाथा-कारणें । राम सर्व जाणें अंतरींचें ॥ ९ ॥ अंतरींचें गूज राम सर्व बीज । रामदासीं बीज प्रगटलें ॥१०॥

---

१ पळून. २ हाक मारतां.

( २४ ) ऐका नव रस सुंदर सरस । जेणें होय रस सर्वकाळ ॥ १ ॥ प्रथम शृंगार दूसरा तो हास्य । तिसरा तो रस करुणेचा ॥ २ ॥ रौद्र तो चतुर्थ वीर तो पांचवा । रस तो साहावा भयानक ॥ ३ ॥ मोंह तो सातवा बीमत्स आठवा । लज्जा तो नववा रस जाण ॥ ४ ॥ रसीक बोलणें रसीकची गाणें । रसिक वाचणें व संगीत ॥ ५ ॥ ज्याचे त्याचे परी आवडी सारखे । बोलतां ओरखे लुब्ध होती ॥ ६ ॥ लुब्ध होती तरी मृदुची बोलणें । नेमस्त चालावें नीतीन्यायें ॥ ७ ॥ नितिन्याय बहूतेकांसी मानतो । व्याप करील तो भाग्यवंत ॥ ८ ॥ भाग्यवंत नर यत्नासी तत्पर । अखंड विचार चालणेचा ॥ ९ ॥ चालणेचा यत्न यत्नाची चाळणा । अखंड शहाणा तोची एक ॥ १० ॥ प्रवृत्ती निवृत्ती चालणा पाहिजे । दास म्हणे कीजे विचारणा ॥ ११ ॥

( २५ ) रीसाचीये परी व्हावें सावचीत । ध्यानीं भगवंत सोडूं नये ॥ १ ॥ सोडूं नयें सर्व काळ निजध्यास । श्रवण अभ्यास असों द्यावा ॥ २ ॥ असो द्यावा सदा संन्निध विवेक । तेणें देव एक चोजवेल ॥ ३ ॥ चोजवेल

---

१ आर्ष.

देव श्रवण मननें । कुबुद्धि साधनें पालटावी ॥ ४ ॥ पालटावी सर्व देहाची अहंता । शोधावी तत्वता देहबुद्धी ॥ ५ ॥ देहबुद्धि सर्व ज्ञानें शोधूं जातां । निःसंगा अनंता भेटी होये ॥ ६ ॥ भेटी होये ज्ञानें निर्गुण देवाची । मग नाहीं ची ची संसाराची ॥ ७ ॥ संसाराची ची ची यातना यमाची । चूकवीता तोची धन्य एक ॥ ८ ॥ धन्य एक जनीं तोचि तो पाहतां । मुक्ती सायूज्यता तया लाभे ॥ ९ ॥ जया लाभे मुक्ति सगुणाची भक्ती । दास म्हणे शक्ती आगळा तो ॥ १० ॥

( २६ ) जंव तुज आहे देहाचा संबंध । तंव नव्हे बोध राघवाचा ॥ १ ॥ राघवाचा बोध । या देहा वेगळा । देह कळवळा । तेथें नाहीं ॥ २ ॥ साधुवीण राम धांडोळितां श्रम । नव्हेचि विश्राम साधुवीण ॥ ३ ॥ साधुविण राम कदा आकळेना । संदेह तुटेना कांहीं केल्या ॥ ४ ॥ कांहीं केल्या नव्हे साधुसंताविण रामदास खूण सांगतसे ॥ ५ ॥

( २७ ) ऐसा हा मत्सर लागलासे पाठीं । देवा तुझी भेटी कैंवी घडे ॥ १ ॥ भक्तासी निंदीति अभक्त दुर्जन । दुर्जनासीं जन निंदीताती ॥ २ ॥ भिन्न उपा-

सना भिन्न संप्रदाय । एकमेकां सर्व निंदीताती ॥३॥ क्रियेसी निंदीती क्रियाभ्रष्ट ज्ञानी । क्रियाभ्रष्टां जनीं निंदीताती ॥ ४ ॥ निस्पृहां निंदीती संसारीक जन । संसारीकां जन निंदीताती ॥५॥ पंडितापंडितां विकार लागला । पुराणिकां झाला कळहो थोर ॥ ६ ॥ वैदिका वैदिक भांडती नीकुरें । योगी परस्परें भांडताती ॥७॥ प्रपंचीं परमार्थी भांडण तुटेना । लोभ हा सुटेना तेणें गुणें ॥ ८ ॥ स्मार्त ते वैष्णव शाक्त आणि शैव । निंदीताती सर्व परस्परें ॥९॥ स्वजाती विजाती भांडण लागलें । दास म्हणे केलें अभिमानें ॥ ९ ॥

( २८ ) बहुसाल क्षीण होतसे कठिण । देवासी जतन करावया ॥ १ ॥ करावया भक्ती भावें महोत्सव । देवासाठीं राव वोळगावा ॥२॥ वोळगावा राव राखावया देव । देवासी उपाय मनुष्याचा ॥ १ ॥ मनुष्याचा देव पूजीतां कष्टलों । कासावीस झालों वाउगाची ॥३॥ वाउगाची देव पाषाणाचा केला । भाव हा लागला तयापाशीं ॥ ४ ॥ तयापाशीं मन अखंड लागलें । तों तया फोडिलें कोणी एकें ॥ ५ ॥ कोणी एकें बरा विवेक पहावा । देवाआधि देवा ओळखावें ॥६॥

---

१ निकरानें २ वोळगणें—सेवा करणें.

ओळखावें देवा निर्मला निश्चळा । निर्गुणा केवळा निरंजना ॥ ७ ॥ निरंजना देवा कोणी उच्छेदीना । फुटेना तुटेना कदाकाळीं ॥ ८ ॥ कदाकाळीं देव पडेना झडेना । दृढ उपासना रामदासीं ॥ ९ ॥

( २९ ) ब्रीद साच केलें भक्त उद्धरीलें । प्रचीतीस आलें मनाचीये ॥ १ ॥ मनाची प्रचीती झाली निर्वासना । लेशही असेना विषयांचा ॥ २ ॥ विषयांचा लेश संसारदायक । जानकीनायक चुकवी तो ॥ ३ ॥ चुकवीतो जन्म मृत्यु सेवकाचा । विचार हा काचा[1] कदा नव्हे ॥ ४ ॥ कदा नव्हे कांहीं वाक्य अप्रमाण । धरावे चरण राघवाचें ॥ ५ ॥ राघवाचे दास सर्वस्वी उदास । तोडी आशापाश देवराणा ॥ ६ ॥ देवराणा भाग्यें झालिया कैंपक्षी । नानापरी रक्षी सेवकासी ॥ ७ ॥ सेवकांसी कांहीं नलगे साधना करि तो पावन ब्रीदासाठीं॥८॥ब्रीदासाठीं भक्त तारिले अपार । आतां वारंवार किती सांगों ॥ ९ ॥ किती सांगों देव पतितपावन । करावें भजन दास म्हणे ॥ १० ॥

( ३० ) छत्रीं सुखासनीं अयोध्येचा राजा । नांद-

---

१ कच्चा.

तसे माझा मायबाप ॥ १ ॥ माझा मायबाप त्रिलोकीं समर्थ। सर्व मनोरथ पूर्ण करी ॥ २ ॥ पूर्ण प्रतापाचा कैवारी देवाचा। नाथ अनाथांचा स्वामी माझा। ३ ॥ स्वामी माझा राम योगियांचा विश्राम। सांपडलें वर्म थोर भाग्य ॥ ४ ॥ थोर भाग्य ज्याचें राम त्याचे कुळीं। संकटीं सांभाळी भावबळें ॥ ५ ॥ भावबळीं जेंही धरिला अंतरीं। तया क्षणभरी विसंभेना ॥ ६ ॥ विसंभेना कदा आपुल्या दासासीं। रामीं रामदासी कुळस्वामी ॥ ७ ॥

सुपुत्र संसारीं कुळाचें मंडण। वंश-उद्धरण हरीभक्त ॥ १ ॥भक्त तरे तारी बेचाळीस कुळें। भक्तीचेनि मुळें जगोद्धार ॥२॥ जगोद्धार करी सुपुत्र संसारीं। येर अनाचारी पापरूपी ॥ ३ ॥ पापरूपी नर अभक्त जाणावें। जयासी नेणवे देवराणा ॥ ४ ॥ देवराणा बोले देखोनियां भाव। दास म्हणे भाव कामा नये ॥ ५ ॥

( २१ ) मूर्ख तो संसारीं माझें माझें करी। मृत्यु बरोबरी हिंडतसे ॥ १ ॥ नेणोनियां प्राणी संसारासी आला। आला तैसा गेला दैन्यवाणा॥२॥दैन्यवाणा गेला सर्वही सांडूनी। ठेविले जोडूनी जनालागी ॥ ३ ॥ अंतरीची मूर्ति अंतरली दूरी। कदाकाळीं हरी आठ-

वेना ॥ ४ ॥ आठवेना अंतकाळीं रामेवीण । धन्य तें मरण दास म्हणे ॥ ५ ॥

( ३२ ) काया हे काळाची घेउनी जाणार । तुझेनी होणार काय बापा ॥ १ ॥ काय बापा ऐसें जाणोनि नेणसी । मी माझें म्हणसी वायांवीण ॥ २ ॥ वायांवीण शीण केला जन्मवरी । दंभ लोकाचारी नागवण ॥ ३ ॥ जात आहे सर्व सांडूनि करंटा । जन्मवरी ताठा धरूनीया ॥ ४ ॥ धरूनीयां ताठा कासया मरावें । भजन करावें दास म्हणें ॥ ५ ॥

( ३३ ) पूर्ण समाधान इंद्रियदमन । श्रवण मनन निरंतर ॥ १ ॥ निरंतर ज्याचे हृदयीं विवेक। उपासना एक तोची धन्य ॥ २ ॥ धन्य तोची एक संसारीं पाहतां । विवेकें अनंता ठायीं पाडी ॥ ३ जन्मोजन्मीं केलें पुण्य बहूसाल तरीच घडेल संतसंग ॥४॥ समाधान घडे सज्जनाच्या संगें । स्वरूपाच्या योगें रामदासी ॥ ५ ॥

( ३४ ) साधु आणि भक्त व्युत्पन्न विरक्त । तपोनिधि शांत अपूर्वता ॥ १ ॥ अपूर्वता जनीं शुद्ध समाधानी । जनाचे मीळणी मीळों जाणे ॥ २ ॥ मिळों जाणे जना निर्मळ वासना । अंतरीं असेना निंदा द्वेष ॥ ३ ॥ सर्वकाळ जेणें सार्थकीं लाविला । वंश उद्ध-

रीला नामघोषें ॥ ४ ॥ नामघोष वाचे उच्चारी सर्वदा। संताच्या संवादा वाटेकरी ॥ ५ ॥ वाटेकरी झाला सायुज्यमुक्तीचा । धन्य तो देवाचा दास म्हणे ॥६॥

( ३५ ) आम्हा तुम्हा मुळीं झाली नाहीं तुटी । तुटीवीण भेटी इच्छीतसा ॥१॥ इच्छीतसा योग नसतां वियोग । तुम्हा आम्हा योग सर्वकाळ ॥२॥ सर्वकाळ तुम्ही आम्ही एके स्थळीं । वायां मृग जळीं बुडो नये ॥ ३ ॥ बुडो नये आतां सावध असावें । रूप ओळखावें जवळीच ॥ ४ ॥ जवळीच आहे नका धरूं दुरी । बाह्य अभ्यंतरी असोनीयां ॥ ५ ॥ असोनी संन्निध वियोगाचा खेद । नसोनिया भेद लाऊं नये ॥ ६ ॥ लाऊं नये भेद मायिक संबंधीं । रामदासी बोधीं भेटी झाली ॥ ७ ॥

( ३६ ) ओवीचेनी मिषें स्वरूपासी जावें । सत्वर पावावें समाधान ॥ १ ॥ तेंची असें रूप निर्गुण रामाचें । सुख विश्रामाचें समाधान ॥ २ ॥ समाधानी योगी ते हें सुख भोगी । मनीं वितरागी याची सुखें ॥ ३ ॥ दुःख शोक नाहीं राम आठवीतां । अमृत सेवितां मृत्यु नाहीं ॥ ४ ॥ नाहीं जन्म मृत्यु अभेद भक्तांसी । रामी रामदासीं अनुभव ॥ ५ ॥

( ३७ ) पोट भरावया मांडिले उपास । झाला

कासावीस लाभेंवीण ॥ १ ॥ राजा पावावया प्रजा धुंडाळितो । कासावीस होतो वाउगाची ॥ २ ॥ द्रव्य साधावया निद्रव्याचा संग । तेथें कैचें मग द्रव्य मीळे ॥ ३ ॥ बम्ह साधावया कर्ममार्गें गेला । तंव कर्में केला कासावीस ॥ ४ ॥ सुटका व्हावया बंधनची केलें । तेणें तें सुटलें केवी घडे ॥ ५ ॥ केंवी घडे हद रोगें आरोग्यता । कुपथ्यानें व्यथा वाढतसे ॥ ६ ॥ एक व्यथा एक औषध घेतलें । दास म्हणे झालें तया-परी ॥ ७ ॥

( ३८ ) परीचर्य जेथें अत्यंत संबंध । तेथें उठे खेद विकल्पचा ॥ १ ॥ म्हणोनियां मना निस्पृह अ-सावें । सर्वथा नसावें एके ठायीं ॥ २ ॥ एके ठायीं वास करितां तापस । पडती सायास विवेकाचे ॥ ३ ॥ विवेकाचे जन मिळतां संकट । लागे खटपट सर्व काळ । ॥ ४ ॥ सर्व काळ गेला उद्वेगीं पडतां । कोणे वेळे आतां समाधान ॥ ५ ॥ समाधान चळे अहंता प्रबळे । तेणें गुणें पोळे अभ्यंतर ॥ ६ ॥ अभ्यंतर पोळें राम विसंबतां । दास म्हणे आतां समाधान ॥ ७ ॥

( ३९ ) काय करावे ते संपत्तीचे लोक । जानकी नायक जेथें नाहीं १ ॥ जेथें नाहीं माझा श्रीराम समर्थ । त्याचें जिणें व्यर्थ कोटीगुणें ॥ २ ॥ नाम नाहीं

मनीं नाहीं जो कीर्तनीं । तया कां जननी प्रसवली ॥ ३ ॥ प्रसवली परी झाला भूमीभार । दुस्तर संसार उल्लंघेना ॥ ४ ॥ उल्लंघेना एका रामनामेंवीण । रामदास खूण सांगतसे ॥ ५ ॥

( ४० ) एकदां जेवीतां नव्हे समाधान । प्रतिदीनीं अन्न खाणें लागे ॥ १ ॥ तैसें निरूपण केलेंची करावें । परी न करावें उदासीन ॥ २ ॥ प्रतीदीनीं अन्न प्रतीदीनीं जीवन । देहसंरक्षण करावया ॥ ३ ॥ प्रत्यहीं संसारीं बोलावें लागतें । कांहीं केलीया तें सुटेना कीं ॥ ४ ॥ प्रत्यहीं हा देहो पाहावा लागतो । शुद्ध भरावा तो रात्रंदिवस ॥ ५ ॥ प्रत्यहीं देहानें भोगिलें भोगावें । त्यागिलें त्यागावें दास म्हणे ॥ ६ ॥

( ४१ ) ज्याचेनि जीतोसी त्यासी चुकलासी । व्यर्थ कां झालासी भुमीभार ॥ १ ॥ भुमीभार जीणें तुझें गुरुवीणें । वचनें प्रमाणें जाण बापा । २ ॥ जाण बापा गुरु-वीण गती नाहीं । पडसी प्रवाहीं मायाजाळीं ॥ ३ ॥ मायाजाळीं व्यर्थ गुंतलासी मूढा । जन्मवरी ओढा तडातोडी ॥ ४ ॥ कांहीं तडातोडी कांहीं राम जोडी । आयुष्याची घडी ऐसी वेचीं ॥ ५ ॥ ऐसी

१ जगतोस. २ ताटातूट.

वेची बापा आपुली वयसा[1] । दास म्हणे ऐसा काळ घाली ॥ ६ ॥

(४२) प्रपंचीं असोनी परमार्थ करावा । बरा विवरावा निरंजन ॥ १ ॥ निरंजन देव प्रगटे अंतरीं । मग भरोवरी[2] करीना कां ॥२॥ करीना कां परी संसार बाधीना । परी तो साधीना काय करूं ॥ ३ ॥ काय करूं देवा लोकांसी उपाय । टाकवेना सोय विश्रांतीची ॥ ४ ॥ विश्रांतीची सोय समाधान होये । मोक्षाचा उपाय सद्‌गुरुची ॥ ५ ॥ सद्‌गुरु-संगती चुके अधोगती । दास म्हणे मती पालटावी ॥ ६ ॥

(४३) करूनी अकर्ते होउनीया गेले । तेणें पंथें चाले तोची धन्य ॥ १ ॥ तोची धन्य जनीं पूर्ण समाधानी । जनीं आणि वनीं सारीखेची ॥ २ ॥ सारीखाची जेथें तेथें पालटेना । नये अनुमाना कांहींएक ॥ ३ ॥ कांहींएक लोक देहांत पाहाती । अंतरीची गती कोण जाणे ॥ ४ ॥ कोण जाणे काय परावे मनींचें । जनासी जनीचें कळतसे ॥ ५ ॥ कळतसे परी अंतर शोधावें । मनासी बोधावें दास म्हणे॥६॥

(४४) तुजवीण देवा मज कोणी नाहीं । माझी

---

१ आयुष्य. २ श्रम,

चिंता कांहीं असो द्यावी ॥ १ ॥ वैराग्यें कनिष्ठ अभावें वरिष्ठ । माझे मनीं नष्ट संदेह तो ॥ २ ॥ विवेकें सांडीलें ज्ञानें ओसंडीलें । चित्त हें लागलें तुझ्या पायीं ॥ ३ ॥ विद्या ना वैभव नेणें हावभाव । परी माझा भाव तुझ्यापायीं ॥ ४ ॥ तुझें नाम वाचें उच्चारीत असें । अंतरीं विश्वासें धरीयेलें॥५॥रामदास म्हणे मी तुझा अज्ञान । माझें समाधान करी देवा ॥ ६ ॥

( ४५ ) कर्ता एक देव तेणें केलें सर्व । तयापाशीं गर्व कामा नये ॥ १ ॥ देह हे देवाचें वित्त कुबेराचें । तेथें या जीवाचें काय आहे ॥ २ ॥ देता देववीता नेता नेववीता । कर्ता करविता जीव नव्हे ॥ ३ ॥ निमित्ताचा धनी केला असे प्राणी । पाहतां निर्वाणीं जीव कैचा ॥ ४ ॥ लक्ष्मी देवाची सर्व सत्ता त्याची । त्याविण जीवाची उरी नाहीं ॥ ५ ॥ दास म्हणे मना सावध असावें । दुश्चित्त नसावें सर्व काळ ॥ ६ ॥

( ४६ ) दासाची संपत्ती राम सीतापती । जीवाचा सांगाती राम एक ॥ १ ॥ राम एक माता राम एक पिता । राम सर्व भ्राता सहोदरु[1] ॥ २ ॥ सहो-

---

१ सख्खा भाऊ

दरु विद्या वैभव कांचन । सर्वही स्वजन राम एक ॥ ३ ॥ राम एक स्वामी रामच कैवारी लाभ तो संसारीं राम एक ॥ ४ ॥ राम एक ज्ञानें राम एक ध्यान रामें समाधान रामदासीं ॥ ५ ॥

( ४७ ) राघवाचें नाम राखशील जरी । तुज राखे तरी देवराणा ॥ १ ॥ देवराणा माझें जीविचें जीवन । आवडीनें खूण सांगतसे ॥ २ ॥ सांगतसें खूण माझे अंतरींची । सर्वही सुखाची सुखमूर्ति ॥ ३ ॥ सुखमूर्ति राम सोडूं नको कदा । तुज तो आपदा लागों नेदी ॥ ४ ॥ लागों नेदी कष्ट आपुल्या दासासी । रामी रामदासी साहाकारी ॥ ५ ॥

( ४८ ) रात्रंदिस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें ॥ १ ॥ कांचनाचें ध्यान परस्त्री चिंतन । जन्मासी कारण हेचि दोनी ॥ २ ॥ दोनी नको धरूं नको निंदा करूं । तेणें हा संसारू तरशील ॥ ३ ॥ तरशील भव-सागरीं बुडतां । सत्य या अनंताच्यानि नामें ॥ ४ ॥ नामरूपातीत जाणावा अनंत । दास म्हणे संत-संग धरा ॥ ५ ॥

( ४९ ) संताचेनि संगें देव पाठी लागे । सांडुं जातां मागें सांडवेना ॥ १ ॥ सांडवेना देव सदा समागमीं । बाह्य अंतर्यामीं सारीखाची ॥ २ ॥ सारीखाची

तीर्थी सारीखाची क्षेत्रीं । दिवा आणि रात्रीं सारी-खाची ॥ ३ ॥ सारिखाची कडां कपाटीं शीखरीं । गृहीं वनांतरीं सारीखाची ॥ ४ ॥ सारीखाची अंत नाहीं तो अनंत । रामदासी किंत मावळला ॥५॥

( ५० ) कुमारीच्या पोटीं ब्रह्मचारी आला । विचारीता झाला तोचि बाप ॥ १ ॥ बापची पुरुष ते तों मायराणी । शब्द विचक्षणीं विचारावा॥२॥ विचा-रितां होय नातुही पणतु । प्रपिता हे मातु मिथ्या नव्हे ॥ ३ ॥ मिथ्या नव्हे कदा हा देह-संब्रधु । विस्तारें विविधु सोइरीक ॥ ४ ॥ सोईरीक-संबंधु नाहीं त्या निर्गुणा । शाश्वताच्या खुणा दास म्हणे ॥५॥

( ५१ ) विदेशासी जातां देशची लागला । पुढें सांपडला मायबाप ॥ १ ॥ मायबाप राम या विश्व लोकांचा । तो स्वामी आमुचा सर्व देशीं ॥ १ ॥ सर्व देशीं आहे विचारें पाहतां । जातांना राहतां सारी-खाची ॥ ३ ॥ सारीखाची देव कदा पालटेना । राहे त्रिभुवना व्यापुनीयां ॥ ४ ॥ व्यापुनीयां दासा सन्नि-धची असे । विचारें विलसे रामदासी ॥ ५ ॥

( ५२ ) रामेंवीण देश जाण तो विदेश । विदे-

---

१ संशय. २ विविध नाना प्रकारचीं.

शाचा देश राम करी ॥ १ ॥ राम भेटे ज्यासी तो नव्हे विदेशी । सर्व देश त्यासी आपलेची ॥ २ ॥ आपलेचि देश या रामाकरितां । होय सार्थकता जेथें तेथें ॥ ३ ॥ जेथें तेथें राम देखतां विश्राम । संसारींचा श्रम आठवेना ॥ ४ ॥ आठवेना तेथें आठव विसर दास निरंतर जैसा तैसा ॥ ५ ॥

( ५३ ) संतसंगें जन्म चुकती यातना । आणि जनार्दना भेटी होये ॥ १ ॥ भेटी होये संतसंगें राघवाची।आणिक भवाची शांति होये ॥२॥ जरी राहे भाव राघवीं सर्वदा । संसार आपदा तया नाहीं ॥ ३ ॥ तया नाहीं दुःख तया नाहीं शोक । दास म्हणे एक राम ध्याता ॥ ४ ॥

( ५४ ) मन हें विवेकें विशाळ करावें । मग आठवावें परब्रह्म ॥ १ ॥ परब्रह्म मनीं तरीच निवळे। जरी बोधें गळे अहंकार ॥ २ ॥ अहंकार गळे संताचे संगतीं । मग आदि अंतीं समाधान ॥ ३ ॥ समाधान घडे स्वरूपीं राहतां । विवेक पाहतां निःसंगाचा ॥ ४॥ निसंगाचा संग सदृढ धरावा । संसार तरावा दास म्हणे ॥ ५ ॥

( ५५ ) दर्पणीं पहातां दिसतें सर्वांग । परी पृष्ठभाग आढळेना ॥ १ ॥ आपुलीच पाठी पाहतां न

दिसे । ऐसें बोलतसे सर्व जन ॥ २ ॥ आपशुद्धि नाहीं त्या काय करावें । म्हणोनी जाणावें आपणासी ॥ ३ ॥ आपणासी जाणे संताचे सगतीं । तया अधोगती जन्म नाहीं ॥ ४ ॥ नाहीं जन्म मृत्यु नाहीं येणें जाणें । स्वरूपीं राहणें दास म्हणे ॥ ५ ॥

( ५६ ) नित्य निरंतर सर्वांचें अंतर । तोचि निराकार बोलिजे तो ॥ १ ॥ बोलिजे तो संत, महंत जाणती । खुणेसी बाणती विवंचिता ॥ २ ८ विवंचिता राम रामची होईजे । ये गोष्टीची कीजे विचारणा ॥ ३ ॥ विचारणा सार विचारें उद्धार । साधु योगेश्वर विचारेंचि ॥ ४ ॥ विचारेंचि जनीं होतसे सार्थक । धन्य हा विवेक दास म्हणे ॥ ५ ॥

( ५७ ) प्रवृत्ति सासुरें निवृत्ति माहेर । तेथें निरंतर मन माझें ॥ १ ॥ माझे मनीं सदा माहेर सुटेना । सासुरें तुटेना काय करूं ॥ २ ॥ काय करूं मज लागला लौकिक । तेणें हा विवेक दुरी जाये ॥ ३ ॥ दुरी जाये हीत मजची देखतां । प्रयत्न करूं जातां होत नाहीं ॥ ४ ॥ होत नाहीं प्रयत्न संतसंगेंवीण । रामदास खूण सांगतसे ॥ ५ ॥

( ५८ ) निरूपणें भक्ती निरूपणें ज्ञान । अनुताप पूर्ण ।नरूपणें ॥ १ ॥ निरूपणें योग योगाचा संयोग ।

निरूपणें त्याग घडतसे ॥ २ ॥ घडतसे सर्व कांहीं निरूपणें । बाणती लक्षणें सज्जनाचीं ॥ ३ ॥ सज्जनाचीं मतें सज्जन जाणती । येर ते नेणती जाणपणें ॥ ४ ॥ जाणत्या नेणत्या होय समाधान । करावें मनन संगातीत ॥ ५ ॥

( ५८ ) सर्व समाधान होय निरूपणें । परी जाणपणें बुडवीलें ॥ १ ॥ बुडवीलें देहातीत समाधान । देह अभिमान वाढवीला ॥ २ ॥ वाढवीला तर्क वायां निरूपणीं । जाणीवे पापिणी काय केलें ॥ ३ ॥ काय केलें ऐसें जाणत जाणतां । स्वरूपीं अहंता कामा नये ॥ ४ ॥ कामा नये देह-बुद्धीचें जाणणें । दास निरूपणें सावधान ॥ ५ ॥

( ५९ ) निरूपणा ऐसें नाहीं समाधान । आणिक साधन आढळेना ॥ १ ॥ भक्ति ज्ञान घडे वैराग्य आंतुडे[1] । भावार्थ सापडे निरूपणें ॥ २ ॥ शांती क्षमा दया नैराशता मनीं । अवस्था उन्मनी निरूपणें ॥ ३ ॥ रिद्धी सिद्धी दासी होती निरूपणें । श्रवण मनन निजध्यासें ॥ ४ ॥ भ्रांतीचा संदेह तुटे एकसरा । दास म्हणे करा निरूपणा ॥ ५ ॥

---

१ प्राप्त होतें.

( ६० ) प्रचीतीचा देव सप्रचीत भाव । करावा उपाव सप्रचीत ॥ १ ॥ प्रचीतीचा देव प्रचीतीची मात्रा । प्रचीतीच्या मंत्रा पाठ कीजे ॥ २ ॥ प्रचीतीनें कोणी एक तें पहावें । जन ओळखावें प्रचीतीनें ॥३॥ प्रचीतीनें इष्ट प्रचीतीनें मित्र । प्रचीतीनें सूत्र कोणा-एक ॥ ४ ॥ कोणी एक कार्यें प्रचीती उपाये । दास म्हणे सोय प्रचीतीची ॥ ५ ॥

( ६१ ) देव तो कळेना राहिला चुकोनी । संसारा येऊनी काय केलें ॥१॥ काय केलें बापा आपुलें [1]अन्हित । देखत देखत चुकलासी ॥ २ ॥ चुकलासी धणी या भूमंडळाचा । सर्वांहि देवांचा मुख्य देव ॥ ३ ॥ मुख्य देव आहे तो तुज कळेना । शाहाणा आपणा म्हणवीसी ॥४॥म्हणवीसी परी दसऱ्याचें सोनें । उणे कोटिगुणें दास म्हणे ॥ ५ ॥

( ६२ ) नवस पुरवी तो देव पूजीला । लोभालागीं झाला कासावीस ॥ १ ॥ कासावीस झाला प्रपंच करितां । सर्व काळ चिंता प्रपंचाची ॥ २ ॥ प्रपंचाची चिंता करितांची मेला । तो काय देवाला उपकार ॥ ३ ॥ उपकार झाला सर्व ज्या लागुनी । तें गेली मरोनी पाहातसे ॥ ४ ॥

---

( १ ) अनहित.

पाहातसे पुढें आपणही मेला । देवासी चुकला जन्म॰वरी ॥ ५ ॥

( ६३ ) सूर्य नारायणा देवा नमस्कार । तुवां निराकार दाखवावें ॥ १ ॥ दाखउनी द्यावें मज नविवावें । चंद्रा तुज भावें प्राथितसे ॥ २ ॥ प्राथितसे मही आणि अंतरिक्षा । तुम्ही त्या अलक्षा दाखवावें ॥ ३ ॥ दाखवावें मज आपी नारायणें । ब्रह्म प्राप्ती जेणें तें करावें ॥ ४ ॥ करावें सनाथ अग्नि प्रभंजनें । नक्षत्रें वरुणें दास म्हणे ॥ ५ ॥

( ६४ ) तुजला तूं थोर मजला मी थोर । मी थोर तूं थोर कामा नये ॥ १ ॥ कामा नये कोणा अंगीं मी तूं पण । पाहा थोरपण ईश्वराचें ॥ २ ॥ ईश्वराचें रूप पाहातां निवावें । मी तूं पण द्यावें सोडूनीयां ॥ ३ ॥ सोडूनीयां द्यावें तें काय आपणा । शाश्वताच्या खुणा पाहे बापा ॥ ४ ॥ पाहे बापा देव कोण निरवाव । दास म्हणे भाव तेथें ठेवी ॥ ५ ॥

( ६५ ) सर्व काळ गेला संसार करीतां । तरी सार्थकता कैसी घडे ॥ १ ॥ कैसी घडे भक्ती कैसी घडे मुक्ती । म्हणोनिया चित्तीं गोष्टी धरा ॥ २ ॥ गोष्टी धरा मनीं स्वहितालागुनी । बैसा देवध्यानीं क्षण एक ॥ क्षण एक गेला सुखाचा बोलतां । तेणें

कांहीं चिंता वोसरेल ॥ ४ ॥ वोसरेल चिंता संसारीची माया । भजे रामराया दास म्हणे ॥ ५ ॥

( ६६ ) संसार करावा सुखें यथासांग । परी संतसंग मनीं धरा ॥१॥ मनीं धरा संतसंगती विचार । येणें पैलपार पाविजेतो ॥ २ ॥ पाविजेतो याची प्रचीत पाहावी । निरूपणीं व्हावी अतीप्रीती ॥ ३ ॥ अतीप्रीती तुम्ही निरूपणीं धरा । संसारीं उद्धरा असोनीयां ॥ ४ ॥ असोनीयां नाहीं माया सर्व कांहीं । विवंचुनी पाही दास म्हणे ॥ ५ ॥

( ६७ ) आतां किती बोलों धालों[1] तृप्त झालों । विवेकें विरालों परब्रह्मीं ॥ १ ॥ परब्रह्मीं जातां ब्रह्मची तत्वतां । विचारें पाहतां आपणची ॥ २ ॥ आपणची असे कोणीच न दिसे । संशयाचें पिसें वाव[2] झालें ॥३॥ वाव झालें भय सर्व संसारीचें । लाधलें हरीचें निजधाम ॥ ४ ॥ निजधाम बोधें विवेकें पाहावें । दास जीवेंभावें सांगतसे ॥ ५ ॥

( ६८ ) संसारीचें दुःख बहुसाल होतें । तें झालें परतें विचारानें ॥ १ ॥ विचारानें सर्व संग वोरं[3]-गला । रामरंग झाला असंभाव्य ॥२॥ असंभाव्य सुख

---

१ संतुष्ट झालों. २ व्यर्थ-नष्ट. ३. नाहिसा झाला.

मर्यादेवेगळें। विचाराच्या बळें तुळंबळें ॥ २ ॥ तुळंबळें सर्व चंचळ निश्चळ। द्वैत तळमळ येथें नाहीं ॥ ४ ॥ तेथें नाहीं दैन्य वस्तु सर्व मान्य। तयासी अनन्य देवदास ॥ ५ ॥

( ६९ ) राजा सांडूनीयां प्रजाचा सेवक। त्यासी कोणीएक रागीजेल ॥ १ ॥ रागेजना कोणी राव वोळंगतां[1]। तैसें भगवंता वोळंगावें ॥ २ ॥ वोळंगावें भावें देवा निर्गुणासी। भजतां गुणासी नाश आहे ॥ ३ ॥ नाश आहे गुणा पाहावें निर्गुणा। योगीयांच्या खुणा ओळखाव्या ॥ ४ ॥ ओळखतां खुण श्रवण मननें। आत्मनिवेदनें दास म्हणे ॥ ५ ॥

( ७० ) द्रव्य दारा जनीं कदा नव्हे धणी। तैसा रामवाणी असों द्यावें ॥ १ ॥ रात्रंदिवस द्रव्यदारचें चिंतन। तैसें लावी मन राघवासी ॥ २ ॥ राघवासी मन लावीतां आनंद। तेणें तुटे खेद संसारींचा ॥४॥ राघवाची सोय पूर्व पुण्यें होय। अंतीचा उपाय दास म्हणे ॥ ५ ॥

( ७१ ) माझें मी तूं पण विवेकानें नेलें। देवाजीनें केलें समाधान ॥ १ ॥ मी देह म्हणतां केल्या

१ प्रसन्न करितां.

येरझाऱ्या । चुकवीला फेरा चौऱ्यांशीचा २ ॥ आपुल्या सुखाचा मज दिला वाटा । वैकुंठीच्या वाटा कोण धांवे ॥ ३ ॥ देवासी नेणतां गेला बहु काळ । सार्थकाची वेळ एकाएकीं ॥ ४ ॥ एकाएकीं एक देव सांपडला । थोर लाभ झाला काय सांगों ॥ ५ ॥

( ७२ ) श्रवण म्हणजे ऐकतची जावें । बरें विवरावें ग्रंथांतरीं ॥ १ ॥ ग्रथांतरीं कळे तें मुखें बोलावें । कीर्तन जाणावें याचें नांव ॥ २ ॥ नांव घ्यावें साचें सर्वदा देवाचें । तिसरे भक्तीचें लक्षण हें ॥ ३ ॥ लक्षण चौथीचें तें ऐसें जाणावें । पाउल सेवावें सद्गुरुचे ॥ ४ ॥ गुरुदेव पूजा तेची तें अर्चन । सहावें वंदन नमस्कार ॥ ५ ॥ नमस्कार कीजे सर्वदा स्वभावें भक्तीचें जाणावें लक्षण हें ॥ ६ ॥ लक्षण हें सख्य आठवें भक्तीचें सांगावें जीवीचें देवापासीं ॥ ७ ॥ देवापासीं होतां उरेना मीपण । आत्मनिवेदन रामदासी ॥ ८ ॥

( ७३ ) जाणावा तो ज्ञानी पूर्ण समाधानी । निःसंदेह मनीं सर्वकाळ ॥ १ ॥ मिथ्या देहभाव प्रारब्धाआधीन । राखे समाधान पूर्णपणें ॥ २ ॥ आवडीनें करी कर्म उपासना । सर्वकाळ ध्यानारूढ मन ॥ ३ ॥ जाणे ब्रह्मज्ञान स्वयें उदासीन । मानी तो वमन द्रव्य

दारा ॥ ४ ॥ पदार्थाची हानी होतां नये काणी। जयाची करणी बोले ऐसी ॥ ५ ॥ दास म्हणे धन्य सर्वांसीं जो मान्य। जयाचा अनन्य समुदाय ॥ ६ ॥

( ७४ ) जाणावा तो नर देवची साचार। वाचे निरंतर राम नाम ॥ १ ॥ सगुणी सद्भाव नाहीं ज्ञान-गर्व। तयालागीं सर्व सारीखेंची ॥ २ ॥ निंदका वंदका संकटीं सांभाळी। मन सर्व काळीं पालटेना॥३॥पालटेना मनीं परस्त्री कांचनी। निववी वचनीं पुढीलांसी ॥४॥ पुढीलांसी नाना सूखें देत आहे। उपकारीं देह-लावी तसे ॥ ५॥ लावीतसे देह रामभजनासी। रामी राम-दासी हरिभक्ती ॥ ६ ॥

(७५) लाज हे पापिणी लागलीसे पाठी। तेणें नव्हे भेटी राघवाची ॥ १ ॥ राघवाची भेटी तरीच लाहिजे। कीर्तनीं राहिजे क्षण एक ॥२॥ क्षण काळ गेला देवा न भजतां। कैसे परी आतां परलोक ॥ ४ ॥ पर-लोकीं पुण्यशील होती धन्य। रामदासी मान्य हरीभक्ती॥५॥

( ७६ ) पतीत म्हणजे वेगळा पडीला। पावन तो झाला एकरूप ॥ १ ॥ एकरूप देव अरूप ठायींचा। तेथें दुजा कैचा कोण आहे ॥ २ ॥ कोण आहे दूजा स्वरूपीं पाहतां। विचारें राहतां सुख आहे ॥ ३ ॥सुख

आहे मूळ आपुलें शोधितां । मनासी बोधितां राम-दास ॥ ४ ॥

( ७७ ) राघवाची कथा पतीत पावन । गाती भक्त जन आवडीनें ॥१॥ राघवाच्या गुणा न दिसे तुळणा । कैलासिचा राणा लांचावला ॥ २ ॥ देवांचें मंडण भक्तांचें भूषण । धर्म संरक्षण राम एक ॥ ३ ॥ राम-दास म्हणे धन्य त्यांचें जीणें । कथा-निरूपणें जन्म गेला ॥ ४ ॥

( ७८ ) संगती सज्जन कथा निरूपण । सगुणें निर्गुण पाविजेतें ॥ १ ॥ सगुणाची भक्ती केल्या होय मुक्ती । ऐसें वेदश्रुती बोलतसे ॥ २ ॥ भक्तीविणें ज्ञान कदा पाविजे ना । हें वाक्य सज्जना अंतरीचें ॥ ३ ॥ रामदास म्हणे साराचें हीं सार । सर्वांसी आधार भक्ती-भाव ॥ ४ ॥

## श्लोक.

( ७९ ) घडेना नसे भाव त्या भक्ति कांहीं । नसे भक्ति त्या मुक्ति होणार नाहीं ॥ म्हणोनी मना भक्ति तें सार आहे ॥ विवेकें अती शांति होऊनि राहे ॥१॥

## श्लोक.

( ८० ) भजनरहित ज्ञानें मोक्ष होणार

नाहीं ॥ सकल निगम त्यांचें सार शोधूनि पाही ॥ सगुण भजन मार्गें राक्षिलें थोर थोरीं । अधम नर तयांचें ज्ञान संदेहकारी ॥ १ ॥

( ८१ ) भक्तीविण ज्ञान त्या नांव अज्ञान । जाणती सज्ञान संत जन ॥ १ ॥ पायाविणे केलें थोर दामोदर । पावतां संहार वेळ नाहीं ॥ २ ॥ तारुंविण नांव तो नव्हे उपाव । ठाकवेना ठाव पैलथडी ॥ ३ ॥ रामदास म्हणें शुद्ध उपासनें । विश्रांती पावणें केवी घडे ॥ ४ ॥

## श्लोक.

( ८२ ) भजन रघुविराचें पाहतां सार आहे ॥ अगणित तुळणा हें सर्व कांहीं न साहे ॥ भुषण हरि जनाचें ध्यान योगीजनाचें । स्वहित मुनिजनाचें गूज हें सज्जनाचें ॥ १ ॥

## श्लोक.

( ८३ ) नको गद्य पद्यादिकें शब्द ज्ञानें । नको तर्क साहित्य देहाभिमानें ॥ नको मंत्र यंत्रादि पूजा-विधानें । नको योगयागादिकें धूम्रपानें ॥ १ ॥ चढे वैभवें फुंज ज्ञातेपज्याचा । तेणें अंतरे स्वामि लोकत्रयाचा ॥ म्हणोनी बहू आवडी त्या जनाची । जिथें

१ रत्नखचित मंदीर.

साबडी[1] भक्ति सर्वोत्तमाची ॥ २ ॥

( ८४ ) रामाचें भजन तेंची माझें ज्ञान । तेणें समाधान पावईन ॥ १ ॥ रामासी वर्णितां देहीं विदेहता । झाली तन्मयता सहजची ॥ २ ॥ राघवाचें रूप तें माझें स्वरूप । तेणें सुखरूप निरंतर ॥ ३ ॥ रामदास म्हणे मज येणें गती । राम सीतापतीच्यानी नामें ॥ ४ ॥

( ८५ ) संसारीचें दुःख मज वाटे सुख । राघवाचें मुख पाहतांची ॥ १ ॥ माझें सुख माझ्या राघवाच्या पायीं । तेणें मी हृदयीं निवईन॥ २ ॥ आम्हां नाहीं चिंता संसारीं असतां । वाचे गुण गातां राघवाचे ॥ ३ ॥ रामदास म्हणे राम सीतापती ॥ ३ ॥ तेथें मी विश्रांती पावईन ॥ ४ ॥

( ८६ ) समर्थाचें उणें सेवकां मरण । तेणें गुणें क्षीण होत असे ॥ १ ॥ संसारीचें दुःख सांडुनीयां आतां । मज तुझी चिंता वाटतसे ॥ २ ॥ पतीतपावन नाम कैसें राहे । कासावीस होय जीव माझा ॥ ३ ॥ रामदास म्हणे भलतें करावें । आधीं उद्धरावें सेवकांसी ॥ ४ ॥

---

१ भोळी.

(८७) माझें सर्व जावो तुझें नाम राहो। हाची माझा भावो अंतरींचा ॥ १ ॥ पतीतपावन नाम हें जाईल। मग कोण राहिल तुजपाशीं ॥ २ ॥ यालागीं राघवें भक्ता उद्धरावें। आपुलें राखावे ब्रीद देवा ॥ ३ ॥ रामदास म्हणे देवा तुझी आण। ब्रीदासाठीं प्राण देईजे तो ॥ ४ ॥

(८८) कां वो रामराये दुरी धरीयलें। कठिण कैसें झालें चित्त तूझें ॥ १ ॥ देउनी आलिंगन प्रीती घडीभरें। कै मुख पितांबरें पुससील ॥ २ ॥ घेउनी कडीये धरुनी हनवटी। कै गुजगोष्टी सांगसील ॥ ३ ॥ रामदास म्हणे केव्हां संमोखीसी[1]। प्रेमपान्हा देसी जननीये ४ ॥

(८९) सुखाचे सांगती सर्वही मिळती। दुःख होतां जाती निघोनियां ॥ १ ॥ निघोनियां जाती संकटाचे वेळे। सुख होतां मिळे समुदाव ॥ २ ॥ समुदाय सर्व देहाचे संबंधी। तुटली उपाधी रामदासी ॥ ३ ॥

(९०) ताकही पांढरें दुधही पांढरें। चवि जेवणारे जाणिजे तें ॥ १ ॥ जाणि जे ते चवी गुळ साखरेची। पाहतां तेथेंची भेद आहे ॥ २ ॥ भेद आहे तैसा अभेदाची परी। जाणि जे चतुरीं दास

---

१ बोलसी.

म्हणे ॥ ३ ॥

( ९१ ) करी घेतां नये टाकितां न जाये । ऐसें रूप आहे राघवाचें ॥ १ ॥ राघवाचें रूप पाहतां न दिसे । डोळां भरलेसे सर्वकाळ ॥ २ ॥ सर्वकाळ भेटी कदा नाहीं तुटी । रामदासी लुटी स्वरूपाची ॥३॥

( ९२ ) प्रपंची तें भाग्य परमार्थी वैराग्य । दोन्ही यथायोग्य दोहींकडे ॥ १ ॥ दोहींकडे सांग होतां ते समर्थ । नाहीं तरी व्यर्थ तारांबळी ॥ २ ॥ तारांबळी होते विचार नसतां । दास म्हणे आतां सावधान ॥३॥

( ९३ ) बद्धाचा मुमुक्षु प्रबोधें करावा । मग उद्धरावा ज्ञानमार्गं ॥ १ ॥ ज्ञानमार्गें घ्यावें सत्य समाधानें । तरी मग जन पाठी लागे ॥ २ ॥ पाठी लागे त्याचें अंतर जाणावें । आपुलें म्हणावें दास म्हणे ॥ ३ ॥

( ९४ ) पतीत हे जन करावे पावन । तेथें अनुमान करूं नये ॥ १ ॥ करूं नये गुणदोष-उठाठेवी । विवेकें लावावी बुद्धि जना ॥ २ ॥ बुद्धि सांगे जना त्या नाव सज्ञान । पतीतपावन दास म्हणे ॥ ३ ॥

( ९५ ) लोखंडाचें सोनें परीसाच्या योगें । साधुचेनी संगें बद्ध सिद्ध ॥ १ ॥ बद्ध सिद्ध होती देखत देखतां । होय सार्थकता तत्काळची ॥ २ ॥ तत्का-

ळची वाल्हा जाहला वाल्मीक । दास पुण्यश्लोक रामनामें ॥ ३ ॥

( ९६ ) पतीतपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें ॥ १ ॥ मन हें चंचल न राहे निश्चळ । निरूपणीं पळ स्थिरावेना ॥ २ ॥ सांडुनिया ध्यान विषयचिंतन । करीतसे मन आवरेना ॥ ३ ॥ रामदास म्हणे कथा निरूपणें । मनाचीं लक्षणें जैसीं तैसीं ॥ ४ ॥

( ९७ ) पतीतपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें ॥१॥ वैराग्याचा लेश नाहीं माझ्या अंगीं । बोलतसे जगीं शब्दज्ञान ॥२॥ देह हे कारणीं लावावें नावडे । आळस आवडे सर्वकाळ ॥३॥ रामदास म्हणे लाज तुह्मी तुज । कोण पुसे मज अनाथासी ॥४॥

( ९८ ) पतीत पावना०— भक्तीची आवडी नाहीं निरंतर । कोरडें अंतर भावेंविण ॥२॥ माझें मी तूंपण गेलें नाहीं देवा । काय करूं ठेवा संचीताचा ॥३॥ रामदास म्हणे पतीताचें उणें । पतीत पावनें सांभाळावें ॥४॥

( ९९ ) पतीतपावना०— मुखें बोल ज्ञान पोटीं अभिमान । पाहे परन्यून सर्वकाळ ॥२॥ दृढ देहबुद्धि

तेणें नाहीं शुद्धि । जाहालों मी क्रोधी अनावर ॥३॥ रामदास म्हणे ऐसा मी अज्ञान । सर्व ब्रह्मज्ञान बोलोनियां ॥४॥

(१००) पतीतपावन०— मिथ्या शब्दज्ञानें तुज अंतरलों । संदेहीं पडलों मीपणाचे ॥२॥ सदा खळखळ निर्गुणाची घडे । सगुण नावडे ज्ञानगर्वें ॥३॥ रामदास म्हणे ऐसा मी पतीत । मीपणें अनंत पाहों-जाता ॥४॥

(१०१) मी खरा पतीत तूं खरा पावन । आतां अनुमान करूं नको ॥१॥ आतां मज कांहीं माझी चिंता नसे । तुझें नाम कैसें वांचवील ॥२॥ समर्थें घेतला नांवालागीं भार । मज उपकार कासयाचा ॥३॥ रामदास म्हणे तुझें तुज उणें । सोईरे पिसुणें हांसतील ॥ ४ ॥

( १०२ ) देवा मज आतां वाटे तुझी चिंता । पवाडे वर्णिता हांसतील ॥१॥ नसतां लौकिकीं नावा ऐसी क्रिया । मग हांसावया काय उणे ॥२॥ म्हूणा मंगळ हांसईल तुज । म्हणोनिया लाज मज वाटे ॥३॥ रामदास म्हणे नाम जड झालें । ऐसें काय केलें देवराया ॥४॥

( १०३ ) राम माझी माय कैं भेटईल।

चोरसें[1] देईल आलिंगन ॥१॥ संसारीचें दुःख दाटलें मानसीं। तें मी तुजपासीं सांगईन ॥ २ ॥ उतावीळ चित्त उभारुनी बाहे। रामदास पाहे वाट तुझी ॥३॥

(१०४) अर्थेंवीण पाठ कासया करावें। व्यर्थ कां मरावें घोकूनियां ॥१॥ घोकुनियां काय वेगीं अर्थीं आहे। अर्थरूप राहे होउनियां ॥२॥ होउनियां अर्थ सार्थक करावें। रामदास भावें सांगतसे ॥३॥

---

१ स्नेहभरित.

## स्फुट प्रकरणें.

यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेंवीण दरिद्रता ॥
उमजला लोक तो धाला । उमजेना तो हपापिला॥ १
हिंडतां शहाणे होतें । बोलतां बोल शीकतें ॥
वाचीतां लिहीतां येतें । तेणें तें मान्य होतसे ॥२॥
घरींच बैसतां खोटें । ब्राह्मणु हिंडतां बरा ॥
आळसी [1]घातघेणा तो । कष्टला म्हणिजे बरा॥३॥
प्रसंगें वर्ततां आलें । यथातथ्याचि सूचिलें ॥
मनुष्य राखिलें राजी । तो प्राणी शहाणा बरा ॥४॥
समयीं धीर सांडीना । यत्नीं यत्न बरा करी ॥
हिंडतां पारखी लोका । कार्यकर्ता जीवीं धरी॥५॥
मैत्रिकी ही विटो नेदी । सर्वांसी सारखा दिसे ॥
विचार जाणतो मोठा । दक्ष तो जाणता जनीं ॥६॥
उदंड ओळखी होतां । उदंड भाग्य होतसे ॥
उदंड कलहो होतां । उदंड लाथ खातसे ॥७॥
विचारें गोड बोलावें । बहुतां मान्यसें बरें ॥
भांडतां पुरवेना कीं । मैत्रिकी करितां बरें ॥८॥
करावें तेंचि पावावें । हें आलें आपणांकडे ॥
आपलें आपणांपासीं । जनासी काय बोल हा ॥९॥

---

१ घातकी.

आपली चूक जाणावी । सांडावी ते एकीकडे ॥
विवेकें साजिरा झाला । येरे[१] उदंड मीळती ॥१०॥

वेषानें कार्य साधेना । विवेकें कार्य साधतें ॥
विवेकी मानिती ज्याला । धन्य तो ब्राह्मणू जनीं॥

पराचें कार्य कर्ता जो । त्याचें कार्य कसें नव्हे ॥
तांतडी तांतडी धांवे । बरेंपणें मनोगतें ॥१२॥

भल्याची संगती व्हावी । स्नानसंध्या पवित्रता ॥
परोपकारिणी काया । नित्यानित्य विचारणा ॥१३॥

स्नानसंध्या टिळेमाळा । उदास तापसी फिरे ॥
उत्तमु तो नये वाट्या । जेथें तेथें विराजतो ॥१४॥

एके स्थळीं स्थिरावेना । नित्य नूतन साजिरा ॥
कीर्ति ते दिगंतीं धांवे । नेमस्त राहतां जनीं॥१५॥

एकांत सांपडे मोठा । बुद्धियोग ठायीं पडे ॥
इहलोक परलोकीं । बुद्धियोगची पाहिजे ॥१६॥

कृतकृत्य जिणें झालें । देव सांपडतां जनीं ॥
धन्य तो कुल तो जन्म । ज्ञानें सार्थक जाहला॥१७

(२)भाग्यासी काय ऊणे रे । यत्नावांचूनि राहिलें ॥
यत्नतो करावा कैसा । हेंचि आधीं कळेचिना ॥१॥

---

१ दुसरें.

मुख्य यत्न विचाराचा । त्यावरी बोलणें बरें ॥
चालणें सत्य नेमाचें नीति न्याय चुकों नये ॥२॥
गल्बला बुद्धि नाहीं तो । नाना निश्चय सांगती
ऐकावें कोण कोणाचे । बोलताहे बहुचकी ॥३॥
सांगोंची जाणती सर्वे । कर्ता कोणी दिसेचिना
जाणते नेणते सांगों । स्वभाव लागला जनीं ॥४॥
शास्त्र हो लोक हो कोणी । नीति हो न्याय हो न हो॥
दाटुनी सांगती वेडे । आदरें हो अनादरें ॥५॥
करंटे मिळाले सर्वे । जो तो बुद्धीच सांगतो ॥
सांगावें तें आपणाला । आपणु करितां बरें ॥ ६॥
लोकांचे गोष्टीनें वर्ते । प्रत्ययों पाहिल्याविणें ॥
आळसें चाळणा नाहीं । स्वतः बुद्धि कळेचिना ॥७॥
हित ते आपुली बुद्धि । शोधुनि पाहणें बरें ॥
पाहिल्याविण जो कर्ता । त्याचें कार्य बरें नव्हे ॥८॥
सांगती लोक ते कैसे । आपणु ऐकतो कसा ॥
स्वयें जो परीक्षा नेणें । लोकांचें ऐकीलें करी ॥९॥
मोठें तें पाप लोकांचें । प्रभु तो जाणता नव्हे ।
वर्ततो शिकविल्या बोले । तो काय म्हैसमंगळु ॥
लाच चोरी बहू झाली । घालाघाली परस्परें ॥
धण्याला नेणवे कांहीं । बेदादी नगरीं पहा ॥११॥

१ मठ्ठ.

धणी तो राहिला मागें । कारभारीच नासिती ॥
पाप हें थोर लोकांचें । सांगावें कवणापुढें ॥१२॥
प्रपंच नासतो ऐसा । भाग्य जातें निघोनियां ॥
यालागीं सर्व सांभाळी । तोची साहेब नेटका॥१३॥
सर्वदा बरा राजा । विवेकी सर्व—साक्षपी ।
आज्ञेनें सर्वही चाले । तेणें सौख्य बहू जना ॥१४॥
पोरांला माय जाणेना । तीं पोरें वांचलीं कशीं ॥
गुराखी राखतो गुरें । धणी दोहींस पाळितो॥१५॥
अत्र[1] बोलिले ऐसें । येणें न्याय परत्राहि[2]
प्रत्ययो शोध शोधाया । सावधान चहूंकडे ॥ १६॥
सर्वत्र राखणे राजी । सुख दुःख जाणोनिया ॥
सर्वांची वाहावी चिंता। बुद्धिमंत करावया ॥१७॥
लोक ते शहाणे केले । जन्मापासून सोडिले ।
प्रचीती समस्ता लोकां । भक्तिमार्ग प्रतिष्ठिला ॥ १८
(३)स्वदेश राहिला मागें । विदेश लागला पुढें ॥
आचार राखणें आधीं । स्नानसंध्या पवित्रता ॥१॥
अचुक शुद्ध ल्याहावें । वाचावें नीट नेटकें ॥
साकल्य अर्थ सांगावा । यथा तथ्य प्रचीतीनें॥२॥

---

१ या लोकीं. २ परलोकीं. ३ पूर्ण—सर्व—

बोलावें न्याय नीतीनें । मर्यादा राखणें जनीं ॥
अभ्यास करावा आधीं । ताळबंध पाठांतरें ॥३॥
प्रसंग मान जाणावें । बाणावे बहुतांपरी ॥
भक्तीभाव असो द्यावा । घालावा भार ईश्वरीं ॥४॥
प्रत्यही मागणें भिक्षा । मिळाली न मिळे तरी ॥
नित्य नूतन हिंडावें । धुंडावे भक्त प्रेमळ ॥५॥
सर्वत्र लोक शोधावें । बोधावे भक्तिच्या गुणें ।
राहावे दुर्बळा जेथें । देवाल्यें कां नदीतीरीं ॥६॥
पर्वतीं उदकापाशीं । सन्निधची एकीकडे ॥
फार एकांत सेवावा । अभ्यास नित्य नूतनु ॥७॥
ओळखी कराव्या दाटा । एके ठायीं स्थिरों नये ।
वादविवाद तो खोटा । दाटावा मदमत्सर ॥८॥
उद्धट बोलणें खोटें । बोलावीं मृदु उत्तरें ॥
नेटकी पाहिजे दीक्षा । रक्षावी भक्ति आदरें ॥९॥
भक्ती ज्ञान असो द्यावें । शुद्ध वैराग्य नेटकें ।
धरावीं कीर्तिचीं द्वारें । तरावी भाविकें बहु ॥१०॥
अत्यंत साक्षपी व्हावें । न व्हावें आळशी कदा ॥
घ्यावा या देहाचा लाहो । जायाचें हें म्हणोनिया ११
मरोनि कीर्ति उरवावी । नुरवावी अपकीर्ति ते ॥
धन्य धन्य म्हणे लोक । सत्क्रिया करितां बरी ॥१२॥
पुण्यमार्ग प्रतिष्ठावा । लावावी धर्मवासना ॥

देवाल्यें करावी मोठीं । वापी कूप सरोवरें ॥१३॥
सावधु सकळा ठायीं । न्यायनीती चळों नये ॥
सकळांसीं सख्य राखावें । वर्तावें तें मनोगतें ॥१४॥
दास्य तें करावें ऐसें । यामध्यें घडेल तसें ॥
देव सांग करी सर्वै । भावार्थ पाहिजे बरा ॥१५॥
( ४ ) स्वतंत्र ईश्वरू जाणा । पराधीनच मानवी ॥
विषयवासनेसाठीं । पराधीनची जाहाले ॥१॥
सांगती सर्वही कामें । आपुलालीं परोपरी ॥
उसंत घ्यावया नाहीं । चुकती गांजिती सदा ॥२॥
गांजिती मारिती सर्वै । ज्याचें त्याचें किती करूं ॥
कष्टलों, भागलों, माझें । दुःख कोणीच नेणती॥३॥
विद्या नाहीं बुद्धि नाहीं । भाग्य नाहींच देखिलें ॥
वैभव संपदा कैची । अन्न वस्त्र मिळेचिना ॥४॥
देहत्याग बरा वाटे । दुःख ब्रह्मांड जाहलें ॥
सांगावें हें तरी कोणा । सख्य नाहीं भुमंडळीं ॥५॥
विसावा सुटिका नाहीं । दुख झालें परोपरी ॥६॥
ऐसीं हीं सोसिलीं दुःखें । जन्मोजन्मीं बहुविधें ॥
जन्मदुःख पुरें आतां । मायबापा रघूत्तमा ॥७॥
अनाथ रंक मी तुझें । जन्मापासुनि सोडवी ॥
पतीतपावना देवा । सांभाळी गा दयानिधी ॥८॥
प्रल्हाद रक्षिला देवें । नानाविघ्नें निवारिलीं ॥

गजेंद्र सोडिला नेटें । एकाएकींच धांवणी ॥९॥
अजामेळ महापापी । स्मरणें तरला तया ॥
रक्षिलें उदंडा भक्ता । दयाळु भक्तवत्सलु ॥१०॥
ब्रीदें हीं चालतीं तुझीं । पवाडे ऐकिले बहु ॥
समर्थें वहावी चिंता । मी तुझा शरणागतु ॥११॥
संकटीं भर्वसा तूझा । भक्तांसी वज्रपंजरू ॥
वोळला मेघ सूखाचा । आनंद सचराचरीं ॥१२॥
बुद्धिनें शोधिला देवो । भावें तत्काळ पाविला ॥
पाहिली भक्ति हे नौमी । योगे वियोग तूटला॥१३॥
ज्ञान तो जाणिजे देवो । ज्ञाने परत्र पावणें ॥
प्रवृत्ति निवृत्ति ज्ञानें । ज्ञानें मोक्षचि पाविजे ॥१४॥

( ५ ) भक्तांचा देव लोभाळु । भक्तांचें मनिचें करी॥
हारद्र[1] जीविचें जाणें । राजा त्रैलोक्यनाथ कीं ॥१॥
भक्तांसी त्याविणें नाहीं । त्यासही भक्त दुर्लभु ॥
विदेशी एक ते दोघे । वेगळे नव्हती कदा ॥२॥
सांपडे भक्त जो जैसा । तैसा तो होतसे तया ॥
सर्व आपणापासी । मनासी पुसणें बरें ॥३॥
देव तो दयाळू मोठा । अन्याय क्षमणें बहु ॥
भक्तांचा साभिमानी तो । बुद्धि दाता परोपरी॥४॥
कोण रे चालवी तैसें । न्यून तें पुरतें करी ॥
उभाची पाठिसी देवो । जेव्हां तेव्हां क्षणक्षणा॥५॥

---

१ हृद्गत.

भक्तांला काय उणे रे । देव त्रैलोक्य वर्तवी ॥
तो देव आपुला झाला । वैभवा कोण पूसते ॥ ६॥
टाकितां लावितो मागें । देव दाताचि जाइला ॥
घ्यावें तें कोणतें कीती । त्रैलोक्य भरलें असें ७॥
भक्त तो घेईना कांहीं । देवें त्रैलोक्य दीधलें ॥
सर्वही सांडिलें दोघीं । एकमेकांसी लाविती ॥ ८ ॥
ऐसी ही प्रीति दोघांची । चढती वाढती सदा ॥
दोघेही तापसी योगी । वियोगी नव्हती कधीं ॥ ९ ॥
भक्तानें अंतरीं देवो । जाणोनी धरिला बळें ॥
देवही विसंभेना कीं । सोडीना भक्तवत्सलु ॥१०॥
भक्तांचें न्यून सोसीना । न्यून तें पुरतें करी ॥
भक्तांचा भार वाही तो । ब्रीदेंची चालली असे ॥११॥
रामदास म्हणे माझा । राम स्वामी दयानिधी ॥
सोडिले बंध देवाचे । तो हा त्रैलोक्यनायकू ॥१२॥
(६) माझें माझें तुझें माझें । ऐसी ही मैत्रिकी जनीं ॥
माझें तुझें तुझें तुझें । ऐसें हें न घडे कदा ॥ १ ॥
आशेची मैत्रिकी खोटी । दुराशा विटवी पुढें ॥
परोपकारणी मैत्री । ते मैत्री न विटे कदा ॥ २ ॥
अविश्वासें वस्ति केली । विश्वास हृदयीं नसे ॥
विकल्पें चालते मैत्री । ती मैत्री आत्मघातकी ॥३॥
मित्र तो पाहिजे ज्ञानी । विवेकी जाणता भला ॥

श्लाघ्यता पाहिजे तेथें । इहलोक परत्रही ॥ ४ ॥
उगाची वेळ घालाया । नासके मित्र पाहिले ॥
कुबुद्धि कुकर्मी दोषी । त्याचें फळ भोगावया ॥ ५ ॥
संगदोषें महादुःखें । संगदोषें दरिद्रता ॥
संगतीनें महद्भाग्य । प्राणी प्रत्यक्ष पावती ॥ ६ ॥
संग तो श्रेष्ठ जाणावा । नीच संग कामा नये ॥
न्यायवंत गुणग्राही । यत्नाचा संग तो बरा ॥ ७ ॥
(७) देहाचा भर्वसा नाहीं । तारुण्य चळतें जनीं ॥
वृधापीं विटंबे काया । रूप विद्रूप होतसे ॥ १ ॥
केस ते रेशिमा ऐसे । पुढें बुर्फूल होतसे ॥
टकले पडती माथां । शेंडीचा ठाव जातसे ॥ २ ॥
दुरुनी ऐकिजे कानीं । ते कर्ण बधिरावले ॥
दुरूनी न्याहळे डोळा । ते डोळे मंद जाहले ॥ ३ ॥
नासिकें गळतें पाणी । जिव्हेची बोबडी वळे ॥
दात ते सर्वही गेले । मान हाले निरंतरी ॥ ४ ॥
उदंड पाहिली पृथ्वी । उंबरा उंच जाहला ॥
पाळिलीं पोसिलीं होतीं । हांसती तेंचि माणसें ॥५॥
मागील आठवे सर्वे । दुःख वाटे क्षणक्षणा ॥
आक्रंदे तो कणे कुथें । आयुष्य न सरे कदा ॥६ ॥
सर्व एकीकडे जाती । हांसती खेळती सुखें ॥
पाहतां न येती कोणी । आपलाल्या कामाकडे ॥७॥

ऐसें हें दुःख वृधापीं । कळलें पाहिजे जना ॥
परत्र साधणें आधीं । तारुणींच उठाउठी ॥ ८ ॥
पडेना वर्म जो ठायीं । तों कर्म चुकतें कसें ॥
सर्व संग सुटे ज्याला । त्याला तो योग साधला ॥९॥
(८) रचेना खचेना ब्रह्म । फुटेना तुटेना कदा ॥
चळेना ढळेना ब्रह्म । सदोदितच्चि संचलें ॥ १ ॥
येईना जाईना ब्रह्म । उपजेना मरेना कदा ॥
उडेना बुडेना ब्रह्म । सदोदिताचि संचले ॥ २ ॥
अंत ना पार ब्रह्माला । सन्मुखची चहुंकडे ॥
धरितां टाकितां येना । सदोदिताचि संचले ॥ ३ ॥
काळें ना पिंवळें निळें । तांबडें ना हिरवें नव्हे ॥
वर्णव्यक्ति तया नाहीं । सदोदिताचि संचले ॥ ४ ॥
घटाकाश मठाकाश । उपाधी करितां सुचे ॥
निरोपाधी गुणातीत । सदोदिताचि संचलें ॥ ५ ॥
कल्पांत मांडला जेव्हां । तेव्हां जैसें तैसें असे ॥
मायातीत परब्रह्म । सदोदिताचि संचलें ॥ ६ ॥
आत्मशास्त्र गुरुवाक्य । प्रचीत पाहणे बरी ॥
अहं ब्रह्म अहं ब्रह्म । सदोदिताचि संचलें ॥ ७ ॥
( ९ ) भुतेंचि भासती झाले । मुळींच भासला फणी ॥
पाषाण श्वापदा ऐसा । जाणतां भय तूटलें ॥ १ ॥
मार्गस्थ तस्करा ऐसें । काजवे व्याघ्र नेत्रसे ॥

कांवळे रींसने वाटे । जाणतां भय तूटलें ॥ २ ॥
अज्ञानें निश्चयो केला । मिथ्या सत्यचि वाटला ॥
विचारें ओळखों जातां । जाणतां भय तूटलें ॥ ३ ॥
बाऊ बाऊ मुलें भिती । जाणते नेणते कसे ॥
मी कोण हेंचि जाणावें । जाणतां भय तूटलें ॥ ४ ॥
पडसादेंची जो भ्याला । मृगजळीं बुडो म्हणे ॥
हेंचि शोधुनि पहावें । जाणतां भय तूटलें ॥ ५ ॥
(१०) चुकतां होतसे वांखा । न चुकतां बहू बरें ॥
अभ्यासें चूक सांडावी । अचूक मान्य होतसे ॥ १ ॥
चाळणा करावी सर्वें । एकांतीं राहतां बरे ॥
एकांत मानला ज्याला । त्याला साधे हळुहळु ॥ २ ॥
लोकिकीं गल्बला होतो । काळ जातो निरर्थकु ॥
जाणता करिना ऐसें । आयुष्यें धांव घेतली ॥ ३ ॥
क्रमला काळ तो गेला । अभ्यासेंविण वाउगा ॥
साधकु बाधकु झाला । व्यर्थची वय वेंचलें ॥ ४ ॥
बोलतां बोलतां येतें । पुसतां पुसतां कळे ॥
पुसणें सांगणें जाणे । यथातथ्य प्रचीतीनें ॥ ५ ॥
संवाद विवाद होतां । विवादें युद्ध होतसे ॥
म्हणोनि लोक सोडावे । आरण्य धरितां बरें ॥ ६ ॥

---

१ अस्वल. २ घोटाळा.

संगत्यागें सुखी व्हावें । वाचावें बहूतां परी ॥
प्रत्ययो पाहतां पोटीं । साधकू सिद्ध होतसे ॥ ७ ॥

(११) धन्य कर्तार तो गैबी । पाहो जातां दिसेचिना ।
सर्व कर्तव्यता ज्याची । जेथें तेथें चहूंकडे ॥ १ ॥
बहु गुण बहू रूपें । पाहों जातां दिसेचिना ॥
कर्ता तो भागला नाहीं । किती म्हणोन सांगणें ॥२॥
एकला आवरी सर्वै । कोण्या यत्नें कळेचिना ॥
अद्भूत तोचि जाणे तो । त्यावीण दुसरा नसे ॥३॥
अनंत लाघवी लीळा । त्यावीण दुसरा नसे ॥
एक सूत्रें तिहीं लोकां । बोलवी चालवीतसे ॥ ४ ॥
त्यावीण भोगिती दुःखें । त्याचेनि भाग्य भोगिती ॥
अरत्रीं हो परत्रीं हो । तेणें वीण घडेचिना ॥ ५ ॥

(१२) कष्टी कष्टी बहू कष्टी । नष्ट संदेह कष्टवी ॥
अष्टधा स्पष्ट जाणावी । श्रेष्ठ ते तुष्टती सदा ॥१॥
नित्यानित्यविवेकानें । प्रत्ययें प्रत्ययो घडे ॥
नित्य सत्य विचाराचें । सत्य सत्यास सांपडे ॥ २ ॥
प्रत्यक्ष प्रत्ययो येतो । प्रेत्न प्रत्यक्ष जाणिजे ॥
प्रसिद्ध प्राप्ति देवाची । प्रेत्नप्रांतास पाववी ॥ ३ ॥
ब्राह्मणु ब्रह्मवेत्ता तो । ब्राह्मणु ब्रह्मनिश्चयी ॥
ब्राह्मणु ब्रह्मस्थितीचा । ब्राह्मणु म्हणिजे गती ॥ ४ ॥
विश्वकर्ता विश्वभर्ता । विश्वभोक्ता परोपरी ॥

---

१ गुप्त.

दरिद्री वैभवी ज्ञाता । सर्व तो जगदांतरें ॥ ५ ॥
( १३ ) दोनी पुरुष ये लोकीं । क्षराक्षरची बोलिजे ॥
क्षर ते सर्वही भूतें । साक्षी कूटस्थ अक्षरू ॥ १ ॥
उत्तमु ईश तो अन्य । परमात्मा बोलिजे तया ॥
नाम रूप नसे तेथें । निर्विकारी गुणातीतु ॥ २ ॥
उत्तमु प्रत्यय ज्ञाती । मध्यमु शास्त्रनिश्चयी ॥
अधमु लोकधारीचा । पाषांडी अधमोधमु ॥ ३ ॥
उत्तमु कल्पनातीतु । मध्यमु शब्द बोलिका ॥
अधमु नेणता गर्वी । पापी तो अधमाधमु ॥ ४ ॥
उत्तमु मुख्य ज्ञाती तो । मध्यमु तो उपसकु ॥
अधमु संशयी कर्मी । कर्मभ्रष्ट अधमोधमु ॥ ५ ॥
धन्य जो सर्वही जाणे । सार शोधून घेतसे ॥
प्रत्ययेंवीण मानीना । तो ज्ञाता दुर्लभु जनीं ॥ ६ ॥
राम तो कोण तो जाणा । दास तो कोणता कसा ॥
भक्ती निवेदनी कैसी । ऐसें हें जाण साधका ॥ ७ ॥
(१४) देहाचा भर्वसा नाहीं । वैभवाचा असेचिना ॥
देश काळ वर्तमानें । सर्वही होत जातसे ॥ १ ॥
संगती चालते सर्वे । मागें पुढें हळुहळु ॥
देखतां देखतां होतें । कळतें न कळे असे ॥ २ ॥
देशोदेशिचे राजे । नाना श्रीमंत जाण ते ॥
किती आले किती गेले । कोण जाणे कळेचिना ॥ ३ ॥

दिसतें काय सांगावें । लोक जाती मरोनियां ॥
उपजलें वाढलें मेलें । आलें गेलें किती किती ॥ ४ ॥
यालागीं मोकळी वृत्ति । असली पाहिजे सदा ॥
धन्य ते जाणती ज्ञानी । उदास गिरीकंदरीं ॥५॥

(१५) शारदा वेदमाता हे । स्फूर्तिरूपा मनोरमा ॥
नादभेद कळा जोती । धन्य ते गायनी कळा ॥ १ ॥
अन्वये भक्ति ज्ञानाचे । ध्यानमूर्ति मनोहरा ॥
साहित्य सत्य बोलावें । सर्वांला आवडेलसें ॥२॥
मान नेमस्त जाणावे । म्हणावें प्रसंगें बरें ॥
श्रोत्याचें चित्त शोधावें । वंदावें तदनंतरे ॥ ३ ॥
अर्थ पाहोन जें गाणें । तें जाणें न विटे कदा ॥
सुचीत साक्षपी श्रोता । जाणता भक्त प्रेमळ ॥ ४ ॥
श्रोता तो जाणिजे ऐसा । तेथें गातां बहु बरें ॥
कळेना त्यापुढें गाणें । तें गाणें व्यर्थ होतसे ॥ ५ ॥
जाणता जाणत्या भेटे । नीतिचा गुण ग्राहकु ॥
अहंता नाढळे जेथें । तेथें आनंद होतसे ॥ ६ ॥
गीत वाद्य तानमानें । सर्व बुद्धिसी होतसे ॥
रंग तो मातला तेथें । घमंड होतसे सदा ॥ ७ ॥
थोर हे गायनी विद्या । सर्व सद्या विलासवी ॥
रामदास म्हणे माझा । राम हा बुद्धिदायकु ॥ ८ ॥

(१६)युक्ती नाहीं बुद्धि नाहीं । विद्या नाहीं विवेकिता ॥
नेणता भक्त मी तुझा । बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥
मन हें आवरेना कीं । वासना वावडे सदा ॥
कल्पना धावते सैरा । बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥
अन्न नाहीं वस्त्र नाहीं । सौख्य नाहीं जनामधें ॥
आश्रयो पाहतां नाहीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥
बोलतां चालतां येना । कार्यभाग कळेचिना ॥
बहुधा पीडिलों लोकीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥
तुझा मी टोणपा झालों । कष्टलों बहुतापरी ॥
सौख्य तें पाहतां नाहीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ५ ॥
नेटकें लिहितां येना । वाचितां चुकतों सदा ॥
अर्थ तो सांगतां येना । बुद्धि दे रघुनायका ॥ ६ ॥
प्रसंग वेळ तर्केना । सुचेना दीर्घ सूचना ॥
मैत्रिकी राखितां येना । बुद्धि दे रघुनायका ॥ ७ ॥
संसारीं श्लाघ्यता नाहीं । सर्वही लोक हांसती ॥
वीसरू पडतो पोटीं । बुद्धि दे रघुनायका ॥८॥
चित्त दुश्चित्त होताहे । ताळतंत्र कळेचिना ॥
आळसु लागला पाठीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ९ ॥
कळेना स्फूर्ति होईना । आपदा लागती बहू ॥
प्रत्यहीं पोट सोडीना । बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥
संसार नेटका नाहीं । उद्वेगु वाटतो जिवीं ॥
परमार्थु कळेना कीं । बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥

देईना पुर्वीना कोणी । उगेच जन हासती ॥
वोसरू पडतो पोटीं । बुद्धि दे रघुनायका ॥ १२ ॥
पिशुनें वाटती सर्वै । कोणीही मजला नसे ॥
समर्था तूं दयासिंधु । बुद्धि दे रघुनायका ॥ १३ ॥
उदास वाटतें जीवीं । आतां जावें कुणीकडे ॥
तूं भक्तवत्सला देवा । बुद्धि दे रघुनायका ॥ १४ ॥
काया वाचा मनोभावें । तुझा मी म्हणवीतसे ॥
हे लाज तुजला माझी । बुद्धि दे रघुनायका ॥ १५ ॥
मुक्त केल्या देवकोटी । भूभार फेडिला बळें ॥
भक्तासी आश्रयो मोठा । बुद्धि दे रघुनायका॥ १६ ॥
भक्त उदंड तुम्हांला । आम्हांला कोण पूसते ॥
ब्रीद हे राखणें आधीं । बुद्धि दे रघुनायका॥ १७ ॥
उदंड ऐकिली कीर्ति । पतीतपावना प्रभु ॥
मी एक रंक दुर्बुद्धि । बुद्धि दे रघुनायका ॥ १८ ॥
आशा हे लागली मोठी । दयाळु बा दया करी ॥
आणीक नलगे कांहीं । बुद्धि दे रघुनायका ॥ १९ ॥
रामदास म्हणे माझा । संसार तुज लागला ॥
संशयो वाटतो पोटीं । बुद्धि दे रघुनायका ॥२० ॥

(१७) गणेश पुजावा आधीं । विद्या बुद्धि प्रदायकु ॥
पूजितां तुटती चिंता । भजतां विघ्न जातसे ॥ १ ॥

चुकतां निकामी होतो । करंटा तो म्हणोनिया ॥
मूर्ख श्रेष्ठांस मानेना । दरिद्री साक्षपी नव्हे ॥ २ ॥
शरीर आंसुदे राखे । कष्टविना कदापिही ॥
जेवणें खेळणें माने । हांसणें नीजणें सदा ॥ ३ ॥
संगती मूर्ख पोराची । थोरा सन्मुख नाढळे ॥
कामास चुकवी जो तो । गयाळी मोकळा सदा ॥४॥
भला तो खोडि सांडीतो । श्रीमंत सर्व साक्षपी ॥
भल्यांस निववूं जाणे । कार्यभाग परोपरी ॥ ५ ॥
कामासी पाहिजे कामी । निकामी तगणे जनीं ॥
कार्यभाग करावा रे । कार्यकर्तांचि धन्य तो ॥ ६ ॥
कार्यभाग करूं जाणें । लोक राजी समस्तही ॥
सर्वांसी पाहिजे ऐसा । अभ्यासें होतसे जनीं ॥ ७ ॥
(१८)ज्याचा जो अभ्यास जैसा । तैसा व्यापार पाहणें ॥
पाहता पाहतां जाणे । जाणतां जाणता कळे ॥ १ ॥
कळतां कळतां शीके । शिकतां शिकतां करी ॥
करितां करितां वाढे । वाढतां वाढतां भला ॥२॥
ल्याहावें शुद्ध वाचावें । जाणावें तदनंतरें ॥
जाणतां कळतां बिंबे । बिंबतां स्फूर्ति होतसे ॥ ३ ॥
प्रत्यय बोलतां आले । अचुक न चुके जनीं ॥
सत्य मिथ्या कळों आले । जाणता त्यास बोलिजे ॥४॥
चुकेना ठकेना कामीं । प्रसंग जाणता बरा ॥

यथातथ्य त्वरा जाणे । ज्याचे त्याचे परोपरी ॥ ५ ॥
कार्य तें नेमितां येना । प्रसंग बहुतापरी ॥
म्हणोनि जाणता व्हावा । जाणजाणो वर्तविया ॥ ६ ॥
उणीव येउं दे ना तो । कलहो न करी सदा ॥
जनाचें मन तो राखे । युक्तिनें काम चालवी ॥ ७ ॥
ऐसा शाहाणा लोकीं । तयाची संगती बरी ॥
धरीतां सौख्य होताहे । प्रवृत्ति निवृत्तिकडे ॥ ८ ॥
(१९) वन्ही तो चेतवावा रे । चेतवितांच चेततो ॥
विवेक जाणिजे तैसा । वाढवितांच वाढतो ॥ १ ॥
संग तो साक्षपीयाचा । धरीतां साक्षपु घडे ॥
साक्षपें साक्षपु वाढे । पुरती मनकामना ॥ २ ॥
कष्टता सौख्य मानावें । कष्टीं फळची पाविजे ॥
आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्मांड भोगवी ॥ ३ ॥
केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ॥
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥ ४ ॥
अचूक यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ॥
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ॥ ५ ॥
सावधु देव जाणावा । उन्मत्त दैत्य बोलिजे ॥
होरस्या दैत्य जाणावा । देव तो सौख्यदायकु ॥ ६ ॥
साक्षपी अंश देवाचे । आळशी वंश दानवी ॥

---

१ हट्टी.

राक्षसी दैत्य तो मोठा। अन्यायें दैत्य झाला ॥ ७ ॥
देव सर्वांस सांभाळी। तदंश जाणिजे तसा ॥
दैत्य ते पीडिती लोका। तदंश त्याचसारिखे ॥ ८ ॥

(२०) देखिली तुळजा माता। निवालें अंतरीं सुखें ॥
तुटली सर्वही चिंता। थोर आधार वाटला ॥ १ ॥
संसार पाहतां मागें। पाळिले सर्वही कुळ ॥
प्रस्तुत प्रत्ययो आतां। रक्षिते बहुतांपरी ॥ २ ॥
आघात संकटे वारी। निवारी दुष्ट दुर्जना ॥
संकटीं भर्वसा मोठा। तत्काळ काम होतसे ॥ ४ ॥
प्रपंचीं आमुचे कुळीं। तुळजा कुळदेवता ॥
नेणतां ऐकिलें होतें। जाणतां स्मरतें मनीं ॥ ५ ॥
वैराग्य घेतलें पोटीं। सर्व संसार सांडिला ॥
तुझिया दर्शना आलों। कृपादृष्टीं नवाजिलों ॥ ६ ॥
तुझा नवाजिला आहे। महंत म्हणती जनीं ॥
तूझोंचि सर्वही देणें। सर्वहि तुजपासुनी ॥ ७ ॥
संसारीं मोकळें केलें। आनंदीं ठाव दीधला ॥
तोडिली सर्वही चिंता। तूं माया सत्य जाहलें ॥८॥
उदंड ऐकिलें होतें। रामासी वर दीधला ॥
मी दास रघुनाथाचा। मजही वरदायिनी ॥

१ नवाजणें—स्तुती करणें.

सदानंदीं उदो झाला । सुख संतोष फावला ॥
पराधीनता ते गेली । सत्ता उदंड चालिली ॥ ९ ॥
जीवींचें जाणते माता । तूं माता मज रोकडी ॥
लोकांच्या चुकती माता । अचुक जननी मला ॥१०॥
एकची मागणें आतां । द्यावें तें मज कारणें ।
तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हाचि देखतां॥११॥
दुष्ट संहारिलें मागें । ऐसें उदंड ऐकतों ॥
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवी ॥ १२ ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ॥
क्षमावें तुळजे मातें । इच्छा पूर्णचि ते करी ॥ १३ ॥
बाळका वाढवी माता । जेथें तेथें परोपरी ।
स्वभावें जीविचें जाणें । अंतरीं विवरे सदा ॥ १४ ॥
बाळका बोलतां येना । हीत तेंहि कळेचिना ॥
हेकाड बावळें वेडें । मातेला प्रिय होतसे ॥ १५ ॥
नागवें उघडें लोळे । हागे वोकी अव्हासव्हा ॥
तैशास नेटकें दावी । लेवी नेसवी सदा ॥ १६ ॥
मातेचा कळवळा मोठा । लोभासी तुळणा नसे ॥
आळसेना विसंभेना । कंटाळेना कदापिही ॥ १७ ॥
त्रैलोक्य बाळका पाळी । वाढवी शहाणें करी ॥
कुळेची पाळली कीर्ति । कुळदेव्या म्हणोनिया ॥१८॥
त्रिलोकीं पुरली आहे । त्रैलोक्य जननी पहा ॥

तेचि हे तुळजामाता । भक्तांसी पाळिते सदा ॥१९॥
ओळखी सांडिली बाळें । तीला तों सांडितां नये ॥
लोभेंची पाळणें लागे । नाना देहीं भरोनियां ॥२०॥
शक्ती ते सर्व शक्तीते । आदि–मुक्ती पुरातना ॥
दासासी पाळते लीला । ध्यानमूर्ति ठसावली ॥२२॥
(२१) संगीत गायनी विद्या । सर्व सद्या मनोरथा ॥
विदेश पाहतां नाहीं । धन्य ते गायनी कळा ॥ १ ॥
आवडी सकळै लोकां । प्रीतीनें भजती जनीं ॥
इच्छिते पुर्विते सर्वै । धन्य ते गायनी कळा ॥२॥
एकाकी महंती येते । उदंड कीर्ति वाढते ॥
विख्यात सकळै लोकीं । धन्य ते गायनी कळा ॥३॥
राहती लोक ते राजी । आवडी उपजे मनीं ॥
वर्णितां कीर्ति देवाची । धन्य ते गायनी कळा ॥४॥
प्रबंधें कीर्ति देवाची । जाड दृष्टांत नेटके ॥
रसाळ गौल्यता मोठी । धन्य ते गायनी कळा ॥५॥
भक्तीची आवडी मोठी । करुणा कीर्तनें बरीं ॥
भक्तांची आवडी भक्तां। धन्य ते गायनी कळा ॥६॥
(२२) प्रपंच नेणतां वेडा । जाणतां देव बोलिजे ॥
चतुर इतरा वाटे । ज्ञानी तो सर्व दुर्लभु ॥ १ ॥
उत्तमु जाणतां ज्ञानी । मध्यमु जाणता भला ॥
अधमु जाणतां वेडा । मूर्ख सर्वत्र नेणती ॥ २ ॥

नेणतां बोलणें खोटें । नेणतां कलहो उठे ॥
नेणतां विस्कटे विद्या । नेणतां फस्कटे सभा ॥ ३ ॥
त्याहावें शुद्ध वाचावें । शोधावें प्रत्ययें बरें ॥
बोधावें विवेकें न्यायें । प्रचीत सकळां कळे ॥ ४ ॥
जग हें जगदीशाचें । जाणतें बहुतांपरी ।
उगेंचि अनुमानेना । पाहिजे जाणती कळा ॥ ५ ॥
लोक हे राखतां राजी । सर्व राजीच होतसे ॥
अंतरें चुकतां तेथें । सर्व [1]भाजीच होतसे ॥ ६ ॥
जन हे वोळतु जेथें । अंतरात्माचा बोळला ॥
जन हें खौळलें जेथें । अंतरात्माचि खौळला ॥ ७ ॥
करावें आपणासाठीं । बरें वाईट वोखटें ॥
करावें तेंचि पावावें । द्यावें घ्यावेंचि ऊसणे ॥ ८ ॥
बऱ्यानें बरवें होतें । दुःखें दुःखचि वाढतें ॥
सर्व हें आपणापासी । लोकांसी म्हणतां नये ॥ ९ ॥
तावितां तप्त होताहे । भांडतां भांडती बहु ॥
मुखेंचि सौख्य जोडावें । सौख्यें सौख्यचि होतसे ॥
स्तवावें बहुतां लोकां । मानावे बहुतापरी ॥
विध्योक्त विश्व वंदावें । निंदा हे आत्मघातकी ॥ ११ ॥
अधिकार सोडितां खोटें । अधिकार राखतां बरें ॥
प्रसंग साधितां साधे । प्रसंग चूकतां कळे ॥ १२ ॥

---

१ घोटाळा.

विवेकानें चुकावेना । घडीघडी क्षणक्षणा ॥
चुकतां साम्यता कैची । अत्र हो परत्र हो ॥ १३ ॥
एकांत सेवितां आधीं । चाळणा करितां बरी ॥
अभ्यासीं लावितां बुद्धि । अकस्मातचि संभवे ॥१४॥
गल्बला होंचि नेदावा । गल्बला बुद्धि भ्रष्टवी ॥
मुळींचि नेणतें व्हावें । जाणत्या नेणत्यामधें ॥१५॥
( २३ ) फीरणें बहूतां ठायीं । संसार हा बहुचकु ॥
बहुतांसी बोलणें लागे । गांवोगांवीं घरोघरीं ॥ १ ॥
घरींची माणसें राजी । राखावीं तीं परोपरी ॥
भंगलें चित्त जाणावें । रक्षावें तें परोपरी ॥ २ ॥
अंतरीं प्रीती राखावी । शब्दाशब्दीं परोपरी ।
तुटली प्रीति ते खोटी । राक्षिली पाहिजे बरी ॥ ३ ॥
वर्ततां येत नाहीं रे । वर्तणें नकळे जनीं ॥
सकळांसी राखणें राजी । हे मुख्य भक्ति जाणिजे ॥

## इहलोक.

(२४) वासना मायबापाची । रमतां एक जाहली ।
आवडी राहिली पोटीं । रक्तरेतें तनुघडे ॥ १ ॥
आधिक काम मातेचा । तेणें कन्याच होतसें ॥
आधीक काम पित्याचा । तेणें नरची होतसे ॥ २ ॥
चत्वार खाणिचे प्राणी । वाढती ते येणे रीती ॥
न्यून पूर्ण नरनारी । समान काम नपुंसकु ॥ ३ ॥

जे जे जातीमधें जन्म । ते ते तैसेच शीकती ।
शीकती शिकवीताती । नानायत्नें परोपरी ॥ ४ ॥
जाणता लोक भाग्याचा । नेणता दरिद्री सदा ॥
दरिद्री आळसी मोठा । भाग्याचा यत्न वाढवी ॥५॥
कर्मानुसार या लोकीं । संगती सापडे बरी ॥
इहलोक परलोकीं । सत्संग पाहिजे बरा ॥ ६ ॥
जन्मती करंट्या पोटीं । ते तों करंटेंचि खरे ॥
सेवितां लोक भाग्याचा । सेवनें भाग्य भोगिती ॥७॥
सेवकु एकएकांचा । प्रत्यक्ष दिसते जनीं ॥
या लागीं संग भाग्याचा । प्रत्यक्ष भाग्य भोगवी ॥८॥
कित्येक लोक भाग्याचे । करंटे होतसे पुढें ॥
बुद्धिचा भ्रंश होताहे । यालागीं भाग्य जातसे ॥९॥
भाग्याचे करंटे होती । करंटे भाग्य भोगिती ॥
प्रत्यक्ष दिसतें लोकीं । पाहतां पाहतां कळे ॥ १० ॥
बुद्धिचें गुंथाडे मोठें । दक्ष धूर्तचि जाणती ॥
जाणोनि काय होतें रे । वर्तणें खस्त पाहिजे ॥११॥
लोक हे लालची मोठे । गफलती होतसे सदा ॥
भाग्य हें चुकतां जातें । आळसें काम नासतें ॥१२॥
बुद्धि हे इह लोकींची । अल्पसी बोलिली असे ॥
प्रचीत पाहतां आहे । जाणते जाणती गुणी ॥ १३ ॥

## परलोक.

(२५) संसारें कष्टता प्राणी । त्रासला बहुतां परी ॥
संगती चालिसे गेले । वैराग्य भरतें मनीं ॥ १ ॥
तीर्थ यात्रा करीना नाना । ऐकिलें बहुता परी ॥
गुरूवीण मार्ग नाहीं । म्हणोनि गुरु पाहिला ॥ २ ॥
गुरूची परीक्षा नेणें । एकाकी पडिला भरू ॥
गुरू तो जाणता नाहीं । ज्ञानवैराग्य दुर्बळु ॥ ३ ॥
दरिद्री पीडीला प्राणी । चाकरी ठेविला ठके ॥
पावेना सांडितां येना । दांत चाऊन राहिला ॥ ४ ॥
साहेब जोडतां मोठा । भाग्य तत्काळ पाविजे ॥
धणी तो करंटा आहे । सेवकु रडतो सदा ॥ ५ ॥
तैसाची ज्ञानियां योगी । विश्वविख्यात पाहिज़े ॥
लाहिजे प्रत्ययो तेथें । नेमस्त परलोकिचा ॥ ६ ॥
बहूतां मान्य मानावें । बहूतां वंद्य वंदिजे ॥
निंद्य तें वंदितां खोटें । हांसती सकळै जनीं ॥ ७ ॥
जाणोनि घेइजे नाणें । खरें खोटें परीक्षुनी ॥
परीक्षा नेणता प्राणी । सहजें ठकला असे ॥ ८ ॥
नित्यानित्य विवेकानें । सारासार विचारणा ॥
आत्मशास्त्र गुरुवाक्य । ऐक्यता घडतां बरें ॥ ९ ॥
पिंड ब्रह्मांडीचे देह । तत्वें तत्वविवंचना ॥
पंचीकर्ण महावाक्यें । समाधानाचि पाविजे ॥ १० ॥

श्रवणें सार शोधावें । मननें मन मावळें ॥
निवळा निवळे सर्वें । साध्य साध्यचि होइजे ॥११॥
दृश्य ना भास भासेना । साधकु साध्य जाहला ॥
देह संदेह तो कैचा । मोक्ष मोक्षचि जाहला ॥१२॥

## तुळजामाता

( २७ ) शक्तीरूपें जगन्माता । वर्तते जगदांतरी ॥
त्रिलोकीं जितके प्राणी । शक्तीवीण वृथावृथा ॥ १ ॥
प्रसिद्ध तुळजामाता । श्रीराम वरदायिनी ॥
कुळासी पाळिले मुळीं । आतां आम्हांसी पाळते ॥ २ ॥
बहुताचे कुळीं आहे । पहा प्रचीति रोकडी ॥
कृपेनें रंक ते राजे । सामर्थ्यें वर्तती जनीं ॥ ३ ॥
चुकतां क्षोभतें नेटें । राजे रंक करी पुन्हा ॥
आरोग्या रोग लावीते । फोडी सर्वांग खांडकें ॥ ४ ॥
कामने सारखी वाचा । गोविती बहुतापरी ॥
तुष्टतां तुळजामाता । पुरती मन कामना ॥ ५ ॥
रामदास म्हणे माझी । माता हे जगदीश्वरी ॥
ऐश्वर्य सर्व शक्तीचे । विवेकें प्रत्ययें पहा ॥ ६ ॥

२८ पाडवा आडवा आला । मन घाला अभ्यासितां ॥
विवर्णें अंतःकर्णें हो । सांगणें अर्थ येथीचा ॥ १ ॥
अभ्यासें होत आहेरे । अभ्यास करणें सदा ॥
उदंड बोलणें लागे । यथातथ्य हळुहळु ॥ २ ॥

सर्वही पेरणें विद्या । लोकांमध्यें हलुहलु ॥
नेणते जाणते करणें । कथा नीरूपणें सदा ॥ ३ ॥
कंटाळा दुरि टाकावा । मनामधें त्रासो नये ॥
सांगता सांगतां हासे । हांसे खेळे अहर्निशीं ॥ ४ ॥
लोक हे आभारे भारे । विचारें दाटले बहु ॥
अखंड सर्वस्त्रे राजी । नवाजीतो मृदोत्तरें ॥ ५ ॥
मैत्रिकी सर्व लोकांसीं । मनापासून जाहली ॥
वेध हा लागला मोठा । लोक भाटचि जाहले ॥ ६ ॥
सर्वांसी राखणे राजी । सर्व काळ मृदोत्तरें ॥
एकाचि जीव सर्वांचा । कट्टबद ढळेचिना ॥ ७ ॥
भक्तीचा जिव्हाळा मोठा । खोटा मार्ग असेचिना ॥
रामदास म्हणे माझा । राम त्रैलोक्य नायकु ॥ ८ ॥
(२९) आमुची ओळि देवाची । वाचीना त्या कळेचिना ॥
राम उपासना माझी । त्रैलोक्य व्यापिनी पहा ॥ १ ॥
सोडिले देव बंदीचे । पापी राक्षस मारिले ॥
प्रताप पाहतां मोठा । ज्ञानी सर्वत्र जाणती ॥ २ ॥
अध्यात्मीं तो गुरू व्हावा । वीतरागी विचक्षणु ॥
कर्म उपासना ज्ञानें । सर्व संदेह तूटती ॥ ३ ॥
सिद्धांत पाहिल्याविणें । मोक्ष हातीं घडेचिना ॥
वेदांती बोलिले सर्वे । पुढें मौन्याचि राहिला ॥ ४ ॥

१ ---

तो अर्थ पाहणें आर्धी । मौन्यगर्भ विचारणा ॥
तें वर्म सद्गुरूपासी । वेदशास्त्र कळेचिना ॥ ५ ॥
सर्वसंग परित्यागी । महायोगी विवंचला ॥
जनांत पाहतां वर्ते । प्रतापें धर्मस्थापना ॥ ७ ॥
संसार देखिला जेहीं । तेहीं अध्यात्म साधणें ॥
अध्यात्म पाहिल्यावीण । चुकेना यमयातना ॥ ७ ॥
विवेकी दक्ष जो कोणी । पुरूषार्थु धर्मरक्षकु ॥
अमोल्य जन्म ह्या तेणं । व्यर्थची दवडूं नये ॥ ८ ॥
संसारीं दोनि साधावी । इह लोक परत्रही ॥
इहलोक साधिती सर्वै । शक्यनुसार घरोघरीं ॥९॥
पाप उदंड जाहाले । कळेना सद्गुरूविणें ॥
सद्गुरू पाहतां नाहीं । पुण्य उदंड पाहिजे ॥ १० ॥
पुण्याचें रूप तें कैसें । हेंचि आर्धी कळेचिना ॥
सर्वही निर्णयो जेथें । तोचि ग्रंथ बरा पहा ॥११॥
कळेना ऐकिल्यावीण । इहलोक परत्र ही ॥
परत्र पावना देवा । दीननाथा रघूत्तमा ॥ १२ ॥

## आनंद वनभुवन.

(३०) जन्मदुःखें जरादुःखे । नित्यदुःखें पुनःपुन्हा ॥
संसार त्यागणें, जाणें । आनंदवनभुवना ॥ १ ॥

---

१ दासबोध.

संसार वोढितां दुःखें । ज्याचें त्यासीच ठाऊकें ॥
परंतु एकदां जावें । आनंदवनभुवना ॥ २ ॥
न सोसे दुःख होतें तें । दुःख शोक परोपरी ॥
एकाकी एकदा जावें । आनंदवनभुवना ॥ ३ ॥
कष्टलों कष्टलों देवा । पुरे संसार जाहला ॥
देहत्यागासी येणें हो । आनंदवनभुवना ॥ ४ ॥
स्वर्गाची लोटली जेथें । रामगंगा महानदी ॥
तीर्थासी तुळणा नाहीं । आनंदवनभुवनीं ॥ ५ ॥
त्रैलोक्य चालिलें तेथें । देवगंधर्व मानवी ॥
ऋषी मुनी महायोगी । आनंदवनभुवनीं ॥ ६ ॥
आक्रा आक्रा बहू आक्रा । काय आक्रा कळेचिना ॥
गुप्त तें गूप्त जाणावें । आनंदवनभुवनीं ॥ ७ ॥
त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंध विमोचाने ॥
मोहीम मांडली मोठी । आनंदवनभुवनीं ॥ ८ ॥
कल्पांत मांडला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया ॥
कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभुवनीं ॥ ९ ॥
बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावतें ॥
अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभुवनीं ॥ १० ॥
त्रैलोक्य गांजिते मागें । ठाउकें विवेकी जना ॥
कैपक्ष घेतला रामें । आनंदवनभुवनीं ॥ ११ ॥

बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला ॥
मोडलीं मांडलीं छत्रें । आनंदवनभुवनीं ॥ १२ ॥
गळाले पळाले मेले । झाले देशधडी पुढें ॥
निर्मळ जाहली पृथ्वी । आनंदवनभुवनीं ॥ १३ ॥
उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया ॥
जपतप अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥ १४ ॥
बंड पाषांड उडालें । शुद्ध अध्यात्म वाढलें ॥
रामकर्ता रामभोक्ता । आनंदवनभुवनीं ॥ १५ ॥
रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि उठली ॥
मर्दिले पूर्वीचे पापी । आनंदवनभुवनीं ॥ १६ ॥
प्रत्यक्ष चालिली राया । मूळमाया समागमें ॥
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनीं ॥ १७ ॥
भक्तांसी रक्षिलें मागें । आतांही रक्षिते पाहा ॥
भक्तांसी दीधलें सर्वें । आनंदवनभुवनीं ॥ १८ ॥
सामर्थ्यें यश कीर्तिचीं । प्रतापें सांडिली सीमा ।
ब्रिदेची दिधली सर्वें । आनंदवनभुवनीं ॥ १९ ॥
वेदशास्त्र धर्मचर्चा । पुराणें महात्में किती ॥
कवित्वें नूतनें जीर्णें । आनंदवन भुवनीं ॥ २० ॥
उदंड ठेविलीं नामें । आपस्तुतींच मांडली ॥
ऐसें हें बोलणें नाहीं । आनंदवनभुवनीं ॥ ११ ॥

बोलणें वाउगें होतें । चालणें पाहिजे बरें ॥
पुढें घडेल तें खरें । आनंदवनभुवनीं ॥ २२ ॥
महिमा तो वर्णवेना । विशेष बहूतांपरीं ॥
विद्यापीठ तें आहे । आनंदवनभुवनीं ॥ २३ ॥
सर्वसद्या कलाविद्या । नभूतो न भविष्यति ॥
वैराग्य जाहाले सर्वै । आनंदवनभुवनीं ॥ २४ ॥

(३१) दुःख दारिद्य उद्वेगें । लोक सर्वत्र पीडिलें ।
मुळींची कुलदेवी हे । संकटीं रक्षिती बळें ॥ १ ॥
राम उपासना माझी । त्रैलोक्य सुख पावतें ॥
सोडिले देव इंद्रादी । तोडिलीं बंधनें बळें ॥ २ ॥
कीर्तीसी तुळणा नाहीं । प्रतापें आगळा बहू ॥
न्याय नेमस्त हे लीळा । नभूतो न भविष्यती ॥ ३ ॥
ते सूर्यवंशीचे राजे । विख्यात भुवनत्रयीं ॥
नेमस्त न्याय नीतीचे । करिती धर्म स्थापना ॥ ४ ॥
रामराजा महाराजा । वर हा दिधला तया ॥
जननी रामवरदानी । तधीपासून बोलिजे ॥ ५ ॥
तुळजापुरची माता । प्रतापेंचि प्रगटली ॥
आदिशक्ती महामाया । कुळींची कुळस्वामिनी ॥६॥
शक्तीनें पावती सुखे । शक्ती नसतां विटंबना ॥
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे ॥ ७ ॥

कोण पुसे अशक्ताला । रोगीसें बराडी दिसे ॥
कळा नाहीं कांती नाहीं । युक्ति बुद्धि दुरावली ॥८॥
सार संसार शक्तीनें । शक्तिनें शक्ति भोगिजे ॥
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ॥ ९ ॥
शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ॥
शक्तीयुक्ती जये ठायीं । तेथ श्रीमंत धांवती ॥१०॥
युक्ती तें जाड कळा । विशक्तीसी तुळणा नसे ॥
अचूक चुकेना कोठें । त्याची राज्यें समस्तही ॥११॥
उदंड खस्तिची कामें । मर्द मारुनि जातसे ॥
नामर्द कायते लंडी । सदा दुश्चित्त लालची ॥१२॥
फितव्यानें बुडती राज्यें । खबर्दारी असेचिना ॥
युक्तीना शक्तीना बेगी । लोक राजी असेचिना ॥१३॥
बेदादी बेकैद सेना । कारभारीच चोरटे ॥
धण्यास राखणे राजी । कदा काळीं घडेचिना ॥१४॥
चोरटी होरटी[३] तुंदे[४] । नासके लाच इच्छिती ॥
लौंढीचे[५] दुरि घालावे । मारावें राजकारणें ॥ १५ ॥
सेवकां आवरूं नेणें । तो राजा मूर्ख जाणिजे ॥
मूर्खाचें राज्य राहेना । कोणाचे कोण ऐकतो ॥१६॥

---

१ मित्रा. २ वेळेवर ३ हटवादी ४ गर्विष्ठ. ५ दुष्ट-गुलाम.

लोकांसी राखणें राजी । तें राज्य प्रबळें बळें ॥
बंद बेबंद जाणावे । ताबे ताबे परोपरी ॥१७॥
खर्ल खोचर काढावे । तांदुळा सारिखे खडे ॥
खरें तें आदरें घ्यावें । खोटे सर्वत्र टाकिती ॥१८॥
सगट सारिखे जेथें । तेथें होते बराबरी ॥
सार गार कळेनाकीं । जाणते नेणते जनीं ॥१९॥
कांहीएक परीक्षावें । शोधावें बहुतांपरी ॥
नेटकें कार्य साधावें । रोधावें कुटिला जना । २०॥
असो हें बोलणें झालें । युक्तीविण कामा नये ॥
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हे॥२१
मुक्त केल्या देवकोटी । सर्व ही शक्तिच्या बळें ॥
समर्थ भवानी माता । समर्था वरु दीधला ॥२२॥
राम वरदायिनी माता । दासें शोधुनि काढिली ॥
ओळखी पडतां ठायीं । भिन्न भेद असेचिना ॥२३॥
तुझा मी मी तुझा माते । ऐसें हे बोलणें नव्हे ॥
तुझी तूं तूं तुझी माता । जगज्ज्योती कृपाळुवे ॥२४॥
बोलतां भवानी माता । महींद्र दास्य इच्छिती ॥
बोलणें हें प्रचीतीचें । अन्यथा वाउगें नव्हे ॥ २५ ॥
मुलांची लाज मातेला । शीकवी सरसे करी ॥
लोभे लोभेंचि शृंगारी । आपली भूषणें तया ॥२६ ॥

---

१ समुदाय. २ दोष छिद्रें.

जीव त्या बाळकापासी । अखंड लाविला असे ॥
स्वहीत कळेना त्याला । शिकवी ते बहु बहुमता ॥

(१) सुरेंद्र चंद्रशेखरू । अखंड ध्यातसे हरू ॥ जनासि सांगतो खुणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ १॥ महेश पार्वती प्रती । विशेष गूज सांगती । सलाभ होतसे दुणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ २ ॥ विषें बहूत जाळिलें । विषें बहुत पोळते ॥ प्रचीत माझिया मना श्रीराम राम हें म्हणा ॥ ३ ॥ बहू प्रयत्न पाहिले । परंतु सर्व राहिले ॥ विबुध पक्ष रक्षणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ ४ ॥ अपाय होत चूकला । उपाय हा भलाभला ॥ नसे जयास तूळणा । श्रीराम राम हे म्हणा ॥ ५ ॥ बहूत पाहिलें खरें । परंतु दोनि अक्षरें ॥ चुकेल यमयातना । श्रीराम ॥ ६ ॥ मनीं धरूनि साक्षपे । अखंड नाम हें जपें ॥ मनांतरीं क्षणक्षणा श्रीराम राम राम हे म्हणा ॥ ७ ॥

(२) मृगांकमौळिच्या मनीं । अखंडध्यान चिंतनीं ॥ १ ॥ तया रुपाकडे मना । अखंड भाव भावना ॥ २ ॥ अखंड ठाण बाणलें । गुणीं धनुष्य ताणलें ॥ सपिच्छ ते सणाणिलें । भुमंडलीं दणाणिलें ॥ ३ ॥

---

१ देव २ शंकराच्या ३ बाणमारावयाच्या वेळाचें स्वरूप.

रघुविरा धरा मनीं । त्यजुनि काम कामिनी ॥ पथीं सगुण–गामिनी । तडक मेघ दामिणी[3] ॥ ४ ॥ सुवर्ण रत्न भूषणीं । विराजतो विभूषणीं ॥ समर्थ राम देखिला मयंक रंक शंकला ॥ ५ ॥ सुगंध बाणली उटी । विशेष कास गोमटी ॥ सुढाळ माळ साजिरी । विभूषणें परोपरी ॥ ६ ॥ ब्रिदावळी पदीं वसे । विशेष दूसरा नसे । विबुध–बंध तोडिले । अनंत जीव सोडिले ॥ ७ ॥ श्रीराम शामसुंदरू । सगागमे फणीवरू । विराजते सितासती । समोर दास मारुती ॥

(३) अखंड सावधान रे । प्रयोग प्रयत्न मान रे ॥ प्रसंग हा तुफानरे । नकोचि व्यवधान रे ॥ १ ॥ मनीं धरूनि धारणा । करूं बरी विचारणा । प्रयत्न मूळ कारणा । अतर्क्य ते विचारणा ॥ २ ॥ बहु विधी विधानहो । परंतु सावधान हो । प्रमाणें जाण उत्तरें । प्रत्योत्तरें निरोत्तरें ॥ ३ ॥ अहो जना अहो जना । मने मना विवंचना ॥ अस्त्रहो सस्त्रहो । प्रचीत पाववी मोहो ॥ ४ ॥ म्हणे उदास दास हा । बरें पहा बरें पहा ॥ करील प्रयत्न जीतुका । तयास लाभ तीतुका ॥ ५ ॥

---

१ वीज. २ चंद्र ३ लक्ष्मण.

( ४ ) करील व्याप तो भला । बहुत भाग्य लाध-ला ॥ नसेल व्याप तो हळू । पळेल रे पळेंपळू ॥ १ ॥ अरत्र हो परत्र हो । विचित्त काळ सूत्र हो ॥ अखंड सावधानता । सभाग्य तो नव्हे रिता ॥ २ ॥ अनेक भाव भावना । सदा मनीं विवंचना विशेष धारण धरी । उदंड चाळणा करी ॥ ३ ॥ सखोल तों कळे-चिना । सदा लिळा तुळेचिना ॥ परांतरासि जाणता दिसे जनास नेणता ॥ ४ ॥ कवी म्हणे बहू बरे । करील देव तें खरें ॥ बरी धरूनि वासना । धरा मनीं उपासना ॥ ५ ॥

( ५ ) श्रीराम राम रामरे । समर्थ योगधाम रे ॥ दयाळ तो दयाकरी । कवी जनासि वीवरी ॥ १ कदापि जें घडेचिना । जनासि सांपडेचिना ॥ करी तयापुढे दया । अपाय जाय वलिया ॥ २ ॥ धनुष्य-बाण धारकू । हरी जनासि तारकू ॥ प्रचंड ध्यान तें धरा । मनांतरींच वीवरा ॥ ३ ॥ अखंड पार्वतीपती रघूत्तमासि चिंतिती । प्रचीत बाणली मना । उपाय सूचला जना ॥ ४ ॥ जसा तसाचि काळ हो । मनीं धरा दयाळ हो ॥ तुम्हासि तो दया करू । अनन्य भाव वीवरू ॥ ५ ॥

( ६ ) महंत हो नका नका । बहूत वैभवें धका ।[1] उदास दास तापसी । फिरे ळिळा जशी तसी ॥ १ ॥ विचार सार वीवरू । नव्हे विवेकु रूवरू ॥ नरू नव्हे खराखरू । किती शिणेल पामरू ॥ २ ॥ प्रसंग हा तडातडी । करा विवेक तातडी ॥ सुचीत व्हा घडी घडी । प्रबोध घ्या खडाखडी ॥ ३ ॥ पहा पहा बरें बरें । करील देव तो खरें ॥ अहंमती अनावरे । विवेक हीन पामरे ॥ ४ ॥ करील तो करील रे । तुम्हासि काय बोल रे ॥ उरों नका म्हणे कवी । उदास दास शीकवी ॥ ५ ॥

(७) अनेक साधना करूं । अनेक धारणा धरूं ॥ उरेल जीव भावतो । नुरेल देव तोचि तो ॥ १ ॥ करील सर्व मीपणें । धरील तें दुजेपणें ॥ उपाय रे भला भला । परंतु हेत चूकला ॥ २ ॥ चुकोनियां चुका पडे । घडोन भक्त वीघडे ॥ अन्यन हो अनन्य हो । अनन्य होत धन्य हो ॥ ३ ॥ अनन्यता नसे तुला । तरीच देव चूकला ॥ विभक्त भक्त तूं कसा । अहंपणें असातसा ॥ ४ ॥ कळोन ही कळेंचिना । वळोनही वळेचिना ॥ कसें करूं कसें करूं । मनें मनासि वीवरूं ॥ ५ ॥ विवंचना घडी घडी । विचार कोण

---

१ प्रत्यक्ष.

नीवडी ॥ विवेक पूरता असे । तयास सर्व वोलसे ॥६॥ गुणें गुणासि खंडिजे । मनें मनासि दंडिजे ॥ नव्हेचि अंतवंत रे । अनंत तो अनंत रे ॥ ७ ॥ न बोलतांचि जाणतां । खुणे खुणासि बाणतां । मिळेल कोण तो गुणी । कळेचिना क्षणी क्षणी ॥ ८ उगा उगा उगाचि रे । नव्हेचि वाउगाचि रे ॥ नका नका वदों नका । विवेक होतसे फिका ॥ ९ ॥ अनन्य भाविता धुरे । तुरोनि दास उद्धरे ॥ नसोन पावला खुणा । म्हणाल तें सुखें म्हणा ॥ १० ॥

(७) कितेक जीव जन्मती । कितेक मृत्यु पावती कितेक होत जातसे । मना प्रचीत येतसे ॥ १ ॥ कितेक वृक्ष वाढती । कितेक वृक्ष मोडती ॥ कितेक पाहतां रचे । कितेक मागुते खचे ॥ २ ॥ कितेक देश लागला । कितेक देश भंगला ॥ कितेक नृपती भले । परंतु मृत्यु पावले ॥ ३ ॥ कितेक उत्पत्ती स्थिती । कितेक पावती गती ॥ तुम्ही समस्त देखतां । कठिण काळ धाकतां ॥ ४ ॥ स्वहित जाणतां खरें । न जाणतां नव्हे बरे ॥ क्षराक्षरासि वीवरा । विचार हा बरा बरा ॥ ५ ॥ असार सार वाड रे । क्षिरा निरा निवाड रे ॥ करीत राजहंस तो । जनामधें विशेष तो ॥६॥

---

१ धाक मानतां

अरे अनन्य भक्त हो । जना अतीत मुक्त हो ॥ सधन्य धन्यधन्य रे । विचार सार मान्य रे ॥ ७ ॥

(८) कदा कळहोची लागला । भुतीं कळहो विभागला ॥ अनंत पंथ आगमीं । कळहो उदंड नीगमीं ॥१॥ कळहो अनादि हा असे । विवंचितांचि नीरसे ॥ अहंमती विरेचिना । तरी कळहो सरेचिना ॥ २ ॥ अभेद भक्तिचा ठसा । अनन्य भाव तो कसा । निवेदनेंचि ओळखा । अहंपणें झकों नका ॥३॥ कदापि वीवरेचिना । तरी मनु थिरेचिना ॥ अहंपणेचि पातकी । उरेल तोचि घातकी । धरूनि पक्ष काय रे । उपाय तो अपाय रे ॥ तुम्ही तुम्हास वीवरा । स्वहित तें मनीं धरा ॥ ५ ॥ जनीं उदंड पाहिलें । कळहो करीत राहिलें ॥ अनन्य देव भेटला । कळहो तयास तूटला ॥ ६ ॥ कळहो करील शब्द रे । अनंत ते निशब्द रे ॥ तुम्ही अनंत कां नव्हा । विवादतां अव्हासव्हा ॥ ७ ॥ अनत ब्रह्म ते असे । तयास पक्ष ही नसे ॥ संतसंत संत रे । निवांत रे निवांत रे ॥ ८ ॥ हितार्थ सांगणं पडे । विवंचिता तिढा पडे ॥ जना प्रचीत नावडे । कुळाभिमान तो

(१) शास्त्रांत (२) वेदामध्य (३) मीपणा (४) फसूं नका (५) स्थिर होत नाहीं.

जडे ॥ ९ ॥ अनन्यता परोपरी उदास दास वीवरी । कळहो जनासि वाटला । मनुबळें उचाटला ॥ १० ॥

(९) परीक्षवंत तो मिळे। तयास ओळखी कळे॥ बहूत लोक नेणतां । करील काय जाणता ॥ १ ॥ असत्य तेंचि सत्य रे । प्रचीत तें असत्य रे ॥ स्वधर्म तो अधर्म रे । अधर्म यूगधर्म रे ॥ २ ॥ नसेंच न्याय पाहतां । तयांत शीण राहतां ॥ नयेचि आणि नायके । अहंपणें वृथा झके ॥ ३ ॥ सुधा परंतु वायसा । घडेल भोग कायसा । विवेकहीन त्या जना । घडे कसी विवं-चना ॥ ४ ॥ प्रचीत न्याय वीलसे । दुराभिमान त्या-नसे ॥ विचार सार वीवरी । जनासि धन्य तो करी ॥ ५ ॥ विशेष संतसंग तो । विरंग रंग भंगतो ॥ अनन्य हो मनीं धरा । विचारणा बरी करा ॥ ६ ॥

(१०) झकाझकी झकों नका । ठकाठकी ठको नका ।। नको भरीं भरो नको ॥ विवंचिता उरो नको ॥ १ ॥ बहूत बोलिजे जनें । धरूनि काय तें मनें ॥ जना जना पडेचिना । सुनिश्चयो घडेचिना ॥ २ ॥ विवेक जाणतां मिळे । तरीच ज्ञान नीवळे ॥ जना-मध्यें बहुरूची । कित्येक लोक लालची ॥ ३ ॥ कळे-

(१) भपकेदारपणाला फसूं नका.

चिना तरी वदे । तयासि कोण चित्त दे ॥ खटखटीत न्याय रे । कळेल तो उपाय रे ॥ ४ ॥

(११) विवंचितो क्षणक्षणा । मती बहुत तीक्षणा ॥ करेल त्या विचक्षणा । अलक्ष लक्ष लक्षणा ॥ १ ॥ घडी घडी पळें पळु । नव्हे कदापि वीकळु ॥ अखंड सावधान तो । वदे विधी विधान तो ॥ २ ॥ परेश जो परात्परू । गुणी तयास तत्परू ॥ निरूपणीं भरीं भरे । बहुत वीवरे वरे ॥ ३ ॥ विचारणा बरी करी । बहुत धारणा धरी ॥ विशेष मानिजे तया । परीक्षवंत श्रोतया ॥ ४ ॥ न दीसतें चि पाहणें । नसोन सर्व राहणें ॥ वदेचि तो घडी घडी ॥ असार सार नीवडी ॥ ५ ॥

( १२ ) नसोन जाणती कळा । कळा समस्त वीकळा । परांतरासि नेणवे । तयास काय जाणवे ॥ १ ॥ परांतरासि जाणता । नसेल तो मुळीं रिता ॥ शिकोन काय शीकले । विकोन काय वीकले ॥ २ ॥ भला भला विचक्षणु । प्रवीण योग्य तीक्षणु ॥ खुणावितां खुणावला । मनें खुणेसि पावला ॥ ३ ॥ बहुत धूर्त तो भला । खुणेसि तूर्त पावला ॥ न सांगतां जया कळे । निरोपितांचि नीवळे ॥ ४ ॥ अखंड हेतु

---

( १ ) हेत-हेतु.

पालटे । कळेचिना मनु[1] निटे ॥ सुरंगना विरंगसे । उगेंचि रंग भंगसे ॥ ५ ॥

( १३ ) विचार सार शोधितां । प्रबोध बोध बोधितां ॥ अखंड खंडता नसे । स्वयें प्रचीत वाटसे ॥ १ ॥ अखंड देव निर्मळु । तयासि काय रे मळु ॥ अचंचळासि चंचळु । म्हणेल कोण तो खळु ॥ २ ॥ गुणरहित निर्गुणा । चुकोन सांगती खुणा । वळेचि गूण लाविती । सगुण ब्रह्म भाविती ॥ ३ । समस्त कार्य मूळ हें । विकारलें समूह हें ॥ अनंत निर्विकार तो । नव्होचि रे विकार तो ॥ ४ ॥ कदा नयेचि प्रत्ययो । तयासि काय तो जयो ॥ पतीत तोचि पातकी । विना प्रचीत घातकी ॥ ५ ॥ नसें प्रचीत तें सुणें । उगेंचि काय भुंकणें ॥ स्वयें प्रचीत तो वरू । उगाचि तितरू खरू ॥ ६ ॥ उदास दास राहतो । प्रचीत सत्य पाहतो ॥ कळेल त्या सुखें कळों । वळेल त्या सुखें वळों ॥ ७ ॥

( १४ ) अंतरींच सावधान-उत्तरीं अवेवधान ॥ सांवरी प्रसंगमान । यापरी विधी विधान ॥ १ ॥ प्रयत्न पूरता करी । सदा विचार वीवरी ॥ चतुर तो परोपरी । तया सरी मनोहरी ॥ २ ॥

---

( १ ) मनु-मन. (२) दुलेक्षी.

(१५) तनें झिजेल त्या मनें । मनें झिजेल त्या तनें ॥ तनें मनें विशेषतः । झिजेल तोचि पूरता ॥ १ ॥ मनें प्रसंग वीवरी । तनें प्रसंग जो करी । तनें मनें चुकेचिना । तया उणीव येचिना ॥ २ ॥ मनें बहुत चंचलें । विशेष गूण आढळे ॥ प्रचीत मानली मना । तरीच आवडे जना ॥ ३ ॥ रुपें विशेषता दिसे । परंतु गूण तो नसे ॥ तयास मानतीलसे । सभा समस्त वीलसे ॥ ४ ॥ उडेल पाभळें बळें । गूणास मोल आगळें ॥ तगेल रंग तो खरा । बरे चतुर वीवरा ॥ ५ ॥ रुपें रसाळ तो गुणी ॥ तयास आवडी दुणी ॥ रुपें गुणें विशेषता । करील तोचि पूरता ॥ ६ ॥ विशेष वेष साजिरा । उदंड गूण तो बरा । प्रचितीनें खरा खरा । चढेल कोण दूसरा ॥ ७ ॥ उदास दास तो धरी । परोपरी क्रिया करी ॥ गुणे गुणी गुणाथिला । भला भला भलाभला ॥ ८ ॥ प्रताप सूर्यसा तपे । तयास कोण रे जपे ॥ अनंत गूण उत्तमा । कदा कळेचिना सिमा ॥ ९ ॥ करी न्हहाल सेवका । समर्थ विसरो नका । विशेष हा रघोत्तमू । भजेल उत्तमोत्तमू ॥ १० ॥

( १६ ) गुणाविषीं भलाभला । परंतु हंस एकला विशेष तो कळेचिना । विहंगमीं मिळेचिना ॥ १ ॥

---

( १ ) नाशवंत. ( २ ) संगोपन.

गुणी गुणास जाणती। गुणी खुणेस जाणती॥ उगाचि लोक आढळे। गुणी विशेष नाढळे॥ २॥ गुणासि गुण ग्राहिके। न मिळतां दिसे फिके॥ तरीच सूख पाविजे। अनंत गूण भाविजे॥ ३॥

( १७ ) प्रसंग रंग भंगवी। सदा सभा विरंगवी तया नराकडे कवी। हुशार खूण पालवी॥ १॥ तुकेल तो चुकेल रे। चुकेल तो तुकेल रे॥ तुकेविना चुकेचिना। चुकेचिना तुकेचिना॥ २॥ नसोन मान जातसे। वसोन मान होतसे॥ प्रसंग संग पावती। तुकें तुकें वळावती॥ ३॥ समस्त व्योम वीवळे। तरी जनांत नीवळे॥ अधोर्ध गुप्त होतसे। पदीं मिळोन जातसे॥ ४॥ अखंड गुप्त पंथ हा। चतुर हो पहा पहा॥ मनें मनासि मीळणी। गुणास जाणती गुणी॥ ५॥

( १८ ) श्रीकृष्ण देव नाटकू। जनात सर्तिरू ठकू॥ तयास बैसला धका। मनुष्य नेति गोपिका॥ १॥ भुपाळ ही भले भले। जनीं उदंड जाहले॥ र्‍हास काळ शेवटीं। विसंचिता लुटालुटी॥ २॥ समाग्य रावणादिका। वहूकठीण काळकां। महीवरी

---

१ पद्यामध्यें २ फसवेवार

शोभला ॥ १ ॥ देहासि कर्म लागले । विध्योक्त चालतां भलें ॥ बहुत कर्म शोभलें । भले तयास लागलें ॥ २ ॥ स्वधर्म कर्म सांगतें । नसे कदापि व्यंग तें ॥ चुकों नये। चुकों नये । चुकीस प्रत्यवाय ये ॥ ३ ॥ स्त्र हा स्वधा परोपरी । अखंड शास्त्र वीवरी । सुशील न्यायवंत तो । बहू जनासि मान्य तो ॥ ४ ॥ उदंड शास्त्र संमती । बहू पुराण व्युत्पत्ति ॥ पहातसे श्रुतीस्मृती । अचुक धारणा धृती ॥ ५ ॥ अपार कर्म मार्ग हा । घडेचिनाच सांग हा ॥ कचाट कर्म सूचना । पुढें असे उपासना ॥ ६ स्वधर्म चूकता जनु । हरी पतीत पावनु ॥ दुजा जनीं असेचिना । म्हणोनियां उपासना ॥ ७ ॥ अनेक नाम चिंतनें । अनेक ते उपोषणें ॥ अनेक देव पूजने । अनेक मंत्र सुमनें ॥ ८ ॥ भुमंडळी भले भले । अनेक देव स्थापिले ॥ किती म्हणोन बोलणें । विधी विधान चालणें ॥ ९ ॥ प्रत्यक्ष देव राक्षिती । प्रत्यक्ष देव भाक्षिती ॥ प्रत्यक्ष देवते किती । उभा उभी करामती । ॥ १० ॥ बहू जनीं प्रसन्नता । प्रत्यक्ष चालते सत्ता ॥ चुको नये चुको नये । चुकवितां महद्भये ॥ ११ ॥ कळे तया उदंड हे । म्हणोनि ज्ञान कांड हे ॥ समूळ सर्व जाणणें । तयास ज्ञानसें म्हणे ॥ १२ ॥ प्रची-

तिनेंच सुटका । प्रबोध सांपडे निका ॥ प्रपंच होतसे फिका । निशब्द गूज हें शिका ॥ १३ ॥ तुटोनि मोक्ष बंधनें । अभेद भेद:साधनें ॥ न सिद्ध रे न बद्ध रे । विभक्त भक्त उद्धरे ॥ १४ ॥

( २४ ) नमू गणेश तो गुणी । विराजतो विभूषणीं । जनासि सौख्य कारकू । विशाळ विघ्नहारकू ॥ १ ॥ जनांत सूमती मती । नमून ते सरस्वती ॥ महंत संत श्रोतया । वंदोनिया गुणालया ॥ ३ ॥ समस्तही मनीं धरा । कथा करीनसे करा । लहानसा कवी नवा । रघोत्तमासि वीनवा ॥ २ ॥ श्रीराम राम राम हा । समर्थ पूर्णकाम्हा ॥ प्रतापकीर्ण फाकलें । प्रचंड तेज झांकलें ॥ ५ ॥ प्रिती करून आदरें । भजोनिया दशाशिरें ॥ पुजून देव शंकरू । उदंड साधिला वरू ॥ ६ ॥ तया वरोंचि मातला । अधर्म कर्म रातला ॥ भुमंडळीं नव्हे भला । बहूत लोक पीडिला ॥ ७ ॥ स्वधर्म सांडिला सवें । अधर्म मांडिला बळें ॥ पिडावळीं ऋषीकुळें । कितेक शोधिलीं मुळें ॥ ८ ॥ समस्त देव ते भले । परंतु बंध पावले ॥ बहू ग्रहासि निग्रहो । ग्रहासि भेटला ग्रहो ॥ ९ ॥ उदासली वसुंधरा । बहू भिती निशाचरा ॥ अनीति फारसी वसे । कदापि

न्याय तो नसे ॥ १० ॥ नरेंद्र हो फणेंद्र हो । विधी सुरेंद्र चंद्र हो ॥ वरुण वात पावकू । कुबेर यमधार्मिकू ॥ ११ ॥ प्रचंड दंड दंडिका । सटी गणेश चंडिका ॥ समस्तही विरोधली । बहू बळें निरोधली ॥ १२ ॥ समीर लोटितो खडे । वरूण घालितो सडे ॥ मयंक[१] साउली धरी । मळीण पावकू हरी ॥ १३ ॥ विधी विधीस धाकतो । सुरेंद्र बाग राखतो ॥ करावयास निग्रहो । भूमंडळासी निग्रहो ॥ १४ ॥ अखंड चाकरी करी । सदा वरूचि भादरी । सटी आरंधळी दळी । गणेश गादवे वळी ॥ १५ ॥ परोपरी विटंबना । वदेल कोण रावणा ॥ उदंड देव पीडिले ॥ मदें पदासि खंडिले ॥ १६ ॥ निशाचरें बहु वसे । कठीण वर्तमानसे ॥ म्हणोनि राम पावला ॥ बहू बळें उठावला ॥ १७ ॥ निमित्त मात्र तें सिता । विबुध पक्ष पूरता ॥ समर्थ तो भला भला ॥ कुढावयासि पावला ॥ १८ ॥ अचाट ती कपी दळें । असंख्य चालिली बळें ॥ करूनि सख्य पाहिलें । परंतु सर्व राहिलें ॥ १९ ॥ हरूनिया कुलांगना । बहूत गर्व रावणा ॥ विचार नाइके भला । प्रचंड राम कोपला ॥ २० ॥ प्रभू म्हणे

---

१ चंद्र. २ मोठ्यानें उभें रडणें. ४ रक्षण करण्यास.

हरेश्वरा । त्रिकूट पालथा करा ॥ उठावली कपी दळे । पुरीस वेढीलें बळें ॥ २१ ॥ कपी विशाल ते गिरी । गिरीच घेतले करीं ॥ उठावले भुजाबळें । बळें बळेंचि तुंबळे ॥ २२ ॥ त्रिकूट घेतला बळें । अचाट चालिलीं दळें ॥ असंख्य वीर जातसे । धुळार गर्द होतसे ॥ २३ ॥ कितेक वीर पाडिले । कितेक ते पच्छाडिले ॥ बळेंचि पोट फाडिती । निशाचरा विभांडिती ॥२४॥ कित्येक दैत्य झोडिले । कितेक हस्त मोडिले ॥ पदीं धरूनि ओढिती । बळें भुमीस पाडिती ॥ २५ ॥ कठीण मार नावरे । वीरांत वीर बावरे ॥ विरश्रिया भरी भरे । देहासि लागले झरे ॥ २६ ॥ पुढील मार भंगती । कितेक वीर लंघती ॥ सर्वांचि ऊठती बळी । बळेंच फोडिती फळी ॥ २७ ॥ हयें हयासि ताडिती । गजें गजा पच्छाडिती । रथें रथासि मोडिती । निशाचरासि झोडिती ॥२८॥ वितंड मेघपर्ण तो । बलाढ्य कुंभकर्ण तो ॥ दळेंचि गीळितो सळे । परंतु मारिला बळें ॥ २९ ॥ प्रधानही भले भले । रणीं बहूत भांडले ॥ परंतु यश नाढळे । देहाभिमान तो गळे ॥ ३० ॥ अखंड वानरा जयो । निशाचरा घडे क्षयो ॥ मनीं धरूनि साक्षपु । अचाट कोपला रिपु ॥ ४१ ॥ उदंड देखिलें उणें । मनीं धरूनि रावणें । बहू बळें उठा-

वला । रणांगणासि पावला ॥३२॥ रथारुढें निशाचरें। बहूत नीकुरें भरें ॥ असंख्य बाण सोडिले ॥ रिपु कितेक मोडले ॥ ३३ ॥ भरार पिच्छ ते झडी । फणाण बाण वांकडी ॥ रिसें कितेक वानरे । गळीतशी भयातुरें ॥ ३४ ॥ कितेक वीर बापुडे । पळोनि राघवाकडे ॥ विशेष मंदली गती । रघोत्तमासि बोलती ॥ ३५ ॥ प्रसंग हा नव्हे भला । कृतांत काळ कोपला ॥ बहुत त्रासलों जिवीं । प्रभू दिनासि वांचवी ॥ ३६ ॥ उणीव देखतां क्षणीं उठावला ततक्षणी ॥ विरंश्चिया भुज बळें असख्य भंगिलीं दळें ॥ ३७ ॥ रणांगणीं निशाचरें । करूनि खस्त गज्जरें ॥ कितेक ते भयातुरें । विलोरें विलोकिलीं दशाशिरें ॥ ३८ ॥ अधीक कोपला हरी । पुढे रथास नेहगी ॥ उदंड सोडिली सिमा । धिकारिलें रघूत्तमा ॥ ३९ ॥ समस्त मानले उणे । गिळीत काळसे म्हणे ॥ खिळीनि हे वसूमती । मनुष्य राम तें किती ॥ ४० ॥ वितंड कोपला इशू । अचाट घोष कर्कशू । धनुष्य वाइले गुणा । नेम वधीत रावणा ॥ ४१ ॥ कडाडिले भडाडिले । दडाडिलें धडाडिले ॥ गडाडिले धडाडिले । दडाडिले घडा-डिले ॥ ४२ ॥ कृतांतकाळ कोपला । भुजाबळें उठा-वला ॥ उदंड भार भेदिले । रिपू समस्त छेदिले

॥ ४३ ॥ रणीं वधूनि रावणा । बिभित्सता रणांगणा ॥ बळें धडाडिला नभीं । विशाळ देवदुंदुभी ॥ ४४ ॥ निरोधे बंध सूटले । समस्त देव भेटले ॥ मृदोत्तरेंच उत्तरे । बहुस्तुती परस्परें ॥ ४५ ॥ समस्तदेव हर्षले । कुसुमभार वर्षले ॥ जयजयो । सितापती । सुखें बहूत गर्जती ॥ ४६ ॥ महेश कीर्ति बोलती । प्रताप जीव ते किती ॥ चुकोन नेणता कवी । रघूत्तमासि वीनती ॥ ४७ ॥ बिभीषणास त्रीकुटीं । बळेंचि स्थापिला पटीं ॥ सुखावला बिभीषणू । अखंड रामचिंतनु ॥ ४८ ॥ विराजमान जानकी । धगधगीत पावकीं ॥ रघूत्तमासि भेटली । वियोग वेळ तूटली ॥ ४९ ॥ अनेक बंध तोडिले । समस्त देव सोडिले ॥ प्रचीतिनें पहा पहा । प्रभू समर्थ राम हा ॥ ५० ॥ निरोप दीधला सुरां । समागमेंचि वानरां ॥ रिसांसहीत घेतले । सपुष्पकांत घातले॥ ५१॥ बहूत आर्त हो तया । विशेष भेटि भ्रातया ॥ समस्त लोक भेटले । महासुखें सुखावले ॥ ५२ ॥ अनेक वीरकट्ट तो । प्रभूसि राजपट्ट तो ॥ अचाट गर्द माजला । त्रिधीभुगोल गाजला ॥ ५३ ॥ सुखें उभारली गुढी । बहू जनासि आवडी ॥ अखंड राज्य हा करू । कपी जनांसि वीवरू ॥ बहूत भव्य भोजने । अनेक वस्त्र

भूषणें ॥ कपी रिसास गौरवी ॥ ५४ ॥ श्रीरामदास तो कवी ॥ ५५ ॥

# भाग ११ वा.

## पंचकें.

### उन्मत्त पंचक

(१) रामीं विसरला प्राणी । काम लोभें केली हाणी ॥ १ ॥ काम धेनू मोकलीली । घरीं गाढवी बांधिली ॥ २ ॥ सांडूनियां चिंतामणी । वेंची दहिवराचें पाणी ॥ ३ ॥ उपडुनी कल्पतरू । केला शेराचा आदरू ॥ ४ ॥ गेलें हातींचें निधान । केलें कवडीचें साधन ॥ ५ ॥ परिस रागें हुंडारिला । हातीं पाषाण घेतला ॥ ५ सार अमृत सांडिलें । दैन्यवाणें कांजी प्यालें ॥ ७ ॥ सोनें सांडूनि आदरें । वेंचू लागला खापरें ॥ ८ ॥ रत्न सांडूनियां खडे । गेले म्हणुन दुःखें रडे ॥ ९ ॥ केली साखर परती । सुखें तोंडीं घाली माती ॥१०॥ म्हणे रामीं रामदास । तोडीं संसारीचा आस ॥११॥

(२) शांतिमाता हे मारिली । भ्रांति तेथें प्रतिष्ठिली ॥ १ ॥ ऐसे लोक कलयुगाचे । भय न धरिती पापाचें ॥ २ ॥ विवेक गुरु तो मारिला । तेथें क्रोध प्रतिष्ठिला ॥ ३ ॥ नीति अमृत सांडिलें । असत्य मद्यपान केलें ॥ ४ ॥ दया बहिण संहारिली । निंदा मातंगी पाळिली ॥ ५ ॥ पुत्र विचार दवडिला ।

---

(१) घालाविली (२) फेंकून दिला (३) मांगीण.

दासी पुत्र प्रतिष्ठिला ॥ ६ ॥ सत्य ब्राह्मण मारिला । दोषी ढीवर पाळिला ॥ ७ ॥ ज्ञान पक्वान्न सांडिलें । माष अज्ञान सेविलें ॥ ८ ॥ भक्ति लक्ष्मी त्यागिली । अभक्ती अवदसा घेतली ॥ ९ ॥ मित्र विश्वास सोडिला । शत्रु विकल्प जोडिला ॥ १० ॥ भेद चोर हे चालिले । अभेद राजे दुराविले ॥ ११ ॥ रामीं रामदास म्हणे । जळो अभक्ताचें जिणें ॥ ११ ॥

( ३ ) जेणें संसारीं घातलें । पापी त्यासी विसरलें ॥ १ ॥ श्रीसी सोडूनियां दारा । भजे दासीच्या डिंगरा ॥ २ ॥ मायबापें दुरावली । चोरें आपुली मानिली ॥ ३ ॥ फोडोनियां शालिग्राम । वेश्या सेवितो अधम ॥ ४ ॥ रामीं रामदास म्हणे जळो अभक्ताचें जिणें ॥ ५ ॥

(४)ज्याच्या उदरासि आला । त्यासी फिरोनि पडला ॥ १ ॥ तोचि जाणावा चांडाळ । देव ब्राह्मणाचा काळ ॥ २ ॥ झाला स्त्रियेसी लंपटु । माय बापासी उद्धटु ॥ ३ ॥ भय पापाचें न धरीं । सज्जनाची निंदा करी ॥ ४ ॥ नेणें माय कीं मावशी । कोणें सांगावें तयाशी ॥ ५ ॥ रामीं रामदास म्हणे । यम केला त्या कारणें ॥ ६ ॥

---

(१) मासे मारणारा(२)उडदाचें अन्न.(३)पोरास.

## (२) मूर्खपण पंचक

(१) हरिकथेचा आला राग। खळ होतां घाली त्याग ॥ १॥ ऐसें प्रकारचे जन। नाहीं देवाचे भजन ॥ २ ॥ कलावताचें तों गाणें। ऐकतांचि जीवमाने ॥ ३ ॥ करितो लग्नाचा उत्सव । नाहीं देव महोत्सव ॥ ४ ॥ भूतदया नाहीं पोटीं। खाती लोभाची चोयटी ॥ ५ ॥ रामीं रामदास म्हणें देवधर्म कोण जाणें ॥ ६ ॥

(२) जन्मवरी शीण केला। अंतकाळीं व्यर्थ गेला ॥ १ ॥ काया स्मशानीं घातली । कन्या पुत्र मुरडली ॥ २ ॥ घरवाडा तो राहिला। प्राणी जातसे एकला ॥ ३ ॥ धनधान्य तें राहिलें । प्राणी चर्फडत गेले ॥ ४ ॥ इष्टमित्र आणि सांगाती । आपुलाले घरीं जाती ॥ ५ ॥ दास म्हणें प्राणी मेले। कांहीं पुण्य नाहीं केलें ॥ ६ ॥

## (३) पराधीन पंचक.

(१) मुंगसाचे कानीं वाळीं। मुंगुस हिंडे आळो आळीं ॥ १ ॥ तरि ते पाळिलें जाणावें। पराधीनचि स्वभावें ॥ २ ॥ वेडें आलेसे पाहुणे। तरि ते जगाचें

---

(१) दान (१) हर्ष पावतो.

मेहुणे ॥ ३ ॥ कार्यकर्ता कीर्तिवंत । त्यासी जाणती समस्त ॥ ४ ॥ कार्यकर्ता तो झाकेना । वेध लावी विश्वजना ॥ ५ ॥ दास म्हणें कुटुंबाचा । तोचि पुरुष दैवाचा ॥ ६ ॥

(२) निज सलगीचें जाणेना । पुढें कोणासी मानेना ॥ १ ॥ आळसी निकामा माणुस । पुढें होत कासावीस ॥ २ ॥ उगेंच नाचतें मुरडतें । कोण पूसतें तयातें ॥ ३ ॥ आपणास अवकाळिलें[१] । ज्याचें त्यास कळों आलें ॥ ४ ॥ आधीं कष्टावें रगडावें । कार्य बहुताचें करावें ॥ ५ ॥ बहुतांसि मिळों जाणें । त्यासि मानिति शहाणें ॥ ६ ॥ बहुतां मानला तो ल्याख[२] ॥ वरकड जाणावे नल्याख ॥ ७ ॥ आहे प्रगट उपाय । दास म्हणें सांगों काय ॥ ८ ॥

(३) कष्ट करितां मनीं विटे । तरि तो कळेल शेवटें ॥ १ ॥ कष्टें उदंड आटोपावें । तरि मग पुढें सुखी व्हावें ॥ २ ॥ असतां परधन वेडें । काय नेविल बापुडें ॥ ३ ॥ शहाणें उदंड कष्टती । वडिल उपकारें दाटती ॥ ४ ॥ बहुत राखिले लौकिक । त्याचें जिणें अलौकिक ॥ ५ ॥ ज्यास त्यास पाहिजे तो । जनीं वाट-

---

१ अपमानिलें. २ लायख.

पास येतो ॥ ६ ॥ मनोगत जाणें सूत्रें । जेथें तेथें जगमित्रें ॥ ७ ॥ न सांगतां काम करी । ज्ञान उदंड विवरी ॥ ८ ॥ स्तुती कोणाची न करी । प्राणी मात्रा लोभ करी ॥ ९ ॥ जनीं बहुतचि साहतो । कीर्ति रूपेंचि राहतो ॥ १० ॥ दास म्हणे नव्हे दुःखी । आपण सूखी जग सुखी ॥ ११ ॥

## (४) उडवणी पंचक.

(१) ऐसें कैसें रे सोंवळे । शिवतां होतसे ओंवळें ॥ १ ॥ स्नानसंध्या टिळेमाळा। पोटीं क्रोधाचा उमाळा ॥ २ ॥ नित्य दंडितोसि देह । तरी फिटेना संदेह ॥ ३ ॥ बाह्य केली झळफळ । देह बुद्धीचा विटाळ ॥४॥ नित्यनेम खटाटोप । मनीं विषयाचा जप ॥५॥ रामदासीं दृढ भाव । तेणेंविण सर्व वाव ॥ ६ ॥

(२) गेला संदेहाचा मळ । तेणें निःसंग निर्मळ ॥ १ ॥ बाह्य गंगा जळ स्नान । चित्तशुद्धि ब्रह्मज्ञान । ॥ २ ॥ सर्वकाळ कर्मनिष्ठ । सर्व साक्षित्वें वरिष्ठ । ॥ ३ ॥ रामदासीं स्नानसंध्या । सुत करी माता वंध्या ॥ ४ ॥

## (५) वेडसर पंचक.

(१) पडसादासी करी वाद । खळाळशीं तो विवाद ॥ १ ॥ तेथें चालेना मीपण । शीण पावावें

आपण ॥ २ ॥ सावधानासवें जावें । प्रतिबिंबेंसीं भांडावें ॥ ३ ॥ रामदास म्हणें भावें । समुद्रासी गडगडावें ॥ ४ ॥

( २ ) आमचे वंशी कैचा राम । एकपिंडीचे निष्काम ॥ १ ॥ रामदास्य आलें हातां । अवघा वंश धन्य आतां ॥ २ ॥ बापें केली उपासना । आम्ही लाघलों त्या धना ॥ ३ ॥ बंधु अभिलाषा टेकला । वांटा घेउनि भिन्न झाला ॥ ४ ॥ पोर सकळां संकोचलें । एक सुखा उघळले ॥ ५ ॥ रामीं रामदासीं स्थिती । पाहिली वडिलांची रीती ॥ ६ ॥

( ३ ) भगवंताचे भेटीं साठीं । थोर करावी आटाआटीं ॥ ११ ॥ स्वेदबिंदु आलें जाण । तोचि भागिरथीचें स्नान ॥ २ ॥ वोळंगता देवराव । सहज होतसे उपाव ॥ ३ ॥ सकळ लोकांचे भाषण । देवासाठीं संभाषण ॥ ४ ॥ जें हरवलें सांडलें । देवाविण कोठें गेलें ॥ ५ ॥ जठराग्नीस अवदान । लोक म्हणती भोजन ॥ ६ ॥ एकवीस सहस्त्र जप । होतो न करितां साक्षेप ॥ ७ ॥ दास म्हणे मोठें चीज । देवीं सहजीं सहज ॥ ८ ॥

---

१ प्रसन्न होतां. २ आहुति.

## ( ६ ) कलियुग पंचक.

( १ ) आलें भगवंताच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥ जैसा कलि राजा आला । धर्म अवघाचि बुडाला ॥ २ ॥ नीति मर्यादा उडाली । भक्ति देवाची चुकली ॥ ३ ॥ दास म्हणें पाप झालें । पुण्य अवघेंचि बुडालें ॥ ४ ॥

( २ ) विप्रीं सांडिला आचार । क्षेत्रीं सांडिला विचार ॥ १ ॥ मेघवृष्टी मंदावली । पिकें भूमीनें सांडिली ॥ २ ॥ बहुवृष्टी अनावृष्टी । दास म्हणे केली सृष्टी ॥ ३ ॥

( ३ ) नाहीं पापाचा कंटाळा । येतो हव्यास आगळा ॥ १ ॥ जना सद्बुद्धी नावडे । मन धांवें पापाकडे ॥ २ ॥ रामीं रामदास म्हणे । पुण्य उणें पाप दुणें ॥ ३ ॥

## (७) बंधन पंचक

( १ ) सर्वकाल शेंडा मूळा । येत जातसे मुंगळा ॥ १ ॥ तैसा कां करिसी येरझारा । शरण जावें रघुवीरा ॥ २ ॥ हातीं धरूनिया सून । खालींवर येतजात ॥ ३ ॥ दास म्हणे जळांतरी । जैसी फिरती कीं भिंगरी ॥ ४ ॥

(२) पायीं बांधूनियां दोरी । भोंगा बांधिला लेंकुरीं ॥ १ ॥ तैसें पावसी बंधन । मग तुजला सोडिल

कोण ॥ २ ॥ एक धरोनि वानर । हिंडवीति दारोदार ॥ ३ ॥ रामदास म्हणे पाहे । रीस धापा देत आहे ॥४॥

( ३ ) अंध अंधारी बैसले । त्यांसि हातें पालवीले ॥ १ ॥ त्यांसि कळेना कळेना । त्यांची वृत्ति निवळेना ॥ २ ॥ संतसंगाचें बोलणें । सांसारिक काय जाणें ॥३॥म्हणे रामीं रामदास । केला नसतां अभ्यास॥४॥

## (८)प्रास्ताविक पंचक

( १ ) डोळे चिरींव चांगले । वृद्धपणीं सरक्या झाले ॥ १ ॥ ओले मातीचा भरंसा । काय मानीसी माणसा ॥ २ ॥ मुख रसाळ चांगलें । पुढें अवघे सुर्कुतलें ॥ ३ ॥ रम्य नासीक सरळें । सर्वकाळ पाणी गळें ॥ ४ ॥ कर्णभुषणें सुंदर । पुढें जाहली बधिर ॥ ५ ॥ बरवी दाताची पंगती । परि ते उन्मळोनि पडती ॥ ६ ॥ बरवे कर आणि चरण । परि ते झाले निष्कारण ॥ ७ ॥ अंगकांती होती बरी । झाली चिरगुटाचे परी ॥ ८ ॥ केश होताती पांढरे । लाळ गळता ना धरे ॥ ९ ॥ बहु साल होतें बळ । पुढें जहाले निर्बळ ॥ १० ॥ देह होतें जें निर्मळ । तेंचि झालें अमंगळ ॥ ११ ॥ सर्व तारुण्यें चांगला । प्राणी दीन रूप झाला ॥ १२ ॥ रामीं रामदास म्हणे ।

---

१ अस्वल २ खूण केली.

आतां सावधान होणें ॥ १३ ॥

(२) काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरण ॥ १ ॥ कांहीं धांवाधांव करी । जंव तो काळ आहे दुरी ॥ २ ॥ देह आहे जाई–जणें । भुललासी कवण्या गुणें ॥ ३ ॥ मायाजाळीं गुंतले मन । परी हें दुःखासी कारण ॥ ४ ॥ सत्य वाटतें सकळ । परी जातां नाहीं वेळ ॥ ५ ॥ रामीं रामदास म्हणें । आतां सावधान होणें ॥ ६ ॥

## (९) प्रस्ताव पंचक.

(१) लक्ष्मी आहे रे चंचळ । इस जातां नाहीं वेळ ॥ १ ॥ सत्य मानावें उत्तर । देव आहे निरंतर ॥ २ ॥ नाना वैभवें समस्तें । येती जाती अकस्मातें ॥ ३ ॥ म्हणें रामी रामदास । काय देहाचा विश्वास ॥ ४ ॥

(२) नद्या मर्यादा सांडिती । उष्णकाळीं वोस होती ॥ १ ॥ तैसा तारुण्याचा भर । सवेंचि होतसे उतार ॥ २ ॥ भाग्य चढें लागवेगें । सवेंचि प्राणी भीक मागे ॥ ३ ॥ रामदास म्हणे काळ । दोनी दिवस पर्वकाळ ॥ ४ ॥

(३) पुरें पट्टणें वसती । एक वेळ वोस होती

---

१ बोलावणें.

॥ १ ॥ तैसें वैभव सकळ । येतां जातां नाहीं वेळ ॥ २ ॥ बहु सृष्टीची रचना । होय जाय क्षणक्षणा ॥ ३ ॥ दास म्हणे चक्रवर्ती । आले गेले सांगो किती ॥ ४ ॥

(४) काम क्रोध खवळले । मद मत्सर मातले ॥ १ ॥ त्यांचे स्वाधीन लागे होणें । ऐसें केलें नारायणें ॥ २ ॥ लोभ दंभ अनावर । जहाला गर्व अहंकार ॥ ३ ॥ दास म्हणे सांगो किती । पडली ऐशाची संगती ॥ ४ ॥

## (१०) संशय पंचक.

(१) गेलों काशी–विश्वेश्वरा । सेतुबंध रामेश्वरा ॥ १ ॥ तरी संशय तुटेना । पूर्वगुण पालटेना ॥ २ ॥ भागिरथी गोदावरी । केली कृष्णा आणि कावेरी ॥ ३ ॥ राम अयोध्येचा पती । केली कृष्ण–द्वारावती ॥ ४ ॥ बद्रि ओढ्या जगन्नाथ । केला स्वामी निर्मल नाथ ॥ ५ ॥ मातापूर तुळजापूर । सप्तशृंगी कोल्हापूर ॥ ६ ॥ केली पंढरी नरहरी । शंभु पाहिला शीखरीं ॥ ७ ॥ मोरेश्वर भुलेश्वर । ज्वालामुखी हरेश्वर ॥ ८ ॥ सिद्ध मैराळ मारुती । देव केले नेणो किती ॥ ९ ॥ बारा लिंगें या वेगळीं । तीर्थें केलीं भूमंण्डळीं ॥१०॥ दास म्हणे भावें । तरि हें मन पालटावें ॥ ११ ॥

## (११) शिकवण पंचक.

(१) कामक्रोध आवरावे । मदमत्सर तूटावे ॥१॥ सांडोनियां कुलक्षणें । शुद्ध घ्यावीं लक्षणें ॥ २ ॥ लोभ दंभासी तुटावे । मीपणासी आटोपावे ॥ ३ ॥ विवेक वैराग्य विश्वास । घरणें म्हणे रामदास ॥ ४ ॥

(२) हो कां मुमुक्षु अथवा मुक्त । आहे विशेष आसक्त ॥ १ ॥ विवेक वैराग्य संग्रह । करणें लागे यावद्देह ॥ २ ॥ रामीं रामदास म्हणें । शांति ज्याच्या दृढपणें ॥ ३ ॥

## (१२) होळी पंचक.

(१) अवघेची बोंबलती । होळी भोंवते भोवती ॥ १ ॥ माया होळी प्रज्वळली । सृष्टि वेढार लाविली ॥ २ ॥ ज्या कारणें गुंडाळिती । तेंचि वाचें उच्चारिती ॥ ३ ॥ होळीमध्यें खाजें आहे तें तूं विचारूनी पाहे ॥ ४ ॥ खाजे खातां सुख होये । परी कठीण हातां नये ॥ ५ ॥ खोल दृष्टीनें पाहिलें । खाजे त्याच्या हातां आलें ॥ ६ ॥ एक उडी घालूं घाती । लंडी चुकून पडती ॥ ७ ॥ एक देहाचे पांगले । तेचि आंगीं हुपळले ॥ ८ ॥ उडी अवघ्यां-

---

१ पेटविली. २ भोवती फिरण्यास. ३ खाद्य. ४ भित्रे.

चींच पडे । परि तें हातासीच न चढे ॥ ९ ॥ एकें थोर धीर केला । खाजें घेऊन पळाला ॥ १० ॥ एक आपणची खाती । एक सकळांतें वाटिती ॥ ११ ॥ रामीं रामदास होळी । केली संसाराची धुळी ॥ १२ ॥

## (१३) भ्रम पंचक.

( १ ) छाया देखोनि आपुली । जीव झाला दिशाभुली ॥ १ ॥ ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥ मुखें बोलतां उत्तर । तेथें झालें प्रत्युत्तर ॥ ३ ॥ डोळां घालितां आंगोळी । एकाचीं तीं दोन झालीं ॥ ४ ॥ पोटीं आपण कल्पिलें । तेंचि आलेसें वाटलें ॥ ५ ॥ दास म्हणे हे उपाधी । शंका धरितां अधिक बाधी ॥ ६ ॥

( २ ) कांहीं दिसे अकस्मात । तेथें वाटे आलें भूत ॥ १ ॥ वायां पडावें संदेहीं । मुळीं तेथें कांहीं नाहीं ॥ २ ॥ पुढें देखितां अंधारें । तेथें आलें वाटे भरें ॥ ३ ॥ झाड झुडूप देखिलें । जीवीं वाटे कोणी आलें ॥ ४ ॥ पुढें रोंविलासे झेंडा । भ्रांत्या म्हणे कोण उभा ॥ ५ ॥ रामदास सांगे खूण । भितो आपणा आपण ॥ ६ ॥

---

१ हृदयांत,

(३) वाजे पाऊल आपुलें । म्हणे मागें कोण आलें ॥ १ ॥ कोण धांवतसे आड। पाहों जातां झालें झाड ॥२॥ भावीतसे अभ्यंतरीं । कोण आलें बरोबरी ॥ ३ ॥ शब्द पडसाद[२] उठला। म्हणे कोण रे बोलिला ॥ ४ ॥ रामीं रामदास म्हणे । ऐशीं शंकेचीं लक्षणें ॥ ५ ॥

## (१४) सार्थ पंचक.

(१) पक्षी श्वापद किडा मुंगी । पराधीन जिणें जगीं ॥ १ ॥ तैसा नव्हे नरदेहो । करा भक्तीचा लवलाहो ॥ २ ॥ नीच योनी चारी खाणी । अवघे पराधिन प्राणी ॥ ३ ॥ रामीं रामदास म्हणे । ज्ञान ध्यान पशु नेणे ॥ ४ ॥

(२) पापपुण्या समता घडे । तरिच नरदेह आतुडे ॥ १ ॥ याचें सार्थक करावें । आपणासी उद्धरावें ॥ २ ॥ बहू जन्माचे शेवटीं । नरदेह पुण्यकोटी ॥ ३ ॥ रामदास म्हणे आतां। पुढती न लागे मागुता ॥ ४ ॥

(३) देशकाळवर्तमान । असे अवघाचि अनुमान ॥ १ ॥ भक्ती करावी देवाची । घडी जातसे

---

१ कल्पना करितो. २ प्रतिध्वनी. ३ इच्छा. ४ मिळतो.

सोन्याची ॥ २ ॥ काळ वेळचि पाहतो । सदा सन्निध राहतो ॥ ३ ॥ रामीं रामदास म्हणे । देह आहे जाइ-जणें ॥ ४ ॥

## (१५) संवादपंचक.

( १ ) तुज कैसें पाहूं देवा । तुझी कशी करूं सेवा ॥ १ ॥ बहु देव पाहुनी आलों । बहुरूपीं भांबावलों ॥ २ ॥ किती देवळें मोडिती । किती देव भंगोनि जाती ॥ ३ ॥ बहुतांच्या बोल गेलों । तेणें बहुत कष्टलों ॥४॥ रामीं रामदास म्हणे । एसीं जनाचीं लक्षणें ॥ ४ ॥

( २ ) देव म्हणे मी जात नाहीं । आतां चिंता न करी कांहीं ॥ १ ॥ मज पाहावा संतापासीं । सेवि जाणत्या भक्तांसी ॥ ३ ॥ मज जाणावें विचारें । सगुणाचे भजनद्वारें ॥ ४ ॥ देव म्हणतो दास सी । रे मी आहें तुजपासीं ॥ ५ ॥

( ३ ) मासीं ब्रीदें कां विसरतां । आणि व्यर्थ कां चेष्टतां ॥ १ ॥ भक्त वत्सल दीनानाथ । तुम्हा आधार समर्थ ॥ २ ॥ भय दाखवी अनिवारा । तोचि सर्व चिंता करी ॥ ३ ॥ दासासमीप राहतो । योगक्षेम ही वाहतो ॥ ४ ॥

(४) मज गांजिलें तें साहे । परि भक्तांचें न साहे ॥ १ ॥ माझ्या भक्तां शीण व्हावा । मग मजसी त्यांसी दावा ॥ २ ॥ मज अवतार घेणें । माझ्या भक्तांचें कारणें ॥ ३ ॥ निज दासांसी पाळावें । दुर्जनासी निर्दाळावें ॥ ४ ॥

(५) आतां बोलावें तें किती । मनीं पाहावी प्रचीति ॥ १ ॥ तुम्हां संकटाचे वेळे । काय झांकितों मी डोळे ॥ २ ॥ सेवकांचा साभिमान । समर्थाचें हें लक्षण ॥ ३ ॥ देव म्हणे दासजनीं । चिंता न धरावी मनीं ॥ ४ ॥

(६) रे मी भक्तांचा कोंवसा । मनीं धरावा भरंवसा ॥१॥ समर्थाचिया सेवकां । काय करवेल रंका ॥ २ ॥ कोप येतांचि ते घडी । घेईन काळाची नरडी ॥ ३ ॥ दास सांभाळावे सदा । मज आणिक नाहीं धंदा ॥ ४ ॥

## १६ सख्यपंचक.

(१) बाळक जाणेना मातेसी । तिचें मन तयापासीं ॥ १ ॥ तैसा देव हा दयाळ । करी भक्तांचा संभाळ ॥ २ ॥ धेनु वत्साचेनी लागें । धांवे त्याच्या मागेंमागें ॥ ३ ॥ पक्षी घेतसे गगन । पिलापाशीं त्याचें मन ॥ ४ ॥ मत्स्य आठवीतां पाळी । कूर्म

दृष्टीनें सांभाळी ॥ ५ ॥ रामीं रामदास म्हणे । माया-जाळाचीं लक्षणें ॥ ६ ॥

## ( १७ ) ध्यान पंचक.

( १ ) ध्यान लागलें रामाचें । दुःख हरपलें जन्माचें ॥ १ ॥ रामपदांबुजावरी । वृत्ति तेंचि मधुकरी ॥ २ ॥ तनु-मेघश्याम-मेळें । चित्त चातक नीवाले ॥ ३ ॥ रामवंदन मयंकीं । चक्षु चकोर झाले सुखी ॥ ४ ॥ कीर्ति-सुगंध-तरुवरी । कूजे कोकीळ वैखरी ॥ ५ ॥ रामीं रामदास स्वामी । चिंतीताहे अंतर्यामीं ॥ ६ ॥

( २ ) आत्मारामाविणें रितें । स्थान नाहीं अणु-सरते ॥ १ ॥ पहातां मन बुद्धिलोचन । रामेंवीण न दिसे आन ॥ २ ॥ संधी नाहीं तीर्थगमना । रामें व्यापिलें त्रिभुवना ॥ ३ ॥ रामदासीं तीर्थां भेटी । तीर्थ रामेंहूनी ऊठी ॥ ४ ॥

## ( १८ ) निष्ठा पंचक.

( १ ) नेणों भक्ति नेणों भाव । आम्ही नेणो दुजा भाव ॥ १ ॥ राघवाचे शरणागत । आहों राम नामांकित ॥ २ ॥ मुखीं राम नामावळीं । काळ घालूं

१ चंद्राचें ठिकाणीं २ दुसरे

पायातळीं ॥ ३ ॥ रामदासीं रामनाम । बाधूं नेणें तया काम ॥ ४ ॥

( २ ) राम अनाथांचा नाथ । आम्हां कैवारी समर्थ ॥ १ ॥ वनीं शिळा मुक्त केली । गणिका विमानीं वाहिली ॥ २ ॥ राम दीनांचा दयाळ । देव सोडिले सकळ ॥ ३ ॥ रामीं रामदास म्हणे । आतां आम्हां काय ऊणें ॥ ४ ॥

## ( १९ ) कथापंचक.

( १ ) धन्य धन्य तें नगर । जेथें कथा निरंतर ॥ १ ॥ गुण गाती भगवंताचे । तेचि मानाचे दैवाचें ॥ २ ॥ स्वयें बोले जगजीवन । थोर कलियुगीं कीर्तन ॥ ३ ॥ रामदास म्हणे भले । हरिभक्तीं उद्धरलें ॥४॥

( २ ) रामनाम कथा गंगा। स्नानें पावन करी जगा ॥ १ ॥ तिसी प्रेमपूर आला । शंकर हृदयीं स्थिरावला ॥ २ ॥ रामदासाची माउली । आळशावरी गंगा आली ॥ ३ ॥

## २० हरिदिनपंचक.

( १ ) एकादशी नव्हे व्रत । वैकुंठीचा महापंथ ॥ १ ॥ परि रुक्मांगदा ऐसा । व्हावा निश्चय मानसा ॥२॥ एकादशी उपोषणें । विष्णुलोकीं ठाव घेणें॥ ३॥ रामीं रामदास म्हणे । काय प्रत्यक्ष प्रमाणें ॥ ४ ॥

(२) ज्यासी हरिची प्राप्ती व्हावी । तेणें हरिदिनीं करावीं ॥ १ ॥ एकादशीं त्यजिल्या अन्न । प्राप्त वैकुंठ-भुवन ॥ २ ॥ रामीं रामदास म्हणे । हरि जागर उपोषणें ॥ ३ ॥

## २१ उपासना पंचक.

( १ ) देव भक्तांचा कैवारी । रक्षितसे नानापरी ॥१॥ काय स्तंभीं प्रगटला । तेणें प्रल्हाद रक्षिला ॥२॥ तया द्रौपदीं कारणें । वस्त्रें दिलीं नारायणें ॥ ३ ॥ महत्संकटीं रक्षिलें । गजेंदासी सोडविलें ॥ ४ ॥ कूर्म रूपें धरिली धरा । झाला वराह दूसरा ॥ ५ ॥ जाणें दासाचें अंतर । लाखाजोहरीं[1] वीवर ॥ ६ ॥

( २ ) भक्तालागीं पावें नेटें । वारी भक्तांचीं संकटें ॥ १ ॥ देव भावें लाचावला । त्यासि अभिमान लागला ॥ २ ॥ आपुल्या भक्तांचे जें उणें । साहेना तें कोटीगुणें ॥ ३ ॥ दास म्हणे नानापरी देव भक्तांचा कैवारी ॥ ४ ॥

## भक्तिपर अभंग पंचक

( १ ) भक्ति नलगे भाव नलगे । देव नलगे आम्हांसी ॥ १ ॥ आम्ही पोटाचे पाईकें[2] । आम्हां न लगे आणिक ॥ २ ॥ आम्ही खाऊं ज्यांची रोटी ।

---

१ पांडवाकरितां केलेल्या लाक्षागृहांत. २ चाकर.

त्यांची कीर्ति करूं मोठी ॥ ३ ॥ रामी रामदास म्हणे ऐशीं मूर्खांचीं लक्षणें ॥ ४ ॥

(२) आम्हां अन्न झालें पुरें । अन्नावीण काय नुरे ॥ १ ॥ पोटभरी मिळे अन्न । आम्हा तेंचि ब्रह्म ज्ञान ॥ २ ॥ अन्नावांचूनी दूसरा । देव आहे कोण खरा ॥ ३ ॥ भगवंताची नाहीं गोडी । काय म्हणे ते बापुडीं ॥ ४ ॥ रामीं रामदास म्हणे । मूर्ख बोलें दैन्यवाणें ॥ ५ ॥

(३) अन्न देणार श्रीहरी । तोचि प्रतिपाळ करी ॥ १ ॥ ज्या देवाचे आज्ञेवरी । मेघ वर्षती अंबरीं[१] ॥ २ ॥ तयासि चुकली बापूडीं । अन्न अन्न करीती वेडीं ॥ ३ ॥ रामदास म्हणे ऐक । आदि अंतीं देव एक ॥ ४ ॥

(४) देव तारी देव मारी । देव सर्व कांहीं करी ॥ १ ॥ अन्नोदक देवें केलें । सर्व तेणेंचि निर्मिले ॥ २ ॥ तयास चुकलीं बापूडीं । अन्न अन्न करिती वेडीं ॥ ३ ॥ रामदास म्हणे ऐक । देव त्रैलोक्य नायक ॥ ४ ॥

(५) देव एका भाग्य देतो । एका भिकेसी लावतो ॥ १ ॥ न कळे भगवंताचें करणें । रावरंक

---

१ आकाशांत.

तत्क्षणें ॥ २ ॥ तयासि चुकलीं वाबुडीं । अन्न अन्न करितीं वेडीं ॥ ३ ॥

(६) शिंक जांभई खोकला—तितका काळ व्यर्थ गेला ॥ १ ॥ आतां ऐसें न करावें । नाम जीवीं तें धरावें ॥ २ ॥ श्वास उच्छवास निघतो । तितका काळ व्यर्थ जातो ॥ ३ ॥ पात्या पातें न लगत । तितका काळ व्यर्थ जात ॥ ४ ॥ लागे अवचित उचकी । तितुकें वय काळ लेखी ॥ ५ ॥ म्हणे रामीं रामदास । होतो आयुष्याचा नाश ॥ ६ ॥

## (२३) भक्तिपंचक.

(१) सोडी संसाराची आस । धरी भक्तीचा हव्यास । दुःखमूळ हा संसार । तयामध्यें भक्तिसार ॥ २ ॥ ग्रंथ पाहतां लक्षकोटी । जेथें तेथें भक्ति मोठी ॥ ३ ॥ जन्मा आलियाचें फळ । दास म्हणे तें सकळ ॥ ४ ॥

(२) राम दीनांचा कैवारी । सेवकांचा अंगीकारी ॥ १ ॥ अंगिकारिलें वानर । त्यांची झाली ख्याती थोर ॥ २ ॥ स्वयें निजधामा जाणें । सज्य कीजे बिभीषणें ॥ ३ ॥ भक्तां उणे देखे जेथें । स्वयें धांव घाली तेथें ॥ ४ ॥ तया वैर केलें साहे । परि भक्तांचे

न साहे ॥५॥ रामीं रामदास म्हणे । निजभक्तांचेनि गुणें ॥ ६ ॥

(३) शिरीं आहे रामराज । औषणाचें कोण काज ॥ १ ॥ जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखासी कारण ॥ २ ॥ शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुसीतळ ॥ ३ ॥ आम्हां तोचि तो राक्षिता । रामदासीं नाहीं चिंता ॥ ४ ॥

## (२४) निश्चय पंचक.

(१) देह जावो अथवा राहो । रामें फोडिला संदेहो ॥ १ ॥ रामा लागीं देशवाटा । संसाराच्या बारा वाटा ॥ २ ॥ जीवलग आदि अंतीं । एक रामाची संगती ॥ ३ ॥ रामदासीं रामराय । नाहीं आणिक उपाय ॥ ४ ॥

(२) देह चिरकाळ[1] राहो । अथवा शीघ्र काळ जावो ॥ १ ॥ आम्ही वस्ती केली रामीं । नाहीं आस्था देहधामीं ॥ २ ॥ देहा होवो उत्तम भोग । अथवा घडो दुःखयोग ॥ ३ ॥ रामीं रामदास मनिला[2] । देह दुःखा वेगळा झाला ॥ ४ ॥

(३) आम्ही मोक्ष लक्ष्मीवंत । भयदारिद्य कैचें तेथ ॥ १ ॥ श्रीपतीचें परिजन[3] । आम्ही स्वानंद

---

१ पूष्कळ वेळ. २ मिळाला. ३ सेवक.

संपन्न ॥ २ ॥ समाधान तें सभाग्य । असमाधान तें अभाग्य ॥ ३ ॥ रामीं रामदास देव । सख्यासहित स्वानुभव ॥ ४ ॥

## (२५) ज्ञानपंचक.

(१) आम्ही समाधान गावें । तुम्ही सावध ऐकावें ॥ १ ॥ सकल सृष्टीचा गोसावी । त्याची ओळख पुसावी ॥ २ ॥ स्वयें बोलिला सर्वज्ञु । ज्ञानेविण सर्व पशु ॥ ३ ॥ दास म्हणे नाहीं ज्ञानतया नरकीं पतन ॥ ४ ॥

(२) ज्ञानेंवीण जी जी कळा । ती ती जाणावी अवकळा ॥ १ ॥ ऐसे भगवंत बोलिला । चित्त द्यावें त्याच्या बोला ॥ २ ॥ एक ज्ञानचि सार्थक । सर्वकर्म निरर्थक ॥ ३ ॥ दास म्हणे ज्ञानेंवीण । प्राणी जन्मला पाषाण ॥ ४ ॥

(३) जेणें ज्ञान हें नेणवें । पशु तयासि म्हणावें ॥ १ ॥ जेणें केले चराचर । कोण विश्वासि आधार ॥ २ ॥ ब्रह्मादिकांचा निर्मिता । कोण आहे त्या परता ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडाच्या माळा । विचित्र भगवंताची कळा ॥ ४ ॥ रामदासाचा विवेक । सर्वां घटीं देव एक ॥ ५ ॥

## २६ वैराग्यपंचक.

( १ ) प्रपंच सांडुनिया बुद्धी । जडली परमार्थ उपाधी ॥ १ ॥ मना होईं सावचित । त्याग करणें हा उचित ॥ २ ॥ संप्रदाय समुदाव । तेणें जडे अहंभाव ॥ ३ ॥ रामदास म्हणे नेम । भिक्षा मागणें उत्तम ॥ ४ ॥

( २ ) नको ओळखीचे जन । अंगीं वाढे अभिमान ॥ १ ॥ आतां तेथें जावे मना । जेथें कोणी ओळखीना ॥ २ ॥ लोक म्हणती कोण काये । पुसों जातां सांगों नये ॥ ३ ॥ रामदास म्हणे पाही । तेथें कांहीं चिंता नाहीं ॥ ४ ॥

( ३ ) कोणी कोणासी रडावें । एकामागें एकें जावें ॥ १ ॥ एक वेळ गेली माता । एक वेळ गेला पिता ॥ २ ॥ द्रव्य दारा जाती पुत्र । जिवलगे आणि मित्र ॥ ३ ॥ प्राणी संसारासी आला । तितुका मृत्यु पंथें गेला ॥ ४ ॥ पूर्वज गेले देवापासी । तेंचि वाट आपणासी ॥ ५ ॥ रामदास म्हणे लोक । करी गेलीयांचा शोक ॥ ६ ॥

( ४ ) ज्याचें होतें तेणें नेलें । तेथें तुझें काय गेलें ॥ १ ॥ वेगीं होईं सावधान । करी देवाचें भजन ॥ २ ॥ गती नकळे होणाराची । हे तंव इच्छा भगवंताची

॥ ३ ॥ पूर्व संचिताची फळें । येती दुःखाचे हालोळे ॥ ४ ॥ पूर्वी केलें जें संचित । तें तें भोगावें निश्चित ॥ ५ ॥ दास म्हणे पूर्व रेखा । प्राप्त न टळे ब्रह्मादिका ॥ ६ ॥

## ( २७ ) विवेकपंचक.

( १ ) एक देव आहे खरा । माया नाथिला पसारा ॥ १ ॥ हेंचि विचारें जाणावें । ज्ञान तयासी म्हणावें ॥ २ ॥ साच म्हणो तरि हें नासे । मिथ्या म्हणो तरी हें दिसे ॥ ३ ॥ पाहों जातां आकारलें । मुळीं कांहीं नाहीं झालें ॥ ४ ॥ कैसा देही देहातीत । कैसे अनंत अनंत ॥ ५ ॥ रामदासाचे बोलणें । स्वप्नमाजीं जाईजणें ॥ ६ ॥

( २ ) पांचा लक्षणीं पुरता । धन्य धन्य तोचि ज्ञाता ॥ १ ॥ विवेक वैराग्य सोडीना । कर्म मर्यादा सांडिना ॥ २ ॥ बाह्य झाले शब्द ज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ ३ ॥ रामीं रामदास कवी । न्याय नीतिनें शिकवी ॥ ४ ॥

( ३ ) अंतर्यामीं समाधान । बाह्य सगुण भजन ॥ १ ॥ धन्य धन्य तेंचि ज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ २ ॥ निरूपणें अंतस्त्याग । बाह्य संपादी वैराग्य

---

१ वेग, उमाळे. २ लटका. ३ खरी.

॥ ३ ॥ रामीं रामदास म्हणे । ज्ञान स्वधर्म लक्षणें ॥ ४ ॥

## (२८) संतपंचक.

(१) मूर्ति त्रिलोकीं संचली । दृष्टी विश्वाची चूकली ॥ १ ॥ भाग्यें आले संतजन । झाले देवाचें दर्शन ॥ २ ॥ देव जवळीं अंतरीं । भेटी नाहीं जन्मपरी ॥ ३ ॥ रामदासीं योग झाला । देहीं देव प्रगटला ॥ ४ ॥

(२) देव अभक्ता चोरला । आम्हां भक्तां सांपडला ॥ १ ॥ भेटी झाली सावकास । भक्ता न लागती सायास ॥ २ ॥ पडे विवेक वेत्रपाणी । वरी दृष्टीची दाटणी ॥ ३ ॥ रामदासाचे अंतर । देवापाशीं निरंतर ॥ ४ ॥

(३) भेटी देईना जनासी । पाठीं लागे सज्जनासी ॥ १ ॥ ऐसें प्रीतीचें लक्षण । भेटीविण नाहीं क्षण ॥ २ ॥ नसे साधनसायासीं । तो हा आम्हां अनायासीं ॥ ३ ॥ रामीं रामदास म्हणे । संत संगाचेनि गुणें ॥ ४ ॥

(४) देव आम्हांसि जोडिला । संतसंगें सांपडला ॥ १ ॥ कडीं कपाटीं शीखरीं । धुंडिताती नानापरी ॥ २ ॥ नाना शास्त्रीं धांडोळिती । जया कारणें

कष्टती ॥ ३ ॥ दास म्हणे साधूविण । नाना साधनांचा शीण ॥ ४ ॥

२९ उन्मनीपंचक

( १ ) गेलों स्वरूपाच्या ठाया । तिकडे ब्रह्म इकडे माया ॥ १ ॥ दोहींमध्यें सांपडलों । मीचि ब्रह्मची बोलिलों ॥ २ ॥ ब्रह्म निर्मल निश्चळ । माया चंचळ चपळ ॥ ३ ॥ तिकडे वस्ती निराकार । इकडे मायेचा विस्तार ॥ ४ ॥ पुढें ब्रह्म मागें माया । मध्यें संदेहाची काया ॥ ५ ॥ रामीं रामदास म्हणे । इतुकें मनाचें करणें ॥ ६ ॥

( २ ) दृढ होतां अनुसंधान । मन जाहालें उन्मन ॥ १ ॥ पाहों जातां या मनासी । द्वैत गेलें अनायासी ॥ २ ॥ होतां बोधाचा प्रबोध । आम्हां शब्दाचा निःशब्द ॥ ३ ॥ ज्ञान विज्ञान जाहालें । वृत्ती निवृत्ती पाहिलें ॥ ४ ॥ रामीं रामदास वाच्य । पुढें झालें अनिर्वाच्य ॥ ५ ॥

( ३ ) मन व्हावें विलक्षण । तोंचि समाधि लक्षण ॥ १ ॥ नलगे पुरूनियां घ्यावें । नलगे जीतेंचि मरावें ॥ २ ॥ अवघा वायो आटोपावा । नलगे ब्रह्मांडासी न्यावा ॥ ३ ॥ डोळा झांकोनि बैसला । परी तो मनें

( १ ) संशयाची ( २ ) शरीर.

आटोपिलि ॥ ४ ॥ नाना साधनें सायास । मनें केला कासावीस ॥ ५ ॥ रामदास म्हणे वर्म । हेंचि मनाचे सुगम ॥ ६ ॥

## ( ३० ) धन्यपंचक

( १ ) प्राणी संसारासी आला । जेणें वंश उद्धरिला ॥ १ ॥ धन्य तोचि एक जनीं । धन्य तयाची करणी ॥ २ ॥ जाणें नवरस सार । लावी कारणें शरीर ॥ ३ ॥ देवीं ब्राह्मणीं आवडी । जाणें हरिकथेची गोडी ॥ ४ ॥ रामदासीं रामराव । तेथें ज्याचा दृढभाव ॥ ५ ॥

( २ ) सर्व सृष्टीचा चालक । चोजवेना देव एक ॥ १ ॥ तरी साधिलें तें काये । कोण पाहिला उपाये ॥ २ ॥ कोण उपजोनि मरते । कळेना की कोठें जातें ॥ ३ ॥ देव कोण भक्त कोण । हा अवघाचि अनुमान ॥ ४ ॥ रामदास सांगे गीत । तुज न कळे कीं हीत ॥ ५ ॥

# भाग १२ वा.

## १ प्रासंगिक.

(१) समर्थांचें शिवाजी महाराजांस पत्रः—

### ओव्या.

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥ परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासि । तयाचे गुण महत्वासी तुळणा कैसी ॥ २ ॥ नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति । पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥ यशवंत कीर्तिवंत । समर्थवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ४ ॥ आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ । सर्वज्ञपणें सुशीळ । सकळा ठायीं ॥ ५ ॥ धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर । सावधपणें नृपवर तुच्छ केले ॥ ६ ॥ तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मण स्थानें भ्रष्ट झालीं । सकळ पृथ्वी आंदोळली धर्म गेला ॥ ७ ॥ देवधर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥ उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक । धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ॥ ९ ॥ या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं तुम्हां करितां ॥ १० ॥ आणिक ही

धर्म कृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारिती ॥ ११ ॥ कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले । कित्यकोंस आश्रय झाले । शिव कल्याण राजा ॥१२॥ तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें । ऋणानुबंधे विस्मरण झालें । काय नेणूं ॥१३ सर्वज्ञ मंडळी धर्म मूर्ति । सांगणें काय तुम्हाप्रति । धर्म स्थापनेची कीर्ति संभाळली पाहिजे ॥ १४ । उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागिलें । प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

## राजधर्म.

(२) सावधपणें प्रपंच केला । तेणें सुखचि पावला दीर्घ प्रयत्नें मांडला । कार्यभाग साधे ॥ १ ॥ आधीं मनुष्य ओळखावें । योग्य पाहूनि काम सांगावें । निकामी तरी ठेवावे । एकीकडे ॥ २ ॥ पाहोन उमजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणे । कार्यकर्त्याच्या गुणे कार्यभाग होतो ॥ ३ ॥ कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहीं एक असला हेकाड । तरी समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ॥ ४ ॥ अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार । शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ ५ ॥ मनुष्यें राजी राखणें

हींचि भाग्याचीं लक्षणें । कठिणपणें दुरी धरणें । कांहीं एक ॥ ६ ॥ समयीं मनुष्य कामा येतें । तया कारणें सोशिजेतें । न्याय सांडितां मग तें । सहजाचि खोटें ॥ ७ ॥ न्याय सीमा उल्लंघूं नये । उल्लंघितां होतो अपाय । न्याय नसतां उपाय । होईल कैचा ॥ ८ ॥ उपाधीस जो कंटाळला । तो भाग्या पासूनि चेवला । समयीं धीर सांडला । तो ही खोटा ॥ ९ ॥ संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाय । तरी मग पाहतां काय । उणे आहे ॥ १० ॥ बंध बांधावे नेटके । जेणें करितां चतुर तुके । ताबे न होतां फिके कारभार होती ॥ ११ ॥ धुरेनें युध्दास जाणें । अशीं नव्हेत कीं राजकारणें । धुरा च करोन सोडणें । कित्येक लोक ॥ १२ ॥ उदंड मुंडें[1] असावीं । सर्व ही एक न करावीं । वेगळालीं कामें द्यावीं । सावधपणें ॥ १३ ॥ मोहरा पेटला अभिमाना । मग तो जीवास पाहेना । मोहरे मिळवून नाना । वरी चपेटें करी ॥ १४ ॥ देखोनी व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती नाना वाटा । मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ॥ १५ ॥ रायांनीं करावे राजधर्म । क्षत्रीं करावे क्षत्रधर्म । ब्राह्मणीं करावें स्वधर्म । नाना प्रकारें ॥ १६ ॥

---

१ मस्तकें.

तुरंगें शस्त्रें आणि स्वार। पाहिला पाहवा विचार। निवडूं जातां थोर थोर। शत्रू पळती ॥ १७ ॥ ऐसा प्रपंचाचा विवेक। स्वल्प बोलिलों कांहीं एक। एका मनोगतें स्वामी सेवका असतां बरें ॥ १८ ॥

## क्षात्रधर्म

(३) जयास जिवाचें वाटे भय। त्यानें क्षात्र धर्म करुं नये। कांहीं तरी करूनि उपाय। पोट भरावें ॥ १ ॥ विन्मुख मरणीं नर्क होती। वांचूनि येतां मोठी फजिती। इहलोक परलोक जाती पाहाना कां ॥ २ ॥ मारितां मारितां मरावें। तेणें गतीस पावावें। फिरोन येतां भोगावें महद्भाग्य ॥ ३ ॥ नजर करार राखणें। कार्य पाहुन खतल करणें। तेणें रणशुरांचीं अंतःकरणें चकित होती ॥ ४ ॥ जैसा भांड्याचा गलोला। निर्भय भारामध्यें पडला। तैसा क्षत्री रिचवला। पर सैन्यामध्यें ॥ ५ ॥ निःशंकपणें भार फुटती। परवीरांचें तवके तुटती। जैसा बळिया घालुनि घेती। भैरी उठतां ॥ ६ ॥ ऐसे अवघेच उठतां। परदलाची कोण चिंता। हरणें लोळवी चित्ता देखत जैसा ॥ ७ ॥ मर्दें तकवा सोडूं नये। म्हणजे प्राप्त होतो जय। काय प्रसंग समय ओळखावा ॥८॥ कार्य समजेना अंतरें। तें काय झुंजेल विचारें। युद्ध

करावें खबरदारें । लोक राजी राखतां ॥ ९ ॥ दोन्ही दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें । युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडुनि ॥ १० ॥ देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला । आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ ११ ॥ मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा । ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ १२ ॥ मरणहाक तो चुकेना । हेह वांचवितां वांचेना । विवेकीं होऊनि समजाना । काय करावें ॥१३॥ भले कूलवंत म्हणावें । तेंही वेगी हजीर व्हावें । हजीर न होतां कष्टावें । लागेल पुढें ॥ १४ ॥ देवद्रोही तितुके कुत्ते । मारुनि घालावे परते । देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं ॥ १५ ॥ देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा । मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥ १६ ॥ विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें । तुळजावराचेनि गुणे । रामें रावण मारिला ॥ १७ ॥ अहो हे तूळजाभवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी । रामदास ध्यातो मनीं । यन्निमित्त ॥ १८ ॥

## ४ सेवकधर्म

ऐका प्रपंच विचार । आपली करणी उत्तरे पार

येथे नाहीं उत्तर । श्रेष्ठाकडे ॥ १ ॥ पूर्वीं दरिद्री पीडिले । ते समर्थीं अंगिकारिले । शिकव शिकवूनि शहाणे केले । नानाप्रकारें ॥ २ ॥ पहिलां होता नाचार[1]। श्रेष्ठीं वाढवोनि केला थोर । या वाचनीं अनादर । होता बरवे नव्हे ॥ ३ ॥ जो आपुले हित न करी । तो आपुला आपण वैरी । येथें कांहीं कोणावरी । शब्द नाहीं ॥ ४ ॥ श्रेष्ठानें मनोगत राखेना । बळेंच करी वल्गना । युक्ति प्रयुक्ति नाना । प्रकारें करी ॥५॥ श्रेष्ठाचें केलें मोडावें । आपुलेंचि पुढें प्रतिष्ठावें । तरी मग लागे भ्रष्टावें । वैभवापासूनि ॥ ६ ॥ पुढें पुढें काम करी । मागें कांहींच न करी । कार्यातें नासतो उरी । कांहींच पुढें ॥ ७ ॥ उगाच गर्वे मेला । मागील दिवस विसरला । स्वार्थेचि करूं लागला । म्हणजे गेलें ॥ ८ ॥ वाडिलांसि बुद्धि शिकवी । युक्तिबळें जाणीव दावी । तया मूर्खासि पदवी । प्राप्त कैची ॥९॥ कार्य करितां कांहीं न भागे । त्याची चिंता प्रभूस लागे । ऐसे जाणूनि विवेक जागे । म्हणजे बरें ॥१०॥ आपणास जपूं लागला । श्रेष्ठाचे मनोचा उतरला । येणें कोण स्वार्थ झाला । विचारावा ॥११॥ स्वामीनीं जें जें बोलावें । तेंचि सेवकीं प्रतिष्ठावें । वेळ चुक-

(१) लाचार (२) बाकी.

वूनि बोलावें । विनीत होऊनि ॥ १२ ॥ श्रेष्ठापुढें शहाणपण । हेंचि केवळ मूर्खपण । मूर्खपणें नागवण आली घरा ॥ १३ ॥ मी शहाणा ऐसें कळलें । तरी स्वतंत्र पाहिजे केलें । स्वतंत्र होतां मिरवलें शहाणपण ॥ १४ ॥ ज्या करितां प्राणी वाढले । त्यासीच अडवूं लागले । ते कैसे म्हणावे भले । नीतिवंत ॥ १५ ॥ सेवकीं सेवाचि करावी । स्वामी आसूद(१)कीं द्यावी । तरीच पाविजे पदवी कांहीं एक ॥ १६ ॥ समर्थाचें मनोगत । तैसेंचि वर्तणें उचित । तेथें चुकतां आघात नेमस्त आहे ॥ १७ ॥ सेवक तोचि अडेना । शब्द भुईस पडेना । काम चुकलें हे घडेना कदाकाळीं ॥ १८ ॥ मनोगत राखतां श्रेष्ठ वोळे । मनोगत चुकतां खवळे । ऐसे जयासी नकळे । तो जाणावा कैसा ॥ १९ ॥ आपस्वार्थ उदंड करणें । आणि स्वामिकार्य बुडविणें । ऐसी नव्हेत ही लक्षणें । सेवकांची ॥ २० ॥ सेवकपणाचें मुख्य वर्म । कांहीं नसावें कृत्रिम । कृत्रिम केलिय संभ्रम । कैचा पुढें ॥ २१ ॥ सेवक विश्वास दाविती । वैरीयाकडे मिळोन जाती । त्या चांडाळांसी गती । कोठेंच नाहीं ॥ २२ ॥

---

(१) आयती

## संभाजीस पाठविलेलें उपदेशपर पत्र

(५) अखंड सावधान असावें । दुश्चित्त कदापि नसावें । तजविजा करीत बसावें । एकांत स्थळीं ॥१॥ कांहीं उग्रस्थिति सांडावी । सौम्यता धरावी । चिंता लागावी पराची । अंतर्यामीं ॥ २ ॥ मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे । सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥ पाणवठीं तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना । तैसें सज्जनाच्या मना । कळले पाहिजे ॥ ४ ॥ जनाचा प्रवाह चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला । जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥ श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्या साठीं भांडत बैसलें । मग जाणावें फावलें । गलीमासी ॥ ६ ॥ ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्यास जाये । धरि धरोन महत्कार्य । समजून करावें ॥ ७ ॥ आधींच पडली धास्ती । ह्मणजे कार्यभाग होय नास्ती । या कारणें समस्तीं । बुद्धि शोधावी ॥ ८ ॥ राजी राखतां जग । मग कार्यभागाची लगबग । ऐसें जाणोनियां सांग । समाधान राखावें ॥ ९ ॥ सकल लोक एक करावें । गलीम निवटुन काढावे । ऐसें करितां कीर्ति धावे । दिगंतरीं ॥ १० ॥ आधीं गाजवावें तडाके । मग भूमंडळ धाके । ऐसें न होतां धक्के । राज्यास

होती ॥ ११ ॥ समय प्रसंग ओळखावा । राग निप-
टून काढावा । आला तरी कळों न द्यावा । जनामध्यें
॥ १२ ॥ राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊनि
करावे सेवक । लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंचि
नये ॥ १३ ॥ बहुत लोक मिळवावे । एक विचारें
भरावे । कष्टें करूनि घसरावे । म्लेंच्छावरी ॥ १४ ॥
आहे तितुके जतन करावे । पुढें आणिक मिळवावे ।
महाराष्ट्र-राज्य करावें जिकडे तिकडे ॥ १६ ॥ लोकीं
हिम्मत धरावी । शर्तीची तरवार करावी । चढती
वाढती पदवी । पावाल येणें ॥ १६ ॥ शिवराजास
आठवावे । जिवित्व तृणवत् मानावें । इहलोकीं परलोकीं
राहावें । कीर्तिरूपें ॥१७॥ शिवराजाचे आठवावें रूप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप । शिवराजाचा आठवावा
साक्षेप । भूमंडळी ॥ १८॥ शिवराजाचे कैसें चालणें ।
शिवराजाचे कैसें बोलणें । शिवराजाची सलगीं देणें । कैसें
असे ॥ १९ ॥ सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे
तो योग । राज्य साधनाची लगबग । कैसी असे ॥२०
त्याहूनि करावें विशेष । तरीच म्हणावे पुरुष । या
उपरी आतां विशेष । काय लिहावे ॥ २१ ॥

## अभंग

(१) कायावाचा यथार्थ रामी मिळणें । तरीच

श्लाध्यवाणें रामदास्यें ॥ १ ॥ कामक्रोध खंडणें मद-मत्सर दंडणें । तरीच श्लाध्यवाणें रामदास्यें ॥ २ ॥ परस्त्रीशीं नपुंसक होणें परद्रव्य न पाहाणें । तरीच श्लाध्य वाणें रामदास्यें ॥ ३ ॥ जैसें मुखें बोलणें तैसी क्रिया करणें । तरीच श्लाध्यवाणें रामदास्यें ॥ ४ ॥ माया निवर्तक ज्ञान ज्ञेयाचे होणे । तरीच श्लाध्य वाणें रामदास्यें ॥ ५ ॥ रामदास म्हणे आवडी सगुण भजणें । तरीच श्लाध्यवाणे रामदास्यें ॥ ६ ॥

( २ ) अर्थेविण पाठ कासया करावे । व्यर्थ कां मरावे घोकूंनिया ॥ १ ॥ घोकूंनिया काय वेगीं अर्थ पाहे । अर्थरूप राहे होऊनियां ॥ २ ॥ पाहोनिया अर्थ सार्थक करावें । रामदास भावें सांगतसे ॥ ३ ॥

( ३ ) कर्ता देव एक तेणें केलें सर्व । तयापासीं गर्व कामा नये ॥ १ ॥ देह तें देवाचे वित्त कुबेराचें । तेथें या जीवाचे काय आहे ॥ २ ॥ देता देववीता नेता नेववीता । कर्ता करवीता । जीव नव्हे ॥ ३ ॥ निमित्ताचा धनी केला असे प्राण । पाहतां निर्वाण जीव कैचा ॥ ४ ॥ लक्षुमी देवाची सर्व सत्ता त्याची । त्याजविण जीवाची उर्मी नाहीं ॥ ५ ॥ दास म्हणे मना सावध असावें । दुश्चित्त नसावें सर्वकाळ ॥ ६ ॥

( १ ) अनंत युगींची जननी तूळजा रामा वर-

दायिनी । तिचें स्वरूप समजोनी उमजोनी पाहे ज्ञाता ॥ १ ॥ शक्तिविण कोण आहे तिहीं लोकांमध्यें पाहे। शक्ति रहित न राहे यश कीर्ति प्रताप ॥ २ ॥ शिव-शक्तीचा विचार अर्ध नारी नटेश्वर । दास म्हणे हा विचार तत्वज्ञानी जाणती ॥ ३ ॥

( ५ ) माझी काया गेली खरें परि मी आहे जग-दाकारें । ऐका स्वहित उत्तरें सांगेन तीं ॥ १ ॥ नका करूं खटपट पहा माझा ग्रंथ नीट । तेणें सायुज्याची वाट ठायीं पडे ॥ २ ॥ राहा देहाच्या वीसरे वर्तू नका वाईट बरें । तेणें मुक्तीचीहीं द्वारें चोजवीती ॥ ३ ॥ रामीं रामदास म्हणे सदा सरा । स्वरूपीं अनुसंधान करा श्रीरामाचें ध्यान निरंतर ॥ ४ ॥

## पदे.

(१) उभी राहे रांडे । शब्दचाळ भांडे । काजळ कुंकू लेउनि रांडे किति करिसी नखरा ॥ भिल्लणी होउनि रुद्र नेला । ठकिले[1] त्या शंकरा ॥ १ ॥ साही त्रिकूट अठरा सडि । तेहि बेडावली ॥ चौर्थी जणीं वाद केला । तेहीं धुडकाविली ॥ २ ॥ उभी दुर्वासासीं गर्व केला । तेथें झालिस घोडी ॥ ३ ॥ शुकासि

---

१ फसविलें.

जाउनि रांडे । काय उजेड केला ॥ मारुनि ज्ञान बाण तुझा मौरा फिरविला ॥ ४ ॥ रामदासें पर्णुनि तुजला। लग्निं टाकोनि दिलें ॥ साधुसंगती जाणोनिया । फार फजित केले ॥ ५ ॥ उभी राहे० ॥

(२) सावधान सावधान । वाचें बोला नारायण ॥ ध्रु० ॥ दशवर्षे बाळपण । वीस वर्षे तारुण्य अंगीं चढे मदन । मग कैचे व्यवधान ॥ १ ॥ तीसांची होय भरती । दारां पुत्रा लागे प्रीती । त्यांचीच पडे भ्रांति । ही स्वरुपें स्थिति ॥ २ ॥ चाळीस वर्षे झालीं । डोळा चाळीसी आली । नेत्राशी भूल पडली न दिसति जवळी ॥ ३ ॥ पन्नास वर्षे होती । हालती दाताच्या पंगती । श्याम केश शुभ्र होती । त्यांशीं म्हातारा म्हणती ॥ ४ ॥ साठीची बुद्धि नाठी । हातीं घेऊनियां काठी । वसवसा लागे पाठी । गांजिताती कारटी ॥ ५ ॥ सत्तरींची हेचि रचना । बसविल्या उठवेना । उठवल्या हाऴवेना । हालवल्या चालवेना ॥ ६ ॥ चार विसा मिळोनि ऐशीं । मग तो झाला तापशी । जळावीण जैसी माशी । तैसी होय कासा-विशी ॥ ७ ॥ नवावरती पडतां पूज्य । मग ते होता-ती दुजे । अवघे म्हणती माझे माझे । न येती कोणी काजा ॥ ८ ॥ शतायुर्षी पुरुष झाला । परि तो वाया

गेला । रामदास याचे बोला । विरळा सावध तो झाला ॥ ९ ॥

(३) जें जें लिहिलें भाळीं तें तें कोण चूकवी । होणारासी चुकवूं जातां अवश्य भोगावी ॥ ध्रु० ॥ सुख दुःख सर्वही आपुल्या प्रारब्धाधीन । उगेंच रुसावें भलत्यावर हें मूर्खपण ॥ १ ॥ संपत्ति विपत्ति दोनि पूर्वदत्ताचें फळ । ऐसें जाणेना तो प्राणी मूर्खचि केवळ ॥ २ ॥ ज्याचें केलेंस तेंचि त्याला लाभ तैसाची । अधिक उणें होऊं नेदी इच्छा रामाची ॥ ३ ॥ माता पिता वनिता यांनीं उगेंच पहावें । बरें वाईट कर्म ज्याचें त्यानें भोगावें ॥ ४ ॥ देह सुख दुःख मूळ ऐसें बरवें जाणून । सुख दुःख विरहित रामदास आपण ॥ ५ ॥

## श्लोक.

(४) भला तोचि तो मुख्य आचार राखे । गुरूदेव लौकीक देवासि धाके ॥ करूंये बरें कर्म जें ते करीतो । महावाक्य तत्वादिकें वीवरीतो ॥ १ ॥ सदा सर्वदा बोलणें प्रत्ययाचें । अनुद्वेग गौल्यत्व नाना सुखांचें ॥ नव्हे बंड पाखंड मत्तें विवादें ॥ भले बोलती बोलणें ज्ञान बोधें ॥ २ ॥ नव्हे बोध तो साधका भ्रष्ट वाचे । नव्हे बोध जो मत्त उन्मत्त वाचे ।

नव्हे बोध जो नित्य चोरुनि खावें । महाबोध तो ब्रह्म-बोधीं बुडावें ॥ ३ ॥ विधी बद्धमायेचि हे सृष्टि चाले। विधी चूकतां मोकली ते न चाले ॥ उदंडा जनीं प्रेत्न ऊदंड केला । म्हणे दास हा योग तो व्यर्थ गेला ॥४।

(५) भजनरहित ज्ञानें मोक्ष होणार नाहीं । सकळ ही निगमाचें सार शोधूनि पाहीं ॥ सगुण भजनमार्गे रक्षिलें थोर थोरी । अधम नर तयांचें ज्ञान संदेह-कारी ॥ १ ॥ स्मरण स्मररिपूचे वीषहर्वे वपूचें । निज-विज निगमांचें सार सर्वागमांचे ॥ मथन त्रिभुवनींचें गूज योगी जनांचें । जिवन जड जिवांचें नाम या राघवाचें ॥ २ ॥ भजन रघुविराचें पाहतां सार आहे। अगणित तुळणाही तूळितां तें न साहे ॥ भुषण हरि-जनाचें ध्यान योगीजनाचें । स्वहित मुनिजनांचें गूज हें सज्जनांचें ॥ ३ ॥

## प्रासंगिक. (२)

(१) अंजनीगीत.

लंकेहूनी अयोध्ये येतां । राम लक्ष्मण सीता । हनुमंतें अंजनी माता । दाखविली रामा ॥ १ ॥ चवघें केला नमस्कार । काय बोले रघुवीर । "तुझ्या कुमरें आम्हां थोर । उपकार केला ॥ २ ॥ सीता शुद्धि येणें केली । लक्ष्मुणाची शक्ती हरिली । लंका

जाळुनी निर्दाळीली राक्षससेना ॥ ३ ॥ अहिरावण महिरावण जाणा । घात करिती आमच्या प्राणा । देवीदेखें दोघां जणां । राक्षियलें येणें ॥ ४ ॥ अठरा पद्में वानरभार । श्रमें युद्ध केलें फार । शिळासेतु हा सागर । समाप्त केला ॥ ५ ॥ माते तुझ्या उदरीं जाण । हनुमान जन्मला रत्न । येवढें माझें रामायण । याचेन योगें " ॥ ६ ॥ ऐकोन पुत्राची ही स्तुती । माता तुच्छ मानी चित्तीं । व्यर्थ कां बा रघुपती । वाहतो । भार हा ॥ ७ ॥ कांहो माझ्या उदरीं आला । गर्भींहुनी नाहीं गळला । आपण असतां कष्टवीला । श्रीराम माझा ॥ ८ ॥ माझ्या दुग्धाची हे प्रौढी । कळिकाळाची नरडी मुरडी । रावणादिक हीं बापुडीं । घुंगुरडी तेथें ॥ ९ ॥ असत्य रामा वाटेल बोली । दुग्धधारा सोडियली । शैलाउदरीं खेचविली । त्रिखंड तेव्हां ॥ १० ॥ वेणीदंड परताळिला । लंकेलागी वेढा दिधला । आणुनी रामासी दाखविला अंजनीमातें ॥ ११ ॥ सीता बोले अंजनीसी । कां कोपविसी बाळकासी । रामें आज्ञा हनुमंतासी । दिधली नव्हती ॥ १२ ॥ आश्चर्य वाटलेसें रामा । म्हणे माते ! धन्य महिमा । पदपद्में अवतया जाणा । वंदिलें भावें ॥ १३ ॥ अत्यंत जिवलग सखा । हनु-

मंत भक्त निका । रामदास पाठीराखा । महारुद्र तो ॥ १४ ॥

(२) रामा हो जय रामा हो पतित पावना पूर्ण कामा हो ॥ ध्रृ० ॥ नाथा हो दीनानाथा हो । तुमचे चरणीं राहो माथा हो ॥ १ ॥ बंधु हो दीनबंधु हो । रामदास म्हणे दयासिंधु हो ॥ २ ॥

(३) गजेंद्र सावजें धरिलासे [1]पानेडीं । रामें तेथें उडी टाकियेली ॥ १ ॥ प्रल्हाद गांजीला तया कोण सोडी । रामें तेथें उडी टाकियेली ॥ २.॥ तेतीस कोटी देव पडिले बांदोडीं । रामें तेथें उडी टाकियेली ॥ ३ ॥ क्षत्रियें पीडिलीं ब्राह्मणें बापुडीं । रामें तेथें उडी टाकियेली ॥ ४ ॥ दासां पायीं पडिली देहबुद्धि बेडी । रामें तेथें उडी टाकियेली ॥ ५ ॥ रामदास म्हणे कां करिसी वणवण । रामें तेथें उडी टाकियेली ॥ ६ ॥

(३) आम्हा ये प्रपंचीं कोणी नाहीं सखा । एका रघुनायका वांचुनीया ॥ १ ॥ विद्या वैभव धन मज कृपणाचें । जीवन जीवाचें आत्मारामु ॥ २ ॥ आकाश अवचितें वरी कोसळेल । मज तेथें राखेल आत्मारामु ॥ ३ ॥ आपंगिलें मज श्रीरामसमर्थें । ब्रह्मांड पालथें

---

१ सरोवरांत. २ बंदीवासात.

घालूं शके ॥ ४ ॥ वक्रदृष्टी पाहतां भरील त्यांचा घोट । काळाचें ही पोट फाडूं शके ॥ ५ ॥ रामदास म्हणे मी शरणागत त्याचा । आधार सकळांचा मुक्त केला ॥ ६ ॥

( ४ ) माशें माझें म्हणसी शेवटीं सांडुनी जासी। कांरे भुललासी सावध होई ॥ १ ॥ बहु दुःख पुढिलांचे दृष्टी देखतोसी । कांरे भुललासी सावध होई ॥ २ ॥ प्रपंची मैंदासी लुब्ध जाहलासी । कांरे भुललासी सावध होई ॥ ३ ॥ जठरीं नवमास जतन केलासी । कांरे भुललासी सावध होई ॥ ४ ॥ नित्य गासी ऐकसी लुलु[1] सोडिनासी । कांरे भुललासी सावध होई ॥ ५ ॥ रामदास सदा सांगतो तयासी । कांरे भुललासी सावध होई ॥ ६ ॥

( ५ ) विषयीं अलिप्तपणा इंद्रियनिग्रह जाण । गुरुकृपेवांचुनि नव्हे नव्हे ॥ १ ॥ चंचळपणें मन जाण न करी विषयध्यान । गुरुकृपेवांचुनी नव्हे नव्हे ॥ २ बुद्धि बोध जाण ब्रह्मानुभव पूर्ण । गुरुकृपेवांचुनी नव्हे नव्हे ॥ ३ ॥ भक्ति ज्ञान पूर्ण सप्रेम संपूर्ण । गुरुकृपेवांचुनी नव्हे नव्हे ॥ ४ ॥ रामदास म्हणे निर्गुणसुख लाधणें । गुरुकृपेवांचुनी नव्हे नव्हे ॥ ५ ॥

---

१ लोलंगता.

(६) तंवरी रे तंवरी परमार्थ स्वयंभ। जंव पोटागीवरी लोभ आला नाहीं ॥ १ ॥ तंवरी रे तंवरी अत्यंत सभ्दाव । जव तें निःशेष वैभव गेलें नाहीं ॥ २ ॥ तंवरी रे तंवरी धीरत्वाची मात। जंव प्रपंचीं आघात झाला नाहीं ॥ ३ ॥ तंवरी रे तंवरी डगमगीना कदा। जंव देहासी अपमान झाला नाहीं ॥ ५ रामदास म्हणे अवघी बुचबंगाळी[२]। ऐसा थोडा बळी जो देह बुद्धी सांडी ॥ ६ ॥

(७) तंवरी रे तंवरी न घडे अवज्ञा। जंव ते कांहीं आज्ञा केली नाहीं ॥ १ ॥ तंवरी रे तंवरी कडकडीत वैराग्य। जंव पोटीं भडाग्य झाली नाहीं ॥२॥ तंवरी रे तंवरी ज्ञान सांगावें। जंव ते न मागावे अर्थ कांहीं ॥ ३ ॥ तंवरी रे तंवरी शब्दज्ञान सुख। जंव ते संसारीचें दुःख झालें नाहीं ॥ ४ ॥ रामदास म्हणे हे तंवरीच कठीण। जंव हे पुर्ण समाधान झालें नाहीं ॥ ५ ॥

(८) तंवरी रे तंवरी भवगजांचें भान। जंव सद्गुरुपंचानन। देखिला नाहीं ॥ १ ॥ तंवरी रे तंवरी मायावन प्रबळ। जंव ज्ञानवडवानळ पेटला नाहीं ॥ २ ॥ तंवरी रे तंवरी विषय सुख खद्योत।

---

२ लाडा कारभार.

जंव निजबोधगभस्त देखिला नाहीं ॥ ३ ॥ तंवरी रे तंवरी जन्ममरण दुःख । जंव सद्गुरुवचनपीयुष घेतलें नाहीं ॥ ४ ॥

( ९ ) राजीवनयना रामा । रामा रामा रामा रामा ॥ ध्रु० ॥ धीर उदार सुंदरा । सगुणा गुण-गंभीरा ॥ चाल रे करुणाकरा । वाट पाहतों दातारा ॥ १ ॥ देव सोडविले त्रिदश । मजलागी कां उदास॥ नको कठीण मानस । वाट पाहे रामदास ॥ २ ॥

( १० ) काय रे निष्ठुर रामा सांडुनी जातोसी आम्हा ॥ तुजवीण गुणधामा । कंठवेना ॥ धृ० ॥ तुझिया वियोगें जाण । मी न ठेवीं प्राण । लटिकें केलें तरी आण । तुझी मज ॥ १ ॥ धनुष्य भंगिलें हेळा । वरिली जानकीबाळा ॥ तये कायसा सोहळा । बनवासी ॥ २ ॥ रामीं रामदासी भाव । बंदी पडिले देव ॥ सर्व सांडुनियां धांव । घातली रे ॥ ३ ॥

( ११ ) राम माझें जीवीचे जीवन । राम माझें मनीचें मोहन ॥ एक वेळ भेटवा हो । तन मन धन सर्वई[1] अर्पीन । राघव दाखवा हो ॥ ध्रु० ॥ घालुनी आसन लाउनी नयन । चित्तासी चिंतवेना ॥ मीपणें मी मज पाहों जाता । निज परम गुज तर्कवेना ॥ १ ॥

१ सहज.

जवळी आहे संग न साहे । कोण न चोजवे तो राघव ॥ रामदास म्हणे आत्मनिवेदनें राघव पाविजेतो ॥ २ ॥

(१२) आहा जी मुनिमानसधामा । परमसुखदायका रे ॥ तुजविण शीण वाटतो जानकी नायका रे ॥ध्रु० ॥माया–मोहपुरीं वाहवलों दुरीं । तूं धांव धांव देवराया ॥ कामक्रोधमदमत्सरमगरें । विभांडिली सर्वकाया ॥ १ ॥ नको लावूं वेळू तूं दीनदयाळु । तुझी मन वास पाहे ॥ येथुनी सोडवी ऐसा मज । तुजविण कोण आहे ॥ २ ॥ नको धरूं दुरी नाहीं देहा उरी । किती सत्व पाहासी ॥ रामदास म्हणे झडकरी धांवणें । राहे मज मानसीं रे ॥ ३ ॥

( १३ ) मज मानत नाहीं तनाना । अर्थप्रबंध कांहो म्हणाना । अभ्यंतर बरें ओळखाना ॥ ध्रु० ॥ अर्थ घन स्वर पोंचट । अर्थेंविण शब्दचि फलकट । विवरतां चुके खटपट रे ॥ १ ॥ अर्थाकरितां खलित्या[1] मिळती । खलितीनें नव्हे द्रव्यप्राप्ती ॥ समजतां कळे प्रचीती रे ॥ २ ॥ धान्याकरितां बहु भूस होतें । भूस पेरितां काय पिकतें । सार घेउनी असार सांडिजे तें रे

---

(१) थैल्या

॥ ३ ॥ दास म्हणे हें न कळे जयासी । किती म्हणोनी सांगो तयासी । समजतां कळे सकळासी ॥ ४ ॥

( १४ )रामा तूं ये रे सखया रामा तूं ये रे । तुजविण मज कोणी नाहीं येउनी भेटी तूं दे रे ॥ ध्रु. ॥ संसारें गांजलों सुखदु:खें पोळलों । पराधीन जिणें माझें, तुज शरण आलों ॥ १ ॥ वैभवेंहीण झाल्या, अपंगी कोण । जीवलगें तीं पिसूणें ऐसी झाली कठीण २ ॥ ॥ प्रपंचीं रंगलों तुझ्या पायीं विरंगलों । केलें मायेनें चेटक, तुझा मार्ग चुकलों ॥ ३ ॥ भेटों येतां तुजला विवेक सांडूनी गेला । तयावीण मी परदेशीं बहु शीण वाटला ॥ ४ ॥ वैभवा भजतों गेल्या निंदक होतों । वृत्ती वैभवीं गुंतली तुझा मार्ग पाहतों ॥५॥ वरपंग राहिला तुजलागीं प्राण फुटला । माझें अंतर जाणावें जीव उदास झाला ॥ ६ ॥ दोष आपुले देखोनी आला कंटाळा । रामदास मुक्त करी देवा परम दयाळा ॥ ७ ॥

( १५ ) अंतरलों कीं रामा अंतरलों । माझें वैभव निघोन गेलें कोणी नव्हे अंतीं रे ॥ धृ. ॥ आयुष्य तारुण्य गेलें वय वृद्धाप्य आलें । मायाजळ खंडवेना आयुष्य निघोन गेलें ॥ १ ॥ बहुतीं सांगितलें परी म्यां नाहीं घेतलें ॥ ते वेळीं वाईट वाटलें । तें मज आतां जाणवलें

॥१॥मदांध झालों तेणें तुज चुकलों ॥ शेवीं मज कोणी नाहीं । जीवलगीं वोसंडिलों ॥ ३ ॥ मी माझें म्हणतां गेलों अर्थ जोडितां तुजविषयीं कानकोंडा काय करूं मी आतां ॥ ४ ॥ रामदासाची वृत्ती। जाणोनी आले श्रीपती । मायाजाळ दुरी केलें। नाहीं भवभय कल्पांतीं ॥ ५ ॥

( १६ ) नको दुरी धरूं रे राघवा कुढावया । तुज कारणें उदास मी सखया ॥ तुजवीण न गमे रे जीवा जीवाचिया । अवस्था लागली रे माहेरा माझिया धृ.॥ काय करावें रे वैभव आम्हांसी । वृत्ती गुंतली राघवा तुजपासी ॥तुझिया वियोगें रे न कंठे मानसीं । प्राणसखया कां निष्ठुर झालासी ॥ १ ॥ मज कासया घातलें संसारीं । रामा ¹अंतर पडिलें बहु दुरी ॥ राघवा तूंचि रे आमुचा कैवारी । सावांधांवा तुजवीण कोण करी ॥ २ ॥ अरे या संसारें गांजिलें, करूं काये । मज सांडुनी विवेक दुरी जाये ॥ येथुनी सोडावितां मज कोण आहे । रामा एक वेळ कृपादृष्टीं पाहे ॥ ३ ॥ इच्छा बंधनीं पडिलों सोडवावें । रामा माझिये अंतरीं प्रगटावें ॥ मानस वैभवीं हें गुंतोचि नेदावें । ब्रीद आपुलें स्वामीनें साभाळावें ॥४॥ भाव कैंचा रे आम्हां

---

(१) धावा ऐकून साहाय्य.

अभाविकां । कीर्ती जाणोनी शरण तुज एका ॥ पतितपावन हें नाम टाकिलें कां । रामा धांवें रे सांभाळीं आम्हां रंका ॥ ५॥ वोंडवेळ[1] लागला तूं कां रे धांवेनासी । करुणासिंधू तूं कां रे आटलासी ॥ काय करिसी माझिया अदृष्टासी । कृपाळुवा कणंव[2] नये कैसी ॥ ६ ॥ जितुके होतें त स्वामिचें करणें । शब्द अनाथासी कासया ठेवणें ॥ रामदासीं कृपाळु रामें तेणें । तोडिलें बंधन खुंटलें येणें जाणें ॥ ७ ॥

(१७) रामीं रंगलें मन माझें रे माझें रे । नावडे आणिक कांहीं दुजें रे॥ध्रु॥धीर गंभीर राम राव रे राव रे। सुरवरां जाहला उपाव रे ॥ १ ॥ ऐसा दुजा कोण आहे रे आहे रे। राघवासी उपमा न साहे रे ॥ २ ॥ रामदास म्हणे मज आतां रे आतां रे। मुक्ती नलगे गुण गातां रे ॥ ३ ॥

(१८) आळस खोटा रे बापा आळस खोटा रे ॥ ध्रृ० ॥ घष्टपुष्ट घाटा मोटा । व्यर्थचि ताठा रे बापा ॥ १ ॥ आळस मोठा तोचि करंटा । जाईल कोणा वाटा रे ॥ २ ॥ दास म्हणे रे यत्न उचटा । वैभव सर्व लुटा रे ॥ ३ ॥

---

(१) पुष्कळ वेळ. (२) दया.

## ( ३ ) षड्रिपु.

### काम.

भल्यासी वैर करिताती । ते साही ओळखा बरे ॥
षड्रिपु काम क्रोधादि । मद मत्सर दंभ तो ॥ १ ॥
प्रपंच सहावा वैरी । हे वैरी जिंकितां बरे ॥
भल्यासी लाविती वेढा । परत्र मार्ग रूधिला[1] ॥ २ ॥
काम आरंभीचा वैरी । निःकाम बुडवी सदा ॥
कामना लागली पाही । काम काम करी जनीं ॥ ३ ॥
काम उत्पन्न होताहे । ते वेळे नावरे जना ॥
काम वेड जडे ज्याला । तो प्राणी आत्म-घातकी ॥४॥
व्याधीनें नासती आंगें । नासिकें झडती जनीं ॥
औषधें दंतही जाती । रूप हानीच होतसे ॥ ५ ॥
रूपहानी शक्तिहानी । द्रव्यहानी परोपरी ॥
योति[2] हानी कुलहानी । सर्व हानीच होत असे ॥ ६ ॥
कित्येक मातले भोगें । लोकलाजचि सांडली ॥
शुभाशुभ नसे तेथें । नीचाशीं उंच भ्रष्टली ॥ ७ ॥
कामाच्या व्यसनें नेलें । मातले रातले[3] जनी ॥
तारुण्य दो दिसासाठीं । जन्म दुर्लभ नासिला ॥ ८ ॥
विधीनें[4] विषयो घ्यावा । अविधी नसता बरें ॥
आश्रयी न्यायनीतीनें । प्रपंच करणें सुखें ॥ ९ ॥

---

१ आडविला २ जाति ३ रत झाले ४ शास्त्रोक्तरीतीनें

## क्रोध.

कोप आरोपण[1] खोटी । कोपें कोप ची वाढतो ॥
मोडतो मार्ग न्यायाचा । अन्याय प्रबळें बळें ॥ १ ॥
क्रोध हा खेद संपादी । जेथें तेथें चहूंकडे ॥
विवेक पाहती कैचा । शुद्धी तेथें असेचिना ॥ २ ॥
कुशब्द बोलटें काढी । त्रासकें वचनें वदे ॥
घेतसे बोलटें ढालें । उणें काढी परोपरी ॥ ३ ॥
कंठ लल्लाटीच्या[2] शिरां । फुगल्या घाम चालिल्या ॥
थर्थरा कांपतो रागें । रूपें भूतचि जाहला ॥ ४ ॥
धर्ते लोक ते झिंजाडी । साता पांचासि नावरे ॥
लीथाडी पच्छाडी कुस्ती । मारामारी धबाधबी ॥ ५ ॥
सुटलीं फिटलीं वस्त्रें । नागवे दिसती जना ॥
लाज ते अंतरीं नाहीं । मातले नीट धांवती ॥ ६ ॥
अनर्थ मांडला मोठा । लाथा बुक्याच तप्रका ॥
कोंपरें मारिती शिरीं । काष्ठ पाषाण अगळा ॥ ७ ॥
भल्यांनीं कोण सांडावा । शांतीनें असतां बरें ॥
क्षुल्लकें कोप पाळावा ॥ भल्यांचें काम तों नव्हें ॥ ८ ॥

## " मद "

क्रोध तो बोलिला मागें । मद तो ऐकिजे पुढें ॥
मदाची गुप्त हे कामें । अंतरीचा कळेचि ना ॥ १ ॥

---

१ आरोप २ कपाळाच्या

मद हा वोखटा मोठा । मद हा खेदकारकु ॥
मदानें पद लाभेना । मद शोक करी भला ॥ २ ॥
देहाचा मद शक्तीचा । द्रव्याचा मद अंतरीं ॥
विद्येचा मद भाग्याचा । मदरूप बहूविधा ॥ ३ ॥
कळेना सृष्टि देवाची । बहुरत्ना वसुंधरा ॥
मदाला नावडे कांहीं । सर्व ही तुच्छ होतसे ॥ ४ ॥
मदानें भुलला प्राणी । विचारें उमजेचिना ॥
परावें सत्य मानेना । विवरेना कदापिही ॥ ५ ॥
वेद हो शास्त्र हो चर्चा । नीति हो न्याय हो न हो ॥
आपणा पाहणें नाहीं । विरंची[1] बोलिला तरी ॥ ६ ॥
इतरा कोण तो लेखा[2] । संतसाधु महंत हो ॥
आपणें न्याय केला तो । आपलें बोलणें बरें ॥ ७ ॥
चालणें थोर तें माझें । माझा मीच बहु भला ॥
न्यायाची गोष्ट मानेना । नीतीनें कोप येतसे ॥ ८ ॥
आपणापरतें नाहीं । सर्व कांहीं भुमंडळीं ॥
गुणग्राहकता नाहीं । परावें तुच्छ होतसे ॥
थोर आयुष्य मोलाचें । मदें व्यर्थचि नासिलें ॥
पापी हा उमजो नेदी । शेवटीं दूर होतसे ॥ १० ॥

## मत्सर

मद तो तिसरा शत्रु । चौथा मत्सर आइका ॥

---

१ ब्रह्मदेव २ गणना.

मत्सरें सत्य मानेना । सत्याचें लटिकें करी ॥ १ ॥
बऱ्याचें वोखटें सांगे । मज नाहीं म्हणोनियां ॥
पैशुन्य नस्तोंचि कर्णें ॥ नस्ताची कुंदं लावणें ॥ २ ॥
नस्तें नस्तें ढाल घेणें । ऐसीही जाति मत्सरी ॥
आपणू करंटा आहे । समर्थां निंदितो सदा ॥ ३॥
आपणू कुकर्मी प्राणी । सत्कर्मासी उच्छेदितो ॥
आपणू चोरटा आहे । सकळांसी चोरटे करी ॥ ४ ॥
आपणू भ्रष्टला आहे । भल्यांला भ्रष्ट भावितो ॥
आपणू घातकी मोठा । पराला घातकी म्हणे ॥ ५ ॥
पोटींचा कपटी मोठा । जनाला कपटी म्हणे ॥
आपणा भक्ति ठाकेना । हरिभक्ता उच्छेदितो ॥ ६ ॥
आपणू नीच कूळींचा । कुळवंत मना नये ॥
आपणू ठायिचा लंडी । रण शूरांसिं हांसतो ॥ ७ ॥
आपणू भ्याड ठायींचा । धारिष्टा कर्कशू म्हणे ॥
आपणू वोंगळू आहे । निर्मळा कर्मठु म्हणे ॥ ८ ॥
आपणू लालची मोठा । वैराग्याची उडावणी ॥
करवेना देखवेनाहीं । ऐसा तो मत्सरी नरू ॥ ९ ॥
आपणू कर्म भोगीतो । पराला कर्म लावितो ॥
जें कांहीं आपणा नाहीं । तें सर्व उडवीतसे ॥१०॥

---

१ वाईट २ चहाडी ३ दोष मानितो ४ भित्रा ५ लोभी ६ तिरस्कार.

मत्सरें भाग्य ही गेलें । मत्सरें बुद्धि नासली ॥
भक्ति ना ज्ञान ना कांहीं । अत्र परत्र नसे ॥ ११ ॥
मत्सरें लाविलें वेढा । ज्याचें त्याला कळेचिना ॥

## दंभ

दंभ हा पांचवा जाणा । महाशत्रू कळेचिना ॥
यालागीं भांडणें लोका । एकमेका पटेचिना ॥१॥
स्वार्थ हा व्यर्थ जाणावा । परंतु जन आंधळें ॥
दंभानें आंधळें केलें । ऐसा हा दंभ तस्करू ॥ २ ॥
शरीर मुख्य जायाचें । दंभाची कोण ते कथा ।
सद्यची उमजेना कीं । वैर साधी परोपरी ॥ ३ ॥
देहाचा दंभ तो खोटा । परंतु आवडे जना ।
विवेकें पाहतां नाहीं । दुःखी होती म्हणोनियां ॥४॥
ज्ञानियां दंभ बाधीना । एकाएकी खडाखडी ।
उठोनि चालिला योगी । दंभ तो कुतरें किती ॥ ५ ॥
वैराग्य पाहिजे अंगीं । उदास फिरती लिळा ॥
दंभ तो उडाला तेथें । लोलंगतांचि खुंटली ॥ ६ ॥
निस्पृहा दंभ बाधीना । निस्पृहो पाहिजे बरा ।
अंतरे अंतरा भेदी । तेथें दंभचि नाढळे ॥ ७ ॥
दंभ तो चोर जाणावा । लालची करिती मुंढें ॥
शेवटीं सर्वही जातें । प्रेत होतें भुमंडळीं ॥ ८ ॥

---

१ लागलीच. २ सहज लीलेनें. ३ लोभी. ४ मूर्ख.

अखंड आठवावें रे । मरणाचें ध्यान अंतरीं ।
तेव्हांचि वैराग्य उठे । दंभ लोटे परोपरी ॥ ९ ॥
धन्य तो विवेकी राजा । वैराग्य बळ आगळें ॥
भक्तीचा वोळेला सिंधू । दंभ तेथें दिसेचिना ॥१०॥

## प्रपंच.

प्रपंच सहावा वैरी । परत्र अंतरीं दुरी ।
अवघा तोचि तो झाला । तेणें देव दुराविला ॥१॥
देव तो राहीला दूरी । ऐसा वैरी प्रपंच हा ।
बाळत्वीं छंद मायेचा । खेळ तो राहिला दुरी ॥ २ ॥
लागतां छंद पोरांचा । क्षणक्षणा चुकावितो ।
सांगते माय मानेना । ल्हिंना ना घरीं नसे ॥ ३ ॥
कांहींसा शाहणा झाला । शिकवीला परोपरी ।
लोभानें लग्न हीं केलें । वोढला सासुऱ्याकडे ॥ ४ ॥
नोवरी आवडे जीवीं । नटावेसें मनीं उठे ।
तारुण्य बाणतां अंगीं । कामलोभेंची भूलला ॥ ५ ॥
खेळ तो राहिला मागें । काम तो पडिला पुढें ॥
मोहिला शक्तिनें प्राणी । तीजवांचुनी नावडे ॥ ६ ॥
उदंड जाहलीं पोरें । खर्च तो वाढला पुढें ॥
उद्वेग लागला जीवा । मेळवितां मिळेचिना ॥ ७ ॥

---

५ प्रसन्न झाला.

फिटेना ऋण ते वाढे । ताडोताडी चहूंकडे ॥
अन्नना वस्त्र मिळेना । वृद्धापी संगला बहू ॥ ८ ॥
कष्टला शेवटीं मेला । गेला प्रपंच हातिचा ॥
घातला मागुता जन्मा । ऐसा वैरी प्रपंच हा ॥ ९ ॥
जन्मास घातलें देवें । काय येऊनि साधिलें ॥
भुलले, चुकले देवा । प्रपंच घातकी पहा ॥ १० ॥
आधींच सर्व जाणावें । काय येतें समागमें ॥
निर्वाणीं अंतिचा देवो । कोणी एकें चुकोनये ॥११॥
घर गांव ठाव माझा । शेत वाडे मळे गुरें ॥
कन्या पुत्र वधू माझी । सर्व सांडुनि चालिला ॥१२॥
माझें माझें म्हणे वेडा । स्वार्थ बुद्धी बहूतसी ।
सर्व सांडूनि गेला रे । एकाएकीं उठोनिया ॥ १३ ॥
प्रपंचें भुलला प्राणी । व्यर्थ आयुष्य वेचलें ॥
देव ना धर्म ना कांही । ऐसा हा साहवा रिपू ॥१४॥
आधींच जाणिजे सर्वें । विवेकी त्यास बोलिजे ।
प्रपंचा लाथ लावा रे । वैरी हा सोडिला कसा ॥१५॥
सर्वांस योग साधेना । पुण्य उदंड पाहिजे ॥
सहस्रामाजिं तो एकु । ज्ञान वैराग्य नेटके ॥ १६ ॥
षड्रिपु जिंकिले जेणें । तोचि ज्ञानी, महाभला ॥
दीक्षेनें उद्धरी लोक । वैरागी तो उदासिनु ॥ १७ ॥

---

१ उदासीन.

# भाग १३

## दासबोध.

### ' दशक ' १.

#### समास ( १ ) ग्रंथारंभ लक्षण.

श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिले जी येथ ॥
श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ॥ १ ॥
ग्रंथा नाम दासबोध । गुरु शिष्याचा संवाद ॥
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥ २ ॥
नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिलें वैराग्याचें लक्षण
बहुधा अध्यात्मनिरोपण । निरोपिलें ॥ ३ ॥
भक्तिचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव ॥
ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथीं ॥ ४ ॥
नाना किंत निवारिले । नाना संशयो छेदिले ॥
नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ॥ ५ ॥
नाना ग्रंथाच्या संमती । उपनिषदें वेदांत श्रुती ॥
आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित ॥ ६ ॥
शिवगीता रामगीता । गुरुगीता गर्भगीता ॥
उत्तर-गीता अवधूत-गीता । वेद आणि वेदांत ॥ ७ ॥
भगवद्गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता ॥
गणेशगीता यमगीता । उपनिषदें भागवत ॥ ८ ॥
इत्यादिक नाना ग्रंथ । संमतीस बोलिले येथ ॥
भगवद्वाक्यें यथार्थ । निश्चयेंसी ॥ ९ ॥

भगद्वचनीं अविश्वासे । ऐसा कोण पतित असे ॥
भगव्द्वाक्याविरहित नसे । बोलणें येथींचें ॥ १० ॥
पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ॥
तो दुरात्मा दुरभिमान । मत्सरें करी ॥ ११ ॥
आतां असो हें बोलणें । अधिकारा सारिखे घेणें ॥
परंतु अभिमान त्यागणें । उत्तमोत्तम ॥ १२ ॥
आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ॥
तुटे संशयाचे मूळ । एकसरां ॥ १३ ॥
मार्ग सांपडे सुगम । नलगे साधन दुर्गम ॥
सायुज्यमुक्तीचे वर्म । ठायीं पडे ॥ १४ ॥
नासे अज्ञान दुःख भ्रांती । शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती ॥
ऐसी आहे फलश्रुती । इये ग्रंथीं ॥ १५ ॥
आळसी तेचि साक्षपी होती पापी तेचि पस्तावती ॥
निंदक तेचि वंदूं लागती । भक्तिमार्गासी ॥ १६ ॥
बद्धचि होती मुमुक्ष । मूर्ख होती अति दक्ष ॥
अभक्तचि पावती मोक्ष । भक्तिमार्गे ॥ १७ ॥
नाना दोष ते नासती । पतित तेचि पावन होती ॥
प्राणी पावे उत्तम गती । श्रवणमात्रें ॥ १८ ॥
ऐसी याची फलश्रुती । श्रवणें चुके अधोगती ॥
मनास होय विश्रांती । समाधान ॥ १९ ॥

जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ॥
मत्सर धरी जो पुंसा । तयासि तेंचि प्राप्त ॥ २० ॥

## समास ( ४ ) सद्गुरुस्तवन.

आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों शकेना ॥
तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ॥ १ ॥
न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती ॥
तेथें मज मूर्खाची गती । पवाडेल कोठें ॥ २ ॥
मज न कळे हा विचारु । दुरूनि माझा नमस्कारु ॥
गुरुदेवा पैलपारु । पाववी मज ॥ ३ ॥
मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ॥
माया झाली लज्जायमान । काय करूं ॥ ४ ॥
नातुडे मुख्य परमात्मा । म्हणोनि करावी लागे प्रतिमा ॥
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्गुरुचा ॥ ५ ॥
आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ॥
तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तवूं आतां ॥ ६ ॥
जय जयाजी सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ॥
परम पुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ॥ ७ ॥
तुझियेनि अभयंकरें । अनावर माया हे वोसरे ॥
जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ॥ ८ ॥
आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे ॥
निशी झालिया नंतरें । पुन्हां काळोखें ॥ ९ ॥

तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव ॥
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ १० ॥
सुवर्णाचा लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं ॥
तैसा गुरुदास संदेहीं । पडोचि नेणें सर्वथा ॥ ११ ॥
कां सारिता गंगेसी मिळाली।मिळणी होतां गंगा झाली॥
मग जरी वेगळी केली।तरी होणार नाहीं सर्वथा॥१२॥
परी ते सरितां मिळणी मागें।वोहळ मानिजेत जगें ॥
तैसा नव्हे शिष्य, वेगें।स्वामीच होये ॥ १३ ॥
परीस आपणा ऐसें करीना । सुवर्णे लोहो पालटेना ॥
उपदेश करी बहुत जना । अंकित सद्गुरूचा ॥१४॥
शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां नये॥
म्हणोनि उपमा न साहे । सद्गुरूसी परिसाची ॥१४॥
उपमे म्हणो गगन । तरी गगनापरीस ते निर्गुण ॥
या कारणे दृष्टांत हीन । सद्गुरूस गगनाचा ॥१६॥
सद्गुरूसी उपमावे अमृत।तरी अमर धरिती मृत्युपंथ॥
सद्गुरू कृपा यथार्थ । अमर करी ॥ १७ ॥
सद्गुरूसी म्हणावे कल्पतरू।तरी हा कल्पनेतीत विचारू॥
कल्पवृक्षाचा अंगिकारू ।- कोण करीं ॥ १८ ॥
चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसें चिंतामणी ॥
कामधेनूची दुभणी । निःकामासी न लगती ॥१९॥

सद्‌गुरू म्हणो लक्ष्मीवंत। तरी ते लक्ष्मी नाशवंत ॥
ज्याचे द्वारीं असे तिष्टत । मोक्षलक्ष्मी ॥२०॥
स्वर्ग लोक इंद्र संपत्ती । हे काळांतरी विटंबती ॥
सद्‌गुरूकृपेची प्राप्ती । काळांतरी चळेना ॥२१॥
हरिहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ॥
सर्वदा अविनाश एक । सद्‌गुरुपद ॥ २१ ॥
तयास उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टि आघवी ॥
पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें ॥ २३ ॥
म्हणोनि सद्‌गुरु वर्णवेना । हेगें हेचि माझी वर्णना ॥
अंतरस्थितीचिया गुणा । अंतर्निष्ठ जाणती ॥२४॥

## दशक (२)

### समास ( १ ) मूर्खलक्षणनाम

वंदून सद्‌गुरु चरण । करून रघुनाथस्मरण ॥
त्यागार्थ मूर्ख लक्षण । बोलिजेल ॥ १ ॥
जन्मला जयाचे उदरीं । तयांसी तो विरोध करी ॥
सर्वा मानिली अंतुरी । तो एक मूर्ख ॥ २ ॥
परस्त्रीसी प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी ॥
कुळेंविण कन्या वरी । तो एक मूर्ख ॥ ३ ॥
समर्थावरी अहंता । अंतरीं मानी समता ॥
सामर्थ्येंविण करी सत्ता । तो एक मूर्ख ॥ ४ ॥

आपण आपुली करी स्तुती । स्वदेशी भोगी विपत्ती ॥
सांगे वडिलाची कीर्ती । तो एक मूर्ख ॥ ५ ॥
अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी ॥
जो बहुतांचा वैरी । तो एक मूर्ख ॥ ६ ॥
बहुत जागते जन । तयामध्यें करी शयन ॥
परस्थळीं बहु भोजन । करी, तो एक मूर्ख ॥ ७ ॥
धरूनि परावी आस । प्रयत्न सोडी सावकाश ॥
निसुगाईचा संतोष । मानी तो एक मूर्ख ॥ ८ ॥
आपणाहून जो श्रेष्ठ । तयासी अत्यंत निकट ॥
शिकवणेचा मानी वीट । तो एक मूर्ख ॥ ९ ॥
औषध न घे असोन व्यथा । पथ्य न करी सर्वथा ॥
न मिळे आलिया पदार्था । तो एक मूर्ख ॥ १० ॥
आपणांस जेथें मान । तेथें अखंड करी गमन ॥
रक्षूं नेणे मानाभिमान । तो एक मूर्ख ॥ ११ ॥
घरिच्या वरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा ॥
ऐसा जो कां वेडमुढा । तो एक मूर्ख ॥ १२ ॥
स्वयें नेणें परोपकार । उपकाराचा अनोपकार ॥
करी थोडें बोले फार । तो एक मूर्ख ॥ १३ ॥
विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान ॥
कोरडाची वाहे अभिमान । तो एक मूर्ख ॥ १४ ॥

दंत चक्षु आणि घ्राण । पाणी वसन आणि चरण ॥
सर्वकाळ जयाचे मळिण । तो एक मूर्ख ॥ १५ ॥
आपणासी राखे परोपरी । शरणागतास अव्हेरी ॥
लक्ष्मीचा भर्वसा धरी । तो एक मूर्ख ॥ १६ ॥
पुत्र कलत्र आणि दारा । इतुकाची मानुनिया थारा ॥
विसरोन गेला ईश्वरा । तो एक मूर्ख ॥ १७ ॥
जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें ॥
हें जयास नेणावें । तो एक मूर्ख ॥ १८ ॥
पुरुषाचेनि अष्टगुणे । स्त्रियांस ईश्वरी देणें ॥
ऐशा केल्या वहुत जेणें । तो एक मूर्ख ॥ १९ ॥
देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही ।
ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो एक मूर्ख ॥ २० ॥
परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख ॥
गेले वस्तूचा करी शोक । तो एक मूर्ख ॥ २१ ॥
समर्थासीं मत्सर धरी । अलभ्य वस्तूचा हेवा करी ॥
घरच्या घरीं करी चोरी । तो एक मूर्ख ॥ २२ ॥
सांडूनिया जगदीशा । मनुष्याचा मानी भर्वसा ॥
सार्थकेंविण वेची वयसा । तो एक मूर्ख ॥ २३ ॥
संसारदुःखाचेनि गुणे । देवास गाळी देणें ॥
मैत्राचें बोले उणें । तो एक मूर्ख ॥ २४ ॥
अल्प अन्याय क्षमा न करी । सर्वकाळ भारकी धरी ॥

जो विश्वासघात करी । तो एक मूर्ख ॥ २५ ॥
बहुता दिवसाचे सेवक । त्यागून ठेवी आणिक ॥
ज्याची सभा निर्नायक । तो एक मूर्ख ॥ २६ ॥
अनीतीनें द्रव्य जोडी । धर्म नीती न्याय सोडी ॥
संगतीचे मनुष्य तोडी । तो एक मूर्ख ॥ २७ ॥
घरीं असोन सुंदरी । जो सदांचा परदारी ॥
बहुताचें उच्छिष्ट अंगिकारी । तो एक मुर्ख ॥ २८ ॥
अतिताचा अंत पाहे । कुग्रामामधें राहे ॥
सर्वकाळ चिंता वाहे । तो एक मूर्ख ॥ २९ ॥
कलह पाहत उभा राहे । तोडविना कौतुक पाहे ॥
खरे अस्तां खोटे साहे । तो एक मूर्ख ॥ ३० ॥
लक्ष्मी आलियावरी । जो मागील वोळखी न धरी ॥
देवीं ब्राह्मणीं सत्ता करी । तो एक मूर्ख ॥ ३१ ॥
आपुले काज होय तंवरी । बहुसाल नम्रता धरी ॥
पुढिलांचे कार्य न करी । तो एक मूर्ख ॥ ३२ ॥
आपण वाचीना कधीं । कोणास वाचाया नेदी ॥
बांधोन ठेवी बंदी । तो एक मूर्ख ॥ ३३ ॥

### ७ समास ( ५ ) रजोगुण लक्षण.

मुळीं देह निर्गुणाचा । सत्वरजतमाचा ॥
त्य मध्यें सत्वाचा । उत्तम गुण ॥ १ ॥

सत्वगुणें भगवद्भक्ती। रजोगुणें पुनरावृत्ती।
तमोगुणें अधोगती। पावती प्राणी ॥ २ ॥
माझें घर माझा संसार। देव कैचा आणिला थोर।
ऐसा करी जो निर्धार। तो रजोगुण ॥ ३ ॥
माता पिता आणि कांता। पुत्र सुना आणि दुहिता।
इतुक्यांची वाहे चिंता। तो रजोगुण ॥ ४ ॥
कैचा धर्म कैचें दान। कैचा जप कैचें ध्यान ॥
विचारीना पापपुण्य। तो रजोगुण ॥ ५ ॥
नेणें तीर्थ नेणें व्रत। नेणें अतीत अभ्यागत ॥
अनाचरीं मनोगत। तो रजोगुण ॥ ६ ॥
मी तरुण मी सुंदर। मी बलाढ्य मी चतुर ॥
मी सकळामध्यें थोर। तो रजोगुण ॥ ७ ॥
दुसऱ्याचें सर्व जावें। माझेंचि बरें असावें ॥
ऐसें आठवें स्वभावें। तो रजोगुण ॥ ८ ॥
कां मागें जें जें भोगिलें। तें तें मनीं आठवलें ॥
दुःख अत्यंत वाटलें। तो रजोगुण ॥ ९ ॥
वैभव देखोन दृष्टी। आवडी उपजली पोटीं ॥
आशागुणें हिंपुटी। करी तो रजोगुण ॥ १० ॥
जें जें दृष्टी पडलें। तें तें मनीं मागितलें ॥
लभ्य नस्तां दुःख झालें। तो रजोगुण ॥ ११ ॥
तस्करविद्या जवीं उठे। पर न्यून बोलावें वाटे ॥

नित्य नेमास मन विटे । तो रजोगुण ॥ १२ ॥
नेणोनिया परमात्मा । सकळ पदार्थीं प्रेमा ॥
बळात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ॥ १३ ॥
आतां रजोगुण हा सुटेना । संसारिक हें तुटेना ॥
प्रपंचीं गुंतली वासना । यास उपाये कोण ॥ १४ ॥
उपाय येक भगवद्भक्ती । जरी ठाकेना विरक्ती ॥
तरी यथानुशक्ती । भजन करावें ॥ १५ ॥
काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।
ईश्वरीं अर्पूनिया मनें । सार्थक करावे ॥ १६ ॥

समास ( ६ ) तमोगुण लक्षण

संसारीं दुःखसंबंध । प्राप्त होतां उठे खेद ॥
कां अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ॥ १ ॥
शरीरीं क्रोध भरतां । नोळखे मातापिता ॥
बंधु बहीण कांता । ताडी तो तमोगुण ॥ २ ॥
डोळां युद्धची पहावें । रण पडिलें तेथें जावें ।
ऐसें घेतलें जीवें । तो तमोगुण ॥ ३ ॥
प्रीतिपात्र गेलें मरणें । तयालागीं जीव देणें ॥
स्वयें आत्महत्या करणें । तो तमोगुण ॥ ४ ॥
किडा मुंगी आणि श्वापद । यांचा करूं आवडे वध ।
अत्यंत जो कृपामंद । तो तमोगुण ॥ ५ ॥

युद्ध देखावें ऐकावें । स्वयें युद्धची करावें ॥
मारावें कीं मरावें । तो तमोगुण ॥ ६ ॥
मत्सरें भक्ती मोडावी । देवालयें बिघडावी ॥
फळती झाडें तोडावी । तो तमोगुण ॥ ७ ॥
सत्कर्में ते नावडती । नाना दोष ते आवडती ॥
पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ॥ ८ ॥
भांडण लावून द्यावें । स्वयें कौतुक पहावें ॥
कुबुद्धी घेतली जीवें । तो तमोगुण ॥ ९ ॥
स्नानसंध्या नेम नसे । स्वधर्मीं भ्रष्टला दिसे ॥
अकर्तव्य करीतसे । तो तमोगुण ॥ १० ॥
उगेंच खावें उगेंच असावें । स्तब्ध होउन बैसावें ॥
कांहींच स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ॥ ११ ॥
निराहार उपोषण । पंचाग्नी धूम्रपान ॥
आपणास घ्यावें पुरून । तो तमोगुण ॥ १२ ॥
देवाची जो निंदा करी । तो आशाबद्धी अघोरी ॥
जो संतसंग न धरी । तो तमोगुण ॥ ३ ॥

## समास ( ७ ) सत्वगुण.

मागां बोलिला तमोगुण । जो दुःखदायक दारुण ॥
आतां ऐका सत्वगुण । परम दुर्लभ ॥ १ ॥
जो भजनाचा आधार । जो योगीयांचा थार ॥
जो निरसी संसार । दुःख मूळ जो ॥ २ ॥

जेणें होय उत्तम गती । मार्ग फुटे भगवंतीं ॥
जेणें पाविजे मुक्ती । सायुज्यता ते ॥ ३ ॥
जो परमार्थाचें मंडण । जो महंताचें भूषण ॥
रजतमाचें निर्शन । जयाचेनि ॥ ४ ॥
संसार दुःख विसरवी । भक्तिमार्ग विमल दावी ॥
भजन क्रिया उपजवी । तो सत्वगुण ॥ ५ ॥
परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी ॥
परोपकारी तांतडी । तो सत्वगुण ॥ ६ ॥
स्नानसंध्या पुण्यशीळ । अभ्यंतरीचा निर्मळ ॥
शरीर वस्त्रें सोज्वळ । तो सत्वगुण ॥ ७ ॥
निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी ॥
क्रिया पालटे रोकडी । तो सत्वगुण ॥ ८ ॥
धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान ॥
करी ब्राह्मण संतर्पण । तो सत्वगुण ॥ ९ ॥
सुंदरें नाना उपकर्णें । मंडप चांदवे आसनें ॥
देवालयीं समर्पणें । हा सत्वगुण ॥ १० ॥
ऐसी भक्तीची आवडी । नीच दास्यत्वाची गोडी ॥
स्वयें देवद्वार झाडी । तो सत्वगुण ॥ ११ ॥
महत्कृत्य सांडून मागें । देवास ये लागवेगें ॥
भक्ति निकट अंतरंगें । तो सत्वगुण ॥ १२ ॥
शब्द कठिण न बोले । अति नेमेसी चाले ॥

योगी जेणें तोषविले । तो सत्वगुण ॥ १३ ॥
अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारले नयन ॥
पडे देहाचें विस्मरण । तो सत्वगुण ॥ १४ ॥
सर्वकाळ उदासीन । नाना भोगीं विटे मन ॥
आठवें भगवद्भजन । तो सत्वगुण ॥ १५ ॥
शांती क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया ॥
सत्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥ १५ ॥
आले अतीत अभ्यागत । जाऊं नेदी जो भुकिस्त ॥
यथानुशक्ति दान देत । तो सत्वगुण ॥ १७ ॥
जेणें जिंकिली रसना । तृप्त जयाची वासना ॥
जयास नाहीं कामना । तो सत्वगुण ॥ १८ ॥
होणार तैसें होत जात । प्रपंचीं आला आघात ॥
डळमळिना ज्याचें चित्त । तो सत्वगुण ॥ १९ ॥
एका भगवंता कारणें । सर्व सुख सोडिलें जेणें ॥
केलें देहाचें सांडणें । तो सत्वगुण ॥ २० ॥
विषयीं धांवे वासना । परी तो कदा डळमळेना ॥
ज्याचें धारिष्ठ चळेना । तो सत्वगुण ॥ २१ ॥
सकळांसीं नम्र बोले । मर्यादा धरून चाले ॥
सर्व जन तोषविलें । तो सत्वगुण ॥ २२ ॥
सकळ जनासी आर्जव । नाहीं विरोधास ठाव ॥
परोपकारीं वेंची जीव । तो सत्वगुण ॥ २३ ॥

आपकार्याहून जीवीं । परकार्य सिद्धी करावी ॥
मरोन कीर्ति उरवावी । तो सत्वगुण ॥ २४ ॥
नीच उत्तर साहणें । प्रत्योत्तर न देणें ॥
आला क्रोध सावरणें । तो सत्वगुण ॥ २५ ॥
सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी ॥
वाट भक्तीची धरावी । तो सत्वगुण ॥ २६ ॥
जया आवडे प्रातःस्नान । आवडे पुराणश्रवण ॥
मंत्री देवतार्चन । करी तो सत्वगुण ॥ २७ ॥
विदेशीं मेलें मरणें । तयाला संस्कार देणें ॥
अथवा सादर होणें । तो सत्वगुण ॥ २८ ॥
परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख ॥
वैराग्य देखोन हरीख । मानी, तो सत्वगूण ॥ २९ ॥
आतां असो हे बहुत । देवीं धर्मीं ज्याचें चित्त ॥
भजे कामना रहित । तो सत्वगुण ॥ ३० ॥

## दशक ( ४ )

### समास (१) श्रवणभक्ति निरूपण.

सावध होऊन श्रोतेजन । ऐका नवविधा भजन ॥
सत्शास्त्रीं बोलिलें पावन । होइजे येणें ॥ १ ॥
प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथा पुराण श्रवण ॥
नाना अध्यात्म निरूपण । ऐकत जावें ॥ २ ॥
कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ॥

योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे ॥ ३ ॥
नाना व्रतांचें महिमे । नाना तीर्थांचें महिमे ॥
नाना दानांचे महिमे ऐकत । जावे ॥ ४ ॥

नाना मुद्रा नाना आसनें । नाना देखणीं लक्षस्थानें ॥
पिंडज्ञानें तत्वज्ञानें । कैसीं तीं ऐकावीं ॥ ५ ॥

नाना पिंडांची रचना । नाना भूगोल रचना ॥
नाना सृष्टींची रचना । कैसी ते ऐकावी ॥ ६ ॥

चौदा विद्या चौसष्ट कला । सामुद्रिक लक्षणें सकळ--
कळा ॥
बत्तीस लक्षणें नाना कळा । कैशा त्या ऐकाव्या ॥

कोण दोषें कोण रोग । कोण्या रोगास कोण प्रयोग ॥
कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ॥८॥

कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती ॥
कैशी पाविजे उत्तम गती । ऐसें हें ऐकावें ॥ ९ ॥

पिंड ब्रह्मांडाची रचना । नाना तत्व विवंचना ॥
सारासार विचारणा । कैसी ती ऐकावी ॥ १० ॥

वेदशास्त्रें आणि पुराणें । महावाक्यांची विवरणें ॥
तनुचतुष्टयानिर्शनें । कैसीं तीं ऐकावीं ॥ ११ ॥

ऐसें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ॥
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ती॥१२॥

सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । कां ते निर्गुण अध्यात्में शोधावीं ॥
श्रवणभक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ॥ १३ ॥

## समास ( ९ ) आत्मनिवेदन भक्ति.

ऐका निवेदनाचे लक्षण । देवासी वाहावें आपण ॥
करावें तत्वविवरण । म्हणजे कळे ॥ १ ॥
भक्त म्हणे विभक्त नव्हे । आणि विभक्त ह्मणजे भक्त नव्हे ॥
विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ॥ २ ॥
तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा ॥
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥ ३ ॥
मी कोण ऐसा निवाडा । पाहो जातां तत्वझाडा ॥
विचार करितां उघडा । आपण नाहीं ॥ ४ ॥
तत्वें तत्व जेव्हां सरें । तेव्हां आपण कैचा उरें ॥
आत्मनिवेदन येणें प्रकारें । सहजचि झालें ॥ ५ ॥
आत्मा एक स्वानंदघन । आणि अहमात्मा हें वचन ॥
तरी मग आपण कैचा भिन्न । उरला तेथें ॥ ६ ॥
त्वंपद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद ॥
वस्तु ठाईंचा अभेद । आपण कैचा ॥ ७ ॥
आपण मिथ्या साच देव । देवभक्त अनन्यभाव ॥
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ ८ ॥

या नांव आत्मनिवेदन । ज्ञानियांचें समाधान ॥
नवमें भक्तीचें लक्षण । निरोपिलें ॥ ९ ॥
पंचभूतांमधें आकाश। सकल देवामधें जगदीश ॥
नवविधा भक्तीमधें विशेष। भक्ति नवमी ॥ १० ॥
नवमी भक्ति आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्म-
मरण ॥
हें वचन सत्यप्रमाण । अन्यथा नव्हें ॥ ११ ॥
ऐसी हें नवविधा भक्ती । केल्या पाविजे सायुज्यमुक्ती॥
सायुज्यमुक्तीत कल्पांतीं । चळण नाहीं ॥ १२ ॥

## दशक (५)

### समास (२) गुरुलक्षण.

जे करामती दाखविती । तेहि गुरु म्हणिजेती ॥
परंतु सद्गुरु नव्हेती । मोक्षदाते ॥ १ ॥
जे जातीचा जो व्यापार । शिकविती भरावया उदर ॥
तेही गुरु, परी साचार । सद्गुरु नव्हेती ॥ २ ॥
आपली माता आणि पिता । तेही गुरुचि तत्वता ॥
परी पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ॥
भवव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सास ताडातोडी ॥
केली, देखोनि शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥४
प्राणी मायाजाळीं पडिले । संसारदुःखें दुःखवले ॥

ऐसे जेणें मुक्त केलें । तो सद्‌गुरु जाणावा ॥ ५ ॥
वासना नदी महापुरीं । प्राणी बुडता ग्लांती करी ॥
तेथें उडी घालूनि तारी । तो सद्‌गुरु जाणावा ॥ ६ ॥
शिष्यास न लावितां साधन। न करविती इंद्रियदमन।
ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळाले तरी त्यजावे ॥७॥
जो कोणी ज्ञान बोधी। समूळ अविद्या छेदी ॥
इंद्रियदमन प्रतिपादी। तो सद्‌गुरु जाणावा ॥ ८ ॥
अद्वैतनिरूपणें अगाध वक्ता । परी विषयीं लोळंगता ॥
ऐसिया गुरुचेनि सार्थकता होणार नाहीं ॥ ९ ॥
निःशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे ॥
दुराशा धरिती ते वोखटे । शद्बज्ञाते कामिक ॥ १० ।
निःशेष कामना रहित। ऐसा तो विरळा संत ॥
अवघ्या वेगळें मत। अक्षय्य ज्याचें ॥ ११ ॥
सांडूनि अक्षय्य सुख। सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख ॥
कामनेसारिखें दुःख। आणीक कांहींच नाहीं ॥ १२ ।
ईश्वरेंविण जे कामना। तेणेंचि गुणें नाना यातना ॥
पावती होती पतना। वरपडे प्राणी ॥ १३ ॥
होतां शरीरासी अंत। सामर्थ्य हीं निघोन जात ॥
शेखीं अंतरला भगवंत। कामनागुणें ॥ १४ ॥
म्हणोनि निःकामता विचारु। दृढ बुद्धीचा निर्धारु ॥
तोचि सद्‌गुरु पैलपारु। पाववी भवाचा ॥ १५ ॥

मुख्य सद्‌गुरुचें लक्षण । आधीं पाहिजे विमळज्ञान॥
निश्चयाचें समाधान । स्वरुपस्थिती ॥ १६ ॥
याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ॥
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्म विषयीं ॥ १७ ॥
नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार ॥
कर्मेंविण अनाचार । भ्रष्ट होती ॥ १८ ॥
म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्म कर्म आणि साधन ॥
कथानिरूपण श्रवण मनन । नीतिन्यायें मर्यादा ॥१९॥
यांमधें एक उणें असें । तेणें तें विलक्षण दिसें ॥
ह्मणोन सर्व ही विलसें । सद्‌गुरूपासी ॥ २० ॥
आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट आसक्त दिसती ॥
जळो तयांची महंती । कोण पुसे ॥ २१ ॥
जें जें कांहीं उत्तम गुण । तें सद्‌गुरूचें लक्षण ॥
तथापी सांगो ओळखण । होय जेणें ॥ २२ ॥
नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळुपण ॥
हें सद्‌गुरुचें लक्षण । जाणिजें श्रोतीं ॥ २३ ॥
याहीवरी अध्यात्मश्रवण । हरिकथा निरूपण ॥
जेथें परमार्थ विवरण । निरंतर ॥ २४ ॥

## समास ( ६ ) शुद्धज्ञाननिरुपण नाम.

ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान ह्मणिजे आत्मज्ञान ॥
पाहावें आपणाणि आपण । या नांव ज्ञान ॥ १ ॥
मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप ओळखावें ॥
नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ॥ २ ॥
जेथें दृश्य प्रकृति सरे । पंचभूतिक वोसरे ॥
समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान ॥ ३ ॥
मन बुद्धि अगोचर । नचले तर्कांचा विचार ॥
उल्लेख परेहूनि पर । या नांव ज्ञान ॥ ३ ॥
जेथें नाहीं दृश्यभाव । जेथें जाणीव हें अज्ञान ॥
मिमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ५ ॥
सर्वसाक्षी अवस्था तुर्या । ज्ञान ऐसें ह्मणती तया ।
परी ते जाणिजे वायां । पदार्थज्ञान ॥ ६ ॥
दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पयार्थज्ञान बोलिजे ॥
शुद्धस्वरूप जाणिजे । या नांव स्वरुपज्ञान ॥ ७ ॥
ऐक शुद्धज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपाचि आपण ॥
या नाव शुद्ध स्वरुपज्ञान । जाणिजे श्रोतीं ॥ ८ ॥
महावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण ॥
मुख्य लक्ष्यांशे आपण । वस्तुच आहे ॥ ९ ॥
जें चराचराचे मूळ । शुद्ध स्वरुप निर्मळ ॥
या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥ १० ॥

शोधितां आपुलें मूळ स्थान । सहजाचि उडे अज्ञान ॥
या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायक ॥ ११ ॥
आपणासी ओळखी जातां । आंगीं वाणे सर्वज्ञता ॥
तेणें एकदेशी वार्ता । निःशेष उडे ॥ १२ ॥
असो पूर्वीं थोरथोर । जेणें ज्ञानें पैल पार ॥
पावले तें साचार । ऐक आतां ॥ १३ ॥
व्यास वसिष्ठ महामुनी । शुक नारद समाधानीं ॥
जनकादिक महाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ॥ १४ ॥
वामदेवादिक योगेश्वर । वाल्मीक अत्रि ऋषीश्वर ॥
शौनकादिक अध्यात्मसार । वेदांतमतें ॥ १५ ॥
जें वेदांत शास्त्राचें सार । सिद्धांतधादांतविचार ॥
ज्याची प्राप्ती भाग्यानुसार । भाविकांसि होये ॥ १६ ॥
साधुसंत आणि सज्जन । भूत भविष्य वर्तमान ॥
सर्वत्रांचे गुह्यज्ञान । तें सांगिजेल आतां ॥ १७ ॥
तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धूम्रपानें ॥
पंचाग्नी गोरांजनें । जें प्राप्त नव्हे ॥ १८ ॥
सकळ साधनांचें फळ । ज्ञानाची शीग चि केवळ ॥
जेणें संशयाचें मूळ । निशेष तुटे ॥ १९ ॥
छपन्न भाषा तितुके ग्रंथ । आदिकरून वेदांत ॥
या इतुकियांचा गहनार्थ । एकचि आहे ॥ २० ॥
जे नेणवें पुराणीं । जेथें शिणल्या वेदवाणी ॥

तेंचि आतां येचि क्षणीं । बोधीन गुरुकृपें ॥ २१ ॥
पाहिलें नसतां संस्कृती । रीग नाहीं महाराष्ट्र ग्रंथीं ॥
हृदयीं बैसल्या कृपामूर्ती । सद्गुरु स्वामी ॥ २२ ॥
आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत ॥
माझा स्वामी कृपेसहित । हृदयीं वसे ॥ २३ ॥
अरे गहनाचें हि गहन । तें तूं जाण सद्गुरुवचन ॥
सद्गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ॥ २४ ॥
सद्गुरुवचन तोचि वेदांत । सद्गुरुवचन तोचि सिद्धांत
सद्गुरुवचन तोचि धादांत । सप्रचित आतां ॥ २५ ॥
जें अत्यंत गहन । माझ्या स्वामींचें वचन ॥
जेणें माझें समाधान । अत्यंत झालें ॥ २६ ॥
तें हें माझ्या स्वामीचें गुज । मी सांगेन म्हणतों तुज ॥
जरी अवधान देसी मज । येचि क्षणीं ॥ २७ ॥
शिष्यें म्लान वदनें बोलें । धरिलें सदृढ पाउलें ॥
मग बोलों आरंभिलें । गुरुदेवें ॥ २८ ॥
अहं ब्रह्मास्मि महावाक्य । येथीचा अर्थ अतर्क्य ॥
तोहि सांगतों ऐक्य । गुरुशिष्य जेथें ॥ २९ ॥
ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूंचि आहेस ब्रह्म ॥
ये विषयीं संदेह भ्रम । धरूंचि नको ॥ ३० ॥
ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्य केर आटे ॥
तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें ॥ ३१ ॥

मिथ्यत्वें वृत्ति फिरे । तों दृश्य असतांचि वोसरे ॥
सहजचि येणें प्रकारें । झालें आत्मनिवेदन ॥ ३२ ॥
असो गुरूचें ठायीं अनन्यता । तरी तुज कायेसी रे चिंता॥
वेगळेपणें अभक्ता । उरोंचि नको ॥ ३३ ॥
आतां हेंचि दृढीकर्ण । व्हाया करी सद्गुरुभजन ॥
सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ ३४ ॥
देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ॥
देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी ॥ ३५ ॥
शिष्या एकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें ॥
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ ३३ ॥
अखंड घडे श्रवण मनन । तरीच पाविजे समाधान ॥
पूर्ण झालिया ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे अंगीं ॥ ३७ ॥
शिष्या मुक्तपणें अनर्गळ । इंद्रियें करिसी वाष्कळ ॥
तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ॥ ३८ ॥
विषवीं वैराग्य उपजलें । तयासचि पूर्ण ज्ञान झालें ॥
मणी टाकितांचि लाधलें । राज्य जेवीं ॥ ३९ ॥
ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन ॥
जया पुरुषास जें ध्यान । तयास तेंचि प्राप्त ॥ ४० ॥
म्हणोनि जे अविद्या । सांडून धरावी सुविद्या ॥
तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे सहज ॥ ४१ ॥

सन्यपाताचेनि दुःखें । भयानक दृष्टीस देखे ॥
औषध घेतांचि सुखें । आनंद पावे ॥ ४२ ॥
तैसें अज्ञानसन्यपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें ॥
ज्ञान औषध घेतां तें । मुळींच नाहीं ॥ ४३ ॥
जागृतीची ओळखण । ऐक तयाचें लक्षण ॥
जो विषयीं विरक्त पूर्ण । अंतरापासूनी ॥ ४४ ॥
जेणें विरक्तीस न यावें । तो साधक ऐसें जाणावें ॥
तेणें साधन करावें । थोरीव सांडूनि ॥ ४५ ॥
साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध झाला ॥
त्याहूनि मुमुक्षु भला । ज्ञानाधिकारी ॥ ४६ ॥

## समास ( ७ ) बद्धलक्षण नाम.

सृष्टि जे कां चराचर । जीव दाटले अपार ॥
परी ते अवघे चत्वार । बोलिजेती ॥ १ ॥
ऐक तयाचें लक्षण । चत्वार ते कोणकोण ॥
बद्ध मुमुक्षु साधक जाण । चौथा सिद्ध ॥ २ ॥
आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अंधारीचा अंध जैसा ॥
चक्षुवीण दाही दिशा । शून्याकार ॥ ३ ॥
भक्त ज्ञाते तापसी । योगी वीतरागी संन्यासी ॥
पुढें देखिला दृष्टीसी । येणार नाहीं ॥ ४ ॥
न दिसे नेणें कर्माकर्म । न दिसे नेणें धर्माधर्म ।
न दिसे नेणें सुगम । परमार्थ पंथ ॥ ५ ॥

तयास न दिसे सच्छास्त्र । सत्संगति सत्पात्र ॥
सन्मार्ग जो कां पवित्र । तो ही न दिसे ॥ ६ ॥
न कळे सारासार-विचार । नकळे स्वधर्म आचार ॥
न कळे कैसा परोपकार । दानपुण्य ॥ ७ ॥
नाहीं पोटीं भूतदया । नाहीं शुचिष्मंत काया ॥
नाहीं जनास निववावया । वचन मृदु ॥ ८ ॥
न कळे भक्ति न कळे ज्ञान । न कळे वैराग्य नकळे ध्यान
न कळे मोक्ष न कळे साधन । या नांव बद्ध ॥ ९ ॥
न कळे देव निश्चयात्मक । न कळे संताचा विवेक ॥
न कळे मायेचें कौतुक । या नांव बद्ध ॥ १० ॥
जयास नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण ॥
तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाहीं ॥ ११ ॥
दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मैत्री नाहीं ॥
शांति नाहीं क्षमा नाहीं । या नांव बद्ध ॥ १२ ॥
नाना प्रकारीचे दोष । करितां वाटे परम संतोष ॥
बाष्कळपणाचा हव्यास । या नांव बद्ध ॥ ११ ॥
बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद ॥
बहु द्वंद बहु खेद । या नाव बद्ध ॥ १४ ॥
बहु दर्प बहु दंभ । बहु विषय बहु लोभ ॥
बहु कर्कश बहु अशुभ । या नांव बद्ध ॥ १५ ॥

बहु अभिमान बहु ताठा । बहु अहंकार बहु फाटा ॥
बहु कुकर्माचा साठा । या नांव बद्ध ॥ १६ ॥

बहु निंदा बहु द्वेष । बहु अधर्म बहु अभिलाष ॥
बहु प्रकारचे दोष । या नांव बद्ध ॥ १७ ॥

बहु कल्पना बहु कामना । बहु तृष्णा बहु वासना ॥
बहु ममता बहु भावना । या नांव बद्ध ॥ १८ ॥

परमार्थ विषयीं अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान ॥
नेणें स्वयें समाधान । या नांव बद्ध ॥ १९ ॥

परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ॥
संसारभार जोजार । या नांव बद्ध ॥ २० ॥

सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी ॥
देहबुद्धीची घातली बेडी । या नांव बद्ध ॥ २१ ॥

हातीं द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ ॥
सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ॥ २२ ॥

नेत्रीं द्रव्य दारा पहावी । श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी ॥
चिंतनीं द्रव्यदारा चिंतावी । या नांव बद्ध ॥ २३ ॥

काय वाचा आणि मन । चित्त वित्त जीव प्राण ॥
द्रव्य दारेचें करी भजन । या नांव बद्ध ॥ २४ ॥

द्रव्य दारा तेंचि तीर्थ । द्रव्य दारा तोचि परमार्थ ॥
द्रव्य दरा सकळ स्वार्थ । ह्मणे तो बद्ध ॥ २५ ॥

### (८) मुमुक्षु लक्षणनाम.

संसार मदाचेनि गुणें । नाना हीनें कुलक्षणें ॥
जयाचेनि मुखावलोकनें । दोष चि लागे ॥ १ ॥
ऐसा प्राणी जो कां बद्ध । संसारीं वर्तता अबद्ध ॥
तयास प्राप्त झाला खेद । काळांतरीं ॥ २ ॥
संसारदुःखें दुःखवला । त्रिविध तापें पोळला ॥
निरूपणें पस्तावला । अंतर्यामीं ॥ ३ ॥
झाला प्रपंची उदास । मनें घेतला विषयत्रास ॥
ह्मणे आतां पुरे सोस । संसारीचा ॥ ४ ॥
प्रपंच जाईल सकळ । येथील श्रम तो निर्फळ ॥
आतां कांहीं आपुला काळ । सार्थक करूं ॥ ५ ॥
ऐसी बुद्धि पस्तावली । पोटीं अवस्था लागली ॥
ह्मणे माझी वयसा गेली । व्यर्थची आवघी ॥ ६ ॥
पूर्वीं नाना दोष केले । ते आवघेचि आठवले ॥
पुढें येऊनि उभे ठेले । अंतर्यामीं ॥ ७ ॥
निंदे ऐसे नाहीं दोष । ते मज घडलें कीं विशेष ॥
माझे अवगुणीं आकाश । बुडो पाहे ॥ ८ ॥
नाहीं ओळखिले संत । नाहीं अर्चिला भगवंत ॥
नाहीं अतीत अभ्यागत । संतुष्ट केलें ॥ ९ ॥
नाहीं कष्टविलें शरीर । नाहीं केला परोपकार ॥
नाहीं राखिला आचार । काममदें ॥ १० ॥

सत्य तेंचि उच्छेदिलें । मिथ्य तेंचि प्रतिपादिलें ॥
ऐसें नाना कृत्य केलें । उदरंभराकारणें ॥ ११ ॥
ऐसा पोटीं पस्तावला । निरूपणें पालटला ॥
तोचि मुमुक्षु बोलिला । ग्रंथांतरीं ॥ १२ ॥
पुण्यमार्ग पोटीं धरी । सत्संगाची वांछा करी ॥
विरक्त झाला संसारीं । या नांव मुमुक्षु ॥ १३ ॥
गेले राजे चक्रवर्ती । माझें वैभव तें किती ॥
म्हणे धरूं सत्संगती । या नांव मुमुक्षु ॥ १४ ॥
म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ ॥
म्हणे मी पापी केवळ । या नांव मुमुक्षु ॥ १५ ॥
ह्मणे मी अभक्त दुर्जन । म्हणे मी हीनाहून हीन ॥
ह्मणे मी जन्मलों पाषाण । या नांव मुमुक्षु ॥ १६ ॥
ह्मणे मी दुराभिमानीं । ह्मणे मी तपीळ जनीं ॥
ह्मणे मी नाना व्यसनी । या नांव मुमुक्षु ॥ १७ ॥
ह्मणे मी आळशी आंगचोर । म्हणे मी कपटी कातर ॥
ह्मणे मी मूर्ख अविचार । या नांव मुमुक्षु ॥ १८ ॥
ह्मणे मी अवगुणाची राशी । म्हणे मी व्यर्थ आलों जन्मासी ॥
ह्मणे मी भार झालों भूमिसी । या नांव मुमुक्षु ॥१९॥
आपणास निंदी सावकास । पोटीं संसाराचा त्रास ॥
धरी सत्संगाचा हव्यास । या नांव मुमुक्षु ॥ २० ॥

# दशक ११

## समास (५) राजकारणनाम

कर्म केलेंचि करावें । ध्यान धरिलेंचि धरावें ॥
विवरलेंचि विवरावें । पुन्हां निरूपण ॥ १ ॥

अनन्य राहे समुदाव । इतर जनास उपजे भाव ॥
ऐसा आहे अभिप्राय । उपायाचा ॥ २ ॥

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ॥
तिसरें तें सावधपण । सर्वविषयीं ॥ ३ ॥

चौथा अत्यंत साक्षप । फेडावें नाना आक्षेप ॥
अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावें ॥ ४ ॥

जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ॥
नीति न्यायास अंतर । पडोंच नेदावें ॥ ५ ॥

संकेतें लोक वेधावा । एकूनएक बोधावा ॥
प्रपंचहि सावरावा । यथानशक्त्या ॥ ६ ॥

दोष देखोन झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ॥
दुर्जन सांपडोन सोडावे परोपकार करूनी ॥ ७ ॥

तऱ्हे भरोंच नये । सुचावे नाना उपाये ॥
नव्हे तेंचि करावें । कार्य दीर्घ यत्नें ॥ ८ ॥

फड नासेंचि नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा ॥
अतिवाद न करावा । कोणीएकासीं ॥ ९ ॥

दुसऱ्याचें अभिष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें ।
न सोसे तरी जावें । दिगांतराप्रती ॥ १० ॥
दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटोन घ्यावें ।
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ ११ ॥
अपार असावें पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १२ ॥
शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ॥
क्रिया करून करवावी । बहुतां करवीं ॥ १३ ॥
करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये ॥
परस्परेंचि प्रत्यये । प्रचितीस जाणावा ॥ १४ ॥
जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ॥
बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ १५ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच नेदावें ॥
परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ १६ ॥
लोक पारखून सांडावें । राजकारणें अभिमान झाडावे॥
पुन्हां मेळवून घ्यावें । दुरील दोरें ॥ १७ ॥
हिरवटासी दुरी धरावें । कचरटासी न बोलावें ॥
संबंध पडतां सोडून जावें । एकीकडे ॥ १८ ॥
ऐसें असो राजकारण । सांगतां तें असाधारण ॥
सुचित असतां अंतःकर्ण । राजकारण जाणें ॥ १९ ॥
वृक्षी रूढासी उचलावें । युद्धकर्त्यास ढकलून द्यावें ॥

कारबाराचें सांगावें । आंग कैसें ॥ २० ॥
पाहतां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहवेना ॥
आलें वैभव अभिलाषीना । कांहीं केल्या ॥ २१ ॥
एकांची पाठी राखणें । एकास देखो न सकणें ॥
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ २२ ॥
न्याय बोलतांहि मानेना । हित तेंचि नये मना ॥
येथें कांहींच चालेना । त्यागेंविण ॥ २३ ॥

समास (६) महंतलक्षण नाम

जाणायाचें सांगतां न ये । सांगायाचें नेमस्त न ये ।
समजल्याविण कांहींच न ये । कोणीएक ॥ १ ॥
हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण ॥
वर्तायाचें लक्षण । तेंहि असावें ॥ २ ॥
पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे ॥
सकळिकांचें राखों जाणे । समाधान ॥ ३ ॥
दीर्घ सूचना आधीं कळे । सावधपणें तर्क प्रबळे ॥
जाणजाणोनि निवळे । यथायोग्य ॥ ४ ॥
ऐसा जाण जो समस्त । तोचि महंत बुद्धिवंत ॥
या वेगळें अंतवंत । सकळ कांहीं ॥ ५ ॥
आधींच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी
गुंतल्या लोकास उगवी । विवेकबळें ॥ ६ ॥

ज्यास यत्नाचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे ॥
धीटपणें प्रगटे, दडे । ऐसा नव्हे ॥ ७ ॥
सांकडीमधें वर्तों जाणे । उपाधीमधें मिळों जाणें ॥
अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी ॥ ८ ॥
आहे तरी सर्व ठायीं । पाहों जातां कोठेंचि नाहीं ॥
जैसा अंतरात्मा ठायींच ठायीं । गुप्त झाला ॥ ९ ॥
त्यावेगळें कांहींच नसे । पाहो जातां तो न दिसे ॥
न दिसोन वर्ववितसे । प्राणिमात्रासीं ॥ १० ॥
तैसाच हा ही नाना परी । बहुत जनास शहाणा करी ॥
नाना विद्या त्या विवरी । स्थूल सूक्ष्मा ॥ ११ ॥
राखों जाणें नीतिन्याय । न करी न करवी अन्याय ॥
कठीण प्रसंगीं उपाय । करूं जाणें ॥ १२ ॥
ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा ॥
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ १३ ॥

समास ( १० ) निस्पृहवर्तणुक निरूपणनाम.

मूर्ख एकदेशीं होतो । चतुर सर्वत्र पाहातो ॥
जैसा बहूधा होऊन भोगितो । नाना सुखें ॥ १ ॥
तोचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित ॥
प्रशस्त जाणतां समस्त । विख्यात योगी ॥ २ ॥
कर्ता भोक्ता तत्वता । भुमंडळीं सर्व सत्ता ॥
त्यावेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवणु ॥ ३ ॥

ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ॥
पाहों जातां न सांपडावें एकाएकीं ॥ ४ ॥
वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण ॥
चाळणेविण एक क्षण । जाऊंच नेदी ॥ ५ ॥
त्यागी ओळखीचे जन । सर्वकाळ नित्यनूतन ॥
लोक शोधून पाहती मन । परी इच्छा दिसेना ॥७॥
पुतें कोणाकडे पाहेना । पुतें कोणासीं बोलेना ॥
पुतें एके स्थळीं राहेना । उठोन जातो ॥ ७ ॥
जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तरी जायेना ॥
आपुली स्थिति अनुमाना । येवोंच नेदी ॥ ८ ॥
लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर ।
लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिच्छा ॥ ९ ॥
एवं कल्पितां कल्पेना । ना तर्कितांहि तर्केना ॥
कदापि भावितां भावेना । योगेश्वर ॥ १० ॥
लोक संकल्प विकल्प करिती । ते अवघेचि निर्फळ होती ॥
जनांची जना लाजवी वृत्ति । तेंव्हां योगेश्वर ॥ ११ ॥
बहुतीं शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ॥
तरी मग जाणावें साधिले । महत्कृत्य ॥ १२ ॥
अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ॥

काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ १३ ॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेउनि जनास शिकवावें ।
उदंड समुदाय करावें । परी गुप्तरूपें ॥ १४ ॥
अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ॥
लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ १५ ॥
आधीं कष्ट मग फळ । कष्टाचि नाहीं तें निर्फळ ॥
साक्षपेंविण केवळ । वृथापुष्ट ॥ १६ ॥
लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ॥
जाणजाणोन धरावे । जवळी दुरी ॥ १७ ॥
अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां व्यर्थ जातें ॥
जाणोनि शोधावी चित्तें । नानाप्रकारें ॥ १८ ॥
अधिकार पाहोन कार्य सांगणें । साक्षेप पाहोन विश्वास धरणें ॥
आपला मगज राखणें । कांहीं तरी ॥ १९ ॥
हें प्रचितीचें बोलिलें । आधीं केले मग सांगितलें ॥
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणएकें ॥ २० ।
महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे ॥
जाणते करून विखरावे । नाना देशीं ॥ २१ ॥

# दशक ( १२ )

## समास ( १ ) विमललक्षणनिरूपणनाम.

आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थविवेका॥
येथें आळस करूं नका। विवेकी हो ॥ १ ॥
प्रपंच सांडून परमार्थ कराल। तेणें तुम्ही कष्टी व्हाल॥
प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥
प्रपंच सांडून परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायाला॥
मग तया करंट्याला॥ परमार्थ कैंचा ॥ ३ ॥
परमार्थ सांडून प्रपंच करिसी। तरी तूं यमयातना भोगिसी॥
अंतीं परम कष्टी होसी। यमयातना भोगितां ॥ ४ ॥
संसारीं असतां मुक्त। तोचि जाणावा संयुक्त॥
अखंड पाहे युक्तायुक्त। विचारणा हें ॥ ५ ॥
प्रपंचीं जो सावधान। तो परमार्थ करील जाण॥
प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थीं खोटा ॥ ६ ॥
म्हणोन सावधपणें। प्रपंच परमार्थ चालवणें॥
ऐसें न करितां भोगणें। नाना दुःखें ॥ ७ ॥
पर्णाळि पाहोन उचले। जीवसृष्टि विवेकें चाले॥
आणि पुरुष होऊन भ्रमले। यासी काय म्हणावें॥
म्हणोन असावी दीर्घ सूचना। अखंड करावी चाळणा

पुढील होणार अनुमाना । आणून सोडावें ॥ ९ ॥
सुखी असतो खबर्दार । दुःखी होतो बेखबर ॥
ऐसा हा लौकिक विचार । दिसताचि आहे ॥ १० ॥
म्हणोन सर्वसावध । धन्य तयाचे महिमान ॥
जनीं राखें समाधान । तोचि एक ॥ ११ ॥
चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला
ते वेळे सावरायाला । अवकाश कैंचा ॥ १२ ॥
म्हणोन दीर्घ सूचनेचे लोक त्यांचा पहावा विवेक ॥
लोकाकरितां लोक । शहाणे होती ॥ १३ ॥
परी ते शाहाणे ओळखावे । गुणवंताचे गुण घ्यावे ॥
अवगुण देखोन सांडावे । जनामध्यें ॥ १४ ॥
मनुष्य पारखूं राहेना । आणि कोणाचे मन तोडिना ॥
मनुष्यमात्र अनुमाना । आणून पाहे ॥ १५ ॥
दिसे सकळांस सारिखा । पाहातां विवेकी नेटका ॥
कामी निकामी लोकां । बरे पाहे ॥ १६ ॥
जाणोन पाहिजेत सर्व । हेचि तयाचे अपूर्व ॥
ज्याचे त्यापरी गौरव । राखो जाणे ॥ ७ ॥

## (४) विवेक वैराग्यनाम

महद्भाग्य हाताशीं आलें । परी भोगूं नाहीं जाणिलें ॥
तैसें वैराग्य उपजलें । परी विवेक नाहीं ॥ १ ॥

नाना प्रपंचाच्या वोढी । नाना संकटें सांकडीं ॥
संसार सांडून देशधडी । होय तेणें ॥ २ ॥
तो चिंतेपासून सूटला । पराधीनतेपासून पळाला ॥
दुःखत्यागें मोकळा झाला । रोगी जैसा ॥ ३ ॥
विवेकेंवीण वैराग्य केलें । अविवेकें अनर्थीं घातलें ॥
अवघें व्यर्थचि गेलें दोहिंकडे ॥ ४ ॥
ना प्रापंच ना परमार्थ । अवघें जिणेंचि झालें व्यर्थ ॥
अविवेकें अनर्थ । ऐसा केला ॥ ५ ॥
कां व्यर्थचि ज्ञान बडबाडिला।परी वैराग्ययोग नाहीं घडला
जैसा कारागृहीं अडकला । परमार्थ सांगे ॥ ६ ॥
वैराग्यविणें ज्ञान । तो व्यर्थचि साभिमान ॥
लोभदंभें घोळसून । कासाविस केला ॥ ७ ॥
स्वान बांधले तरी भुके । तैसा स्वार्थामुळें थिंके ॥
पराधिक देखों न सके । साभिमानें ॥ ८ ॥
हें एकेंविण एक । तेणें उगाच वाढे शोक ॥
आतां वैराग्य आणि विवेक । योग ऐका ॥ ९ ॥
विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपच तुटला ॥
अंतर्बाह्य मोकळा झाला । निःसंग योगी ॥ १० ॥
जैसा मुखें ज्ञान बोले । तैसीच सर्व क्रिया चालें ॥
दीक्षा देखोनि चाकित झाले । सुचिष्मंत ॥ ११ ॥

आस्था नाहीं त्रैलोक्याची । स्थिति बाणली वैराग्याची ॥
यत्नविवेकधारणेची । सीमा नाहीं ॥ १२ ॥
तत्काळचि सन्मार्ग लागे । ऐसा अंतरीं विवेक जागे ॥
वक्तृत्व करितां न भंगे । साहित्य प्रत्ययाचे ॥ १३ ॥
सन्मार्गें जगास मिळाला । ह्मणिजे जगदीश वोळला ॥
प्रसंग पाहिजे कळला । कोणीएक ॥ १४ ॥
प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ॥
स्नानसंध्या भगवद्भजन । पुण्यमार्ग ॥ १५ ॥
विवेकवैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हेंकाडपिसें ॥
शब्दज्ञान येळिलसें । आभणचि वाटे ॥ १६ ॥
म्हणोन विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य
रामदास ह्मणे योग्य । साधू जाणती ॥ १७ ॥

## दशक ( १८ )

### समास ( ६ ) उत्तमपुरुष--निरूपण नाम

नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें ॥
विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंगारिजे ॥ १ ॥
शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज ॥
अंतरीं नसतां चातुर्यबीज । कदापि शोभा न पावे ॥ २ ॥
तऱ्हे शीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा ॥
राजकारण संवादा । मिळोंचि नेणें ॥ ३ ॥

ऐसें लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ॥
पापी अपस्मार जनीं । राक्षस जाणावें ॥ ४ ॥
समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना ॥
नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ ५ ॥
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें ॥
हटनिग्रहीं न पडावें । विवेकीं पुरुषें ॥ ६ ॥
बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडिलें तट ॥
कोणी एकाचा शेवट । झाला पाहिजे ॥ ७ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भोवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ ८ ॥
म्लेंछ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड ॥
याकारणें अखंड । सावधान असावें ॥ ९ ॥
सकळ कर्ता तो ईश्वरु । तेणें केला अंगिकारू ॥
तया पुरुषाचा विचारू । विरूळा जाणें ॥ १० ॥
न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंगप्रकार ॥
परीक्षिणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ ११ ॥
महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ॥
अद्भुताचि कार्य करणें । देणें ईश्वराचे ॥ १२ ॥
यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणासी नाहीं सीमा
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १३ ॥
देव ब्राह्मण आचारविचार । कित्येक जनासी आधार ।

सदा घडे परोपकार देणें । ईश्वराचे ॥ १४ ॥
इहलोक परलोक पाहणे । अखंड सावधपणें राहाणें॥
बहुत जनाचें साहाणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥
धर्मस्थापनेचें नर । ते ईश्वराचे अवतार ॥
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥
उत्तम गुणाचा ग्राहिक । तर्क तीक्ष्ण विवेक ॥
धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ १८ ॥
सकळ गुणामधें सार । तजविजा विवेक विचार ॥
जेणें पाविजे पैलपार । अत्रपत्रींचा ॥ १८ ॥

## दशक ( १९ )

### समास ( ९ ) राजकारण नाम.

ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास ॥
तेणें अखंड सावकास । एकांत सेवावा ॥ १ ॥
जेथें तजवीजा कळती । अखंड चाळणा निघती ॥
प्राणीमात्रांची स्थिती—गती । कळों येते ॥ २ ॥
जरी हा चाळणाच करीना । तरी कांहींच उमजेना ॥
हिसेबझाडाचि पाहीना । दिवाळखोर ॥ ३ ॥
अखंड राहतां सलगी होते । अतिपरिचयें अवज्ञा घडते
याकारणें विश्रांतीतें । घेतां नये ॥ ४ ॥
आळसें आळस केला । तरी मग कारभाराचि बुडाला
अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ॥ ५ ॥

उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावी नित्यनेमें ॥
अवकाश कैंचा कुत्रिमें । करावयासी ॥ ६ ॥
या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी
राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ ७ ॥
नष्टासी नष्ट योजावें । वाचाळासी वाचाळ आणावें ॥
आपणावरी विकल्पाचे गोवे । पडोंच नेदी ॥ ८ ॥
कांटीनें कांटी झाडावी । झाडावी परी ते कळों नेदावीं ॥
कळकटेपणाची पदवी । असों न द्यावी ॥ ९ ॥
न कळतां करी कार्य जे तें । तें काम तत्काळचि होतें ॥
गचगचेंत पडतां तें । चमत्कारें नव्हे ॥ १० ॥
कोणी एक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें ॥
याकारणें ढिलेपणें तें । असोंचि नये ॥ ११ ॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १२ ॥
अवघ्यांस अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडिलें ॥
याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥ १३ ॥
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें ते लोकांकरवीं करवावें
कित्तेक खलक उगवावे । राजकारणामधें ॥ १४ ॥
बोलके पाहिलवान कळकटे । तयासींच घ्यावें झटे ॥
दुर्जने राजकारण दाटे । ऐसें न करावे ॥ १५ ॥

खळदुर्जनांसी भ्याले । राजकारण नाहीं राखिले ॥
तेणें अवघें प्रगट झालें । बरें वाईट ॥ १६ ॥
दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ॥
सज्जनापरीस आळवावे । महत्व देउनी ॥ १७ ॥
जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ।
याकारणें ते वाट । बुझुनि टाकावी ॥ १८ ॥
हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ॥
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ १९ ॥
कोठेंच पडेना दृष्टी । ठायीं ठायीं त्याच्या गोष्टी ॥
वाग्विलासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें ॥ २० ॥
हुंब्यास हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥ २१ ॥
धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ॥
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥ २२ ॥
जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ॥
इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ॥ २३ ॥

**समाप्त.**

लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे ।
दिनानाथ हा राम येणार आहे ॥
जयाचेनि योगें सुखानंद लोटे ।
तया देखतां अंतरीं बाष्प दाटे ॥ १ ॥ करुणाष्टकें. १७

## आरती दासबोधाची.

॥ वेदांत संमतीचा काव्यसिंधु भरिला ॥
॥ श्रुतिशास्त्रग्रंथ गीता साक्ष संगम केला ॥
॥ महानुभाव संतजनीं अनुभव चाखिला ॥
॥ अज्ञान जडजीवा मार्ग सुगम झाला ॥
॥ जयजया दासबोधा ग्रंथराज प्रसिद्धा ॥
॥ आरती ओवाळीन विमलज्ञान बाळबोधा ॥ धृ ॥
॥ नवविधा भक्ति रामरूप अनुभवी ॥
चातुर्य निधी मोठा मायाचक्र उगवी ॥
॥ हरिहरहृदयींचे गुह्य प्रगट दावी ॥
॥ बध्दचि सिध्द झालें असंख्यात मानवी ॥ २ ॥
॥ वीसही दशकींचा अनुभव जो पाहे ॥
॥ नित्यनेम .विवरितां स्वयें ब्रह्मचि होये ॥
॥ अपार पुण्यगांठीं तरी श्रवण लाहे ॥
॥ कल्याण लेखकाचें भाव गर्भ हृदयीं ॥ ३ ॥

## आरती श्री समर्थांची

॥ आरती रामदासा । सद्गुरु सर्वेशा ॥
॥ कायावाचा मनोभावें । ओवाळूं परेशा ॥ १ ॥
॥ रामदास मूर्तिमंत । रामचंद्र अवतार ।
॥ कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ॥ २
॥ वैराग्य भक्तिज्ञान । शांति क्षमा विरक्ती ॥
॥ विवेक सालंकृत । क्षमा दया सर्व भूतीं ॥ ३ ॥
॥ सच्चिदानंद घन । रामदास केवळ ॥
॥ दिनकर कृपायोगें । रामचंद्र निर्मळ ॥ ४ ॥

॥ ॐ तत्सत् ॥

# शुद्धिपत्र.

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | २ | सज्जचेनि | सज्जनाचेनि |
| ३४ | १८ | दराशा | दुराशा |
| ३६ | ११ | साक्षा | साक्षी |
| ४० | ३ | मूळमापा | मूळ बापा |
| ४९ | ३ | तजविण | तुजविण |
| ५५ | १ | तझी | तूझी |
| ५९ | १२ | गंतला | गुंतला |
| ६१ | ८ | चालसा | चालता |
| ६६ | ७ | सरेना | स्मरेना |
| ६९ | २ | पराधीतता | पराधीनता |
| ६९ | ९ | तझा | तूझा |
| ७० | १६ | मध | मध्यें |
| ७२ | १४ | रगली | रंगली |
| ७२ | १५ | सर्र | सर्व |
| ७३ | ५ | युग्मा | युग्मीं |
| ७५ | ४ | ढळेना | टळेना |
| ७५ | १० | नेणने | नेणवे |
| ७७ | ७ | निघाला | निमाला |
| ७९ | ७ | दयाळा | दयाळें |
| ९२ | २ | राहे | राहो |
| ९४ | १० | निर्धून | निर्धूत |
| ९५ | १५ | पार्ने | पात्रें |

| | | | |
|---|---|---|---|
| १०३ | १५ | सवें मतेरे | सळें मत्सरें |
| १०३ | १६ | सोर | थोर |
| १०५ | १७ | तक्षणीं | लक्षणीं |
| ११२ | ७ | शोक संताप हासी | बरा कौल पाळी |
| ११९ | १२ | तुटेला | तुटेना |
| ११८ | ३ | कबाड | काबाड |
| १२७ | २ | हासहोरा | हाराहोरा |
| १२९ | १५ | वायुगे | वाउगे |
| १३१ | ९ | हहिहर | हरिहर |
| १३२ | १६ | आली | आलें |
| १३४ | १६ | भ्याड | ध्यास |
| १५० | १६ | देखिती | देखिली |
| १५१ | १५ | व्यापिती | व्यापिली |
| १५२ | १७ | फोडिलीं | फेडिलीं |
| १५८ | ६ | साहे | आहे |
| १६५ | १० | दिसें | दिलें |
| १६७ | १७ | घार | घोर |
| १६६ | १८ | क्षाभले | क्षोभले |
| १८५ | १४ | अंकप्त | अंकपू |
| १९२ | १७ | उठाना | उठावा |
| १९३ | १८ | मारूति | मारूनि |
| १९६ | १५ | दती | दंती |
| २०० | ११ | जेथे जेथें | जेथ जेथें |

| | | | |
|---|---|---|---|
| २०१ | १ | पुरीच्या पुढें शीघ्र घालावें | |
| २०७ | १८ | राघवा | राघवाची |
| २१४ | ८ | बोलली | बोलसी |
| २१६ | २ | वभैव | वैभवें |
| २१६ | ६ | जोडीत | तोंडीत |
| २२० | १६ | सवे | सवें |
| २२३ | २१ | अग्निमुखें | अग्निमूखीं |
| २२९ | ९ | भ्रटला | भ्रष्टला |
| २३० | १३ | म्हण | म्हणे |
| २३१ | १० | जेळां | डोळां |
| २३५ | ९ | चीरें | चीरें करें |
| २३६ | ६ | वधूला | ते वधूला |
| २३६ | १७ | बोता | बोलता |
| २३८ | ४ | त्वांसि | त्वांचि |
| २४१ | ८ | सुधापक्ष | सुधावक्ष |
| २४१ | १७ | पुरीतो | चुरीतो |
| २४२ | १९ | आश्चय | आश्चर्य |
| २४३ | ३ | रा णा | रावणा |
| २४८ | ८ | हाटी | दाटी |
| २४८ | १८ | भूलता वक्त | भूलता वक्र |
| २४९ | ९ | सवै | सवैं |
| २५२ | १८ | रघू | रधू |
| २५५ | ८ | पहा कीं | पहावी |

| | | | |
|---|---|---|---|
| २६२ | १० | आणि ते कूझरीचे | आणिले कूसरीचे |
| २६२ | १८ | चाढिले | चालिले |
| २६३ | १७ | चालिसा | चालिला |
| २७१ | १९ | भाषणाचे | भूषणाचे |
| २७३ | १८ | सव | सर्व |
| २८१ | १५ | पर्ण | पर |
| २८५ | ५ | स्थूळ देहाचा | स्थूल देहाची |
| २८७ | ७ | ध्यास | ध्यासें |
| २८७ | १२ | उच्चारितां | नाम उच्चारितां |
| ३१३ | १० | कातुक | कौतुक |
| ३१५ | १ | मंदार | मंदीर |
| ३२० | ५ | वंदेही | वैदेही |
| ३२५ | ५ | देससंगे | देहसंगें |
| ३३२ | १ | सेवसी | सेवेसी |
| ३४० | १९ | दैन्यधाणा | दैन्यवाणा |
| ३५५ | ३ | नातीं | नाहीं |
| ३५५ | १२ | तैसा | तैसें |
| ३६१ | ५ | रासदास | रामदास |
| ३६९ | ५ | सर्वदा | खबर्दार |
| ३७८ | १० | उपसकु | उपासकू |
| ३७९ | ११ | जाणे | गाणें |
| ३८१ | २० | विदन | विघ्न |

३९९ २ रे ओळीनंतर भाग १० स्फुट श्लोक असें लिहावें

| | | | |
|---|---|---|---|
| ४०१ | ५ | धारण | धारणा |
| ४०२ | १५ | अन्यन | अनन्य |
| ४१० | १२ | पसंतरासि | परांतरासि |
| ४११ | ८ | ास | दास |
| ४१३ | २० | ङदासलीं | उदासली |
| ४१६ | ११ | **विलोरे** हें गाळावें | |
| ४१७ | ७ | बीनती | वीनवी |
| ४३४ | ११ | सरते | परते |
| ४३६ | ८ | गजेंदासी | गजेंद्रासी |
| ४४७ | २ | विस्तारिनी | विस्तारिली |
| ४५० | ८ | हेह | देह |
| ४५१ | ४ | वाचनी | वचनी |
| ४५१ | १६ | चिता | चिंता |
| ४५९ | ८ | हर्वे | हर्ते |
| ४६२ | ५ | मारों माझें | माझें माझें |
| ४६३ | ३ | सद्भाव | सद्भाव |
| ४६७ | १९ | साभाळावें | सांभाळावें |
| ४८९ | १६ | सायध | सावध |
| ४९५ | ३ | आपणाणि | आपणासि |
| ४९५ | ११ | मिमळ | विमळ |
| ४९६ | ३ | वाणे | बाणे |
| ५०३ | १८ | शालों | झालों |
| ५०७ | ८ | वर्ववीतसे | वर्तवीतसे |
| ५१२ | ७ | प्यर्थ | व्यर्थ |

# समर्थांचे मठ-महंत व शिष्य.

(संक्षिप्त चरित्र पुरवणी)

समर्थांनीं सर्व महाराष्ट्रांतच नव्हे तर महाष्ट्राबाहेरही धर्मजागृति उत्पन्न करून बहुजन समाजाला कर्तव्यदक्ष करून सन्मार्गाला लावलें, श्री. ज्ञानेश्वर एकनाथ तुकाराम प्रभृति संतश्रेष्ठांनींही समर्थांच्या पूर्वीं लोकजागृति करून बहूजन समाजाला सन्मार्गाला लावण्याचें श्रेय संपादन केलें होतें. परंतु समर्थांप्रमाणें वरील पूज्य साधुश्रेष्ठांनीं मठ स्थापना करून महंताकडून शिष्यवर्ग तयार करण्याचा सांप्रदाय अंमलांत आणला नव्हता. समर्थांच्या शिकवणींत "राजी" राखून इष्ट कार्य करण्यास जागोजागीं उपदेश केला आहे. वर्तायाचा विवेक राजी राखणें सकळ लोक । हळूहळू पुण्यश्लोक करीत जावे ॥ १३।१०।१७ लोकांचें मनोगत राखून "नभामाजी तारांगणें" असा शिष्य समुदाय करण्यास जागजागीं मठ स्थापना करण्याची समर्थांना आवश्यकता भासली. त्याप्रमाणें त्यांनीं सर्व भरतखंडांत मठ स्थापना केली. रामेश्वरापासून बद्रीकेदारपर्यंत व द्वारकेपासून रामटेकपर्यंत सर्व प्रसिद्ध क्षेत्रीं समर्थांचे मठ व महंत होते. समर्थांनीं एकंदर हजार दीड हजार मठ स्थापन केले होते. असें श्री. देव म्हणतात. (दासबोध—प्रस्तावना पान १७) समर्थांनीं

आपले हयातींत एकंदर अकराशें मठ स्थापन केले असें श्री. भावे म्हणतात. ( महाराष्ट्र सारस्वत पान २०८ ) प्रत्येक मठांत महंत अगर मठपति असत. मुख्य मठांत मठपति ब्रह्मचारी असत. समर्थ परीक्षा घेऊन महंत नेमीत असत. समर्थांची शिक्षा कडक असे. समर्थांचा धकाकीचा मामला असे व तो अशक्ताला सहन होत नसे. समर्थ आपल्या वयाच्या सत्तराव्या वर्षी हेळवाकपासून चाफळपर्यंत घोड्यावर भरधांव बसून आले होते यावरून त्यांची शरीरयष्टी किती बळकट होती याचें अनुमान करतां येईल. समर्थांचे कांहीं प्रसिद्ध मठ व मठपतिः--

१।२ चाफळ व सज्जनगड--खुद्द समर्थ, ३ डोमगांव--कल्याण, ४ शिरगांव-दत्तात्रेय-कल्याणांचे वडील बंधु ५ रामेश्वर–हनुमान ६ बद्रीकेदार–दयाळ ७ प्रयाग--वेणीमाधव ८ अयोध्या--रामकृष्ण ९ मथुरा; हरिकृष्ण १० रामटेक--श्रीधर ११ सोमनाथ--विश्वंभर १२ कांची--भगवंत १३ ओंकारेश्वर--ब्रह्मदास १४ द्वारका--हरि १५ काशी--रामचंद्र १६ गोकर्ण--भैरव १७ श्रीरंगपट्टण--शंकर १८ पंढरपूर--अनंत १९ कण्हेरी -वासुदेव २०।२१ टाकळी व इंदूर--उद्धव २२ हरिद्वार--जयकृष्ण २३ अवंतिका--रघुनाथ २४ श्री

सत्याशेखर २५ ओदुंबर--हरिदास इत्यादि मठपति महंत-शिष्य- प्रशिष्याशिवाय तत्कालीन राजकार्य धुरंधर पुरुषांमध्येंही समर्थांचे पुष्कळ शिष्य होते:--

१ श्री शिवाजीमहाराज, २ रामचंद्रपंत अमात्य, ३ बाळाजीपंत चिटणसि, ४ निळोपंत मुजुमदार, ५ अंताजीपंत वाकनीस, ६ नरसोपंत अंबरखाने, ७ गणेशपंत रायगडकर, ८ नारायणपंत विजापूरकर, ९ रामकृष्णपंत देवगिरीकर, १० बाळकृष्णपंत शाहापूरकर इत्यादि.

समर्थांच्या कांहीं शिष्यीणी होत्या:--१ वेणाबाई ह्या सर्वांत प्रसिद्ध आहेत. त्यांनीं ग्रंथरचनाही केली आहे, त्यांचें सीतास्वयंवर सुप्रसिद्ध काव्य आहे. त्या मिरजेस राहात. त्यांच्याही कांहीं शिष्यीणी होत्या, वेणाबाईची समाधी सज्जनगडावर आहे. वेणाबाईच्या शिष्यीण बायाबाई, त्यांचे शिष्य समर्थप्रतापकर्ते गिरीधर, २ चिमणाबाई ऊर्फ आक्का यांची समाधि सज्जनगडावर आहे. यांच्या खटपटीमुळें चाफळ व सज्जनगड येथील देवस्थानाची व्यवस्था समर्थांनंतर चांगली चालली, ३ अंबिकाबाई रा. करवीर, ४ सतीबाई रा. शाहापूर, ५ नबाबाई रा. तापी तीर इत्यादि.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.
ठाणे
REFBK-0002828
REFBK-0002828